क्रमांक : ४

महाराष्ट्र विधानसभा

पत्रक भाग – दोन

गुरुवार, दिनांक २२ जानेवारी, २०२६ / माघ २, १९४७ (शके)

**४. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण :-**

विधानसभेचे सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक ३ मार्च, २०२५ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन बुधवार, दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात एकूण २९३ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. २९३ निवेदनांपैकी २५ निवेदने मा. सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आलेली होती व एकूण २६८ निवेदनांपैकी ९४ निवेदने गुरुवार, दिनांक १२ जून, २०२५ रोजीच्या पत्रक भाग – २ क्रमांक ६४ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली. तसेच १७४ निवेदनांपैकी ४५ निवेदने गुरुवार, दिनांक ११ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्रक भाग – २ क्रमांक ११५ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. १२९ निवेदनांपैकी १६ निवेदने सोमवार, दिनांक २० ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रक भाग – २ क्रमांक १२१ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती.आता ११३ निवेदनांपैकी ७३ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती या सोबत वितरीत करण्यात येत आहेत. उर्वरित प्रलंबित ४० निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीद्वारे सन्मा. विधानसभा सदस्यांनी संपूर्णत: ऑनलाईन (Online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (Online) पध्दतीने निवेदने प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग -२ द्वारे अवगत करण्यात येईल.

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : २२ जानेवारी, २०२६

मेघना तळेकर
सचिव – २,
महाराष्ट्र विधानसभा

याची प्रत :

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
७) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष
९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
१०) संगणक कक्ष (Website)
११) एम.के.सी.एल.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

श्री. भास्कर जाधव,श्री. रोहित पवार,श्री. विजय वडेट्टीवार,श्री. अमीन पटेल,श्री. नानाभाऊ पटोले,श्री. अस्लम शेख,श्री. विकास ठाकरे,श्री. डॉ. विश्वजित कदम,श्री. संजय मेश्राम,डॉ. नितिन राऊत,श्री. अमित झनक,श्री. साजिद खान पठाण,श्री. हेमंत ओगले,श्री. अनिल मांगुळकर,श्री. अॅड. राहूल कुल,श्रीमती ज्योती गायकवाड, मा. वि.स.स.

"दि. ९ जानेवारी २०२५ रोजी पुणे शहरातील येरवडा भागात एका आयटी पार्कमध्ये एका तरुणाने भरदिवसा कोयत्याने वार करून एका तरुणीची हत्या केल्याची घटना घडणे, राज्यात महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होऊन सन २०२४ मध्ये मुंबईत ९५८, पुण्यात ४३९ तर नागपुरात २९७ महिला अत्याचाराच्या घटना घडल्याचे निदर्शनास आले असणे,राज्यात महिलांप्रमाणेच अल्पवयीन मुलीदेखील सुरक्षित नसणे, दि.६ फेब्रुवारी २०२५ रोजी जत तालुक्यातील करजगी येथे एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिची हत्या केल्याची घटना उघडकीस येणे, सन २०२४ मध्ये अमरावती जिल्ह्यात बलात्काराची १३२ प्रकरणे नोंद झाली असून त्यातील ९८ प्रकरणे ही अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराची असल्याचे निदर्शनास येणे, छत्रपती संभाजीनगर शहरात सन २०२४ मध्ये अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराची ५६ प्रकरणे घडणे,एकंदरीतच राज्यात महिला आणि अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराची प्रकरणे वाढत असून राज्यातील महिला आणि मुलींमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असणे, परिणामी शासनाने महिलांच्या सुरक्षेकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

मा. मुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन

पुणे शहरातील येरवडा भागात एका आयटी पार्कमध्ये एका तरुणाने भरदिवसा कोयत्याने वार करून एका तरुणीची हत्या केल्याची घटना :-

दिनांक ०७.०१.२०२५ रोजी १८.०० वाजता मयत पीडिता ही मैत्रिणीसह WNS कॉल सेंटर या कंपनीच्या ईमारतीच्या पार्किंगमध्ये थांबली असताना तिच्या कंपनीमध्ये काम करणारा आरोपी याने उसने दिलेल्या पैशाच्या कारणावरुन मयत पीडिता हिच्या उजव्या हातावर धारदार शस्त्राने ४ ते ५ वार

करून गंभीर जखमी केले व त्यामध्ये सह्याद्री हॉस्पिटल, येरवडा येथे पीडिता उपचारा दरम्यान मयत झाली. सदर प्रकरणी येरवडा पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. १४/२०२५, शस्त्र अधिनियम,१९५९ चे कलम २५, ४, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३), १३५ तसेच भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीस दिनांक ०८.०१.२०२५ ते १३.०१.२०२५ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. दिनांक १३.०१.२०२५ रोजीपासून अद्यापपर्यंत आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये असून दिनांक ०५.०४.२०२५ रोजी मा. न्यायालयात आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

करजगी येथे एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिची हत्या केल्याची घटना :-

अल्पवयीन पीडिता ही दिनांक ०६.०२.२०२५ रोजी सकाळी घराबाहेर खेळायला बाहेर गेली असता आरोपीने त्याच्या घरामध्ये पीडितेसोबत जबरदस्तीने शरीरसंबंध करून तिचा खून केला व प्रेताची विल्हेवाट लावण्याकरिता प्रेत पोत्यात भरून पेटीत भरून ठेवले. सदर प्रकरणी उमदी पोलीस ठाणे येथे गु. र. क्रं. २६/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), २३८, ६५(२), १२७(२) सह लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ५(आय), ६, ८, १२ अन्वये दिनांक ०६.०२.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आहे. गुन्ह्यातील आरोपीस दिनांक ०७.०२.२०२५ रोजी अटक करण्यात येऊन दिनांक १८.०२.२०२५ रोजी मा. न्यायालयात आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

सन २०२४ मध्ये राज्यात महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत :-

| अ. क्र. | जिल्हा | एकूण महिला अत्याचार | बलात्कार | |
|---|---|---|---|---|
| | | | महिला | मुली |
| १ | मुंबई | ६३०५ | ४४१ | ६०९ |
| २ | पूणे | २८८७ | ३३६ | ४५५ |
| ३ | नागपूर | १५०२ | २०१ | २२४ |
| ४ | अमरावती | १३९७ | १०१ | १३३ |
| ५ | छत्रपती संभाजीनगर | १९८३ | १३७ | १७२ |

राज्यातील महिला अत्याचाराची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे:-

| वर्ष | सन २०२२ | सन २०२३ | सन २०२४ |
|---|---|---|---|
| दाखल गुन्हे | ४५३३१ | ४७१०१ | ४६४५९ |
| उघड | ४१५९४ | ४५३९७ | ४३५४५ |
| उघडकीस प्रमाण (%) | ९१.७६ | ९६.३८ | ९३.७२ |

सन २०२३ च्या तुलनेत सन २०२४ मध्ये महिला अत्याचाराचे गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण -१.३६ टक्के (-६४२) ने कमी झाले आहे.

बलात्काराच्या गुन्ह्यांचे ६० दिवसात निर्गतीचे प्रमाण सन २०१८ मध्ये १५.३% इतके होते. सन २०२३ मध्ये हे प्रमाण ९१.१% इतके असून सन २०२४ मध्ये सदर प्रमाण ९४.१% इतके आहे.

| वर्ष | २०२२ | २०२३ | २०२४ |
|---|---|---|---|
| निर्गतीचे प्रमाण (%) | ७३.३ | ९१.१ | ९४.१ |

राज्यात महिला अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी करण्यात येणा-या उपाययोजना **पुढीलप्रमाणे आहेत:-**

१. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचा तातडीने निपटारा होण्यासाठी सर्व आयुक्तालय व जिल्हयांमध्ये घटक प्रमुखांच्या नियंत्रणाखाली मुख्यालयाच्या ठिकाणी **महिला सहाय्य कक्षाची** स्थापना करण्यात आली आहे.

२. महिला व मुलींसंबंधीत येणाऱ्या सर्व प्रकारचे गुन्हे नोंदविणे, त्यांचा तपास करून निर्गती करणे, महिलांच्या संबंधीत येणारे सर्व अर्ज चौकशी करणे व या अनुषंगाने आवश्यक त्या ठिकाणी प्रतिबंधक कार्यवाही करणे, समस्याग्रस्त महिलांचे समुपदेशन करणे या प्रकारच्या महिलां संबंधीत समस्यांवर संवेदनशीलपणे व तात्काळ कार्यवाही करण्याकरीता सर्व पोलीस स्टेशन मध्ये पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिका-यातंर्गत **महिला पोलीस कक्ष** स्थापन करण्यात आलेले आहेत.

३. पिडित महिलांच्या सहाय्यासाठी राज्यात १२४ महिला समुपदेशन केंद्र कार्यरत आहेत.

४. बलात्काराच्या गुन्ह्यांचे ६० दिवसांत मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याकरिता ITSSO पोर्टलद्वारे देखरेख करण्यात येते.

५. राज्यात महिला व बालकांच्या अनैतिक मानवी वाहतुकीस प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने एकूण ४५ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षांची स्थापना करण्यात आली आहे.

६. राज्यात महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी निर्भया/दामिनी पथकाची स्थापना करण्यात आली आहे.

७. बलात्कार व ॲसिड हल्यातील पिडीत व्यक्तींना मनोधैर्य योजनेतंर्गत रु. १० लाखापर्यंत मदत दिली जाते.

८. महिला व मुली यावरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता पोलीसांची गस्त वाढविणे, पोलीस काका, पोलीस दीदी यांच्या मार्फत जागरुकता निर्माण करणे अशा उपाययोजना करण्यात येत आहे.

९. हरविलेल्या बालकांना शोधण्यासाठी ऑपरेशन मुस्कान राबविण्यात येते. सन २०१५ ते सन २०२३ या दरम्यान एकूण १२ मुस्कान ऑपरेशन राबविण्यात येऊन त्यात एकूण ३८,९१० अल्पवयीन मुले/मुली यांचा शोध घेण्यात आला आहे.

१०.बाल न्याय अधिनियम २०१५ या कायद्याअंतर्गत राज्यातील सर्व ४९ पोलीस घटकांमध्ये एकुण ४९ विशेष बाल पोलीस पथके (Special Juvenile Police Unit) कार्यरत आहेत.

११.राज्यात २० पोक्सो व १२ जलदगती न्यायालय स्थापन करण्यात आले आहेत.

१२.महिला हेल्पलाईन क्र. १०३, १०९१, ११२ कार्यरत असून त्याद्वारे महिलांना २४*७ मदत देण्यात येते.

१३.लहान मुलांवरील अत्याचाराबाबत १०९८ ही टोल फ्री हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे.

---------------------

लक्षवेधी सुचना क्र. १८७६

# महाराष्ट्र विधानसभा

## मा. श्री. रमेश उर्फ चंदू यावलकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. १८७६ पुढीलप्रमाणे आहे:-

"महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग यांच्याकडे प्रतिवर्षी उर्जेच्या दराबाबत सुनावण्या घेतल्या जातात, नागरीकांमध्ये जागरुकता निर्माण केली जात नाही, महावितरणामार्फत ठाणे जिल्हा व इतर ठिकाणी जेवढे विज वसुली करणारे कंपन्या आहेत त्यांचा मनमानी कारभार चालत असून महाराष्ट्रातून अनेक तक्रारी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग महावितरण कंपन्या व ईतर कंपन्या विरुध्द लोकप्रतिनिधी व नागरीकांमार्फत आलेले असणे, अनेक वेळा प्रशासनाकडे वाढत्या विजविलाविरुध्द मोठे मोठे आंदोलन व सुनावण्या झाल्या असुन त्या सर्व सुनावण्या या महावितरण विरुध्दच आहे परंतु याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग महावितरणाच्या फ्रेंचायसी कंपन्याविरुध्द कुठलीही ठोस कारवाई करत नसल्याचे दिनांक २४/२/२०२५ रोजी सचिव महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग यांच्याकडे फ्रेंचायसी कंपनी टोरेंट पॉवर यांच्याविरुध्द अनेक नागरीकांनी तक्रार केलेली असणे, महावितरण व त्यांची फ्रेंचायसी कंपनी जनतेला विज वितरण करत असतांना गृहोपयोगी विद्युत उपकरणांना युनिटस लावले जातात त्या उपकरणांबाबत तासी किती युनिट पडतात याबाबत महावितरणाने ग्राहकांना कुठलीही जागरुकती केलेली नाही, रसकट वाढीव बिले पाठवुन महावितरणांना जाब विचारल्यास विजगळतीचे उदाहरण देऊन जनतेची दिशाभुल करतात विद्युत उपकरणांना प्रतितासी किती युनिट लागते याबाबत प्रत्येक बिलाच्या मागे सुचना आली पाहिजे त्यामुळे लोक जागरुक होण्याची शक्यता जास्त आहे आणि महावितरण व टोरेंट फ्रेंचायसी कंपनीमध्ये जे हितसंबंध जपलेले आहेत ते नष्ट होतील आणि गैरकारभार बंद होण्याची शक्यता असल्याने शासनाने तात्काळ जनतेचे वाढीव विजबिलांचे गैरकायदेशीर पैसे वसूल करत असल्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदीनुसार मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगास राज्यातील वीज वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चीत करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. बहुवर्षीय वीजदर विनियमानुसार एकुण महसूलाची गरज व त्याप्रमाणात वीजदर ठरवून मिळावेत याकरीता मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे वितरण कंपनीतर्फे प्रस्ताव सादर करण्यात येतो. तद्नंतर मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडून राज्यातील महसुली मुख्यालयांच्या ठिकाणी जाहीर सुनावणी घेण्यात येते.

मा. आयोगाद्वारे जाहिर केलेले बहुवर्षीय वीजदर विनियम २०१९ व २०२४ नुसार महावितरणने आर्थिक वर्ष २०२२-२३ व आर्थिक वर्ष २०२३-२४ चे अंतिम अचुक समायोजन, आर्थिक वर्ष २०२४-२५ चे तात्पुरते समायोजन व आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० साठी एकुण महसूली गरज याकरीता मा.आयोगासमोर दि. ३० नोव्हेंबर, २०२४ रोजी बहुवर्षीय वीजदर याचिका दाखल केली. सदर याचिका मा. आयोगाने दि. २२ जानेवारी, २०२५ रोजी दाखल करुन घेऊन,सदर बहुवर्षीय वींजदर याचिकेवर सूचना व हरकती मागविण्यासाठी दि.२४.०१.२०२५ रोजी महावितरण कंपनीने दोन इंग्रजी आणि दोन मराठी भाषेतील दैनिक वृत्तपत्रांमध्ये सार्वजनिक जाहिर सूचना प्रकाशित केली. अधिक जागरूकता निर्माण करण्यासाठी महावितरणने ग्राहक वीज बिलांवर वीजदर याचिकेबद्दल संदेश प्रकाशित केला होता. तसेच, याची ग्राहकांना एसएमएस (SMS) आणि ई-मेलद्वारे माहिती देण्यात आली व दि. १८.०२.२०२५ पर्यंत ग्राहकांनी सूचना व हरकती ऑनलाईन अथवा प्रत्यक्ष स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले.

मा. वीज नियामक आयोगाकडून दि.२५.०२.२०२५ ते दि.०४.०३.२०२५ या कालावधीत महाराष्ट्रातील महसूल मुख्यालयांच्या ठिकाणी जाहीर सुनावणी ऑनलाईन पध्दतीने तसेच ज्या ग्राहकांकडे ऑनलाईन सुविधा उपलब्ध नसतील अशा ग्राहकांसाठी नवी मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, नागपूर येथे प्रत्यक्ष ई-सुविधा केंद्रामध्ये व्यवस्था करण्यात आली होती.

वीज दरवाढीचा ऐतिहासिक कल लक्षात घेता, जर महावितरणने प्रचलित पद्धतीने व्यवसाय (Business as Usual)" पद्धती अवलंबिली असती, तर सध्याचा १९.४५ प्रति युनिट (आर्थिक वर्ष २०२४-२५) इतका सरासरी वीज पुरवठा दर आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ११०.३२ प्रति युनिटपर्यंत व आर्थिक वर्ष २०२९-३० मध्ये ₹ १४.६७ प्रति युनिटपर्यंत वाढलेला असता. परंतू, महावितरण कंपनीने गेल्या अडीच वर्षात राज्याच्या वीज पुरवठ्यासाठी

केलेल्या नियोजनामुळे आगामी पाच वर्षात कंपनीची वीज खरेदी खर्चात ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने त्याचा लाभ आगामी पाच वर्षासाठी महावितरण कंपनीमधील वीज ग्राहकांना देऊन वीज दरात कपात करण्याचे शक्य झाले. प्रामुख्याने सौर, पवन, पंप स्टोरेज, बॅटरी स्टोरेज या नवीकरणीय ऊर्जेवर भर, स्वस्त हरित स्रोतांमधून वीज दराचा लाभ घरगुती, औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांना वीजदर कपातीच्या स्वरूपात देण्यात आला आहे.

मा. वीज नियामक आयोगाने दि.२५.०६.२०२५ च्या आदेशाद्वारे पुढील पाच वर्षांकरिता २% (आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी) ते ९% (आर्थिक वर्ष २०२९-३० साठी) वीजदर कपात मंजूर केली आहे. यामध्ये कुठलाही बदल करण्याचा अधिकार महावितरण कंपनी अथवा शासनास नाही. सदर वीजदर १ जुलै २०२५ पासून लागू करण्यात आली असून, नविन वीजदराप्रमाणे वीज बिल देण्यात येत आहेत.

महावितरणच्या शिळ, मुंब्रा व कळवा उपविभागातील वीज वितरण व्यवस्था फ्रेन्चाइझी तत्वावर दि. ०१.०३.२०२० पासून मे. टोरंट पॉवर लिमीटेड यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. शिळ, मुंब्रा व कळवा वितरण फ्रेन्चाइझी विभागात मे. टोरंट पॉवर लि. कडून संबंधित वितरण फ्रेन्चाइझी करारातील तरतुदीनुसार तसेच महावितरण व मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेद्वारे कामकाज करण्यात येते. महावितरणच्या ग्राहकास लागु असलेल्या दराप्रमाणेच भिवंडी, शिळ, मुंब्रा व कळवा वितरण फ्रेन्चाइझी विभागातील सर्व ग्राहकांना वीज देयके दिली जातात.

विद्युत उपकरणांना प्रति तास किती युनिट लागतात यासारखी माहिती ग्राहकांसाठी महावितरणच्या (www.mahadiscom.in) या संकेतस्थळावर "ज्ञानकेंद्र" या शिर्षकाखाली "अंदाजीत वीज वापर जाणून घ्या" या ठिकाणी उपलब्ध आहे. ग्राहक त्यांच्या उपकरणांचा प्रति तास युनिट या ठिकाणी तपासू शकतात. तसेच महावितरणच्या मोबाईल ॲप मध्ये सुध्दा विविध उपकरणांचा प्रति तास किती युनिट वीज वापर होतो याची माहिती ग्राहकांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. भिवंडी, शिळ, मुंब्रा व कळवा वितरण फ्रेन्चाइझी विभागात कार्यरत असलेल्या मे. टोरंट पॉवर लि. हया वितरण फ्रेन्चाइझी च्या (www.connect.torrentpower.com) या संकेत स्थळावर संबंधीत माहिती वित्तरण फ्रेन्चाइझी क्षेत्रातील ग्राहकांसाठी उपलब्ध आहे.

भिवंडी, शिळ, मुंब्रा व कळवा वितरण फ्रेन्चाइझी विभागात में, टोरंट पॉवर लि. कंपनीद्वारे महावितरणपेक्षा जास्त दराने वीजदेयके देण्यात येतात, अशा तक्रारी विविध लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झाल्या होत्या. त्याअनुषंगाने वीज देयकातील अनियमितता तपासण्याकरीता मुख्य अभियंता, भांडूप शहर परिमंडळ यांचे अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने भिवंडी, शिळ, मुंब्रा व कळवा या विभागात वीज बिलांची तपासणी केली असता सर्व वर्गवारीच्या वीज ग्राहकांची वीज बिले मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने ठरविलेल्या दरानुसार आकारण्यात येत असल्याचे दिसून आले व त्यात कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आली नाही. महावितरण व वितरण फ्रेन्चाइझीतर्फे वीज ग्राहकांना गैरकायदेशीर व वाढीव वीज बिल दिले जात नाही.

भिवंडी, शिळ, मुंब्रा व कळवा या वितरण फ्रेन्चाइझी विभागातील ग्राहकांच्या वीजदेयकांसंबंधित व इतर तक्रारीच्या निराकरणासाठी मे. टोरंट पॉवर लि. तर्फे ५ अत्याधुनिक ग्राहकसेवा केंद्रे उभारली आहेत. तसेच दोन्ही वितरण फ्रेन्चाइझी विभागात में, टोरंट पॉवर कं. लि. मार्फत २४ x ७ टोल फ्री क्रमांक, ग्राहक पोर्टल (connect.torrentpower.com) आणि मोबाईल ॲप्लीकेशन (Torrent Connect) अशा यंत्रणेमार्फत तक्रार नोंदणीचे पर्याय ग्राहकांना उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. यानंतरही ग्राहकांची तक्रार असल्यास महावितरण नोडल कार्यालय, ठाणे आणि भांडूप परिमंडळ यांच्याकडे दाद मागू शकतात. तसेच संबंधित वितरण फ्रेन्चाइझी विभागातील ग्राहकांच्या तक्रार निवारणासाठी, भांडूप येथे ग्राहक तक्रार निवारण मंच (Consumer Grievance Redressal Forum) ची स्थापना करण्यात आली आहे. ग्राहक तक्रार निवारण मंचाकडून ग्राहकांच्या तक्रारीचे निराकरण न झाल्यास संबंधीत वितरण फ्रेन्चाइझी विभागातील ग्राहकांसाठी मुंबई येथे विद्युत लोकपाल (Electricity Ombudsman) यांची नियुक्ती मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग यांचेकडून करण्यात आलेली असून ग्राहक विद्युत लोकपालांकडे तक्रार करु शकतात.

****************************************************************************

लक्षवेधी सूचना क्र.२३९६

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

सर्वश्री. बाबासाहेब देशमुख, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मौजे शिंगवे, ता.सांगोला येथून जाणारा रत्नागिरी ते नागपूर (राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६) चे काम जी.आर.इन्फ्रा.प्रा.लि.या कंपनीकडून करण्यात येणे, तलाठी शिवणे यांच्या दि.१६.१२.२०२१ रोजी वा त्यासुमाराच्या अहवालानुसार सदर कंपनीने अनधिकृतपणे उत्खनन गट क्र.२९०,२८०,२८४,२८६,२८७,२८९,२९१,२९२/२ या गटातून बेकायदेशीर २ लाख ७७ हजार ७५८ वास गौणखनिजाचे उत्खनन करण्यात येणे, त्या अनुषंगाने सांगोला तहसिलदार यांनी सदर कंपनीला २९४ कोटी ४२ लाख ३५ हजार ३५० रकमेच्या दंडाची नोटीस जा.क्र.गौणखनिज कावि/१२२६/२०२१ या पत्रान्वये देण्यात येणे, परंतु तत्कालीन अप्पर जिल्हाधिकारी, तत्कालीन प्रांत अधिकारी, तत्कालीन जिल्हा खनिकर्म अधिकारी, उप अधिक्षक, भूमी अभिलेख सांगोला व तहसिलदार यांनी सदर कंपनीशी आर्थिक हितसंबंध जोपासून सदर प्रकरणी बोगस कागदपत्रे व खोटा अहवाल तयार करून दिल्याने शासनाचे सुमारे २९४ कोटीहून अधिक रूपयांचा महसूल बुडाला असणे, त्याचप्रमाणे जी.आर.इन्फ्रा.प्रा.लि. या कंपनीने मौजे शिवणे ता.सांगोला येथील गट नं.३९३/२/३ मधून विनापरवाना मुरूम व दगड यांचे अवैध उत्खनन केल्याप्रकरणी सदर कंपनीला ४ कोटी ९१ लाख ४० हजार इतका दंड दि.५.२.२०२१ रोजी तहसिलदार, सांगोला यांच्याकडून आकारण्यात येवून अद्याप सदर दंडाची रक्कम वसूली करण्यात आलेली नसणे, सबब सदर प्रकरणी शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडवणाऱ्या संबंधित अधिकारी तसेच जी.आर.इन्फ्रा.प्रा.लि. या कंपनीवर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.."

---

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

जी.आर.इन्फ्रा.प्रा.लि. या कंपनीकडून सोलापूर जिल्ह्यात सांगोला व मंगळवेढा तालुक्यातुन रत्नागिरी ते नागपूर (राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६) चे काम करण्यात आले आहे. सदर महामार्गाच्या कामास अनुसरुन मंगळवेढा व सांगोला तालुक्यातुन गौण खनिजाचा वापर करण्यात आलेला आहे. सदर महामार्गाच्या कामाच्या अनुषंगाने कंत्राटदार कंपनी जी.आर. इन्फ्रा.प्रा.लि. यांचेकडून वापर करण्यात आलेल्या एकूण गौण खनिजापैकी मौजे शिवणे ता. सांगोला येथुन अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुक करुन त्याचा वापर राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी केल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यानुषंगाने अवैध उत्खननाबाबत मौजे शिवणे तलाठी, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय,नागपूर यांच्या पॅनलवरील श्री.पाणंद, पुणे व उपअधिक्षक भूमि अभिलेख, सांगोला यांच्या अहवालानुसार तहसिलदार, सांगोला यांनी अवैध उत्खननाच्या अनुषंगाने तहसिलदार, सांगोला यांना संबंधितांवर दंडात्मक आदेश पारित केले.

तहसिलदार, सांगोला यांनी पारित केलेल्या आदेश संबंधितांनकडून उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा यांच्याकडे आव्हानित करण्यात आले असता, उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा यांनी तहसिलदार, सांगोला यांचे आदेश कायम केले. तदनंतर संबंधितांनी सदर आदेश अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे आव्हानित केले असता, अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी तहसिलदार यांनी वेगवेगळया अहवालास अनुसरुन वेगवेगळया दंडात्मक रकमांचे आदेश पारित केले असल्याने सदर प्रकरणाची फेरचौकशी करुन स्पष्टता येण्याच्या अनुषंगाने तहसिलदार, सांगोला यांना अंतिम आदेश पारित करण्याबाबत दिनांक १२.०१.२०२४ रोजी आदेश दिले.

त्यानुषंगाने तहसिलदार, सांगोला यांनी फेरचौकशी केली असता, मौजे शिवणे, ता.सांगोला येथील गट क्र. २८०,२८४,२८६,२८७,२८९,२९१,२९२/२ मध्ये उत्खनन केल्याचे आढळून आले नाही. तथापि, ग.नं. २९० मध्ये २१,९७४ ब्रास इतके गौण खनिज उत्खनन केल्याचे आढळून आल्याने त्याबाबत तहसिलदार, सांगोला यांनी दिनांक २०.०८.२०२४ च्या आदेशान्वये रु.२१,७८,४८,४९५/- एवढया रकमाचे दंडात्मक आदेश पारित केले. तदनंतर संबंधित कंपनीने सदर आदेश उपविभागीय अधिकारी मंगळवेढा, यांच्याकडे आव्हानित केले असुन त्याबाबत सुनावणीची कार्यवाही उपविभागीय अधिकारी मंगळवेढा, यांच्याकडे सुरु आहे.

मौजे शिवणे, ता.सांगोला येथील ग.नं.३९३/२/३ या गटातून संबंधित कंपनीने विना परवाना उत्खनन केल्याबाबत मंडळ अधिकारी शिवणे यांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने सदर कंपनीने ४७२५ ब्रास अवैध उत्खनन केल्याचे आढळल्याने दिनांक ०५.०२.२०२१ च्या आदेशान्वये संबंधित कपंनीविरुध्द रु.४,९१,४०,५५०/- एवढया दंडात्मक रकमाचे आदेश पारित केले. तहसिलदार,सांगोला यांनी पारित केलेल्या आदेश संबंधितांनी उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा यांच्याकडे अव्हानित करण्यात आले असता, उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा यांनी तहसिलदार, सांगोला यांचे आदेश कायम केले. तदनंतर संबंधितांनी सदर आदेश अप्पर जिल्हाधिकारी,सोलापूर यांच्याकडे आव्हानित करण्यात आले असता, अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी, तहसिलदार सांगोला यांना मौजे शिवणे ता.सांगोला येथील ग.नं.३९३/२/३ च्या अनुषंगाने संबंधित कंपनीने केलेल्या अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक याबाबत फेरचौकशी करुन स्पष्टता येण्याच्या अनुषंगाने अंतिम आदेश पारित करण्याबाबत दिनांक ०२.०९.२०२४ रोजी आदेश दिले. त्यानुषंगाने फेरचौकशीची कार्यवाही तहसिलदार, सांगोला यांच्याकडून सुरु आहे.

**************

लक्षवेधी सूचना क्र. २५०४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. शंकर मांडेकर, वि.स.स., यांची महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना:-

"पुणे येथील हिंजवडी फेज वन मध्ये दिनांक १९ मार्च २०२५ रोजी सकाळी आठ वाजता व्युमो ग्राफिक्स कंपनीचे एकूण बारा कर्मचारी कंपनीच्या टेम्पो ट्रॅव्हल्स या वाहनाने कामासाठी जात असताना टेम्पो ट्रॅव्हल्स ला आग लागणे, मागचे दार न उघडल्याने चौघांचा होरपळून दुर्दैव मृत्यू होणे, सहा जण गंभीर जखमी असणे, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असणे या अपघातामुळे सर्वत्र चिंता व्यक्त होणे, शोक व्यक्त होणे त्याचबरोबर येथील कर्मचाऱ्यांचा सुरक्षेतेचा मुद्दा समोर येणे या दुर्घटनाग्रस्त गाडीचा मेंटेनन्स दुरुस्ती देखभाल योग्य पध्दतीने नसल्याचे निदर्शनस येणे, या अपघाताची चौकशी करुन जखमी व मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना तातडीने आर्थिक मदत मिळण्याची आवश्यकता असताना शासन याकडे करीत असलेले दुर्लक्ष, परिणामी जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना लक्षात घेता याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

दिनांक १९ मार्च, २०२५ रोजी सकाळी आठ वाजता व्युमो ग्राफिक्स कंपनीचे टेम्पो ट्रॅव्हल्सला आग लागलेबाबत हिंजवडी पोलीस ठाणे येथे १७१/२०२५ भा.न्या.सं. कलम १०३ (१), १०९ (१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून मा. न्यायालयात दोषारोष पत्र नं. २३५/२०२५ अन्वये दिनांक १९/०६/२०२५ रोजी २ आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. त्याचा आर.सी.सी. नं. ३२२४/२०२५ असा आहे.

सदर टेम्पो ट्रॅव्हलर वरील चालक यानी कंपनीतील कामगारांसोबतच्या सततच्या भांडणाचा राग व चालक कामाच्या व्यक्तीरिक्त इतर कामे सांगत असल्याचा राग मनात धरुन व त्यांना धडा शिकवण्याच्या इरादाने ड्रायव्हर शीट खाली कापडी चिंध्यावर बेन्झीन केमिकल टाकून बसमधील कर्मचाऱ्यांना जीवे

मारण्याचे उद्देशाने कापडी चिंध्यावर काडीपेटीने आग लावल्याने बसमधील ४ पुरुष कामगार मयत तसेच ५ कामगार गंभीर जखमी झाले आहेत.

सदर घटनेतील मृतकावर यंशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय पिंपरी पुणे येथे शवविच्छेदन करण्यात आले असून नमूद घटनेतील जखमी रुग्णांवर रुबी हॉल क्लिनीक, हिंजवडी, पुणे याठिकाणी उपचार करण्यात आले आहेत.

या अपघातग्रस्त वाहनाची तपासणी होणेकामी मा. उपसंचालक सो, रासायनिक विश्लेषण विभाग, गणेशखिंड पुणे यांचेकडे पत्रव्यवहार केला असून त्यांचेकडील अहवाल अदयाप प्राप्त नाही.

अपघात ग्रस्त वाहनाची तांत्रिक तपासणी करण्याकरीता मा. उपप्रादेशिक परिवहन आधिकारी, पिंपरी चिंचवड यांना पत्रव्यवहार करण्यात आला असून त्यांचेकडून तपासणी पत्र प्राप्त करण्यात आले आहे. सदर वाहनात अचानक पेट घेऊन आग लागेल अशी कोणतीही त्रुटी वाहनाचे इंजिन मध्ये आढळून आले नसल्याचे त्यांनी सांगितले आहे.

या अपघातातील मृताच्या नातेवाईकांना व्योमा ग्राफीक कंपनीकडून प्रत्येकी ८ लाख रुपये तसेच कामगार भरपाई देण्याकरीता म्हणून प्रत्येकी १० ते १२ लाख रुपये मदत मा. न्यायालयात जमा करण्यात आली आहे. अपघातातील मृताचे ग्रेज्युएटी,पी.एफ.,रजा रोखीकरण व बोनसच्या रक्कमा त्यांच्या नातेवाईकांना दिल्या असून या अपघातातील जखमीवर उपचार करण्याकरीता अद्यापपर्यंत ६० लाख रुपये खर्च करण्यात आला आहे.

******

लक्षवेधी सूचना क्र. १८१६

## महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. नरेंद्र भोंडेकर, मा. विधानसभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८१६ पुढीलप्रमाणे आहे :-

"भंडारा जिल्ह्यातील महिला रुग्णालय अद्यावत असणे मागील दहा वर्षांपूर्वी या रुग्णालयाची मुहूर्त मेड ठेवण्यात आली असणे या रुग्णालयाची खाट क्षमता शंभर खाट असणे या रुग्णालयाकरिता दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ अन्वये पदनिर्मिती मान्यता शासनाकडून दिली असणे या रुग्णालयाचे नामकरण क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला व बाल रुग्णालय असे असणे करिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे निवेदन दिले असणे नगरपरिषद भंडारा यांनी माननीय लोकप्रतिनिधी यांच्या निवेदनावर शासनास नाम करण्याचा प्रस्ताव सादर केला असणे फेब्रुवारी महिन्यात बाळंतपणाचा मुद्दा जिल्हा रुग्णालयाकडे सादर केला असता बाळंतपणी महिला हिला उपचार मिळत नसणे सदरची तक्रार अधीक्षक लांबट यांच्या निदर्शनास आणून दिली असणे आरोग्य विभागात १०५४ पदे मंजूर असणे पदभरतीची प्रक्रिया अत्यंत संत गतीने होत असणे संबंधित प्रशासकीय अधिकारी यांच्याकडे तात्काळ पद भरण्याकरिता लोकप्रतिनिधी यांनी सूचना केल्या असणे सदर प्रकरणाकडे आरोग्य विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असणे परिणामी शासनाप्रती स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नापसंती व्यक्त केली असणे तात्काळ भंडारा जिल्ह्यातील महिला व बाल रुग्णालय सुरू होण्याकरिता व नामकरण होने करिता शासनाची प्रतिक्रिया व उपाय योजना."

---

श्री. प्रकाश आबिटकर, मंत्री, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण, यांचे निवेदन.

भंडारा येथे १०० खाटांचे नविन महिला रुग्णालयाचे बांधकाम करण्यात येत आहे. सदर महिला रुग्णालयाकरिता दिनांक १३/०२/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये एकुण ९७ पदे निर्माण करण्यात आली आहेत.

सदर महिला रुग्णालयास "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले रुग्णालय" हे नाव देण्याबाबत डॉ. परिणय फुके, विधानपरिषद सदस्य यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दि. १६/१२/२०२४ च्या निवेदनान्वये मागणी केलेली आहे. तथापि, महापुरुषांचे नाव देण्यामुळे भविष्यात कोणताही वाद उद्भवू नये यासाठी आरोग्य विभागाच्या अखत्यारितील आरोग्य संस्था व मालमत्तेला महापुरुषांचे नाव देण्यास मनाई करण्याचा निर्णय दिनांक ०१/०६/२०१२ रोजीच्या शासन निणर्यान्वये घेतलेला

आहे. सदर शासन निर्णयानुसार भंडारा येथील महिला रुग्णालयाचे नामांतर करण्याच्या प्रस्तावाला मान्यता देता येणार नाही.

सद्यस्थितीत भंडारा जिल्हयातील जिल्हा रुग्णालय हे ४८२ खाटांचे असुन जिल्हा रुग्णालयात भरती झालेल्या महिला रुग्णांना संपूर्णपणे रुग्णसेवा पुरविण्यात येतात. त्याठिकाणी महिला रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबतची तक्रार आतापावेतो प्राप्त झालेली नाही.

जिल्हा रुग्णालय, भंडारा व त्याअतंर्गत उपजिल्हा तसेच ग्रामिण रुग्णालय येथे वर्ग १ ते ४ पर्यतची एकुण ९५७ पदे मंजूर असून ७९५ पदे भरलेली आहेत तर १६२ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

*****************

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक-३</u>

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. अतुल भातखळकर, श्री. चेतन तुपे, श्री. अनिल पाटील, श्रीमती सुलभा खोडके, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. योगेश सागर, श्रीमती सना मलिक, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यात विशेषतः मुंबई, नवी मुंबई, कल्याण, मीरा-भाईंदर, कांदिवली, तुर्भे या व अन्य भागात "टोरेस" या विदेशी कंपनीकडून गुंतवणुकीच्या रकमेवर कमी कालावधीमध्ये चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांच्या कोट्यावधी रुपयांची फसवणूक केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, यामध्ये राज्यातील सव्वा लाखापेक्षा जास्त गुंतवणूकदारांची झालेली फसवणूक, मागील वर्षी पोलिस ठाण्यात याबाबत तक्रार करूनही पोलिसांकडून कोणतीही कारवाई केली गेली नसणे, फसवणूक करण्यात येणाऱ्या योजनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी गुन्हे शाखेच्या अखत्यारीत येणारा आर्थिक गोपनिय कक्ष सन २०२० मध्ये बंद करण्यात आला असणे, त्यामुळे नागरिकांची फसवणूक थांबविण्याबाबत सदरहू कक्ष तातडीने सुरू करण्याची गरज असणे, याप्रकरणी पोलिसांनी टोरेस ब्रँड चालविणाऱ्या प्लॅटिनम हर्न कंपनीसह त्यांचे संचालकांवर गुन्हे दाखल करुनही अद्याप गुंतवणूकदारांनी गुंतवलेली रक्कम त्यांना परत न मिळाल्यामुळे त्यांच्यामध्ये पसरलेले भितीचे वातावरण, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन सर्वसामान्य गुंतवणूकदारांना त्यांची रक्कम परत मिळवून देण्यासह शासनाने या कंपनीच्या संचालक व व्यवस्थापक यांच्यावर तात्काळ करावयाची कारवाई तसेच भविष्यात अशा घटना घडू नये याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

### मा.मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

राज्यात विशेषतः मुंबई, नवी मुंबई, कल्याण, मीरा-भाईंदर, कांदिवली, तुर्भे या व अन्य भागात "टोरेस" हा ज्वेलरी ब्रँड चालविणाऱ्या प्लॅटीनम हर्न प्रा. लि. या विदेशी कंपनीने गुंतवणूकदारांना गुंतवणूकीवर दर आठवडयाला अवाजवी व आकर्षक परतावा देण्याचे आमिष दाखविले होते. त्याप्रमाणे

सुरुवातीला काही काळ परतावा दिल्याने गुंतवणूकदारांचा कंपनीवर विश्वास बसला त्यामुळे गुंतवणूकदारांनी आणखी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. परंतु, सदर कंपनीने डिसेंबर, २०२४ मध्ये अचानक परतावा देण्याचे बंद केले. यामुळे सदर कंपनी, कंपनीचे संचालक आणि इतर संबंधितांविरुद्ध गुंतवणुकदारांनी तक्रार दाखल केल्याने (१) शिवाजी पार्क पोलीस स्टेशन, मुंबई, (२)राबोडी पोलीस स्टेशन, ठाणे आणि (३)नवघर पोलीस स्टेशन, मिरा-भाईंदर-वसई-विरार आयुक्तालय येथे दि.०६ जानेवारी, २०२५ रोजी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तर गुप्तवार्ता विभाग कक्ष (एफ.आय.यु.), नवी मुंबई पथकाने गोपनीय चौकशी करुन शासकीय संस्थांकडून आवश्यक ते पुरावे गोळा करुन कंपनीविरुद्ध एपीएमसी पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे दि.०६.०१.२०२५ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे. सदर गुन्हे भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६(५), ३१७(२), ३१७(४), ३१७(५), ३१८(४), ६१ सह अनियंत्रित ठेव योजना प्रतिबंध कायदा, २०१९ चे कलम २१,२३ व २५ सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये दाखल करण्यात आले आहेत. आतापर्यंत शिवाजी पार्क पोलीस स्टेशन, मुंबई येथे दाखल गुन्ह्यात १३,६५२ गुंतवणूकदारांची रु.१३८.३८ कोटी इतक्या रकमेची, एपीएमसी पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे दाखल गुन्ह्यात दि.२७.०२.२०२५ पर्यंत १२७७ गुंतवणूकदारांची रु.१५,५४,४९,३१५/- इतक्या रकमेची, राबोडी पोलीस स्टेशन, ठाणे येथे दाखल गुन्ह्यात १,०५७ गुंतवणूकदारांची रु. ८,३२,२६,४३५/- इतक्या रकमेची तर नवघर पोलीस स्टेशन, मिरा-भाईंदर, वसई-विरार येथे दाखल गुन्ह्यात दि.२३.०२.२०२५ पर्यंत ८०० गुंतवणूकदारांची रु. ९,५७,८३,०२५/- इतक्या रकमेची अशी एकूण १६,७८६ गुंतवणूकदारांची एकूण रु.१७१,८२,५८,७७५/- रकमेची फसवणूक झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. गुंतवणूकदार व फसवणुकीच्या रकमेत वाढ होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत शिवाजी पार्क पोलीस स्टेशन, मुंबई येथे दाखल गुन्ह्याबाबत ७ आरोपींना, एपीएमसी पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे दाखल गुन्ह्याबाबत ४ आरोपींना तर नवघर पोलीस स्टेशन, मिरा-भाईंदर, वसई-विरार येथे दाखल गुन्ह्याबाबत ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच इतर पाहिजे आरोपींचा शोध सुरु असून ९ परदेशी आरोपींविरुद्ध ब्ल्युकॉर्नर नोटीस व लुकआऊट नोटीस जारी करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणामध्ये आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांनी रोख रक्कम, सोने-चांदी-हिरे दागिने, अनामत रक्कम, बँक खात्यातील रक्कम, वाहने असा एकूण रु.३१,८६,५१,७७१/- इतक्या रकमेचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. नवी मुंबई येथील कंपनीच्या शोरुममधून रोख रक्कम, दागिने व इलेक्ट्रॉनिक्स वस्तू असे एकूण रु.१,८९,९०,७२३/- इतक्या रकमेचा मुद्देमाल, कल्याण येथील कंपनीच्या शोरुममधून रोख

रक्कम, सोने, हिरे व चांदीचे दागिने आणि तीन बँक खात्यातील मिळून एकूण रु.१५,२६,००,५२०/- इतक्या रकमेचा मुद्देमाल तर नवघर हद्दीतील कंपनीच्या शोरुममधून रोख रक्कम रु.७३,१०,०००/- पोलीसांकडून हस्तगत करण्यात आली आहे.

केंद्रीय नियामक RBI, ROC, SEBI, Income Tax, Sales Tax यांच्याशी समन्वय ठेवणे, आंतरिक दक्षता ठेवणे, विविध बँकांचे दक्षता विभाग यांचेसोबत समन्वय ठेवणे तसेच संस्थांमध्ये फसवणूक टाळणेसाठी योग्य त्या खबरदारी घेणेबाबत सूचना देणे, गैरवाजवी स्वरुपाचे कर्ज व परतावा देणारे विज्ञापनबाबत माहिती प्राप्त करण्याबाबत आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांच्या अखत्यारितीत आर्थिक गोपनीय कक्ष दि.१०.०३.२००९ रोजी स्थापन करण्यात आला होता. आर्थिक गोपनीय कक्षाकडे असणारी प्रकरणे ही सर्व जनरल चिटींग स्वरूपाचे असल्याने ती सर्व प्रकरणे कक्ष ०४ (जनरल चिटींग) या नव्याने निर्माण करण्यात आलेल्या कक्षाकडे वर्ग करण्यात आली. तसेच आर्थिक गुन्हे शाखेचे इतर कार्य पार पाडण्याकरिता एक नवीन गोपनीय व तांत्रिक शाखा स्थापनेचे प्रस्तावित होते. यास्तव २००९ मध्ये सुरु करण्यात आलेला आर्थिक गोपनीय कक्ष सन २०२० मध्ये बंद करण्यात आला. सदर आर्थिक गोपनीय कक्ष पुन्हा कार्यान्वित करणेबाबत आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई यांच्याकडून करण्यात येत आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालया अंतर्गत गुप्तवार्ता विभाग कक्ष (एफ.आय.यु.), नवी मुंबई दि.२७.१२.२०२३ रोजी स्थापन करण्यात आलेला असून सद्यस्थितीत तो कार्यरत आहे.

गुंतवणूकदारांचे पैसे परत करण्याकरीता कंपनीच्या हस्तगत वस्तूंचा लिलाव करण्याच्या प्रक्रियेसाठी मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच एमपीआयडी कायद्यान्वये जप्तीबाबतचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही पोलीसांकडून करण्यात येत आहे.

---

लक्षवेधी सुचना क्रमांक :६४५ गृह विभाग

e

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. भास्कर जाधव, श्री. रोहित पवार, श्री. विजय वडेट्टीवार, मा.वि.स.स यांच्या लक्षवेधी सूचना क्र.६४५ पुढीलप्रमाणे आहे :-**

"दि. १२ ऑक्टोबर २०२४ रोजी माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांची गोळ्या झाडून हत्त्या करण्यात येणे, दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी सिनेसृष्टीतील एका प्रसिद्ध अभिनेत्यावर चोरीच्या उद्देशातून हल्ला होणे, तसेच सदर गुन्हेगाराकडून एका दुसऱ्या सुप्रसिद्ध अभिनेत्याच्या घराची रेकी केल्याचे तपासा दरम्यान दिसून येणे, सदरील घटनांवरून राज्यात दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढत असून सद्यस्थितीत राज्यात लोक प्रतिनिधी, सिनेकलाकार, महत्वाच्या व्यक्ती तसेच सामान्य नागरिक देखील सुरक्षित नसल्याचा जनमानस निर्माण होणे, राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण शाखेच्या अहवालानुसार देशातील सर्वाधिक गुन्हेगारी असलेल्या राज्यात महाराष्ट्राचा समावेश होणे, -महाराष्ट्र जिल्हा सुशासन निर्देशांक २०२४-च्या अहवालानुसार राज्यातील ३६ पैकी ३२ जिल्ह्यात गुन्हेगारी रोखण्यात शासनाला अपयश आल्याचे निदर्शनास येणे, राज्यात महिला अत्याचाराच्या घटना वाढल्या असून माहे, जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत मुंबईत ९५८, पुण्यात ४३९ तर नागपुरात २९७ महिला अत्याचाराच्या घटना घडल्याचे निदर्शनास येणे, महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवाल २०२४ नुसार राज्यात दररोज सरासरी १२१ महिला अत्याचाराच्या घटना घडणे, सद्यस्थितीत राज्यातील नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांचा पोलीस प्रशासनावरील विश्वास कमी होत असणे, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".

---

**मा.मुख्यमंत्री ( गृह) यांचे निवेदन**

दिनांक १२/१०/२०२४ रोजी राम मंदिर टॅक्सी स्टँड जवळ, श्रीराम हाईट बिल्डिंग समोरील रोडवर, खेरनगर, बांद्रा पूर्व मुंबई या ठिकाणी आरोपींनी आपापसात संगणमत करून अग्निशस्त्राद्वारे माजी मंत्री श्री झियाउद्दीन अब्दुल रहीम सिद्धिकी उर्फ बाबा सिद्दिकी यांना जीवे ठार मारले तसेच एका इसमास गंभीर जखमी केले व इतर इसमांच्या जीवितास धोका निर्माण केला म्हणून फिर्यादी यांनी सदर इसमाविरुद्ध कायदेशीर तक्रार दिल्याने निर्मल नगर पोलीस ठाणे गु.र.क्र.५८९/२४ अन्वये दाखल गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे शाखेमार्फत करण्यात येत आहे अन्वये पुर्ननोंद करण्यात आला असून गु.प्र.शा. गु.र.क्र. ८६/२४, भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १०३(१), १०९, १२५, ३(५), ३३६(२), ३३७, ६९(२), २३८ सह भा.ह.का. मधील कलम ३, ५, २५, २५ (६), २५ (७) (१), २५ (८), २५ (९), २७ सह म. पो. कायदा कलम ३७(१) (अ), १३५, सह मोक्का १९९९ कलम ३(१) (i) (ii), ३(२), ३(३), ३(४) अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयात एकुण २६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. नमूद गुन्हयात संघटीत टोळचा सहभाग निष्पन्न झाल्याने दिनांक ३०/११/२०२४ रोजी महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा, १९९९ कलम ३ (१) (i) (ii), ३(२), ३(३), ३(४) चा अंतर्भाव करण्यात आला आहे. मोक्का कायदयान्वये आरोपी क्रमांक १ ते २६ यांना विनांक ०३/१२/२०२४ रोजी फेरअटक करण्यात आली आहे. नमुद गुन्हयात अटक आरोपी क्र. ०१ ते २६ यांचे विरुध्द सबळ पुरावा उपलब्ध झाल्याने मा. विशेष मोक्का न्यायालय, सत्र न्यायालय, मुंबई येथे दि. ०६/०१/२०२५ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. त्यास विशेष कोर्ट केस क्र. ५२/२०२५ देण्यात आला आहे. मा. न्यायालयाच्या आदेशाने कलम १९३(९) भा.ना.सु.स. अन्वये गुन्हयाचा पुढील तपास करण्यात येत आहे.

अभिनेता सैफ अली खान यांच्यावरील जीवघेणा हल्ला याबाबत वांद्रे पोलीस ठाणे, गु.र.क्र. ८५/२५, भा.न्या. संहिता २०२३ मधील कलम ३११, ३१२, ३३१ (४), ३३१ (६), ३३१(७). सह भारतात प्रवेशास प्रतिबंध अधिनियम १९४८ कलम ३(ए), ६(ए), सह परकीय नागरीक आदेश १९४६ कलम ३(१), १४ अन्वये गुन्हा नोंद आहे. नमुद गुन्हयाच्या तपासात भारती व्हिला व नेक्स्ट ॲव्हेन्यु या बिल्डींगच्या सिसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता नमुद आरोपी वांद्रे पश्चिम या ठिकाणी घरात किंवा बिल्डींगमध्ये चोरी करण्याच्या उद्देशाने फिरताना/रेकी करताना दिसून आले आहेत. सदर गुन्हयातील आरोपीस दि.१९.०१.२०२४ रोजी अटक केली आहे. तपासात सदर आरोपी बांग्लादेशी नागरीक असल्याने निष्पन्न झाले आहे. आरोपीविरूध्द सबळ पुरावे प्राप्त करण्यात आले आहेत.

क्राईम इन इंडीयाच्या सन २०२२ च्या अहवालानुसार महाराष्ट्र राज्यात भादंवि कायद्यान्वये ३,७४,०३८ गुन्हे दाखल आहेत.तसेच दर एक लाख लोकसंख्येमागे क्राईम रेट २९७.५ आहे.

सन २०२४ मध्ये भादंवि व भान्यासं कायद्यान्वये (IPC & BNS) एकूण ३,८३,०३७ गुन्हे दाखल असून या कालावधीची तुलना सन २०२३ अखेर ३,८५,६२३ दाखल गुन्हयांशी केली असता -०.६७% (-२५८६) ने एकुण दाखल गुन्हयांमध्ये घट झाली आहे. सन २०२४ मधील दाखल गुन्हयांची तुलना सन २०२३ शी केली असता, खून, दुखापत, दरोडा, जबरीचोरी, घरफोडी, चोरी, दंगल व फसवणुक या महत्वाच्या शिर्षकामध्ये घट झाली आहे. दोषसिध्दी प्रमाण सन २०२४ मध्ये भादंवि व भान्यासं गुन्हयांच्या दोषसिध्दीचे प्रमाण ५०.५% इतके असून सन २०२३ अखेरशी तुलनाकेली असता +२.४% ने दोषसिध्दीच्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

सन २०२४ मध्ये सिनेकलाकार यांचेवर एकुण १० हल्ले व धमकीचे गुन्हे मुंबई शहर येथे दाखल करण्यात आले आहेत. सर्व गुन्हे उघडकीस आणण्यात आले असून आरोपींवर योग्यती कारवाई करण्यात आली आहे.राज्यात इतर जिल्हयात सिनेकलाकार यांचेवर हल्ले व त्यांना धमकी देणेयाबाबत कोठेही गुन्हा दाखल नाही. तसेच सन २०२४ मध्ये राजकीय व्यक्ती यांचेवर एकुण ३५ हल्ले व धमकीचे गुन्हे संपुर्ण राज्यात दाखल करण्यात आले आहेत. एकुण दाखल गुन्हयांपैकी २९ गुन्हे उघडकीस आणण्यात आले असून आरोपींवर योग्यती कारवाई करण्यात आली

सन २०२४ मध्ये महिला अत्याचाराचे एकूण ४६,४५१ गुन्हे दाखल असून या कालावधीची तुलना सन २०२३ शी केली असता त्यामध्ये -१.३६१% ने घट झाली आहे. सदर घट ही बलात्कारासह खून, हुंडाबळी, आत्महत्त्येस प्रवृत्त करणे, गर्भपात, पती व त्याच्या नातेवाईकांकडून छळ, अपहरण व अपनयन, अनैतिक मानवी वाहतुक इत्यादी महत्वाच्या शिर्षकामध्ये झाली आहे.

अपराधी कृतीबद्दल प्रचलित कायद्यानुसार गुन्हा नोंद करुन, दाखल गुन्हयांचा तपास वरिष्ठांच्या देखरेखीखाली निःपक्षपातीपणे करण्यात येते. गुन्हेगारी टोळ्यांचे मनोधैर्य वाढले नसून, सन २०२४ मध्ये मोक्का अन्यये १७७ गुन्हे दाखल करुन ८४३ आरोपीवर कारवाई केली. गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्याकरीता फौजदारी प्रक्रियासंहिता १०७, ११० बी एनएनएस १२६, १२८, म.पो.का. कलम ५५ ते ५७, एमपीडीए अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येते.

**************

लक्षवेधी सूचना क्र.७८९

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. भीमराव रामजी केराम,श्री. सुधीर सच्चिदानंद मुनगंटीवार वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे:-

"राज्यात गृह विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या पोलीस आयुक्तालयांमधून आदिवासींची तब्बल ३८० राखीव पदे गायब असल्याची धक्कादायक बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये उघडकीस येणे, विशेषता राज्यात बृहन्मुंबई, नवी मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे, सोलापूर, छत्रपती संभाजी नगर, अमरावती, नागपूर, मुंबई, पिंपरी चिंचवड, मीरा-भाईंदर व वसई विरार अशी एकूण बारा आयुक्तालय आहेत. सदर पोलीस आयुक्तालयात गट-अ ते ड संवर्गात एकूण मंजूर पदे ४७ हजार ६६६ आहेत यापैकी अनुसूचित जमातीसाठी ३ हजार ३३१ पदे राखीव आहे .अनुसूचित जमातींची भरलेली पदे ३ हजार १२२ आहे. ३८० पदांचा पूर्वीचा अनुशेष शिल्लक असणे, जात वैधता प्रमाणपत्र सादर करणाऱ्यांची संख्या २ हजार ७४२ आहे.३८० जणांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांची संख्या ३८० असणे, अधिसंख्य पदावर ३८० जणांना वर्ग केल्यानंतर ती पदे रिक्त दाखवायला पाहिजे होती पण कोणतीच पदे रिक्त दाखविण्यात आलेले नाही. बेपत्ता झालेल्या पदांचा छडा लावून आदिवासी समाजाला न्याय द्यावा अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची विशेष पदभरती मोहीम राबविण्यात यावी अशी राज्यातील आदिवासी संघटनांकडून होत असलेली मागणी, याबाबत समाजामध्ये पसरलेला तीव्र असंतोष लक्षात घेता शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

## ** मा.मुख्यमंत्री ( गृह ) यांचे निवेदन **

गृह विभागाच्या अधिपत्याखाली एकुण १२ पोलीस आयुक्तालय कार्यरत आहेत. सन २०२३ च्या आकृतीबंधानुसार त्या कार्यालयांच्या आस्थापनेवर गट-अ ते गट-ड पर्यंत एकूण १,१०,१९० पदे मंजूर आहेत. सदर मंजूर पदांपैकी गट-ब ते त्यावरील संवर्गाची पदे (पोलीस उपनिरीक्षक ते त्यावरील संवर्गाची पदे), तसेच, लिपीक वर्गीय पदे अशी एकुण १६७५१ पदे ही परिक्षेत्रिय कार्यालये, पोलीस महासंचालक यांचे कार्यालय व शासनाकडून भरली जातात. तसेच, उर्वरित पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची एकूण ९३४३९ पदे ही पोलीस आयुक्तालय कार्यालयाकडून सरळसेवा/पदोन्नतीने भरली जातात.

गट-ब ते त्यावरील संवर्गाची पदांची आस्थापना, पोलीस महासंचालक कार्यालय व शासन यांच्याकडे असते. यामुळे, या पदांच्या आरक्षणाची टक्केवारी पोलीस महासंचालक कार्यालय व शासन यांचेकडूनच निश्चित केली जाते.

कृ.मा.प.

पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक यांची पदे पोलीस आयुक्तालय कार्यालयांमार्फत भरली जातात. सद्यस्थितीत, पोलीस आयुक्त कार्यालयातील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील एकूण ९३४३९ मंजूर पदांपैकी ६४५५ पदे रिक्त आहेत. मंजूर पदांमधून अनुसूचित जमातीकरीता असलेल्या ७% आरक्षणानुसार एकूण ६५४१ पदे राखीव आहेत. यांपैकी ४५२ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांपैकी पदोन्नती कोट्यातील मागसवर्गीयांची रिक्त पदे ही सद्यस्थितीत, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि.०७/०५/२०२१ नुसार सेवाज्येष्ठतेने भरली जातात व उर्वरित सरळसेवेची पदे ही पोलीस भरतीने भरण्यात येत आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र. ८९२८/२०१५ व इतर याचिकांमध्ये दि.०६/०७/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात, शासनाने निर्गमित केलेले शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.७२/१६-ब, दि. ०५/०६/२०१८ व शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि. २१/१२/२०१९ मधील तरतुदींनुसार, महाराष्ट्र पोलीस दलातील या १२ पोलीस आयुक्तालयांमधील एकूण ८०० पोलीस अधिकारी/कर्मचारी / लिपीकवर्गीय कर्मचारी यांना त्यांचे जातीचे दावे अवैध ठरल्याच्या कारणास्तव अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आले आहे. त्यापैकी, ७७३ अधिकारी /कर्मचाऱ्यांकरिता शासनाकडून अधिसंख्य पद निर्माण करण्यात आले असून, उर्वरित २७ अधिकारी / कर्मचाऱ्यांकरिता अधिसंख्य पद निर्माण करण्यात आलेले नाही. अधिसंख्य पद निर्माण करण्यात आलेल्या एकुण ७७३ पदांपैकी ५८२ पदे सरळसेवेने / पदोन्नतीने भरण्यात आलेली आहेत. तसेच, उर्वरित १९१ पदे ही भविष्यात सरळसेवेने / पदोन्नतीने भरण्यात येतील.

*********************************************

H-872-1A

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय)अधिवेशन

**श्री. संतोष बांगर, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २०६७ पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्यातील पालघर जिल्ह्यात मौजे ससूपाडा गाव (ता. वसई) ते मौजे आचड (ता. तलासरी) पर्यंत मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.०८ वर रस्त्याच्या दुतर्फा लहान-मोठी हॉटेल्स व ढाबे असणे, बहुतांशी हॉटेल वन विभाग महसूल विभागाच्या तसेच आदिवासी बांधवांच्या जागेवर असून बहुतेक हॉटेल्स अनधिकृत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, मौजे मनोर हलोली (जि. पालघर) येथील एका ढाब्यावर इंधन आणि रसायनांच्या अवैध व्यवसायावर अलिकडेच पोलिसांनी कारवाई केल्यानंतरदेखील उपरोक्त परिसरातील हॉटेल्स व धाब्याच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये अवैधरित्या भंगार-सळ्या-डिझेल आणि विविध रसायनांची बेकायदा खरेदी-विक्री सुरू असल्याचे निदर्शनास येणे, सदरहू अवैध व्यवसाय कळू नये यासाठी महामार्गालगत दर्शनी भागात पत्र्यांचे मोठे शेड लावले जात असून, काही माफियांकडून हे व्यवसाय चालवले जात असणे, तसेच उक्त बेकायदेशीररित्या खरेदी केल्या जाणाऱ्या रसायनांमध्ये ज्वालाग्राही रसायनांचा समावेश असणे, यामुळे एखाद्या वेळेस या ठिकाणी आग लागून मोठी हानी होण्याची भीती येथील स्थानिक-ग्रामस्थ सतत करीत असल्याची बाब देखील समोर आलेली असणे, या गंभीर प्रकरणी नागरिकांमध्ये पसरलेला प्रचंड संताप आणि असंतोषाचे वातावरण, सदर प्रकरणी शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना, याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन.

राज्यातील पालघर जिल्ह्यात मौजे ससूपाडा गाव (ता.वसई) ते मौजे आचड (ता. तलासरी) पर्यंत मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.०८ वर रस्त्याच्या दुतर्फा अनधिकृत हॉटेल, धाबे असल्याची बाब माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली नाही. तथापि, मनोर, दहिसर व मांडवी या आदिवासी वनक्षेत्रात मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.०८ वर रस्त्याच्या दुतर्फा लहान मोठे एकूण २६ हॉटेल/धाबे पूर्वीपासून एकसाली प्लॉट, वनहक्क कायद्याअंतर्गत वाटप जमीन व इतर वाटप क्षेत्रावर अनधिकृतपणे सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधितावर वन कायद्यांतर्गत गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. तसेच नांदगाव तर्फे मनोर, चिल्हार,आवढानी,सातिवली,कुडे हलवली,दुर्वेस या ठिकाणी आदिवासी जागेवर अनधिकृत बांधकाम

झाल्याचे निदर्शनास आले असून महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६चे कलम ३६ व ३६ अ तसेच महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमीन प्रत्यार्पित करणे अधिनियम -१९७४ मधील तरतुदीनुसार २६ अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आली आहेत. तसेच मौजे बोट, हलवली व कुडे येथील ज्या खातेदारांनी जिल्हास्तरीय वनहक्क कमिटी यांचेकडून वाटप करण्यांत आलेल्या क्षेत्राचा वापर उपजिविकेच्या ख-याखु-या गरजांसाठी न करता व्यावसायासाठी करून अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ व वन (संवर्धन) अधिनियम १९८० च्या कायद्याचा भंग केल्याचे निदर्शनास आल्याने खातेदारांचे वनपट्टे रद्द करण्याची शिफारस अध्यक्ष जिल्हास्तरीय वनहक्क समिती तथा जिल्हाधिकारी पालघर यांना दि.०९.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आली आहे. तसेच मौजे चारोटी गट क्र.७४ या वन जमिनीत अनधिकृतपणे हॉटेल बांधकाम असल्याचे दिसून आले असून सदर वन जमिनीबाबत मा. न्यायालयात दावा प्रलंबित आहे.

तसेच मनोर पोलीस व पुरवठा अधिकारी, तहसिल कार्यालय पालघर यांच्या सयुंक्त कारवाई अन्वये दि.०८/०१/२०२५ रोजी चौरसिया ढाब्यामागे ऑईल सदृश्य द्रव्य पदार्थ साठा व विक्री करीत असल्याबाबत एका इसमाविरुद्ध मनोर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नंबर ०७/२०२५ भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम २८७ सह जिवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३,७ तसेच मोटर स्पीरीट अँण्ड हायस्पीड डीझेल ऑर्डर २००५(पुरवठा नियमन व वितरण व गैरव्यवहार प्रतिबंध) चे कलम २ (ए), २(ई), २ (एफ) २ (एच) २ (एम) २ (एन) २(ओ), २ (पी), २ (क्यु) व ३ (४), ३(५), ३ (६) प्रमाणे दिनांक ०८.०१.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्यानुसार आरोपीनकडून रु. १,८०,०००/- चा ऑईल सदृश्य द्रव्य पदार्थ जप्त केला आहे.

आरोपीतांस दिनांक ०८.०१.२०२५ रोजी बी.एन.एस.एस. कलम ३५(३) अन्वये नोटीस देण्यात आली आहे. तसेच रसायनांची बेकायदा खरेदी विक्री होवु नये म्हणुन महामार्गावर नेहमी पेट्रोलिंग नेमण्यात येत असुन महामार्गावरील हॉटेल व ढाब्यांचा परिसराची वारंवार तपासणी करण्यात येत आहे.

**********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. शंकर मांडेकर, श्री. सुनिल शेळके, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २२०८ पुढीलप्रमाणे आहे :

"पुणे जिल्ह्यातील मुळशी व मावळ तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागांमध्ये अनेक ठिकाणी अवैधरित्या गावठी हातभट्टी दारू विक्री केली जात असल्याचे निदर्शनास येणे. मुंबई - पुणे महामार्गालगतची बहुतांश हॉटेल्स व धाबे यांचा देखील यामध्ये समावेश असणे. गुटखा, गांजा, चरस, कोकेन, डोडा पावडर, मेफेड्रोन (एमडी) यांसारख्या अंमली पदार्थांची अवैद्यरित्या राजरोसपणे विक्री केली जात असल्याच्या अनेक तक्रारी स्थानिक ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांसकडून वारंवार होत असणे. सदर अंमली पदार्थांच्या विक्रीमध्ये विविध भागातील दलाल, कुरिअर कंपन्या यांचा देखील समावेश असल्याची शक्यता निर्माण होणे. या जीवघेण्या अंमली पदार्थांच्या नशेसाठी तरुण पिढीमध्ये होत असलेला बेसुमार वापर, परिणामी तरुणांमध्ये वाढत असलेली व्यसनाधीनता व त्यांना होत असलेले अनेक प्रकारचे आजार, यामुळे जनतेमध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण, या अवैध दारू धंद्यावर व अंमली पदार्थांच्या विक्रीवर शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, या पदार्थांच्या विक्रीस कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी शासनाने तात्काळ करावयाची कठोर कारवाई व यावर शासनाची प्रतिक्रिया."

---

मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

पुणे जिल्ह्यातील मुळशी व मावळ तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागांमध्ये अवैधरित्या गावठी हातभट्टी दारू विक्री बाबत पोलीस विभागाकडून पुणे शहर व ग्रामीण भागांमध्ये सन २०२२ ते २०२५ माहे फेब्रुवारी पर्यंत केलेल्या कार्यवाहीअंतर्गत एकूण ४५४० गुन्हे दाखल असून त्यासंदर्भात ३६२८ आरोपींना अटक करण्यात आली. या कार्यवाही अंतर्गत एकूण रु.५,२४,६७,६३२/- किंमतीचा मुद्देमाला जप्त करण्यात आला आहे. तसेच मुंबई-पुणे महामार्गावरील हॉटेल्स व ढाबे या ठिकाणी अवैध गावठी हातभट्टी दारू विक्री बाबत एकूण ८३ गुन्हे दाखल असून त्यात ८५ आरोपींना अटक करण्यात आली व एकूण रु.१,०९,५०,१०३/- किंमतीचा मुद्देमाला जप्त करण्यात आला.

गुटखा, गांजा, चरस, कोकेन, डोडा पावडर, मेफेड्रोन (एमडी) यांच्यासारख्या अंमली पदार्थाची अवैधरित्या राजरोसपणे विक्री केली जात असल्याच्या तक्रारी स्थानिक ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांचेकडून प्राप्त झाल्यास व अशाप्रकारे अवैध धंदे आढळून आल्यास अशा अवैध धंद्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येते. त्याअंतर्गत अवैध गुटख्याबाबत सन २०२२ ते २०२५ माहे फेब्रुवारी पर्यंत केलेल्या कार्यवाहीअंतर्गत एकूण १६४ गुन्हे दाखल असून त्यासंदर्भात २४७ आरोपींना अटक करण्यात आली आहे व या कार्यवाही अंतर्गत एकूण रु.१०,६४,२६,७११/- किंमतीचा मुद्देमाला जप्त करण्यात आला आहे. तसेच, गांजा, चरस, कोकेन, डोडा पावडर, मेफेड्रोन (एमडी) यांचे सारखे अंमली पदार्थांबाबत सन २०२२ ते २०२५ माहे फेब्रुवारी पर्यंत केलेल्या कार्यवाहीअंतर्गत एकूण ६९८ गुन्हे दाखल असून त्यासंदर्भात १०२४ आरोपींना

अटक करण्यात आली आहे व या कार्यवाही अंतर्गत एकूण रु.३७,०७,४७,२८,७११/- किंमतीचा मुद्देमाला जप्त करण्यात आला आहे. अंमली पदार्थ विक्रीमध्ये विविध भागातील दलाल, कुरियर कंपन्या यांचा समावेश असलेबाबत निष्पन्न झाले नाही तरीदेखील पुणे ग्रामीण घटकात अंमली पदार्थ विक्रीमध्ये विविध भागातील दलाल, कुरियर कंपन्या यांचा समावेश आहे का? याबाबत गोपनिय बातमीदारांमार्फत माहिती प्राप्त करून कारवाई करण्यात येत आहे. तरूण पिढीमध्ये अंमली पदार्थांचे सेवन करण्याचे प्रमाण विचारात घेऊन नशा मुक्ती अभियान राबवुन त्यामध्ये तरूण पिढीचा जास्तीत जास्त प्रमाणात समावेश करुन त्यांना व्यसनापासून परावृत्त करणेसाठी मार्गदर्शन करण्यात येते. शाळा कॉलेज येथे भेट देवून तेथील विद्यार्थी व विद्यार्थीनी यांचेमध्ये अंमली पदार्थाचे दुष्परीणाम व कायद्याचे ज्ञान प्रसारीत करण्यात येते.

हातभट्टी दारु तसेच गुटखा, गांजा, चरस, कोकेन, डोडा पावडर, मेफेड्रोन (एमडी) यांसारख्या अंमली पदार्थांच्या विक्रीवर कायमस्वरूपी आळा बसणेसाठी खालीलप्रमाणे उपाय योजना करण्यात येत आहेत :-

- राज्यात अंमली पदार्थाच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्याकरीता शासनाने राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेला आहे.
- शासनाने राज्याकरीता स्टेट अपेक्स लेव्हल कमिटी व ॲन्टी नारकोटीक टास्क फोर्सची निर्मिती केली आहे.
- पोस्ट ऑफीस व कुरीअर सेवा कंपन्यांच्या पार्सल सेवेच्या माध्यमातून अंमली पदार्थाच्या होणाऱ्या विक्रीस आळा घालण्याकरीता पोस्ट ऑफीस व कुरीअर सेवा कंपन्यांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत मार्गदर्शक सुचनावली तयार करुन त्यांना पाठविण्यात आली आहे.
- महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक ठिकाणी विशेष पथके नेमून, गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळवून केसेस दाखल केल्या जातात. तसेच चोरट्या मार्गाने होणाऱ्या वाहतूकीस आळा घालण्याकरीता वाहनांची अचानक तपासणी केली जाते.
- जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त दरवर्षी २६ जून पासून पंधरा दिवस अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविले जाते. सदर कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कक्षामार्फत तसेच स्थानिक पोलीस ठाणे मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रात शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानके व महत्वाच्या चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स, बॅनर्स लावले जातात, पत्रकं वाटली जातात. तसेच पथनाट्य आयोजित करून जनजागृती केली जाते. इतर वेळी सुध्दा ठिकठिकाणी अशासकीय सामाजिक संस्थाच्या सहकार्याने अंमली पदार्थ विरोधात जनजागृतीचे कार्यक्रम आयोजीत केले जातात.
- अंमली पदार्थ विरोधी काम करणाऱ्या अशासकीय संस्था व राज्य शासनामार्फत चालविण्यात येणारी व्यसनमुक्ती केंद्र येथील पदाधिकाऱ्यांशी समन्वय ठेवला जातो. व्यसनाधीन लोकांना व त्यांच्या नातेवाईकांना त्याबाबत माहिती दिली जाते.
- स्वयंसेवी संस्था व आरोग्य विभाग यांच्या मार्फतीने व्यसनी तरूणांचे पुनर्वसन करणे, व्यसनमुक्ती केंद्रातून अशा तरूणांचे समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात येते.

********

## महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये लक्षवेधी सूचना
## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**महसूल व वन विभाग/आस्था-४अ**

**मा.श्री.प्रकाश सुर्वे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २५३० :-**

"मौजे सावे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथील जमीन खरेदी केलेल्या जमिनीचे गट नंबर चे फेरफार मध्ये खाडाखोड करून चुकीचे गट नंबर ची नोंद केलेले असणे, सदर फेरफार मध्ये खाडाखोड करणाऱ्याविरुद्ध योग्य कारवाई करून पूर्ववत सातबारा व फेरफार दुरुस्ती करून मिळावा म्हणून तक्रारदार यांचे मामेभाऊ यांचेसह त्यांचे सह हिस्सेदार यांनी तहसीलदार कार्यालय शाहुवाडी येथे अर्ज केला असणे, सदर अर्जावर सुनावणी सुरु असताना तक्रार दाराची तहसीलदार, शाहुवाडी यांचे दलाल श्री. सुरेश खोत यांनी भेट घेऊन तुमचे प्रलंबित काम पूर्ण करून देतो असे सांगून रुपये ५ लक्ष लाचेची मागणी करणे, याबाबत तक्रारदाराने अँटी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दाखल केली असणे, अँटी करप्शन ब्युरो कोल्हापूर यांनी तक्रारीची पडताळणी केली असता त्यांना रुपये ५ लक्ष लाचेची मागणी करून ती स्वीकारताना श्री. सुरेश खोत यांना पकडण्यात आले असणे, परंतु श्री. खोत यांनी ज्यांच्याकरिता लाचेची मागणी केली त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसणे, असे अनेक एजंट यांच्यामार्फत तेथे वसुली केली जात असणे सामान्य जनता या तहसीलदारांना त्रस्त असणे तरी रामलिंग चव्हाण तहसीलदार शाहुवाडी कोल्हापूर यांच्यावर शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

### श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे सावे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथील जमीन खरेदी केलेल्या जमिनीचे गट नंबर क्र.६१६ या जमिनीशी संबंधित फेरफार क्र.३२२ मध्ये खाडाखोड करून चुकीचे गट नंबर ची नोंद केलेले आहे. म्हणून सदर फेरफारा मध्ये खाडाखोड करणाऱ्याविरुद्ध योग्य कारवाई करून पूर्ववत सातबारा व फेरफार दुरुस्ती करून मिळावा म्हणून तक्रारदार यांचे मामेभाऊ व त्यांचे सह हिस्सेदार यांनी तहसीलदार कार्यालय शाहुवाडी येथे अर्ज केला होता. सदर अर्जावर सुनावणी सुरु असताना तक्रारदार यांची खाजगी इसम श्री. सुरेश खोत यांनी भेट घेऊन तुमचे प्रलंबित काम पूर्ण करून देतो असे सांगून रु.५ लक्ष लाचेची मागणी केली. याबाबत तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर येथे तक्रार दाखल केली. दिनांक १८.०७.२०२३ रोजी तहसीलदार, शाहूवाडी यांनी मौजे सावे येथील गट क्रमांक ६१६ कब्जेदार सदरील खाडाखोड करून घातलेली अधिकची नावे कमी करून संबंधितावर कारवाई करण्याबाबत नमूद करून मौजे सावे तालुका शाहूवाडी येथील फेरफार क्रमांक ३२२ पुनर्विलोकनात घेण्याची मंजुरी मिळणे बाबत उपविभागीय अधिकारी, पन्हाळा विनंती यांचेकडे केली होती.

त्यावर, उपविभागीय अधिकारी, पन्हाळा यांनी दिनांक १७.१०.२०२३ च्या पत्रान्वये सदर परवानगी देता येणार नसल्याचे कळवले व महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग सन २००६ चे महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील कलम ७ (३) आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ प्रमाणे लेखन प्रमादाची दुरुस्तीची प्रक्रिया करून अभिलेख पूर्ववत करणे बाबत कळवले होते. यानुसार तहसीलदार, शाहूवाडी यांनी अर्धन्यायिक प्रकरण क्र. आर टी एस/ एस आर/७५/२०२३ मध्ये सुनावणी घेण्यात आली. सदर प्रकरणांमध्ये मौजे सावे, तालुका शाहूवाडी येथील फेरफार नोंदवही मध्ये नमूद असलेल्या फेरफार क्रमांक ३२२ या फेरफार मध्ये खाडाखोड करून मूळ फेरफार मध्ये परिणाम झालेले भूमापन व उपविभाग क्रमांक या सदरामध्ये अधिकचे गट क्रमांक समाविष्ट केल्या बाबत चौकशी करण्यात आली. चौकशी दरम्यान मूळ फेरफार अभिलेखांमध्ये फक्त सहा गट समाविष्ट होते. परंतु सुनावणी दरम्यान सदर अभिलेखांमध्ये एकूण ३१ गट समाविष्ट असल्याचे निदर्शनास आले आहे. सदरच्या अतिरिक्त गट क्रमांक हे कोणत्याही कायदेशीर आधाराशिवाय सदर अभिलेखांमध्ये नमूद झालेले दिसून आले असल्याने दिनांक ०४.०१.२०२५ रोजी सदरचे अर्धन्यायिक प्रकरण तहसीलदार शाहूवाडी यांनी आदेशासाठी बंद केले.

सदर अर्जावर सुनावणी सुरु असताना तक्रारदार यांची खाजगी इसम श्री. सुरेश खोत यांनी भेट घेऊन अर्जदार यांचे प्रलंबित काम पूर्ण करून देतो असे सांगून रु.५ लक्ष लाचेची मागणी केली. सदरची लाचेची रक्कम स्वीकारताना श्री. सुरेश खोत यास दिनांक १९.०३.२०२५ रोजी अटक करण्यात आले. त्याची पोलीस कस्टडी रिमांड घेवुन त्याचेकडे गुन्ह्याचे अनुषंगाने तपास तपास केला आहे. गुन्ह्याचे तपासात तक्रारदार यांना आरोपीने दिलेला निवाडा आदेश व तहसिलदार कार्यालयातील संबंधित दस्ताऐवज प्राप्त केली असून याप्रकरणी पुढील सखोल तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्यामार्फत सुरू आहे.

श्री.रामलिंग भगावान चव्हाण, तहसिलदार, शाहूवाडी, जि.कोल्हापूर यांची दफ्तर तपासणी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी पन्हाळा यांचेमार्फत पथक नेमण्यात आले. श्री.चव्हाण यांनी जमीन विषयक कामकाजाअंतर्गत अर्धन्यायीक कामकाज हाताळतांना महसूल विभाग शासन निर्णय दि.१७.१२.२०१५ मधील सुचनांचे अनुपालन न करणे, अर्धन्यायिक कामकाजामधील विलंब तसेच कार्यालयीन कामकाजामध्ये अनियमितता निदर्शनास आल्याने शासनाने श्री.रामलिंग भगावान चव्हाण, तहसिलदार, शाहूवाडी यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार श्री. चव्हाण यांचेविरुध्द महसूल व वन विभाग, शासन ज्ञापन दि.०९ ऑक्टोंबर, २०२५ अनुसार महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

*****

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. उमेश उर्फ चंदु यावलकर विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २५१३ पुढीलप्रमाणे आहेः**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे-नारपोली गाव सर्व्हे के. ९३. ९४ व ९१ लगतचे मोठे नाले नादुरुस्त कमकुवत झाल्याने सदर नाल्याच्या बाजुला असलेल्या इमारतींना चोका पोहोचल्यामुळे इमारती ढासळण्याची भविष्यात समस्या निर्माण होऊन मोठ्या प्रमाणात जिवितहानी होण्याची शक्यता असणे, बाजूलाच मेट्रो ब्रिजेस असल्यामुळे इमारती पडुन नुकसान होण्याची संभावना असणे तसेच सदर नाल्याला वन्हाळा तलावाचे पाणी पावसाळ्यात पुरासारखे वाहत असुन सदरचा नाला हा ४० वर्षापुर्वी बांधला गेलेला असल्यामुळे त्याचे नविन रुपांतर त्याने नविन निविदा काढणे आवश्यक आहे व त्या नाल्याचे पुढील काही वर्षासाठी मजबुतीकरण करुन त्या नाल्यावरुन चारचाकी वाहन जाईल असे मोठे स्लॅपसुध्दा टाकणे आवश्यक असल्याने रहदारीचे दळणवळणाच्या साधनासाठी उपयोगी पडेल असे नागरीकांनी दिनांक २६/१०/२०२३ रोजी मा. मुख्यमंत्री व आयुक्त भिवंडी महानगरपालिका यांना तक्रार केलेली असुन शासनाने सदर बाब गांभीयनि घेऊन तात्काळ नाल्याचे नविन बांधकाम करण्यासाठी निविदा काढणे जरुरीचे असल्याने शासनाने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया.

---

उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीत मौजे-नारपोली गाव सर्व्हे नं.९३. ९४ व ९१ लगत मोठा नाला अस्तित्वात आहे. सदर नाल्याचे बांधकाम हे ४० वर्षापूर्वी झालेले असून, सद्यस्थितीत नाल्याच्या भिंती सुस्थितीत आहेत. सद्यस्थितीत नाल्यालगत मनपा हद्दीत तळ मजला स्वरुपाची झोपडपट्टी घरे असून, नाल्यापासून ७ मीटर लांब मेट्रो कॉलम आहेत.

सदर नाल्यातून वऱ्हाळदेवी तलावाचे पाणी वाहत असून, पावसाळ्यापूर्वी नालेसफाई करण्यात येत असल्याने पाण्याच्या प्रवाहास अडथळा निर्माण होत नाही. सदरचा नाला ढासळून भविष्यात समस्या निर्माण होऊ नये याकरिता आवश्यकतेनुसार नाल्याची दुरुस्ती करण्याचे नियोजन होते. तथापि, महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्थळपाहणी केली असता, सद्यस्थितीत नाल्याच्या दुरुस्तीची आवश्यकता दिसून येत नाही.

सदर नाल्याच्या समांतर भंडारी कंम्पाऊंड येथील श्रीकर डाईंग रस्त्याचे सिमेंट कॉक्रिटीकरणाचे काम अंतिम टप्प्यात प्रगतीपथावर आहे. यामुळे नाल्यावर मोठे स्लॅब टाकण्याची आवश्यकता नाही. त्याचप्रमाणे नाल्याची साफसफाई करणे सोईचे व्हावे याकरिता नाला नैसर्गिकदृष्ट्या उघडा ठेवणे आवश्यक आहे.

***********************

लक्षवेधी सूचना क्र. ६८६

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. शंकर जगताप, श्री रोहित पवार, शंकर मांडेकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान~~परिषद~~ सभा नियम १०५ अनुसार दिलेले लक्षवेधी सूचना क्र. ६८६ पुढीलप्रमाणे आहे :-

"पुण्यातील जागतिक दर्जाचे असलेले हिंजवडी आयटी पार्क प्रशस्त रस्त्यांअभावी वाहतूक कोंडीत सापडणे. स्थानिक ग्रामपंचायती,पुणे पिंपरी-चिंचवड महापालिका,पीएमआरडीए, एमआयडीसी, सार्वजनिक बांधकाम विभाग,राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्यातील समन्वयाचा अभाव,अधिकाऱ्यांचा वेळकाढूपणा,चालढकल वृत्तीमुळे गेल्या २५ वर्षात 'आयटी'ला जोडणाऱ्या रस्त्यांचे भक्कम जाळे निर्माण न झाल्याने तेथील कंपन्या इतरत्र स्थलांतरीत होत असणे, आयटीला जोडणाऱ्या अनेक पर्यायी रस्त्यांच्या रेंगाळलेल्या कामांमुळेच वाहतूक समस्या बिकट होणे, हिंजवडी फेज १,२,३ कडे ये-जा करताना पुणे व पिंपरी-चिंचवडकरांना लक्ष्मी चौक मार्गे भूमकर चौक-डांगे चौक व वाकड-हिंजवडी या रस्त्यांचा प्रामुख्याने अवलंब करावा लागणे, परिणामी या रस्त्यांवर ताण येऊन प्रचंड वाहतूक कोंडी होणे.मेट्रोच्या कामामुळेही हिंजवडीतील रस्ते अरुंद होणे. तसेच पर्यायी रस्ते पूर्ण न झाल्याने, कात्रज-देहूरोड बाह्यवळण मार्गावरील भूमकर चौक,वाकड,ताथवडे, पुनावळे याठिकाणचे भुयारी मार्ग(अंडरपास) अरुंद असल्याने तसेच सेवा रस्त्यांचे रुंदीकरण न झाल्याने आयटीतील वाहतूकीस अडथळा निर्माण होणे, आयटी पार्कमध्ये बाहेरून ये-जा करण्यासाठी रामबाण ठरू शकणाऱ्या हिंजवडी-माण-म्हाळुंगे या नवीन सहापदरी रस्त्याचे शेतकऱ्यांशी वाटघाटीबाबत सकारात्मक तोडगा काढून रस्ता तयार केल्यास हिंजवडीतून माण,म्हाळुंगे, बालेवाडीला तसेच पुण्यात जाणे सोपे होण्याची शक्यता.तसेच हिंजवडी फेज १,२ मधील वाहतूक बाहेरच्या बाहेर जाण्यास सोयीचे होण्याकरिता शासकीय विभागात एकोपा नसल्याने कोणतीही कार्यवाही न झाल्याने नागरिकांच्या मनामध्ये शासनाप्रती पसरलेला प्रचंड असंतोष, शासनाने करावयाची व कार्यवाही उपाययोजना."

---

## मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत हिंजवडी, माण, मारुंजी गावांच्या हद्दीमध्ये टप्पा क्र.१, टप्पा क्र.२ व टप्पा क्र.३ अनुक्रमे ९६.४२ हेक्टर, २३७ हेक्टर व ३५१ हेक्टर एवढ्या क्षेत्रावर राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान पार्क विकसीत केले आहे. सदर माहिती तंत्रज्ञान पार्कमध्ये महामंडळातर्फे अंतर्गत सहा पदरी व चौपदरी रस्ते, अंतर्गत जलवितरण वाहिन्या, पथदिवे, वाहतुक बेटे, वृक्षारोपण, विद्युत उपकेंद्र, इत्यादी पायाभुत सोई सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. या आयटी पार्कमध्ये मुख्यतः इन्फोसिस, विप्रो, डेसॉल्ट, टाटा टेक्नॉलॉजीस, पर्सिस्टंट, टेक महिंद्रा, टाटा कन्सल्टन्सिस सर्व्हिसेस, कॉग्निझंट, केपजेमिनी, एस.क्यु.एस. इ. नामांकित माहिती तंत्रज्ञान व इतर उद्योग कार्यरत आहेत.

राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान मधील दैनंदिन कामकाजासाठी लाखो कर्मचारी ये-जा करित असतात. या उद्यानामधील मुख्य रस्ता ६ पदरी रस्ता फुटपाथासह बांधलेला आहे. राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान पार्कमध्ये अंतर्गत रस्त्यांवर वाहतूक कोंडीची समस्या नाही. या क्षेत्रा बाहेर पोहोच रस्त्यांवर होणाऱ्या वाहतुक कोंडीचा त्रास कमी करण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तर्फे शिवाजी नगर पुणे ते हिंजवडी मेट्रो (लाईन-३) हा एकूण २३.३० कि.मी. लांबीच्या प्रकल्पाचे काम हाती घेतले असून सद्यस्थितीत प्रकल्पाचे ८५ टक्के भौतिक काम पूर्ण झालेले आहे. सदर प्रकल्प माहे सप्टेंबर, २०२५ अखेर कार्यान्वित करण्याचे नियोजित आहे. या प्रकल्पाचे काम मुख्य रस्त्याच्या मधील दोन लेन मधून चालू असून त्यामुळे वाहतुक कोंडीचा त्रास सकाळी व संध्याकाळी काही प्रमाणात होत आहे. सदर मेट्रो प्रकल्प कार्यान्वीत झाल्यानंतर या माहिती तंत्रज्ञान पार्कमधील वाहतुक कोंडी कमी होणार आहे.

सद्यस्थितीत हिंजवडी फेज १,२,३ कडे ये-जा करताना पुणे व पिंपरी-चिंचवडकरांना लक्ष्मी चौक मार्गे भूमकर चौक-डांगे चौक व वाकड ते हिंजवडी या रस्त्यांचा प्रामुख्याने अवलंब करण्यात येतो. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मंजुर विकास योजनेतील वाकड चौक ते हिंजवडी ४५ मी. रूंद रस्ता, भुमकर चौक ते हिंजवडी ३० मी. रूंद व ३६ मी. रुंद रस्ते पुर्ण रूंदीने विकसीत केलेले आहेत. आयटी पार्कमध्ये जाणाऱ्या येणाऱ्या मार्गावर होणाऱ्या वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदय यांचेकडे दिनांक १०.०७.२०२५ रोजी व मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) महोदयांच्या उपस्थितीत दिनांक १९.०६.२०२४ रोजी हिंजवडी या भागामध्ये रस्ते विकसीत करणाऱ्या शासकीय यंत्रणा जसे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जिल्हापरिषद, पुणे, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलिस विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशन यांच्या समवेत बैठक घेऊन वाहतूक कोंडी टाळण्यासाठी सूचविण्यात आलेल्या उपाय योजनानुसार संबंधित विभागामार्फत पुढीलप्रमाणे रस्ते रुंदीकरण व बळकटीकरण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(१) **हिंजवडी येथील शिवाजी चौक ते स्मशान भूमी दरम्यानच्या ९०० मी. रुंदीच्या रस्त्याचे रुंदीकरण करणे व लक्ष्मी चौक येथे उड्डाणपूल बांधणे:** - सदरहू रस्ता हा सहा पदरी विकसित करणे व उड्डाणपूलाचे बांधकाम म.औ.वि. महामंडळाच्या अंदाजपत्रकामध्ये निधीची तरतुद करण्यात आलेली असून, सदर कामाकरीता प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यात आली असून निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

(२) **राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यानातील टप्पा क्र १ व ३ मधील माण गावाकडे जाणाऱ्या SH-१३० रस्त्याचे रुंदीकरण करणे व उड्डाणपूल बांधणे.**- सदरहू काम सार्वजनिक बांधकाम व म.औ.वि. महामंडळ

यांच्या संयुक्त विद्यमानाने विकासित करण्यात येणार आहे. सदरहू प्रकल्पाकरीता भूसपंदानाची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) **हिंजवडी-माण-म्हाळुंगे असा पर्यायी रस्ता विकसित करणे :-** सदरहू काम हे म.औ.वि.महामंडळ व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमानाने मुंबई-पुणे बैगलोर महामार्गापासून अंदाजे ६ कि.मी लांबीचा ६ पदरी रस्त्याचे काम हाती घेतले असून यापैकी २.७५ कि.मी लांबीच्या रस्ताचे काम पुणे झाले आहे. उर्वरित ३.२५ कि.मी लांबीचे काम भूसंपादन अभावी अपूर्ण आहे. सदर भूसंपादन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विकास योजनेमधून (TP Scheme) त्वरीत करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. भूसंपादनानंतर उर्वरित काम देखील त्वरीत काम पूर्ण करण्यात येईल.

पुणे सातारा महामार्गावरील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत पीएमसी, पीसीएमसी, पीएमआरडीए या भागामध्ये अस्तित्वात असलेल्या सेवा रस्त्याची रुंदीकरण व मंजबुतीकरण करणे व भुमकर चौक, वाकड, तातवडे, पुनावळे या भागातील दोन्ही बाजूस ५ पदरी सेवा रस्ते उभारण्याचे कामाचे निविदा प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. तसेच रावेत त नऱ्हे एकूण ३८ कि.मी चा उन्नत मार्ग खर्च रु. ३६६० कोटी उभारण्यास केंद्र शासनाच्या आर्थिक व्यवहार मंत्रालयाच्या समिती पुढे मंजूरीसाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत प्रस्तावित आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत लक्ष्मीचौक ते मांरुजी रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी रुंदीकरणासह रस्त्याचे काम केंद्रीय मार्ग निधीमध्ये प्रस्तावित करण्यात आलेला आहे. तसेच हिंजवडी आयटी पार्कमधील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील रस्त्यावरील अनाधिकृत अतिक्रमण हटाव मोहिम वेळोवेळी राबविण्यात येत आहे.

बालेवाडीत स्टेडीअम ते शेडगे वस्ती म्हाळूंगे हा रस्ता २४ मी रुंद करण्यासाठी तसेच हिंजवडी फेज -१ छत्रपती चौक आणि विपरो सर्कल येथे जाण्यासाठी सुर्या हॉस्पीटल ते साखरे वस्ती या रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी तसेच सिम्बायोसीस, नांदे, गोडाबेवाढी, किरणगुट या चौकांचे विरतारीकरण व १७ रस्त्याचे रुंदीकरण, सुधारणा व मजबुतीकरण यासाठी रु ४७३.२८ कोटीचा कार्यक्रमास प्राधिकरणबैठकीमध्ये मान्यता देण्यात आलेली आहे.

वरील प्रमाणे नमूद कामे पुर्ण झाल्यानंतर हिंजवडी येथील आय टी पार्क मध्ये पीसीएमसी व पीएमसी या भागातून जाणाऱ्या व येणाऱ्या वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल.

*******

लक्षवेधी सूचना क्र. ७३६

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**मा. श्रीमती सुलभा गणपत गायकवाड, वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ७३६ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मौजे करवले ता.अंबरनाथ येथील १०० एकर शासकिय व खाजगी जमिन सन २०१० साली एमएमआरडीए ने मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याचा घेतलेला निर्णय, उक्त १०० एकर जमीनीपैकी ३० एकर जमिनीचा ताबा महानगरपालिकेने दोन वर्षापूर्वीच घेणे, उर्वरित जमिन ताब्यात घेण्याबाबतची प्रक्रिया अदयाप चालू असणे, सदर गावातील बहुतांश जमिनी हया शासनाच्या विविध प्रकल्पासाठी बाधित / संपादित करण्यात आल्यामुळे गावाच्या विकासाकरिता उरलेली नसल्याने गावाच्या मुलभूत सोयी-सुविधांकरिता जसे की गावठाण, बगीचा, खेळाचे मैदान, विदयालय, महाविदयालय, समाज मंदिर वा तत्सम सार्वजनिक वापराकरिता ग्रामपंचायतीकडे हक्काची जमीन नसल्याने या गावाचा विकास खुंटलेला असणे, परिणामी शेतक-यांमध्ये / ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी असणे, सध्याची गावाची वाढती लोकसंख्या लक्षात घेता ग्रामपंचायतीकडे हक्काची जमीन असणे गरजेचे असून जेणेकरुन ग्रामपंचायत लोकोपयोग विकास कामे प्राधान्याने करु शकेल, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १५/२/२०२५ रोजी केलेला पत्रव्यवहार, याकरिता शासनाने विशेष लक्ष घालून ग्रामपंचायतीला गावाचा विकास करण्याकरिता व मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्याकरिता जमीन उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे अंबरनाथ कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत आहे. मौजे-करवले, ता. अंबरनाथ हे गाव समाविष्ट असलेल्या अं.कु.ब.प.अ. क्षेत्राच्या विकास योजनेला शासनाने दि.२५/०७/२००५ व दि.११/०८/२००८ (ई.पी.) रोजीच्या अधिसूचनेन्वये मंजूरी प्रदान केली आहे. मंजूर विकास योजनेनुसार मौजे-करवले हे संपूर्ण गाव हरित परिमंडळामध्ये समाविष्ट आहे.

मुंबई महानगर प्रदेशातील घनकचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी प्राधिकरणामार्फत सामाईक भराव भूमी प्रकल्प (Land fill sites) राबविण्यासाठी महसूल व वन विभागामार्फ़त दि. ३० जुलै, २०१० रोजीच्या आदेशाद्वारे ठाणे व रायगड जिल्ह्यातील शासनाच्या मालकीच्या जमीनींचा आगाऊ ताबा प्राधिकरणास हस्तांतरित करण्यात आला आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, ठाणे यांचे दि. ०६/०८/२०१० रोजीच्या आदेशाद्वारे मौजे- करवले येथील स.नं. ३१, ४०, २९/१, २९/४, २६/अ, २६/ब, २६/क व ३२ मधील ४४-४७-१ हे..आर. शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा " सामाईक भराव भूमी प्रकल्पासाठी " प्राधिकरणास देण्यात आला.

उपरोक्त जमिनीपैकी काही जमीनीची मागणी बृहन्मुंबई महानगरपालिकेने घनकचरा प्रकल्पासाठी शासनाकडे केली असल्याने, मौजे करवले ता. अंबरनाथ जि. ठाणे येथे ५२.१० हेक्टर (त्यामध्ये ३९.९० हेक्टर शासकीय व १२.२० हेक्टर खाजगी जमीन) जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्रस्तावित भरावभूमी व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या प्रयोजनार्थ प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार सुमारे ३८.८७१ हेक्टर (अंदाजे १.०९५ हेक्टर अकारी पडीत जागा वगळून) शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा शासनातर्फे दि.१८/०१/२०१६ रोजी महानगरपालिकेस देण्यात आला. त्यापैकी १२ हेक्टर शासकीय जागेचा प्रत्यक्ष ताबा बृहन्मुंबई महानगरपालिकेला दि.१६/०१/२०१९ रोजी देण्यात आला. सदर भूखंडाच्या दक्षिणेकडील जागेतून गॅस ऑथिरिटी ऑफ इंडियाची (गेल) पाईपलाईन व अलिबाग विरार बहुउद्देशीय मार्ग जात असल्यामुळे सदर भुखंडाच्या दक्षिणेकडील शासकीय व खाजगी जमिनीचा महापालिकेस घनकचरा प्रकल्पासाठी वापर करणे शक्य होणार नाही. त्यामुळे, या शासकीय जागेमधून जाणारी गेल पाईपलाईनची जागा व खाजगी भुखंडातुन काही भाग वगळण्यात आला आहे. त्या अनुषंगाने एकूण ३५.८२ हेक्टर जागा (२९.७१ हेक्टर शासकिय जागा व ६.१०५ हेक्टर खाजगी जागा) अधिग्रहीत करण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्रयोजन आहे.

*****

लक्षवेधी सूचना क्र.७७६

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**मा. ॲड. पराग अळवणी, श्रीमती ज्योती गायकवाड, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ७७६ पुढीलप्रमाणे आहे:-**

"मुंबईतील विमानतळ परिसरातील इमारती ह्या ५० वर्षांहून अधिक काळापासून अस्तित्वात असणे; अनेक इमारती या जीर्ण अवस्थेत असून काही मोडकळीस आल्या असल्याचे निदर्शनास येणे; येथील इमारती दोन ते तीन मजल्याच्या असून उंचीची मर्यादा असल्याने या इमारतींना लागू करण्यात आलेल्या चटई क्षेत्रफळात या इमारतींचा पुनर्विकास शक्य होत नसणे; विमानतळ परिसरातील एअरपोर्ट फनेल झोन मधील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासंबंधी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर करण्यात येणे; महापालिकेच्या सदरहू प्रस्तावावर संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी, महापालिकेने सादर केलेला प्रस्ताव उचित नसल्याबाबत कळविणे; तसेच, महापालिकेचा प्रस्ताव व संचालक, नगररचना यांनी अभिप्रायामध्ये पुनर्विकासाबाबत सुचविलेला पर्याय यामध्ये एकवाक्यता नसून एक विशिष्ट प्रस्ताव स्विकारावा अशी बाब नसणे; त्यामुळे एअरपोर्ट फनेल झोन मधील जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्याकरिता बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मध्ये लवकरात लवकर स्वतंत्र तरतूद करण्याकरिता करावयाची ठोस उपायोजना व शासनाची प्रतिक्रिया. "

## मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदय यांचे निवेदन

मुंबईमधील सांताक्रूझ, पार्ले व कुर्ला या भागात विमानतळाच्या फनेल झोनमुळे इमारतींच्या उंचीवर मर्यादा आहे. त्यामुळे इमारतींचे बांधकाम अथवा पुनर्विकास, या फनेल झोनच्या नियमांतर्गत त्या त्या ठिकाणी जेवढी उंची अनुज्ञेय असेल तेवढ्याच उंचीपर्यंत करता येतो. सदरहू क्षेत्रातील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासात पुर्ण क्षमतेने (बेसिक + प्रिमियम एफ़एसआय + टिडीआर) परवानगीयोग्य संपुर्ण क्षेत्राचा वापर करून पुनर्विकास करणे शक्य होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे, फनेल झोन मधील उंचीचे निर्बधांमुळे बाधित इमारतींचे पुनर्विकासाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीकांकडून वारंवार विनंती करण्यात आलेली आहे.

बृहन्मुंबई क्षेत्रातील उंचीचे निर्बंध असलेल्या एअरपोर्ट फनेल झोन मधील जुन्या इमारतींचा पुनर्विकास सुसह्य व्हावा याकरिता नियमावलीमध्ये विशिष्ट तरतूद करणे तसेच अशा प्रकारे इतर निर्बंध असल्यामुळे पुनर्विकासास अडथळा येत असलेल्या क्षेत्राचा पुनर्विकास करणे शक्य होण्याकरिता बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मध्ये त्याबाबत स्वतंत्र तरतूद करण्याकरिता मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक) अन्वये फ़ेरबदलाची सूचना निर्गमित करण्यात आली आहे. सदर फ़ेरबदलामुळे फनेल झोनमधील, तसेच अशा प्रकारे निर्बंध असलेल्या बृहन्मुंबई क्षेत्रातील इतर बाधित क्षेत्रातील जुन्या इमारतींचे पुनर्विकास सुसह्य होणार आहे.

****************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. देवेंद्र कोठे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे कला, क्रीडा, संगीत साहित्य, समाजकारण आणि राजकारण या क्षेत्राशी अतूट नाते असणे, अशा प्रेरणादायी नेतृत्वाचे कायमस्वरूपी स्मरण रहावे या हेतूने सोलापूर महानगरपालिकेने स्मारकासाठी सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मांडणे, सदर कामी मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ५३ (दि. १३/०४/२०१५) आणि २७० (दि. १०/१२/२०१६) रोजी ठराव पारित करण्यात आलेले असणे, सोलापूर शहरातील टी.पी. १ फा.प्लॉ.नं. २७ ही महानगरपालिकेच्या मालकीची आणि इ.पी. ३४ नुसार आरक्षण क्र. ४/४३ लायब्ररी आणि कम्युनिटी सेंटर करिता आरक्षित असलेली जागा मंजूर असणे, या टी.पी. १ फा.प्लॉ.नं. २७ पैकी २७०० चौरस मीटर जागेवर वाचनालय, ग्रंथालय, अभ्यासिका, ॲम्पीथिएटर, कलादालन अशा विविध घटकांनी युक्त नियोजित हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे स्मारकासाठी रक्कम रुपये १०,९५,२६,००० चे पूर्वगणनपत्रक सोलापूर महानगरपालिकेकडून प्रस्तावित असणे, १६/०१/२०२१ रोजी सोलापूर दौऱ्यावर असताना नगरविकासमंत्री मा. ना. एकनाथजी शिंदेसाहेब यांनी नियोजन भवन येथील आढावा बैठकीत या स्मारकाकरिता पहिल्या फेजसाठी शासनाकडून चार कोटी रुपये देण्याचे घोषित करणे, हा निधी महानगरपालिकेकडे वर्ग न झाल्याने काम रखडलेले असणे, स्मारकासाठी निश्चित केलेली जागा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असून शहराची सांस्कृतिक व शैक्षणिक गरज लक्षात घेता अशा स्वरूपाचे प्रेरणादायी स्मारक होण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

सोलापूर शहरातील टी.पी. १ फा. प्लॉ.नं. २७ पैकी २७००.०० चौ.मी. इतक्या महानगरपालिकेचे जागेवर शिवसेनाप्रमुख हिंदु हृदय सम्राट मा. बाळासाहेब ठाकरे यांचे भव्य

स्मारक बांधण्याबाबत सन २०१६-१७ च्या डी एस आर दरपत्रकानुसार रक्कम रू.१०,९५,२६,०००/- इतक्या रक्कमेचे पुर्वगणनपत्रक सोलापूर महानगरपालिकेकडून तयार करणेत आले होते. सदर कामाबाबत सोलापूर महानगरपालिकेने सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्रमांक-५३, दि.१३/०४/२०१५ व ठराव क्रमांक-२७० दि. १०/१२/२०१६ रोजी पारित करण्यात आलेले आहेत.

हिंदुह्रदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे स्मारकाच्या बांधकामाची फेज-१ व फेज-२ अशी विभागणी करण्यात आलेली असून, त्यानुसार हिंदुह्रदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे स्मारकाबाबतच्या प्रस्तावावर सोलापूर महानगरपालिकेकडून कार्यवाही सुरु आहे.

***************

# महाराष्ट्र विधानसभा



## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.१०४१**

**मा श्री.किसन काथोरे, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१०४१ पुढीलप्रमाणे आहे :-**

"ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपालिका क्षेत्रामधील बांधकाम परवानगी प्रकरणात छाननी करणे कामी Auto DCR प्रणालीचा वापर होत आहे. महाराष्ट्र शासनाने ऑटो डीसीआर आणि बीपीएमएस या दोन प्रणालीचा पर्याय जमीन धारकास विकासकास दिलेला आहे. तथापि, कुळगाव बदलापूर नगरपालिका क्षेत्रामधील बांधकाम परवानगी प्रकरणात केवळ ऑटो डीसीआर या प्रणाली वापर होत असून बीपीएमएस प्रणालीचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. याबाबत नगरपालिका प्रशासनाने व विकासकांच्या संघटनेने महाराष्ट्र शासनाचे नगर विकास खात्याकडे अनेक वेळा पाठपुरावा केला असून, सदर प्रणाली उपलब्ध करण्याकामी आवश्यक रकमेचा भरणा हा केलेला आहे. तथापि, सदर बाबतीत शासनाकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. ऑटो डीसीआर प्रणाली मध्ये अनेक त्रुटी असून त्यामुळे नगरपालिका क्षेत्रात काम करणाऱ्या विकासकास / वास्तुविशारदास अनेक अडचणी निर्माण होत असून अनेक बांधकाम परवानगी प्रकरणे बऱ्याच काळापासून प्रलंबित आहेत व त्यामुळे विकासकास आर्थिक फटका बसत असून नगरपालिकेचेही आर्थिक नुकसान होत आहे व नगरपालिका क्षेत्रामध्ये करावयाच्या विकास कामांसाठी निधी उपलब्ध होत नाहीत. वरील बाबत शासनाने त्वरित निर्णय घेऊन बीपी एमएस प्रणाली कुळगाव बदलापूर नगरपालिकेत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा.उपमुख्यमंत्री यांचे निवेदन

०१. महाराष्ट्र इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी कार्पोरेशन लिमिटेड (महाआयटी) यांचेकडून कुळगाव-बदलापूर, नगरपरिषद क्षेत्राकरिता ऑनलाइन बांधकाम परवानगी व्यवस्थापन प्रणाली (BPMS) **दि.३ ऑक्टोबर, २०१९ पासून** कोणत्याही प्रकारची नगरपरिषदेकडून रक्कम न आकारता कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

०२. BPMS प्रणालीमध्ये काही बदल करुन शासनाने दि.०२.१२.२०२० च्या अधिसूचनेन्वये, त्यामध्ये नमूद केलेले काही क्षेत्र वगळता राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणे तसेच प्रादेशिक योजना क्षेत्रांसाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मंजूर केली असून **दि.०३.१२.२०२० पासून** अंमलात आली आहे.

०३. महाराष्ट्र शासनाने, दि.०१.१२.२०२१ या शासन निर्णयाद्वारे **दि.०१.०१.२०२२ पासून** कुळगांव बदलापूर नगरपरिषदेस मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) नुसार प्राप्त होणाऱ्या विकास परवानग्या ह्या BPMS या ऑनलाईन प्रणालीद्वारे स्वीकारुन त्यांना परवानगी देण्यास संमती दिली आहे.

०४. संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी **दि.१२.१०.२०२२** रोजीच्या पत्रान्वये महाआयटी ने विकसित केलेल्या BPMS या संगणक प्रणालीद्वारे Softtech कंपनीने विकसित केलेली Auto DCR संगणक प्रणाली एक अतिरिक्त पर्याय म्हणून उपलब्ध राहणेसाठी तत्वत: मान्यता दिलेली आहे.

०५. कुळगाव बदलापूर नगर परिषदेमार्फत सिस्टीम सपोर्ट इंजिनियर (SSI) करिता महाआयटी या नावाने दि. २९ ऑगस्ट, २०२३ रोजी यूटीआय बँक, नरिमन पॉईंट, मुंबई या बँकेत रु.८,११,९२०/- (अक्षरी रुपये आठ लाख अकरा हजार नऊशे वीस मात्र) इतकी रक्कम आरटीजीएस द्वारे पाठविण्यात आली आहे. त्या अनुषंगाने नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांनी **दि.७ डिसेंबर, २०२३** रोजीच्या पत्राद्वारे दि.३१/१२/२०२३ नंतर सिस्टीम सपोर्ट इंजिनियर (SSI) यांच्या सेवा संपुष्टात येतील व याबाबत संबंधित प्रकल्प व्यवस्थापक सेवा पुरवठादार यांना महाआयटी यांचे स्तरावरून अवगत करावे, असे महाआयटीस कळविले आहे.

०६. कुळगाव बदलापूर नगर परिषदेकडे ऑनलाइन बांधकाम परवानगी व्यवस्थापन प्रणाली (BPMS) एकूण ७४ प्रस्ताव प्राप्त आहे. कुळगाव बदलापूर नगर परिषदेमध्ये ऑनलाइन बांधकाम परवानगी व्यवस्थापन प्रणाली (BPMS) व ऑटोडिसीआर या दोन्ही ऑनलाईन बांधकाम परवानगी व्यवस्थापन प्रणाल्या कार्यान्वित असून, त्याद्वारे बांधकाम परवानगी प्रस्ताव प्रकरणी निर्णय घेण्यात येत आहेत.

०७. सद्यस्थितीत कुळगाव बदलापूर नगर परिषदेत ऑनलाइन बांधकाम परवानगी व्यवस्थापन प्रणाली (BPMS) सुरळीतपणे सुरू आहे.

***************************

नगर विकास विभाग
लक्षवेधी सूचना क्र.१३५०

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. संदिप क्षिरसागर, श्रीमती नमिता मुंदडा, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.१३५० पुढीलप्रमाणे आहे:-

"सन २०२२ ते जानेवारी २०२५ च्या दरम्यान बीड नगरपालिकेला विविध लेखाशीर्ष तथा नगरपालिका फंडातून विविध विकास कामांना प्रशासकीय मान्यता मिळालेली असणे, या कालावधीमध्ये सदरील कामे होत असतांना न.प. बीडने शासनाच्या जिल्हास्तरावरील तथा न.प.फंडांतर्गत होत असलेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार व दिरुक्ती केली असल्याचे निदर्शनास येणे, हे होत असतांना मा. मुख्याधिकारी, न.प. बीड यांनी शासनाच्या वतीने पारित करण्यात आलेल्या कोणत्याही परिपत्रकाचा अवलंब न करता सदरील कामांवर जाणीवपूर्वक अक्षम्य दुर्लक्ष करत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करण्यास त्याचा सहभाग असल्याचेही निदर्शनास आले असणे, सन २०२२ ते जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये झालेल्या कामांची त्रयस्त समिती अथवा गुणनियंत्रक विभागाकडून चौकशी व्हावी व न.प.फंडाअंतर्गत प्रस्तावित तसेच मंजूर करण्यात आलेल्या व कार्यारंभ आदेश झालेल्या सर्व विकासकामांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी तेथील मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली असल्याचेही निदर्शनास आलेले असणे, तथापि संबंधित अधिकारी यांच्याविरुध्द कार्यवाही करण्याची आवश्यकता असतांना अद्याप कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे नागरिकांमध्ये तसेच अन्य अधिकारीवर्गांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व शासनाप्रती नाराजीची भावना, परिणामी, याप्रकरणी एखाद्या त्रयस्त समिती अथवा गुणनियंत्रण विभागाकडून चौकशी करण्याची होत असलेली मागणी व त्याप्रकरणी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भुमिका."

---

मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

बीड नगरपरिषदेअंतर्गत सन २०२२ ते जानेवारी २०२५ च्या दरम्यान जिल्हा वार्षिक योजनेकरीता (नागरी दलितेत्तर योजना, नगरोत्थान योजना (जिल्हास्तर), लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी

दलीतवस्ती सुधार योजना) नगरपरिषद फंडातून व शासन स्तरावरील विविध योजनेअंतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या कामांना वेळोवेळी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

बीड नगरपरिषदेमध्ये विहीत निविदा प्रक्रिया राबवून प्रचलित कार्यपद्धतीनुसार कामे पूर्ण करण्यात आली आहेत. सन २०२२ ते जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये पूर्ण झालेल्या कामांची त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण व साहित्यांची चाचणी करून अहवाल समाधानकारक आल्यानंतरच नगरपरिषदेमार्फत देयके अदा करण्यात आलेली आहेत. सदर कामांची द्विरुक्ती झालेली नाही.

बीड नगरपरिषदेमध्ये जानेवारी, २०२२ ते जानेवारी, २०२५ या कालावधीत झालेल्या अनियमिततेबाबत मा.लोकप्रतिनिधी यांची दि.१५.०२.२०२५ रोजीची तक्रार विभागास प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने नियमोचित कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत दि.०७.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांना कळविण्यात आले आहे.

या प्रकरणी सहायक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षक, बीड यांच्याकडून चौकशी करुन घेण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, बीड यांच्या स्तरावर सुरु आहे.

* * * * * * *

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना क्रमांक १६९८

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्रीमती सरोज अहिरे मा.विधानभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"नाशिक महापालिकेने वॉटर ग्रेस प्रोडक्ट्स कंपनीला नाशिक शहरातील रुग्णालयांच्या बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंटचा ठेका दिलेला असणे, त्यासाठी १५ गुंठे भूखंड नाममात्र दराने भाडेतत्वाने दिला असणे, या भूखंडाबाबत करार करताना या कंपनीने बेकायदेशीर करारनामे करणे व करारनाम्यात छेडछाड करून नाशिक महापालिकेची फसवणूक केली असल्याची बाब उघड होणे, अशा अनेक तक्रारी महापालिकेकडे असणे, नाशिक महापालिकेने वॉटरग्रेस प्रॉडक्ट कंपनीला बायोवेस्ट मॅनेजमेंट प्रकल्पाचा ठेका दिला असून त्यासाठी सर्व्हे क्रमांक ४०६ या भूखंडातील पंधरा गुंठे जमीन नाममात्र भाड्याने देणे, महापालिकेने हा भूखंड भाडेतत्वाने देताना वॉटर ग्रेस कंपनीसोबत करार करणे, या करारानुसार या कंपनीला २१ वर्षे नाममात्र भाड्याने भूखंड देणे, दरम्यान सरकारी जागा नाममात्र भाड्याने कोणालाही वापरता येणार नसल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने २०१५ मध्ये दिलेला असणे,असे असताना देखिल मनपा अधिकारी व कंपनीचे ठेकेदार यांनी बेकायदेशीरपणे मुदत संपल्यानंतर महापालिकेने पुन्हा कराराची मुदत दहा वर्षे वाढवल्याची गंभीर बाब उघड होणे, नाममात्र जमीन भाडेतत्वाने दिली असताना या कंपनीकडून संपूर्ण भूखंड बेकायदेशीर वापरण्यात येणे, यामुळे वॉटर ग्रेस प्रॉडक्ट कंपनीकडून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारे रेडीरेकनर दराने भाडे आकारणी करून ते वसूल करणे, कंपनीकडून वापरल्या जाणाऱ्या अतिरिक्त जागेचे २००१ पासूनचे भाडेही रेडी रेकनर दराने वसूल करणे, महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम ७९ नुसार मनपाची जागेचा खाजगी संस्थेद्वारे गैरवापर होत असेल तर मनपाच्या नियमांप्रमाणे त्यांच्यावर कारवाई करणे, याप्रमाणे तात्काळ वॉटर ग्रेस प्रोडक्ट्स कंपनीवर कारवाई करण्याची मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग) महोदयांचे निवेदन

नाशिक महानगरपालिका हद्दीतील सर्व खाजगी व शासकिय वैद्यकिय व्यावसायिकामार्फत निर्माण होणाऱ्या जैविक कचऱ्याची विल्हेवाट लावणे कामी मनपाने प्रकल्प उभारणी कामी वॉटरग्रेस कंपनीला रुग्णालयांच्या बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेन्टचा ठेका सन 2001 मध्ये दिलेला आहे.

स्थायी समिती ठराव क्र. 1157 व 1278, अनुक्रमे दि. 11.01.2001 व दि. 15.02.2001 अन्वये मंजुरी देण्यात येऊन महानगरपालिका व मे वॉटरग्रेस प्रॉडक्ट्स यांच्या मध्ये दि. 20.12.2001 रोजी प्रथम करारनामा 11 वर्षे कालावधीचा करणेत आला होता. त्यामध्ये सदर कंपनीस सर्वे न. 406 भूखंडा पैकी 1500 sq.mtr जागा हि 01 रुपये प्रती वर्ष या नाममात्र दराने 11 वर्षाच्या मुदती साठी देण्यात आलेले होता.

तद्नंतर सन 2005 मध्ये तत्कालीन शहर अभियंता यांनी दि. 15.04.2005 रोजी करारनामा मध्ये सुधारणा करणे कामी दिलेल्या अहवाला नुसार सन 2001 मधील करारनाम्यात त्रुटी राहिल्या

आहेत त्या नमूद करून पूरक करारनामा करणे बाबत व सुधारित अटी शर्ती नमूद केल्याचे आढळून येते. सदर करारनामा मध्ये नमूद प्रस्तावित सुधारित अटी नुसार " बाब क्र. 3 व 4 नुसार सदर प्रकल्प 11 वर्ष बी.ओ.ओ ऐवजी 21 वर्ष बी.ओ.टी वर करारनामा केलेला आहे. त्यास स्थायी समिती कडे पाठविण्यात येईल." असे नमूद केल्याचे आढळून येते.

त्यानुसार सुधारित करारनामा मसुदा मनपाचे तत्कालीन कायदे सल्लागार व तत्कालीन विधी अधिकारी यांचेकडून मान्यता घेण्यात आली असे नमूद आहे. तद्नुसार दि. 01 एप्रिल 2005 रोजी तत्कालीन Medical Officer of Health, City Engineer व Proprietor Water grace Products यांचे मध्ये 21 वर्ष मुदतीसाठी सुधारित करारनामा करणेत आला. त्यास महासभा व स्थायी समिती यांची धोरणात्मक बाब म्हणून मान्यता घेतल्याचे आढळून येत नाही.

या भूखंडाबाबत करार करताना या कंपनीने बेकायदेशीर करारनामे करणे व करार नाम्यात छेडछाड करून नाशिक महापालिकेची फसवणूक केली असल्याची बाब उघड होणे विषय बाबत - श्री. दिलीप दत्तू दातीर, शहर अध्यक्ष, मनसे यांची दि. 30.06.2023 व दि. 27.03.2023 रोजी तक्रार प्राप्त झालेली आहे. सदर तक्रारी बाबत आयुक्त यांनी मुख्य लेखा परीक्षक यांना चौकशी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करणे बाबत आदेशित केले होते.मुख्य लेखा परीक्षक मनपा, नाशिक यांचे कडील जा.क्र. 634, दि.31.12.2015 च्या पत्रान्वये जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्प संदर्भात स्थायी समितीच्या ठरावाच्या आधारे मक्तेदार नेमणेच्या नियुक्ती प्रक्रियेत त्रुटी असले बाबत आक्षेप घेण्यात आलेले आहे.

स्थानिक निधी लेखापरीक्षण वर्ष 2012-2013 अंतर्गत प्राप्त परिच्छेदा नुसार सन 2001 ते 2005 या कालावधीत वॉटरग्रेस कंपनी यांना सेवा शुल्कच्या रक्कमे पेक्षा रु. 95,27,908/- इतकी रक्कम ज्यादा प्रदान झाल्याचे व त्यावरील रॉयल्टीची रक्कम रु. 13,40,112/- असे एकूण र रु. 1,08,68,020/- एवढ्या रक्कमेचे महापालिकेचे नुकसान झाले बाबत आक्षेप प्राप्त झालेला आहे.

नाशिक महानगर पालिका स्थायी समितीचे ठराव क्र. 1157 दि. 11.01.2001 व ठराव क्र. 1278 दि. 15.02.2001 हे तसेच या नंतर चे करारनामे दि. 20.12.2001 व दि. 01.04.2005 व अनुषंगिक कार्यारंभ आदेश हे सर्व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 451 (3) नुसार विखंडीत करण्या बाबत तसेच सदर विखंडानाची प्रक्रिया झाल्यावर निविदा प्रसिद्ध करून पुढील कार्यवाही करणे आवश्क्यक आहे. या करिता विद्यमान कंत्राटदार यांना कायम ठेवणे आवश्यक असले बाबत तत्कालीन आयुक्त यांनी दि. 05.05.2016 रोजी शासनास प्रस्तावित केले होते.

त्यानुसार नाशिक महानगर पालिका स्थायी समितीचे उक्त ठराव, करारनामे व कार्यारंभ आदेश हे शासन निर्णय दि. 14.03.2017 च्या आदेशान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 451 (1) नुसार निलंबित केले होते. परंतु दि. 06 सप्टेंबर 2018 रोजीच्या शासन निर्णय अनुषंगाने प्रस्तावित करण्यात आलेली वस्तूस्थिती विचारात घेऊन नाशिक महानगर पालिका स्थायी समितीचे ठराव क्र. 1157 दि. 11.01.2001 व ठराव क्र. 1278 दि. 15.02.2001 हे तसेच या नंतर चे करारनामे दि. 20.12.2001 व दि. 01.04.2005 व अनुषंगिक कार्यारंभ आदेश यांचे दि. 14.03.2017 च्या

आदेशान्वये करण्यात आलेले निलंबन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 451 (3) नुसार रद्द करण्यात आलेले आहे.

सदर बाबत अतिरिक्त आयुक्त, उप आयुक्त अतिक्रमण विभाग, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, उप आयुक्त घनकचरा विभाग, नाशिक महानगर पालिका नाशिक यांनी सदर प्रकल्पाच्या ठिकाणाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी केल्यानुसार तसेच उप अभियंता नगर नियोजन यांचे दि. 10.03.2025 रोजीचे अभिप्राया नुसार व पी.टी शीट नुसार सर्वे न. 406 मधील वॉटरग्रेस कंपनीचे बायो मेडिकल वेस्ट प्लांट चे क्षेत्र हे 1550 sq.mtr नमूद केले असून त्या व्यतिरिक्त लगतचे 2825 sq.mtr क्षेत्रावर वॉटरग्रेस कंपनीच्या घंटागाड्या उभ्या केले असल्याचे आढळून आले आहे. परंतु मिळकत कर विभागाच्या अभिप्राया नुसार सदर जागे बाबत कुठल्याही प्रकारचे भाडे आकारणी केलेली नाही. तसेच शहर अभियंता,नाशिक मनपा यांनी 2001 मधील प्रकल्प 2005 मध्ये देणेकामिच्या करारनाम्या मधील अटी शर्ती निश्चित करणे कामी मार्गदर्शन दिले असले बाबत अभिप्राय दिला आहे.

वरील सर्व विषया बाबत वॉटरग्रेस कंपनीची चौकशी करण्यात येऊन नियमानुसार भाडे आकारण्यात येईल व योग्य ती कारवाई मनपा मार्फत करण्यात येईल.

*************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. मोहन मत्ते, श्री.गोपिचंद पडळकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:**

" भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे टेमघर, कामतघर, फेणे, भादवड, कणेरी आदि भागात सरकारी जमिनी महापालिकेच्या ताब्यात असताना ही त्यावर भूमाफियांनी केलेले अतिक्रमण, वज्रेश्वरी देवस्थान ईनाम वर्ग-३ च्या जमिनींना तत्कालीन आयुक्त यांनी धर्मादाय आयुक्तांची परवानगी न घेता सरसकट दिलेली बांधकाम परवानगी, इमारत वापराचा दाखला देणेबाबत महापालिकेकडे वज्रेश्वरी संस्थानाच्या अनेक तक्रारी असणे, त्याबाबत तात्कालीन आयुक्त यांनी गैरकारभार केल्यामुळे देवस्थान व सरकारी जमिनीबाबत कुठलीही ठोस कारवाई करण्यात न येणे, मौजे कणेरी फेणे येथील देवस्थानाबाबत वज्रेश्वरी देवस्थान संस्थेने महानगरपालिका आयुक्तांना दिनांक २३/०४/२०२४ रोजी तक्रार दिली असून तक्रारीवरून कारवाई होत नसल्याने वज्रेश्वरी संस्थेने मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली याचिका, त्यामुळे देवस्थान जमिनीत होत असलेले अनियमितता व अगुणवत्तेच्या आधारावरती दिलेले बांधकाम परवानग्या तात्काळ रद्द करणे, कामतघर येथील सरकारी जमिनीचे व देवस्थान जमिनीचे संरक्षण करणे आवश्यक असल्याने महानगरपालिकेतील वास्तुविशारद हे अनियमितता व अगुणवत्तेच्या आधारावरती परवानग्या मिळवत असून त्यांच्या काही प्रस्तावांमध्ये ५० टक्के कागदपत्रांची कमतरता असूनही तात्कालीन आयुक्त यांच्याकडून गैरव्यवहातून परवानग्या दिल्या गेल्या असल्याने अशा वास्तुविशारदांच्या प्रस्तावांना गुणवत्तेवरच परवानग्या देण्याची तरतुद ठेवण्यासाठी शासनाने कडक धोरण अवलंबून उपायोजना करण्यासाठी शासनाने करावयाची करावयची कार्यवाही व उपाययोजना"

---

उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेची स्थापना दि.१६.१२.२००१ रोजी झाली असून, महानगरपालिकेचे क्षेत्र २६.३६ चौ.मी.आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार महानगरपालिकेची लोकसंख्या ७,०९,६६५ एवढी असून तरंगती लोकसंख्या सुमारे ३ लाख आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना ही शासन निर्णय दि.३०.०३.२००१ व दि.०८.०७.२००३ अन्वये मंजूर झालेली असून ती अनुक्रमे दि.०१.०५.२००१ द दि.१४.०८.२००३ पासून अंमलात आलेली आहे. तसेच, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्राकरिता सुधारित प्रारुप विकास योजना दि.१२.१०.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

महानगरपालिकेकडून मौजे टेमघर, कामतघर, फेणे, भादवड, कणेरी इत्यादी भागातील सरकारी जमिनीवर बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही. तसेच, सदर ठिकाणच्या सरकारी जमिनी हया महानगरपालिकेच्या ताब्यात नाहीत.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील मौजे टेमघर, कामतघर, फेणे, भादवड, कणेरी या परिसरातील शासकीय जमिनींपैकी मौजे कामतघर, सर्वे नं. ४२/अ/३ पद्मानगर भाजीमार्केट या ठिकाणी विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे तळ अधिक एक मजला असे दुमजली अनधिकृत बांधकाम असून त्यात एकूण ७३ वाणिज्य गाळ्यांचे बांधकाम झालेले आहे. सदर अनधिकृत बांधकाम पुढील आदेशापर्यंत निष्कासित न करण्याबाबत मा. दिवाणी न्यायालय, भिवंडी यांचे स्थगिती आदेश आहेत.

सद्यस्थितीत मौजे टेमघर, फेणे, भादवड, कणेरी या ठिकाणी असलेल्या शासकीय जमिनीवर कुठलीही अतिक्रमणे किंवा अनधिकृत बांधकाम सुरू नाहीत. भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील वज्रेश्वरी देवस्थान ईनाम वर्ग-३ च्या जमिनींवर महानगरपालिकेमार्फत कोणतीही बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही.

मौजे कणेरी, येथील सर्वे क्र.४३४ पै या जागेवर मे. ओम एंटरप्रायजेस यांना महानगरपालिकेने सर्व कागदपत्रांची पडताळणी करून बांधकाम परवानगी दिली. तथापि, सदर जागा ही श्री वज्रेश्वरी योगिनी देवी संस्थान या देवस्थानाच्या मालकीची असल्याचे नमूद करून देवस्थानाने महानगरपालिकेकडे तक्रार अर्ज दाखल केले होते. सदर जागेची मालकी देवस्थान सिध्द करू न शकल्याने सदरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. मौजे कणेरी येथील सर्वे क्र.४३४ पै. येथील बांधकाम परवानगी देण्यात आलेली जागा श्री वजेश्वरी देवस्थान ईनाम वर्ग-३ यांच्या मालकीची नाही. प्रस्तुत प्रकरणी मे. ओम एंटरप्रायजेस यांना देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने श्री वज्रेश्वरी योगिनी देवी संस्थानाच्या वतीने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.९६९८/२०२२ अन्वये दावा दाखल केला होता. तथापि, सदरचा न्यायालयीन दावा संस्थानाने मागे घेतला असल्याने मा. न्यायालयाने दि.१७,०८.२०२२ रोजीच्या आदेशान्वये संस्थानाने दाखल केलेला दावा निकाली काढला आहे.

तद्नंतर, मे. एऑन इन्फिनिटी एलएलपी यांना देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने श्री वजेश्वरी योगिनी देवी संस्थान यांनी सदरील जागा त्यांच्या मालकीची असताना बांधकाम परवानगी दिली असल्याबाबत तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर जागेची मालकी देवस्थान सिद्ध करू न शकल्याने सदरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे. त्यानुषंगाने श्री वज्रेश्वरी योगिनी देवी संस्थान यांनी मे. एऑन इन्फिनिटी एलएलपी यांना देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीबाबत मा. उच्च न्यायालयात दि.१३.०२.२०२५ च्या दरम्यान नव्याने याचिका क्र.४३७३/२०२५ दाखल केली आहे. सदर याचिकेची प्रत महानगरपालिकेस याचिकाकर्त्यांकडून प्राप्त झालेली असून महानगरपालिकेमार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच मौजे कामतघर येथील सरकारी जमिनीवर महानगरपालिकेकडून कोणतीही बांधकाम परवानगी देण्यात आली नाही.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेकडून आतापर्यंत देण्यात आलेल्या बांधकाम परवानग्या हया UDCPR/MRTP Act मधील तरतुदीनुसार देण्यात आलेल्या आहेत.

****

# महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना क्रमांक १९०९

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री.नितीन अर्जन (ए.टी.),पवार मा.विधानभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"प्रशासकीय राजवट सुरू झाल्यापासून नाशिक महानगरपालिका भ्रष्टाचाराचा ठिकाण बनल्याचे चित्र असणे, नाशिक महानगरपालिकेमध्ये राजरोसपणे भ्रष्टाचार करण्यासाठी विविध मार्ग काढले जाणे, नाशिक महानगर पालिकेकडून काढण्यात आलेली ई-निविदा क्रमांक १६ म्हणजे भ्रष्टाचाराचे टोक असणे, विविध ६३ कामांसाठी काढण्यात आलेल्या या ई-निविदेत मर्जीतील ठेकेदार देता यावा यासाठी निविदा भरण्यापूर्वी शहर अभियंता यांनी ठेकेदार यांच्या समवेत कामाची पाहणी केल्याचा दाखला सक्तीचा केला असणे, तसेच नाशिक शहरात असणाऱ्या डांबराच्या प्लांटची संख्या लक्षात घेऊन कामाची रिंग करता यावी यासाठी अनेक कामांमध्ये डांबराच्या कामाचे प्रमाण ३०% पेक्षा कमी असताना देखील डांबराचा प्लांट असण्याची सक्ती केली असणे, या माध्यमातून करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला असणे, त्रयस्थ संस्थेकडून या संपूर्ण ई निविदा प्रक्रियेची चौकशी होणे आवश्यक असणे, परंतु शहर अभियंता यांच्या नेतृत्वाखालीच सदर प्रकार होत असल्यामुळे याबाबत चौकशी करण्यात न येणे, शहर अभियंता यांनी त्याच्या केबिनमध्ये बैठक घेऊन ठेकेदारांना दम देणे व याबाबत तक्रार न करण्याचे आदेश देणे, याबाबत शासनाने तात्काळ हस्तक्षेप करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची असणारी आवश्यकता, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, त्यामुळे वाढत चाललेल्या भ्रष्टाचाराच्या घटना, याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

## उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग) महोदयांचे निवेदन

नाशिक महानगरपालिकेने नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील विविध ६३ कामांसाठी ई-निविदा क्र.१६ दि.१४.१२.२०२४ रोजी प्रसिध्द केली होती. सदर निविदांमधील अटी शर्तीनुसार शहरातील कामे करतांना शहरातील रस्त्यांमध्ये असलेल्या विविध सार्वजनिक सुविधा जसे की, जलवाहिका, मलवाहिका, विद्युत वाहीका, गॅस पाईप लाईन, अनाधिकृत / अतिक्रमित बांधकामे इ. बाबी ठेकेदारास ज्ञात असाव्यात याकरीता जागेची प्रत्यक्ष पाहणी करून त्याचे जिओटॅगींग फोटो टाकणेस बंधनकारक करणेत आले होते.

जलसंपदा विभाग, शासन निर्णय, दि.१८.१०.२०२३ मधील मुद्दा क्र.१४ नुसार निविदा भरण्यापुर्वी निविदाकाराने कार्यक्षेत्राची पाहणी करणे बाबतच्या तरतुदीचा समावेश करण्यात आला होता. त्यास अनुसरून निविदा सुचना क्र.१६ मध्ये निविदा भरण्यापूर्वी ठेकेदार यांनी कामाची पाहणी केल्याचा दाखल्याची अट टाकणेत आली होती.सदर कामांच्या प्रीबीड बैठकी वेळी मक्तेदारांनी केलेल्या मागणीनुसार व खुली स्पर्धा होण्याच्या दृष्टीकोनातून सदर जिओटॅगींग अट रद्द करण्यात आली होती. तसेच जलसंपदा विभाग, शासन निर्णय, दि.१४.०६.२०२४ अन्वये सदरची अट रद्द करणेत आली आहे.

ज्या कामांमध्ये डांबरीकरणाचा समावेश आहे फक्त अशाच कामांमध्ये डांबराचा प्लांट असण्याची अट सार्वजनिक बांधकाम विभाग.शासन निर्णय दि. २७.०९.२०१८ नुसार टाकणेत आली आहे.त्यामुळे निविदेत खुली स्पर्धा होऊन मक्तेदारांमार्फत निविदा भरण्यात आलेल्या आहेत. सबब मक्तेदार यांचे रिंग करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

निविदा खुल्या करतांना महानगरपालिकेच्या निविदा समितीमार्फत कागदपत्रांची छाननी करून अंतीम अहवाल प्राप्त झाल्यानंतर आर्थिक देकार उघडण्यात येते.प्रीबीड बैठकी व्यतिरिक्त मक्तेदारांची बैठक घेण्यात आलेली नाही.

नाशिक महानगरपालिका हद्दी मध्ये अस्तीत्वातील रस्ते रुंदीकरण करणे व अस्तरीकरण करणेच्या कामांच्या प्राकलना मध्ये रोड साईड फर्निचरच्या बाबी अंतर्भुत करण्यात येत नाही. तथापी नवीन रस्ते विकास कामे करतांना रोड साईड फर्निचरच्या बाबी तसेच पावसाळी पाण्याचा निचरा होणेकामी पर्जन्य वाहिनी व इतर आवश्यक बाबी प्राकलनामध्ये घेण्यात येतात. तरी यापुढे रस्ते बांधकाम कामाचे प्राकलन तयार करतांना त्रुटी राहणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

**************

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.१९७६**

**मा.श्री.सुभाष देशमुख, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९७६ पुढीलप्रमाणे आहे :-**

"सोलापूर महापालिका प्रशासनाने नव्या सुधारित विकास योजनेचा प्रारुप आराखडा (डीपी) तयार करताना सातारा शहराची कॉपी केली असून यात अजिंक्यतारा, फोर्ट, जलमंदिर राजवाडा, चार भिंती, बदामी विहीर आदीं गोष्टींचा समावेश असल्याची धक्कादायक बाब माहे जानेवारी २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, जुळे सोलापूर हद्दवाढ भागात मागणी असताना सार्वजनिक उद्याने, बस स्थानक, नाट्यगृह, क्रीडांगणे, हॉस्पिटल, शाळा, वाहनतळ अशा अनेक सुविधांची गरज असतानाही याचा समावेश या आराखड्यात झाला नसणे, उक्त आराखडा (डीपी) रद्द करण्याची मागणी स्थानिक जनेतून व लोकप्रतिनिधींकडून होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

### मा.उपमुख्यमंत्री महोदय यांचे निवेदन

१. सोलापूर शहराची तिसरी सुधारीत प्रारूप विकास योजना म.प्रा.नि.व.न.र. अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.२ जानेवारी २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर प्रारुप विकास योजनेचा अहवाल तयार करत असताना उक्त विकास योजना प्रसिध्द करण्याची कालमर्यादा विचारात घेता ती विहित कालमर्यादेमध्ये प्रसिध्द करणे आवश्यक होते.

२. सदरची प्रारुप विकास योजना तयार करताना नमुना म्हणून **(format)** नुकताच प्रसिध्द झालेल्या सातारा शहराच्या प्रारुप विकास योजनेच्या अहवालाची प्रत विचारात घेण्यात आली होती. त्यामुळे सातारा प्रारुप विकास योजनेतील अजिंक्यतारा किल्ला, जलमंदिर राजवाडा, चार भिंती, बदामी विहीर आदीं गोष्टींचा समावेश सोलापूर प्रारुप विकास योजनेमध्ये नजर चुकीने झालेला आहे. तथापि, म.प्रा.नि.व.न.र. अधिनियम, १९६६ चे कलम २८(४) नुसार कार्यवाही करतेवेळी याबाबत टंकलिखीत चुक दुरुस्त करण्यात येईल.

३. सोलापूर शहराच्या प्रसिध्द प्रारुप विकास योजनेमध्ये क्रीडांगणे, उद्याने/ विरंगुळा केंद्र, वाहनतळ, रस्ते इ. नागरिकांना अपेक्षित इतर सर्व बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच सन २०३४ ची प्रक्षेपित लोकसंख्या गृहीत धरु न सदर लोकसंख्येसाठी आवश्यक ती आरक्षणे प्रस्तावित करणेत आलेली आहेत. सदर विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना १९६६ अधिनियमाच्या सर्व तरतुदीचे पालन करुन व वैधानिक कार्यवाही करून तयार करण्यात येत आहे.

४. सदर विकास आराखडा रद्द करण्याची मागणी स्थानिक जनतेकडून व लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत आहे. परंतु सदर प्रारुप विकास योजनेच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधी / नागरिकांना जर त्यांचे काही प्रस्ताव / हरकती सूचित करावयाच्या असतील तर त्यांनी सदरचे प्रस्ताव / हरकती कलम २८(२) अन्वये गठीत झालेल्या नियोजन समिती समोर सादर करण्याची व सुनावणीची संधी लोकप्रतिनिधी व नागरिकांना असणार आहे.

५. तसेच तद्नंतर ज्यावेळी उक्त नियोजन समिती त्यांच्या अभिप्रायांसह समितीचा अहवाल कलम २८(२) अन्वये नियोजन प्राधिकरणास म्हणजेच सोलापूर महानगरपालिकेस सादर करेल. त्यावेळी या अहवालावर अंतिम निर्णय नियोजन प्राधिकरणाचे स्तरावर होणार आहे.

६. तसेच तद्नंतर सदरची प्रारुप विकास योजना ज्यावेळी सोलापूर महानगरपालिकेकडून कलम ३० अन्वये शासनाच्या मंजूरीसाठी सादर करण्यात येईल. त्यावेळी देखील लोकप्रतिनिधीं / नागरिकांच्या मागण्या / सूचना व हरकती यांचा सकारात्मक विचार होऊन संचालनालयाचे व शासनाच्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. आणि उक्त कार्यवाहीनुसार सदर विकास आराखड्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती झाल्यानंतरच शासनस्तरावरुन सोलापूर प्रारुप विकास योजनेस अंतिम मंजूरी देण्यात येईल.

*************************

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना क्रमांक १९७८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. सुभाष देशमुख, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"राज्यात सोलापूर महापालिकेमध्ये व्यावसायिक मालमत्ता भाडेतत्त्व करारावर ६४% इतक्या प्रमाणात सुपर टॅक्सची आकारणी केली जात असल्याने सदर सुपर टॅक्स कर कमी करण्याची मागणी व्यावसायिकांकडून होत असल्याची बाब माहे जानेवारी २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, सोलापूर महापालिका राज्यातील नव्हे तर देशातील सर्व महापालिकेंपेक्षा जास्त कर आकारत असल्याचे मत व्यावसायिकांनी व्यक्त करणे,सोलापूर शहर हे कामगारांचे शहर म्हणून गणले जाते तेथे अद्याप विमानसेवा व महापालिकेकडून पाणी विविध सोयी सुविधा तसेच मोठमोठे उद्योग व्यवसाय येण्यासाठी पुरविण्यात येणाऱ्या बाबी उपलब्ध होत नसल्याने शिवाय आकारण्यात येणाऱ्या भरमसाठ करांचा विचार करून कोणत्याही कंपन्या शहरात येण्यास धजावत नसणे सोलापूर महापालिकेकडून लावण्यात येत असलेला ६४% सुपर टॅक्स कर कमी करण्यासाठी शासनाने उपाययोजना करणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

सोलापूर महानगरपालिका ड वर्ग महानगरपालिका आहे. सोलापूर महानगरपालिकेत सध्या ३,१०,००० इतक्या नोंदणीकृत मालमत्ता असून त्यांना मालमत्ता कर विभागामार्फत महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १२७, १२८, १२८ अ, १२९ आणि कराधान नियम ७ नुसार वार्षिक भाड्यावर कर मूल्य निर्धारित करून कर आकारणी व वसुली केली जाते.

सध्या महानगरपालिकेमार्फत घरगुती व बिगर घरगुती अश्या दोन गटात मालमत्तांची विभागणी करून नियमानुसार कर आकारणी केली जाते. यामध्ये करयोग्य मूल्याच्या गटानुसार आकारणी केली जाते ज्यामध्ये प्रामुख्याने सर्वसाधारण कर, सफाई पट्टी/साफसफाई कर, इतर कर यामध्ये जल लाभ कर, जल निस्सारण कर, रस्ता कर, मनपा शिक्षण कर यांचा समावेश आहे. महाराष्ट्र शिक्षण उपकर, रोजगार हमी उपकर असा एकूण वार्षिक भाडे मूल्यावर ३७% ते ६४% कराची आकारणी करण्यात येते.

याशिवाय यापूर्वी वार्षिक भाडे मुल्यात ४९% इतके अतिरिक्त भाडेमूल्य वाढवून सुपर टॅक्स सह कर आकारणी करण्यात येत होती. तथापि, व्यावसायिक प्रयोजनार्थ भाड्याने दिल्या जाणाऱ्या मिळकतींना कर आकारणी करताना आकारण्यात येणाऱ्या सुपर टॅक्सची आकारणी रद्द करण्याबाबत स्थायी समिती ठराव क्र.२९१, दि.२०.०२.२०२५ अन्वये वस्तुस्थिती विचारात घेऊन धोरण निश्चित करण्याकरीता सर्वसाधारण सभेकडे शिफारस केली होती. त्यानुसार, सर्वसाधारण सभा ठराव क्र.१३०, दि.२०.०२.२०२५ अन्वये, स्थायी समितीची शिफारस मान्य करुन दि.०१.०४.२०२५ पासून सुपरटॅक्सची आकारणी रद्द करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

***************************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक १९९३**

**श्री.योगेश सागर,मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९९३पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यात विशेषतः मुंबई शहरात व्होकहार्ट, लिलावती, ग्लोबल, कोकिळाबेन, रिलायन्स इ. नामांकित रुग्णालयात होत असलेली रुग्णांची आर्थिक लुटमार, ब्रेनस्ट्रोक, मेंदूचे आजार, किडनीचे आजार इ. रुग्ण संबंधित रुग्णालयात दाखल होताच एमआरआय, सीटी स्कॅन तपासण्या केल्याशिवाय त्यांच्या आजाराचे निदान करता येणार नाही असे डॉक्टरांकडून सांगण्यात येणे, रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक त्या परिस्थितीत काय करावे हे सुचत नाही अशा अवस्थेत असल्याने डॉक्टरांना देवमानून ते सांगतील ते करण्याच्या मनःस्थितीत असणे, त्यांना संबंधित रुग्णालयांमध्ये एमआरआय, सीटी स्कॅन करिता बाजारभावापेक्षा तिप्पट रक्कम मोजावी लागणे, संबंधित रुग्णालयांच्या अंतर्गत असलेल्या औषधांच्या दुकानात उपलब्ध असलेली औषधे तातडीने रुग्णांस देणे आवश्यक असल्याने कोणतीही सवलत न मिता एमआरपीच्या दराने त्याच दुकानातून घ्यावी लागणे, गरजू व द्रारिद्रय रेषेखालील दहाटक्के रुग्णांना मोफत उपचार करणे शासनाने सर्व रुग्णालयांना बंधनकारक केले असताना व त्याबाबतचा फलक प्रत्येक रुग्णालयात दर्शनी भागात लावणे बंधनकारक असताना ही रुग्णालये शासकीय आदेशाची पायमल्ली करीत असल्याचे निदर्शनास येणे, या रुग्णालयांमध्ये डॉक्टरांकडून आप-आपसात संगनमताने कट-प्रॅक्टीस सुरु असल्याचे निदर्शनास येणे, अशा परिस्थितीत या रुग्णालयांमध्ये आपत्कालीन रुग्ण म्हणून दाखल होणारे रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांची आर्थिक ओढाताण होणे, रुग्णालयांची भरमसाठ देयके कशी भागवावयाची या मनःस्थितीत रुग्ण बरा होण्याऐवजी त्याचा आजार अधिक बळावल्याचे निदर्शनास येणे, रुग्णांची लूटमार करणा-या या रुग्णालयांवर शासनाने तातडीने कडक कारवाई करण्याची व राज्यातील सर्वच रुग्णालयात प्रवेशप्रक्रीयेपासून उपचार, रुग्णांना देण्यात येणारी वागणूक, हायजेनिक भोजन व अन्यसुविधा यांची त्रयस्थाच्या भूमिकेतून देखभाल व नियंत्रण ठेवण्यासाठी ट्राय, विद्युत नियंत्रण प्रधिकरण इ. च्या धर्तीवर आरोग्य यंत्रणा देखभाल व नियंत्रण प्रधिकरण गठीत करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

---

<u>मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u>

महाराष्ट्र शुश्रूषागृह नोंदणी अधिनियम १९४९ अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील सर्व खाजगी रुग्णालयांची नोंदणी केली जाते, त्यामध्ये व्होकहार्ट, लिलावती, ग्लोबल, कोकिळाबेन, रिलायन्स इ. नामांकित समावेश आहे. तसेच रुग्णांसाठी १०% खाटा आरक्षित ठेवणे हे धर्मादाय रुग्णालयांना लागु असुन ही बाब धर्मादाय आयुक्त यांच्या अखत्यारीत येते.

महाराष्ट्र शुश्रूषागृह नोंदणी अधिनियम १९४९ अंतर्गत सुधारीत नियम २०२१ अन्वये चाचण्या औषध व उपचार यांच्या दरांबाबत कोणतेही निर्देशन नाही, परंतू संबंधित रुग्णालयाने निश्चित केलेल्या विविध तपासणी उपचार बाबतचा दर फलक अथवा या बाबत यादी रुग्णालयाच्या दर्शनीय भागात लावणे अथवा ठेवणे अनिवार्य केले आहे.

तसेच, सामान्य तक्रारींचा निपटारा करणे करिता संबंधित वैद्यकीय अधिकारी यांचा दूरध्वनी क्रमांक, रुग्णालयाच्या दर्शनीय भागात लावणे अनिवार्य केले आहे.

रुग्णालयातील विविध इतर तक्रारी बाबत तक्रार निवारण कमिटी गठीत करणे ही बाब राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य खात्याशी संबंधित आहे.

***

महाराष्ट्र विधानसभा

७९

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना क्रमांक २०३०

**सन २०२५ चे अधिवेशन**

**श्री.छगन भुजबळ, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.मनोज कायंदे मा.वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना** पुढीलप्रमाणे आहे :-

सन २०२७ मध्ये नाशिक – त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा असणे, अवघ्या दिड – दोन वर्षांवर येऊन ठेपलेल्या कुंभमेळ्याकरीता आवश्यक पायाभुत सुविधा तातडीने सुरु करण्याची आवश्यकता असणे, पायाभुत सुविधांची कामे आता सुरु झाली तरच ही कामे कुंभमेळ्यापर्यंत पुर्ण होणार असणे, सिंहस्थ कुंभमेळ्याचा अंतिम आराखडा नाशिक जिल्हा प्रशासनाकडून शासनाला लवकरात लवकर सादर होणे गरजेचे असणे, शासनाने सिंहस्थ आराखड्याला मंजुरी देवून लवकरात लवकर निधी उपलब्ध करून दिला तरच सिंहस्थ आराखड्यातील प्रत्यक्ष कामांना सुरुवात होणार असणे, सिंहस्थ कुंभमेळ्यातील सर्वाधिक महत्वाचा प्रश्न साधुग्राम आणि अन्य विकास कामांसाठी भुसंपादनाचा असणे, यासाठी आतापासून नियोजन केले तरच भुसंपादन करून त्या ठिकाणी कामे करता येणार असणे, सिंहस्थ तोंडावर आल्यानंतर घाईघाईत कामे केली तर त्या कामांना योग्य दर्जा राहत नसणे, विकासकामे दर्जेदार आणि दिर्घकालीन होण्यासाठी ती विशिष्ट कालमर्यादेत होणे आवश्यक असणे, त्याचप्रमाणे केंद्र शासनाकडून सिंहस्थातील विविध कामांसाठी निधी मिळण्याकरीता योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र शासनाला पाठविणे आवश्यक असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया

**मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन**

सन २०२७ मध्ये नाशिक आणि त्रंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा होणार असून सदर कुंभमेळ्याच्या अनुषंगाने नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे विविध अत्यावश्यक पायाभूत सुविधांची कामे सुरू करण्याच्या अनुषंगाने संबंधित प्रथम टप्प्यातील विकास आराखडा तयार करण्यात येत असून सदर आराखडा तयार झाल्यानंतर यथावकाश शासनास सादर करण्यात येईल.

सदस्य कुंभमेळ्याच्या प्रथम टप्प्यातील आराखडा तयार करून महाराष्ट्र शासनाकडे सदर निधीची मागणी करण्यात येणार आहे तसेच केंद्र शासनाकडे ही सदर कुंभमेळ्याच्या अनुषंगाने आवश्यकते प्रमाणे विविध विकास कामांसाठी निधीची मागणी करण्यात येईल.

सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर या कुंभमेळ्यासाठी नियोजन व आयोजनासाठी नाशिक त्रंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करण्याबाबत कार्यवाही सुरू असून सदर प्राधिकरण लवकरच स्थापन करण्यात येणार आहे तसेच विविध पदांची निर्मिती करण्यात येणार आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्यातील साधू ग्राम व अन्य विकास कामासाठी भूसंपादन करण्याबाबत कारवाई करण्यात येणार असून नाशिक महानगरपालिकेने साधू ग्राम साठी भूसंपादनाची प्रक्रिया त्यांच्या स्तरावर सुरू केलेली आहे. तसेच सदर विकास कामे दर्जेदार पद्धतीने होण्यासाठी विविध निविदा प्रक्रिया राबवण्यात येणार असून याअंती सिंहस्थ कुंभमेळा मार्च २०२७ पूर्वी कालबद्ध स्वरूपात सदर कामे पूर्ण करून घेण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

****************************************************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.२०६१**

**मा.वि.स.स श्री. जयंत पाटील यांनी, महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे: -**

"मौजे बुऱ्हाणनगर ता. जि. अहिल्यानगर येथील जगदंबा देवी मंदिरा समोरील सर्वे क्र, १/२+१/३ मधील बिनशेती प्लॉट मधील कायदेशीर असलेले बांधकाम बेकायदेशिरपणे पाडून टाकल्यामुळे झालेले 2 कोटी रुपयांचे नुकसान. या बांधकामास दि. २२/०८/२०१२ रोजी तहसिलदार यांनी दिलेली परवानगी या बांधकामास पुर्णत्वाचा दाखला मिळालेला असुन सर्व कर व पाणी पट्टी नियमित भरण्यात येत असणे, या बांधकामास दि. २१/०२/२०२५ रोजी रहिवास या प्रयोजना ऐवजी वाणिज्य प्रयोजनासाठी सुधारित रेखांकनास हरकत नसल्याचे उपविभागीय अधिकाऱ्यांनी कळविले असणे, असे असतांना दिनांक २०/०२/२०२५ रोजी या कायदेशीर असलेल्या जागेवरील बांधकाम मोठा पोलिस बंदोबस्तात उपविभागीय अधिकारी यांनी पाडून टाकणे, त्यामुळे त्या परिसरातील नागरीकांत पसरलेला तीव्र असंतोष. नियमित असलेले व सर्वकर भरत असलेले बांधकाम पाडल्यामुळे जागेच्या मालकाचे दोन कोटी रूपयांचे नुकसान, झालेल्या नुकसानीची परतफेड करण्याबाबत व ज्यांनी बांधकाम पाडले त्यांच्या विरुदध कारवाई करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावायाची कारवाई."

---

## मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदय यांचे निवेदन

"प्रस्तुत प्रकरणी मौ.बु-हाणनगर ता.जि.अहिल्यानगर येथील या मिळकतीस तहसिलदार नगर यांचेकडील आदेशान्वये रहिवास प्रयोजनासाठी अकृषिक परवानगी देण्यात आलेली आहे. उपविभागीय अधिकारी नगर भाग, अहमदनगर यांचेकडील, दि.२९/१२/२०१२ रोजीच्या आदेशान्वये रहिवास प्रयोजनाकरीता प्लॉ.नं. १ ते ६ चे एकत्रिकरण व बांधकाम परवानगीचे आदेश पारीत झालेले असुन सदर प्रकरणी दाखल जनहित याचिका, सदर मिळकतीमधील अनधिकृत वाणिज्य वापर व यामुळे होणारा सामाजिक उपद्रव इ. विचारात घेता, उपविभागीय अधिकारी अहिल्यानगर, भाग अहिल्यानगर यांचेकडील दि.१८/०२/२०२५ रोजीच्या आदेशानुसार, मिळकतीमधील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याची कारवाई दि. २०/०२/२०२५ रोजी करण्यात आलेली आहे."

.......................

नगर विकास विभाग
लक्षवेधी सूचना क्र.२१४०

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. संदिप क्षिरसागर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.२१४० पुढीलप्रमाणे आहे:-**

"बीड नगरपरिषदेची दि.२०.०१.२०२५ रोजी नगरपरिषदेमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींसोबत आढावा बैठक घेण्यात आली असणे, यामध्ये सर्व विभागाचा आढावा घेण्यात आलेला असणे, त्यामध्ये लेखा विभागाच्या बाबतीत व न.प.फंडाच्या बाबतीत ज्या तक्रारी प्राप्त होत्या त्यानुसार मुख्याधिकारी यांनी जा.क्र.बीनप/कावि/४७३ दि.३१.०१.२०२५ नुसार न.प.कार्यालयीन प्रमुख व कर्मचारी यांना स्वत: पत्रव्यवहार करत सदरील माहितीबाबत सात दिवसामध्ये देणेबाबत निर्देशीत केलेले असणे. परंतु दि.०९.०३.२०२५ पर्यंत कोणत्याही स्वरूपाची माहिती प्रत्यक्ष, ई-मेल, अथवा सोशल मिडियाद्वारे देण्यात आलेली नसणे, जानेवारी-२०२२ ते जानेवारी-२०२५ या कालावधीतील न.प.फंडातुन केलेल्या विविध विकासकामावरील खर्चाबाबत रितसर माहिती मागवली असता मुख्याधिकारी न.प.बीड यांनी जा.क्र.बीनप/कावि/सा.बां./११/५८९ दि.०६.०२.२०२५ रोजी ३० दिवसाची मुदत स्वत:च्या पत्रामध्ये उल्लेखीत केलेली असणे. तरी ३० दिवस झाल्यानंतरसुद्धा माहिती उपलब्ध होवू शकलेली नसणे, गुंठेवारी व बांधकाम परवानाबाबतीत माझ्याकडे असंख्य तक्रारी प्राप्त असणे. मुख्याधिकारी न.प.बीड यांनी जा.क्र.बीनप/कावि./सा.प्र./४७४ दि.३१.०१.२०२५ नुसार विभागप्रमुख तथा कार्यालयीन कर्मचारी यांच्याकडे स्वत:च्या पत्रानुसार दिलेली असणे. परंतु याबाबतीतही मुख्याधिकारी न.प.बीड यांनी वेळकाढुपणा करणे, न.प.बीड मुख्याधिकारी हे जाणीवपुर्वक मला विधीमंडळाने पारीत केलेल्या अधिकाराचा हक्कभंग करत आहेत. या विषयी विधीमंडळाने वेळोवेळी पारीत केलेल्या सर्व परिपत्रकाचे अवलोकन होवून या विषयी रितसर कार्यवाहीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी करणे, सदर विषयी संबंधित मुख्यअधिकारी यांच्यावर करायाची कारवाई व शासनाची भुमिका."

---

मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

बीड नगरपरिषदेअंतर्गत सर्व विभागाची आढावा बैठक आयोजित करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी दि.१६ जानेवारी, २०२५ रोजी मुख्याधिकारी/प्रशासक, बीड नगरपरिषद यांना पत्र दिले. मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद यांच्या दालनात दि.२० जानेवारी, २०२५ रोजी मा.लोकप्रतिनिधी व सर्व विभाग प्रमुख तसेच संबंधित कर्मचारी यांच्या समवेत बैठक पार पडली. सदर बैठकीत मा.लोकप्रतिनिधी यांनी नगरपरिषदेत जानेवारी २०२२ ते जानेवारी २०२५ या कालावधीतील नगरपालिका फंडातून केलेल्या विविध विकास कामावरील तपशीलवार माहितीच्या संचिका त्यांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करून

देण्याबाबत मागणी केली. तसेच यासंदर्भात दि.३१ जानेवारी, २०२५ रोजी मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद यांना पत्रही दिले आहे.

त्यानुसार मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद यांनी दि.३१ जानेवारी, २०२५ रोजी नगरपरिषदेच्या सर्व विभागांना माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना दिल्या. सन २०२२ ते २०२५ या कालावधीतील नगरपरिषदेच्या सर्व विभागांची माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने, ती उपलब्ध करुन देण्याकरीता ३० दिवसांची मुदत देण्याची विनंती मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद यांनी दि.०६ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये मा.लोकप्रतिनिधी यांना केली. तसेच दि.१२ फेब्रुवारी, २०२५ पासून नगरपरिषद क्षेत्रात अतिक्रमण मोहिम राबविण्यात आली असल्याने व संचिका लेखापरिक्षणाकरीता देण्यात आल्या असल्याने पुनश्च: १५ दिवसांची मुदत देण्याबाबत मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद यांनी दि. ११ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये मा.लोकप्रतिनिधी यांना विनंती केली.

मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद यांनी दि.१७ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये नगरपरिषदेच्या काही विभागांची माहिती मा.लोकप्रतिनिधी यांना उपलब्ध करुन देण्यात आली असून उर्वरित माहिती दि.२७ मार्च, २०२५ अखेरपर्यंत उपलब्ध करुन दिली जाईल असे कळविले आहे.

गुंठेवारी व बांधकाम परवानगीबाबत मा.लोकप्रतिनिधी यांच्या दि.१५ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने, नियमोचित कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना शासनाच्या दि.०७ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

*******

लक्षवेधी सूचना क्र.२१४२

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**मा.श्री.नरेंद्र मेहता, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.२१४२ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मीरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत मौ.घोडबंदर येथील स.क्र ९२/१/अ,/१/ब, ७७/ब/१,२३४/ब/१ या जमिनीवर जीसीसी हॉटेल प्रा.लि.यांनी शासनाची फसवणूक करून परवानगी प्राप्त केल्याची बाब उघडकीस येणे,सदर हॉटेल मालकास महापालिकेने जमिनीची मोजणी तथा विभागणीचा अहवाल नसताना परवानगी देणे,दि.१७/१०/१७ साली परवानगी देताना तारांकित हॉटेल म्हणून अधिकचा fsi दिलेला असणे,याकरता आवश्यक डीसी रूल ३४(४) नुसार १८ मीटर रुंदीचा रस्ता व तारांकित हॉटेल म्हणून परवानगी घेताना विभागीय उपसंचालक नगररचना, स्थानिक विकास प्राधिकरण,मा.पोआयुक्त व मा.संचालक पर्यटन यांच्या समितीची परवानगी घेणे बंधनकारक असणे,परंतु १८ मीटर रुंदीचा रस्ता नसताना, संबंधित समितीची परवानगी नसताना देखील महापालिकेने नियमबाह्य परवानगी दिलेली असणे, तसेच सदर हॉटेल मालकाने दि.०८/०७/२४ रोजी त्याच जागेवर सुधारित परवानगी प्राप्त करणे,सदर परवानगी मिळविताना जीसीसी हॉटेलच्या मालकीची ६९१० चौ.मी इतकीच जागा असताना परवानगी ८७०० चौ.मी इतक्या जागेत बांधकाम परवानगी दिलेली असणे, सदर परवानगी घेताना संबंधित जागा मालकाची नाहरकत किंवा मंजुरी नसताना करून मालकीपेक्षा जास्त जागेवर परवानगी घेणे,अशा प्रकारे नियमबाह्य पद्धतीने परवानगी प्राप्त करणाऱ्या आणि जमीन मालकाची फसवणूक करणाऱ्या विरोधात शहरातील नागरिकांत पसरलेला असंतोष, नियमबाह्य पद्धतीने दिली गेलेली परवानगी तात्काळ रद्द करून संबंधित हॉटेल मालक व अधिकारी यांचेविरुद्ध एमआरटीपी अंतर्गत आणि फसवणुकीचा गुन्हा दाखल करून करावयाची कारवाई."

## मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

मिरा भाईंदर शहराची विकास योजना व विकास नियंत्रण नियमावली शासनाने दिनांक १४/०५/१९९७ रोजी भागश: मंजूर केली असून वगळलेल्या भागाची विकास योजना शासनाने दि.२५/०८/२००० रोजी मंजूर केली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन अधिसूचना दि. २९/०८/२००९, अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत. मिरा भाईंदर शहराची सुधारीत विकास योजना नियुक्त अधिकारी तथा सहायक संचालक नगररचना ठाणे शाखा यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमाचे कलम ३० अन्वये दि.२५/१०/२०२३ रोजी मंजूरीसाठी शासनास सादर केली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या तत्कालीन मंजुर विकास नियंत्रण नियमावली मधील विनियम ३२(४) मधील तरतुदीनुसार Star Category हॉटेल साठी वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक हा शासनाचे पूर्व परवानगीने व शासनाने ठरवून दिलेल्या अधिमुल्य रक्कमेचा भरणा करून घेणेसह शासनाच्या पर्यटन विभागाच्या मान्यतेने अनुज्ञेय होता. तसेच सदरच्या नियमावलीमधील

विनियम क्र.५१(७) (vii) नुसार रहिवास हॉटेल व लॉजिंग हे जर स्वतंत्र भुखंडावर अथवा इमारतीच्या एका भागामध्ये किंवा इमारतीच्या वरच्या मजल्यावर प्रस्तावित असल्यास विभागीय उप-संचालक, नगररचना याच्या सल्लामसलतीने आवश्यक त्या सुविधा असल्याबाबतची खातरजमा करून विकास परवानगी अनुज्ञेय होती. तसेच ४-Star व ५-Star प्रवर्गाच्या हॉटेलसाठी १८.०० मी. रुंदीपेक्षा जास्त रुंदीचा पोहच मार्ग व किमान २५००.०० चौ.मी. क्षेत्राच्या भुखंडावर विभागीय उप-संचालक नगररचना, पोलीस आयुक्त (Law and Order, Traffic). व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्या समितीने मंजुरी दिल्यानंतर Star Category हॉटेल करिता नियोजन प्राधिकरणाने मंजुरी देण्याची तरतूद होती. तथापि, दरम्यानच्या कालावधीमध्ये शासनाने दि.०३/०८/२००४ च्या शासन अधिसुचनेद्वारे तत्कालीन नगरपारिषदेच्या नियमावलीमधील तरतुदीनुसार तत्कालीन उपसंचालक नगररचना, कोकण विभाग यांचेकडील सल्लामसलत, मंजुरी व समती (Consultation, Approval a Consent) घेणेबाबतची तरतुद रद्द केली आहे.

शासन नगर विकास विभागाने शैक्षणिक, वैदयकिय संस्था व Star Category हॉटेल यांना वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक देणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वयेचे निर्देश दि. १४/०३/२०१६ रोजी दिले असून, सदर निर्देशानुसार वाढीव चटई क्षेत्र निर्देशाक मंजुरीचे अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना दिले आहेत.

मौजे नवघर येथील सं.नं.९२/१पै., क्षेत्र ३७९८.२५ चौ.मी. क्षेत्रावर तत्कालिन मिरा-भाईंदर नगरपरीषदेने दिनांक १७/८/१९९२ रोजी रहिवास व वाणिज्य कारणासाठी मंजूरी दिली होती. तदनंतर अन्य सं.नं.खालील क्षेत्र अंतर्भूत करुन वेळोवेळी तत्कालिन मिरा-भाईंदर नगरपरीषदेने/ विदयमान महानगरपालिकेने सुधारीत बांधकाम परवानगी दिली आहे.

उपरोक्त सर्व्हे क्रमांकाच्या जमिनीवर पूर्व मंजुरीनुसार विदयमान हॉटेलचा वापर सुरु असल्याने मे.जी.सी.सी. हॉटेल्स प्रा. लि. यांना भारत पर्यटन, मुंबई (पर्यटन मंत्रालय, भारत सरकार) यांनी दि.०४/०९/२०१३ रोजी स.क्र. ९२/१ मधील हॉटेल है ३-Star हॉटेल असल्याबाबतचे दिलेले प्रमाणपत्र विचारात घेवुन उपरोक्त दि. १४/०३/२०१६ च्या शासन निर्देशानुसार वाढीव १.०० चटई क्षेत्र निर्देशांकानुसार अनुज्ञेय असलेल्या ९४२७.९६ चौ. मी. बांधकाम क्षेत्रापैकी प्रस्तावित १५२७.०० चौ. मी. वाढीव बांधकामास ३५% प्रमाणे अधिमुल्य रक्कम आकारुन महानगरपालिकेने विकास परवानगी दिलेली आहे.

दरम्यानच्या कालावधीमध्ये शासनाने सपूर्ण राज्याकरीता (राजपत्रातील वगळलेला भाग सोडून) एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) दि.०३/१२/२०२० पासुन लागु केली असुन, सदरची नियमावली ही मिरा –भाईंदर महानगरपालिकेस लागू आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दिनांक ८/७/२०२४ रोजी सुधारीत /वाढीव बांधकाम क्षेत्रासाठी परवानगी दिली आहे. सदरची दिलेली परवानगी ही उपंअधिक्षक भूमी अभिलेख, ठाणे यांचेकडील सं.नं.९२/१ च्या एकत्रित जमिनीच्या हद्दीच्या मोजणीनुसार, मे.सैनी हॉटेल प्रा.लि. यांचेकडील नोंदणीकृत करारनाम्यानुसार त्यांची स.नं.९२/१पै. च्य क्षेत्रामधील पुर्व- पश्चिम असलेल्या हद्दीची बाब तसेच विकासकाच्या ताब्यात असलेल्या वाढीव क्षेत्राबाबत

मा.न्यायालयाचे निर्णय विचारात घेवून, पुर्व मंजूरीनुसारच्या स.नं.९२/१/बी, ९१/१सी, ४६४/२, ७७/बी/१ व २३४/बी/१ असे ७/१२ नुसारच्या किमान एकूण १०९९०.०० चौ.मी. क्षेत्रावर UDCPR मधील विनियम १.५ व विनियम ७.१ टेबल क्र.७अ नुसार Star Categary हॉटेल करीता १५.०० मी. रुंद रस्ता विचारात घेवून टेबल ६जी प्रमाणे २.५० चटई क्षेत्र निर्देशांक अधिमुल्य आकारणी करुन अनुज्ञेय केला आहे. सदर मंजूरीवेळी पुर्व मंजूर बांधकाम क्षेत्र कायम ठेवून वाढीव ७६९६.४५ चौ.मी. व सदर क्षेत्रावर ८० टक्के ॲन्सीलरीप्रमाणे ६१५५.८६ चौ.मी. असे एकूण १३८५२.४५ चौ.मी. क्षेत्रासाठी अटी व शर्तीसापेक्ष वाढीव बांधकाम क्षेत्रासाठी विकास परवानगी महानगरपालिकेने दिलेली आहे.

सदर परवानगी ही जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील मंजुर रेखांकन त्याअनुषगीक वेळोवेळी दिलेल्या विकास परवानगी व भूमी अभिलेख विभागाकडील प्रत्यक्ष जागेवरील मोजणी विचारात घेता रस्त्यामध्ये कोणताही बदल झाला नसल्याने व पुर्व मजुरीमधील ३०.०० मी. रुंद रस्त्यास सन्मुख असलेले क्षेत्र व त्यानुसार पूर्व मंजुर इमारत रेषा कायम ठेवल्याने त्यास इतर जमिन मालकांची नाहरकत किंवा मंजुरी घेण्याची आवश्यकता नसल्याने सदर प्रकरणी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिकेने परवानगी दिली आहे.

***

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.२१६८

**मा.वि.स.स श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) यांनी, महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"नाशिक महानगरपालिका हद्दीत सर्वे नंबर ७५९/ए/२+७५९/ए/३+७५९/ए/४ नाशिक शिवार येथे नाशिक मनपाने लँड/बीपी/सीडी/७३१ दि.५.११.२०१९ ची बिल्डिंग सेंट्रल पार्क नावाने परवानगी आणि कर्मेन्समेंट सर्टिफिकेट (रेरा रजिस्ट्रेशन नंबर ५१६ ००० २३ ७१७ देण्यात) आलेले असून सदर प्रकल्प ४००० चौ. मीटर पेक्षा जास्त क्षेत्रावर म्हणजेच १३ ००० चौरस मीटर वर बांधकाम करण्यास परवानगी देण्यात येणे. सदर परवानगी देऊन ही म्हाडा तरतूद नियम क्रमांक नियम २०१३ मध्ये नमूद असून २०% गरिबांना घरे सोडलेली दिसून येत नसणे, सदर बांधकाम प्रकल्पात प्रधानमंत्री आवास योजना (पीएमएवाय) अर्बनच्या अंतर्गत नियमानुसार ईकोनॉमिक विकर/शेक्शन/लोअर इन्कम ग्रुप अंतर्गत असेल तर म्हाडा मुंबई कार्यालय यांची परवानगी घेणे, बंधनकारक असूनही त्यांनी फक्त नाशिक मनपाकडून घेण्यात आलेली परवानगी बेकायदेशीर असणे, सदर बांधकाम प्रकल्पात प्रधानमंत्री आवास योजना (पीएमएवाय) अर्बन च्या नियमानुसार इकॉनॉमिक विकर/सेक्शन ऑब्लिक लोवर इन्कम ग्रुप अंतर्गत येणाऱ्या लोकांना न देता कंपनी मालक व इतर पक्के घर असलेल्या लोकांना बेकायदेशीर रित्या विक्री करत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदय यांचे निवेदन

नाशिक महानगरपालिका हद्दीत सर्वे नंबर ७५९/३/२+७५९/३/३+७५९/३/४ ही मिळकत ३० मिटर रस्त्याच्या सन्मुख असून सदर भूखंडचे क्षेत्र १६००० चौ.मी. असून सदर क्षेत्रावर रहिवाशी व वाणिज्य कारणास्तव दि.२४.११.२००३ रोजी मूळ बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आलेली होती. तद्नंतर अर्जदार / विकसक यांना महानगरपालिकेतर्फे दि.११.०७.२०१९, ०५.११.२०१९ आणि ३१.०३.२०२२ रोजी रहिवासी कारणास्तव सुधारीत बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आलेली आहे.

एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनिमय क्र.३.८.२ (ब) मध्ये Inclusive Housing बाबत खालील प्रमाणे तरतुद आहे.

3.8 PROVISION FOR INCLUSIVE HOUSING

3.8.1 This regulation shall be applicable only to Municipal Corporations having population 10 lacs or more as per the latest Census, as mentioned in Regulation No.3.8.2.

3.8.2 Inclusive Housing Provision for inclusive housing shall be applicable in following cases:-

(b) For Group Housing Scheme :-For a plot of land, admeasuring 4000 Sq.m. or more (after deducting area under D.P./R.P. Roads, D.P. Reservations including deemed reservations under these regulations, if any) to be developed for a Housing Scheme consisting of one or

more buildings (hereinafter referred to as 'the said Scheme'), EWS/LIG Housing in the form of tenements of size ranging between 30.0 and 50.0 Sq.m. carpet area

एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनिमय क्र. ३.८.२ चे (क) मध्ये Inclusive Housing बाबत खालील प्रमाणे तरतुद आहे.

(c) Prospective Applicability: These Provisions shall be applicable prospectively and shall not be applicable to revised permission of any Layout, Housing Scheme or residential development project wherein Commencement Certificate has been issued prior to the date of coming into force of these provisions and is valid on such date. However, this provision shall be applicable to revised permission where revised permission is sought including additional area more than 4000. In such case, this provision shall be applicable to additionally included area.

सदर प्रकरणात उक्त भूखंडामध्ये दिनांक २४/११/२००३ रोजी मुळ बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनिमय क्र 3.8.2 (क) नुसार, Prospective Applicability या तरतुदी फक्त दिनांक ०८/११/२०१३ नंतरच्या प्रस्तावांना लागू होतात व या दिनांकापूर्वीच्या मंजूर प्रस्तांवावर लागू होत नाहीत. सबब, उक्त क्षेत्रावरील मुळ बांधकाम परवानगी ही दिनांक ०८/११/२०१३ पुर्वीच म्हणजेच दिनांक २४/११/२००३ रोजी मंजुर असल्याने सदर प्रस्तावास म्हाडाची तरतुद लागु होत नाही.

विषयाधिन जागेत बांधकाम परवानगी प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत दिलेली नाही. इमारतीस अद्याप भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) देण्यात आलेले नाही.

---------------

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.२२९७**

**मा.वि.स.स. श्री.संदिप क्षीरसागर यांनी, महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"बीड नगर परिषद अंतर्गत सर्व्हे नं.२९ तरफ बलगुजर सारडा नगरी, सर्व्हे नं.१९७ तरफ खोड सारडा रेसिडेन्सी, सर्व्हे नं.७९ तरफ गिराम व इतर बाबतीत नगर परिषदेने चुकीच्या पद्धतीने ले-आऊट करणे, त्यासाठी मुख्याधिकारी यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाणघेवाण करने संबंधित संचिका गहाळ असणे व त्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे प्राप्त असणे, शहरातील ओपन स्पेस जागेच्या दुबार संचिका करुन अनाधिकृत नियमबाह्य ओपन स्पेस वाटप करणे, गुंठेवारी मध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता करणे व त्याच्या सुद्धा संचिका गहाळ असणे, बांधकाम परवानगी देत असताना सर्व नियमांची पायमल्ली करणे व त्यांच्या सुद्धा कार्यालयीन संचिका गहाळ असणे, याबाबतची तपशीलवार माहितीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार करणे, नुकतीच यासंबंधीची मा.विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, मा.जिल्हाधिकारी, बीड व मा.मुख्याधिकारी यांच्याकडे दि.११.०२.२०२५ रोजी पत्राद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पुन्हा तक्रार केलेली असणे, परंतु मुख्याधिकारी यांच्याकडून अद्यापपर्यंत कोणतेही अनुपालन न होणे, याप्रकरणी सदरील झालेल्या अनियमिततेची व आर्थिक संगनमत करुन केलेल्या चुकीच्या कामाची त्रयस्त समिती अथवा विभागाकडून चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याची तेथील नागरीकांची होत असलेली मागणी व त्याप्रकरणी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भुमिका."

### मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

मा.विधानसभा सदस्य यांनी ११.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये बीड शहरातील सर्व्हे नं.२९ तरफ बलगुजार, सर्व्हे नं.१९७ तरफ खोड सर्व्हे नं.७९ तरफ गिराम यामधील संचिकेच्या बाबतीत नगर परिषद बीड ने मंजुर केलेले लेआऊट तसेच सर्व मान्यता दिलेल्या व रिव्हाईज मान्यता दिलेल्या सर्व संचिका मिळणेबाबत नगरपरिषदेस मागणी केलेली आहे. मात्र मा.विधानसभा सदस्य यांनी मागणी केलेल्या सर्व्हे नंबर मधील संबंधीत नेमक्या मालकाचे नाव नसल्यामुळे तसेच, सदर माहिती अंदाजे २० ते २५ वर्षा पूर्वीची असून संबंधीत माहिती अभिलेख विभागात तपासणी करण्याकरिता नगर परिषद, बीड यांना कालावधी लागत आहे. अधिवेशन काळात नगर परिषद, बीड कार्यालयास मोठ्या प्रमाणात विधानसभा तारांकित प्रश्न प्राप्त होत असून त्यासदेखील उत्तर देणे हे प्राधान्यक्रमाचे असल्याने, मा.विधानसभा सदस्य यांना या संबंधी दि.०६.२.२०२५ व दि.११.०३.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अधिकचा वेळ मिळण्याकरीता नगर परिषदेने विनंती केलेली आहे.

तसेच, नगर परिषदेने दि.१४.०३.२०२५ रोजी पुनश्च कार्यालयीन कर्मचाऱ्यांची संचिका शोधण्याकरिता समिती गठीत केली असून, मा.विधानसभा सदस्य यांनी मागणी केलेल्या माहिती पैकी सर्व्हे नं १९७ तरफ खोड ही अभिन्यास संचिका तसेच, सर्व्हे नं २९ तरफ बलगुजर या नावाने पत्रव्यवहार व नामंजुर झालेली संचिका दि.१७.०३.२०२५ रोजी मा.विधानसभा सदस्य यांना उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. उर्वरित सर्व्हे क्रमांक ७९ तरफ गिराम बाबत नगर परिषदेमार्फत अभिलेखात शोध सुरु असून, संचिका प्राप्त होताच नगर परिषदेतर्फे मा.विधानसभा सदस्य यांना उपलब्ध करुन देण्यात येतील. सबब, संचिका नुकत्याच प्राप्त झाल्यामुळे, त्याबाबतीत चुकीच्या पध्दतीने लेआऊट होणे, आर्थिक देवाण-घेवाण झाली असे म्हणणे, योग्य ती चौकशी केल्याशिवाय संयुक्तिक ठरत नाही.

बीड शहरातील मंजुर लेआऊट मधील ओपनस्पेस जागेच्या दुबार संचिका करुन अनाधिकृत नियमबाह्य ओपन स्पेस वाटप करणे अशी कोणतीही बाब आढळून आलेली नाही.

नगर परिषद कार्यालयामार्फत गुंठेवारी अधिनियमानुसार तातडीने कार्यवाही करण्यात येत असून संचिका नगर परिषद कार्यालयात उपलब्ध आहेत व कोणतीही संचिका गहाळ नाही.

नगर परिषद कार्यालयामार्फत बांधकाम परवानगी ही BPMS या पोर्टलद्वारे UDCPR नियमावलीनुसार ऑनलाईन पध्दतीने देण्यात येत असून सर्व बांधकाम परवानगी संचिका BPMS पोर्टलवर उपलब्ध आहेत.

सबब, उर्वरित माहिती प्राप्त होताच मा.विधानसभा सदस्य यांना उपलब्ध करुन देण्याचे नगर परिषद, बीड मार्फत प्रस्तावित असल्याने, नगर परिषद, बीड कार्यालयाकडून माहिती देण्याबाबत जाणीवपूर्वक कोणतीही टाळाटाळ करण्यात आल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात नमूद लेआऊट बाबत अनियमितता झाली किंवा कसे, याबाबत योग्य त्या चौकशीअंती निष्कर्ष काढणे योग्य ठरेल.

***********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.२३२९

**मा.वि.स.स. श्री.संदिप क्षीरसागर यांनी, महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"बीड नगर परिषद अंतर्गत सर्व्हे नं. २९ तरफ बलगुजर सारडा नगरी, सर्व्हे नं. १९७ तरफ खोड सारडा रेसिडेन्सी, सर्व्हे नं.७९ तरफ गिराम, सर्व्हे नं.१९८ तरफ खोड, सर्व्हे नं.२९ माळी, सर्व्हे नं.६८,६९ तरफ गिराम व इतर बाबतीत नगर परिषदेने चुकीच्या पद्धतीने ले-आऊट करणे, त्यासाठी मुख्याधिकारी यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाणघेवाण करणे संबंधित संचिका गहाळ असणे व त्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे प्राप्त असणे, शहरातील ओपन स्पेस जागेच्या दुबार संचिका करुन अनाधिकृत नियमबाह्य ओपन स्पेस वाटप करणे, गुंठेवारीमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता करणे व त्याच्या सुद्धा संचिका गहाळ असणे, बांधकाम परवानगी देत असताना सर्व नियमांची पायमल्ली करणे व त्यांच्या सुद्धा कार्यालयीन संचिका गहाळ असणे, याबाबतची तपशीलवार माहितीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार करणे, यासंबंधीची विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर, जिल्हाधिकारी बीड व मुख्याधिकारी यांच्याकडे दि.११/०२/२०२५ रोजी पत्राद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पुन्हा तक्रार केलेली असणे, परंतु मुख्याधिकारी यांच्याकडून अद्यापपर्यंत कोणतेही अनुपालन न होणे, याप्रकरणी सदरील झालेल्या अनियमिततेची व आर्थिक संगनमत करुन केलेल्या चुकीच्या कामाची त्रयस्त समिती अथवा विभागाकडून चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याची तेथील नागरीकांची होत असलेली मागणी व त्याप्रकरणी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भुमिका."

**मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन**

मा.विधानसभा सदस्य यांनी ११.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये बीड शहरातील सर्व्हे नं.२९ तरफ बलगुजार, सर्व्हे नं.१९७ तरफ खोड सर्व्हे नं.७९ तरफ गिराम यामधील तसेच सर्व्हे नं. १९८ तरफ खोड, सर्व्हे नं.२९ माळी, सर्व्हे नं. ६८, ६९ तरफ गिराम यामधील संचिकेच्या बाबतीत नगर परिषद बीड ने मंजुर केलेले लेआऊट तसेच सर्व मान्यता दिलेल्या रिव्हाईज मान्यता दिलेल्या सर्व संचिका मिळणेबाबत नगरपरिषदेस मागणी केलेली आहे. मात्र मा.विधानसभा सदस्य यांनी मागणी केलेल्या सर्व्हे नंबर मधील संबंधीत नेमक्या मालकाचे नाव नसल्यामुळे तसेच, सदर माहिती अंदाजे २० ते २५ वर्षा पूर्वीची असून संबंधीत माहिती अभिलेख विभागात तपासणी करण्याकरिता नगर परिषद, बीड यांना कालावधी लागत आहे. अधिवेशन काळात नगर परिषद, बीड कार्यालयास मोठ्या प्रमाणात विधानसभा तारांकित प्रश्न प्राप्त होत असून त्यासदेखील उत्तर देणे हे प्राधान्यक्रमाचे असल्याने, मा.विधानसभा सदस्य यांना या संबंधी दि.०६.२.२०२५

व दि.११.०३.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अधिकचा वेळ मिळण्याकरीता बीड नगर परिषदेने विनंती केलेली आहे.

तसेच, बीड नगर परिषदेने दि.१४.०३.२०२५ रोजी पुनश्च कार्यालयीन कर्मचाऱ्यांची संचिका शोधण्याकरिता समिती गठीत केली असून, मा.विधानसभा सदस्य यांनी मागणी केलेल्या माहिती पैकी सर्व्हे नं १९७ तरफ खोड ही अभिन्यास संचिका तसेच, सर्व्हे नं २९ तरफ बलगुजर या नावाने पत्रव्यवहार नामंजुर झालेली संचिका दि.१७.०३.२०२५ रोजी मा.विधानसभा सदस्य यांना उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच, सर्व्हे नं १९८ तरफ खोड, सर्व्हे नं. २९ तरफ माळी, सर्व्हे नं.६८ तरफ गिराम, सर्व्हे नं.६९ तरफ गिराम या अभिन्यास संचिका नगर परिषद बीड कार्यालयात उपलब्ध असून त्यापैकी सर्व्हे नं.६८ व ६९ तरफ गिराम यांचा अभिन्यास सहायक संचालक, नगर रचना बीड यांच्यामार्फत मंजूर झालेला आहे. उर्वरित सर्व्हे नं ७९ तरफ गिराम बाबत नगर परिषद बीड, मार्फत अभिलेखात शोध सुरु असून, संचिका प्राप्त होताच नगर परिषदेतर्फे मा.विधानसभा सदस्य यांना उपलब्ध करुन देण्यात येतील. सबब, संचिका नुकत्याच प्राप्त झाल्यामुळे, त्याबाबतीत चुकीच्या पध्दतीने लेआऊट होणे, आर्थिक देवाण-घेवाण झाली असे म्हणणे, योग्य ती चौकशी केल्याशिवाय संयुक्तिक ठरत नाही.

बीड शहरातील मंजुर लेआऊट मधील ओपनस्पेस जागेच्या दुबार संचिका करुन अनाधिकृत नियमबाह्य ओपन स्पेस वाटप करणे अशी कोणतीही बाब आढळून आलेली नाही.

नगर परिषद बीड, कार्यालयामार्फत गुंठेवारी अधिनियमानुसार तातडीने कार्यवाही करण्यात येत असून सर्व संचिका नगर परिषद कार्यालयात उपलब्ध आहेत व कोणतीही संचिका गहाळ नाही.

नगर परिषद बीड, कार्यालयामार्फत बांधकाम परवानगी ही BPMS या पोर्टलद्वारे UDCPR नियमावलीनुसार ऑनलाईन पध्दतीने देण्यात येत असून सर्व बांधकाम परवानगी संचिका BPMS पोर्टलवर उपलब्ध आहेत.

सबब, उर्वरित माहिती प्राप्त होताच मा.विधानसभा सदस्य यांना उपलब्ध करुन देण्याचे नगर परिषद, बीड मार्फत प्रस्तावित असल्याने, नगर परिषद, बीड कार्यालयाकडून माहिती देण्याबाबत जाणीवपूर्वक कोणतीही टाळाटाळ करण्यात आल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात नमूद लेआऊट बाबत अनियमितता झाली किंवा कसे, याबाबत योग्य त्या चौकशीअंती निष्कर्ष काढणे योग्य ठरेल.

***********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक २४२६**

**श्री. तुकाराम काते, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२४२६ पुढीलप्रमाणे आहे:-**

"मुंबई महानगरपालिकेने ८३ भूखंड महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या गृहनिर्माणासाठी ६० वर्षाच्या कराराने भाडेपट्ट्याने दिलेले असणे, जवळपास १,४०,००० चौरस मीटर क्षेत्रफळावरील भूखंडावर २४२५ हून अधिक कुटुंबे राहत असणे, हे भूखंड ४० ते ५० वर्षांपूर्वी देण्यात आलेले असणे, भूखंडाच्या मकत्याचा कालखंड संपत आला असणे,बांधलेल्या इमारती अतिशय जीर्ण झालेल्या असणे, तातडीने या इमारतींचा पुनर्विकास करणे आवश्यक असणे, अथवा मोठ्या दुर्घटनेची शक्यता नाकारता येत नाही अशी भीती सोसायटीत राहणाऱ्या पालिका कर्मचाऱ्यांच्या कुटुंबात निर्माण झालेली असणे, पण पालिका प्रशासन या दुरावस्थेकडे लक्ष देत नसणे, अतिशय गंभीर सदरहू बाब असून शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

## मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

बृहन्मुंबई महानगरपालिकेने शहर आणि उपनगरांमध्ये महापालिका कर्मचाऱ्यांच्या गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या निवासाची अडचण दूर करण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील तरतूदीनुसार सवलतीच्या दरात एकूण ८३ भूखंड सन १९६५ ते सन १९९८ या कालावधीपर्यंत भाडेतत्त्वावर (मक्त्याने) दिले आहेत. सदर ८३ भूभागांचे एकूण क्षेत्रफळ अंदाजे १,५०,००० चौ. मीटर इतके आहे.

सदर योजना सद्या कार्यान्वित नसल्याने महानगरपालिका कर्मचा-यांना नव्याने भूखंड उपलब्ध होत नसल्याने त्यांचेसाठी बृहन्मुंबई क्षेत्रात निवासाच्या नविन संधी निर्माण होत नाहीत. अशा भूखंडांचा पुनर्विकास करून उपलब्ध होण्या-या अधिकच्या सदनिका महानगरपालिका कर्मचा-यांसाठी उपलब्ध करून दिल्यास, सध्या कार्यरत असलेल्या महानगरपालिका कर्मचा-यांना बृहन्मुंबई क्षेत्रात निवासाच्या नविन संधी उपलब्ध होतील. मात्र तसा पुनर्विकासाचा प्रस्ताव अद्याप कोणत्याही संस्थेकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेला नाही. विद्यमान इमारतीची देखभाल, Structural ऑडीट, दुरूस्ती इ. कामे करणे ही जबाबदारी संबंधित सहकारी संस्थेची आहे.

महानगरपालिकेच्या कर्मचा-यांच्या गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासाबाबत महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या तरतुदींच्या अधीन राहून धोरण बनविणे महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे.

***

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.२४५०**

**मा.वि.स.स. श्री.संदिप क्षीरसागर यांनी, महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

" बीड नगरपरिषदेने आरक्षण जमिनीवर अनियमितता व आर्थिक संगनमत करुन नियमबाह्य गुंठेवारी केलेली असणे, त्यामध्ये सर्व्हे नं ५९ बलगुजार आरक्षण क्रमांक १३३ जमिन गार्डन साठी राखीव असणे, सर्व्हे नं १८८ पिंगळे आरक्षण क्रमांक ३७ क्रिडांगणासाठी राखीव असणे, सर्व्हे नं ५३ बलगुजार आरक्षण क्रमांक १३१ पब्लिक ॲमेनिटी साठी राखीव असणे, सदरील जमिनीवर मुख्याधिकारी न.प. बीड यांनी आर्थिक संगनमत व अनियमितता करुन नियमबाह्य गुंठेवारी केलेली असणे, याबाबतची तक्रारी स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी दिनांक २८/०२/२०२५ व दिनांक ११/०३/२०२५ रोजी विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर, जिल्हाधिकारी बीड, मुख्याधिकारी नगरपरिषद बीड यांच्या कडे पत्राद्वारे केली असणे, यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष , याप्रकरणाची चौकशी करुन आरक्षण असलेल्या जागेवर गुंठेवारी करणाऱ्या अधिकाऱ्याविरुद्ध् कारवाई करण्याची होत असलेली मागणी, त्यावर शासनाने केलेली वा करावयाची कारवाई."

**मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन**

मा.विधानसभा सदस्य यांनी ११.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये बीड शहरातील मंजुर केलेले काही लेआऊट तसेच रिव्हाईज मान्यता दिलेल्या संचिका मिळणेबाबत नगरपरिषदेस मागणी केली असुन यानुषंगाने बीड नगरपरिषद कार्यालयाने दि.१७.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मा.विधानसभा सदस्य यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

मौजे तरफ बलगुजर सर्व्हे क्र.५९ मधील 'आ.क्र.१३३-गार्डन' बाबत झालेल्या गुंठेवारीबाबतच्या एकूण १२ संचिका नगरपरिषद कार्यालयात अढळून आल्या असुन याबाबत संबंधित गुंठेवारी धारकांस दि.१२.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ५१ अन्वये नोटीस बजावण्यात आली असुन सदर नोटीसांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करणे संयुक्तीक राहील. तसेच सदर १२ संचिकाच्या प्रती मा. विधानसभा सदस्य यांना दि.१८.०३.२०२५ रोजी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

मौजे तरफ पिंगळे, सर्व्हे क्र.१८८ मधील काही क्षेत्र आ.क्र.३७-क्रीडांगण या आरक्षणाने बाधित असुन काही क्षेत्र रहिवास विभागामध्ये समाविष्ट आहे त्यामुळे मा. विधानसभा सदस्य यांना नेमक्या कोणत्या क्षेत्रावरील गुंठेवारीबाबत माहिती अपेक्षित आहे हे स्पष्ट नसल्याने सदस्थितीत येथे अनियमितता झाली आहे

असे म्हणणे उचित होणार नाही. तसेच सर्व्हे नं ५३, बलगुजार येथील 'आरक्षण क्रमांक १३१-पब्लिक ॲमेनिटी' मधील मंजुर करण्यात आलेल्या गुंठेवारी बाबत नगरपरिषद कार्यालयाकडून पडताळणी करण्यात येत आहे.

सबब, संचिका नुकत्याच प्राप्त झाल्यामुळे, त्याबाबतीत चुकीच्या पध्दतीने लेआऊट होणे, आर्थिक देवाण-घेवाण झाली असे म्हणणे, योग्य ती चौकशी केल्याशिवाय संयुक्तिक ठरत नाही. त्यामुळे प्रस्तुत अनियमिततेबाबत आवश्यक चौकशीअंती निष्कर्ष काढणे योग्य ठरेल.

***********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली आबा कटके, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान~~परिषद~~ सभा नियम १०५ अनुसार दिलेले लक्षवेधी सूचना क्र. २४९५ पुढीलप्रमाणे आहे :-

"पुणे महानगर प्रदेश प्राधिकरणांअतर्गत २३ गावासह ८६० गावांमधील बांधकाम परवानगीचे अधिकार महानगर प्राधिकरणास असणे, गोरगरिब नागरिकांनी शहरालगताच्या गावांमध्ये १ वा २ गुंठे जागा घेऊन कर्ज घेऊन घरे बांधलेली असणे, तसेच या बांधकामाच्या तेथील ग्रामपंचायतीमध्ये नोंदी असून त्यांनी वेळोवेळी मिळकत कराचा भरणा केलेला असणे, असे असतांना अनधिकृत बांधकामाबाबत माहिती अधिकाराअंतर्गत तक्रारी करुन सामान्य लोकांना वेठीस धरण्यांत येऊन त्यांचेकडून पैसे घेण्याचे प्रकार सर्रासपणे चालु असणे, याबाबत महानगर प्रदेश प्राधिकरणांकडे विचारणा केली असता, प्राधिकरणाकडे तक्रार आली असून नोटीसा देऊन २४ तासांमध्ये बांधकाम पाडण्याच्या लाखो नोटीसा देण्यात आल्याचे निदर्शनास येणे, त्याबाबत संबंधित नागरिकांनी नोंदणीकृत आर्किटेक्ट/ नोंदणीकृत इंजिनियर्स यांचेमार्फत दि. ३० एप्रिल, २०२४ पर्यंत प्रस्ताव दाखल करण्यात येवून त्याबाबतच्या स्कुटीनी चलनाचा भरणा देखील करण्यात आला असणे, तथापि, १० महिन्यांपेक्षा जास्त कालावधी होऊन देखील अद्याप कार्यवाही झालेली नसणे, याबाबत प्राधिकरणाकडे विचारणा केली असता, अपुर्ण कागदपत्रांमुळे प्रस्ताव फेटाळण्यात आल्याची माहिती देण्यात येणे, सदर ठिकाणी गोरगरीब जनतेची असलेली घरे व त्यांनी ग्रामपंचायतीकडे केलेला करभरणा पाहता, त्यांची घरे नियमित करण्याबाबत त्यांनी शासनाकडे केलेली मागणी, शासनाने त्याबाबत केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रामध्ये विशेष नियोजन प्राधिकरण असल्याने विकास परवानगी देण्याची कार्यवाही प्राधिकरणा मार्फत करण्यात येते.

अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागामध्ये अनधिकृत बांधकामाबाबत हित संबधित, त्रयस्थ व्यक्तीकडुन आणि माहिती अधिकार अंतर्गत प्राधिकरणाकडे जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ अखेर एकुण १८४ माहिती अधिकार अर्ज व तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तक्रार अर्ज प्राप्त झाल्यावर प्राधिकरणामार्फत सदर बांधकामाचे सर्वेक्षण करुन त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबधित बांधकामधारकास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५३(१) अन्वये सुनावणीची नोटीस देण्यात येतात. सन जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ अखेर अशा ३३८ अनधिकृत बांधकामधारकास सुनावणीच्या नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत. सदर सुनावणी वेळी बांधकामधारकास त्याने केलेल्या बांधकामाबाबत बाजू मांडण्याची तसेच केलेले बांधकाम नियमानुकुल

करण्याची पुरेशी संधी देण्यात येते. बांधकाम धारकाने केलेले बाधकाम नियमानुकुल होईल किंवा कसे याची तपासणी करून बांधकाम नियमानुकुल होत नसेल तर बांधकामधारकास आदेश मिळाल्यानंतर सदरचे बांधकाम १५ दिवसांत स्वखर्चाने काढुन न घेतल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५३(१) ची निष्कासन करण्याच्या नोटीसा बजाविण्यात येतात. त्यानुसार या कालावधीत एकुण ३३८ पैकी १०८ अनधिकृत बांधकामावर निष्कासन नोटीसा बजावण्यात आली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (१) अन्वये अनधिकृत बांधकामासाठी नोटीस बजावलेनंतर संबंधित व्यक्ती ही कलम ५३(३) नुसार अशी बांधकामे नियमाकुल करण्यासाठी अधिनियमातील कलम ४४ नुसार आवश्यक त्या कागदपत्रांसह प्राधिकरणाकडे विकास परवानगी / नियमीतीकरणाचा अर्ज जागेचा ७/१२, मोजणी नकाशा, स्थळ नकाशा, साईट नकाशा, लेआऊट, बांधकाम नकाशा, पोच रस्ता असल्याबाबत आवश्यक कागदपत्रे या कागदपत्रांसह दाखल करु शकतात. त्यानुसार बांधकामधारक नोंदणीकृत वास्तू विशारद / इंजिनियर यांचे मार्फत विकास परवानगी मिळणेकरीता प्रस्ताव दाखल करतात. या दाखल केलेल्या प्रस्तावासोबत जोडलेल्या कागदपत्रांची पडताळणीनंतर कागदपत्रे परिपुर्ण असल्यास विनापरवानगी/अनाधिकृत घरांना विकास परवानगी मंजूरी देण्यात येते. सन २०२२-२३ मध्ये १३४, सन २०२३-२४ मध्ये १७८ व सन २०२४-२५ मध्ये १०७ याप्रमाणे विनापरवानगी बांधलेले बांधकामे तडजोड शुल्क आकारून प्राधिकरणामार्फत नियमाकुल करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १८ (१) (ii) नुसार गावठाण क्षेत्रामध्ये बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार संबंधित ग्रामपंचायतीस आहेत. त्यामुळे अशा गावठाण क्षेत्रामध्ये बांधकाम परवानगी घेऊन बांधलेली घरे ही अधिकृत आहेत. गावठाण हद्दीच्या बाहेरील क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून प्राधिकरणाची नियुक्ती असल्याने अशा क्षेत्रामध्ये प्राधिकरणाकडून बांधकाम परवानगी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे अशी परवानगी घेतली नसल्यास अशी बांधकामे अनाधिकृत ठरतात. ग्रामपंचायतीकडून आकारण्यात येणारा कर हा मिळकत कर सोयी सुविधांसाठी आकारला जातो. असा कर भरला म्हणजे सदरचे बांधकाम नियमीत झाले असे होत नाही. त्यासाठी सक्षम प्राधिकरणाकडून विकास / बांधकाम परवानगी घेणे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार बंधनकारक आहे..

*******

**लक्षवेधी सूचना क्र.२४९८**

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा. श्री.कृष्णा खोपडे, श्री. प्रविण दटके, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५अनुसारदिलेलीलक्षवेधी सूचना क्रमांक२४९८ पुढीलप्रमाणे आहे:-

"मौजा-नागपूर ख.नं.५७६,३२४/१ ना.सु.प्र. ने ट्रान्सपोर्ट प्लाझाचे आरक्षण असताना मौल तयार करून ५० कोटी किमत व रेडीरेकनर प्रमाणे २५.६१ कोटी रुपये असताना बिल्डर किशोर रॉय यांना फक्त १३ कोटी रुपयात देणे, नाग नदी देशाची धरोहर असताना त्यावर पिल्लर उभे करणे, म.न.पा. झोन क्रं.५ नागपूर यांनी ना.सु.प्र.ला दि. १९/०७, दि.१८/१०/२०१७.दि.०२/१२/२०२१ रोजी नोटीस देऊन तातडीने पिल्लर काढण्याचे दिलेले निर्देश, आजपर्यंत कारवाई होत नसणे, रॉय यांना ९० वर्षाची लीज केल्यानंतर नियमाचे उल्लंघन करून सबलीज करून देणे, नागनदी पासून १५ मी. जागा न सोडता वारंवार नकाशा रिवाईज करून बांधकाम करणे, बिल्डर द्वारा परस्पर मॉलमधील रूम/हॉल व इतर झालेले बांधकाम विकणे, मॉलमध्ये मद्यविक्री व सेवन, त्यामुळे बिल्डरनी अट क्रं. ११ मधील पृष्ठ क्रं.८२ व ९५ करारनाम्याचे केलेले उल्लंघन, ना.सु.प्र.सभापती द्वारा लीज रद्द करून ताबा घेण्याचे आदेश, ना.सु.प्र. सभापती यांनी मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार केलेल्या चौकशीत आरोप निश्चित होणे, यासंदर्भात उल्लंघन करणाऱ्यांचे नावासहित शासनाकडे केलेली तक्रार, त्या अनुषंगाने नगर विकास (नवि ९) यांनी एकूण सहा पत्र पाठविणे, त्यांनतर सहसचिव यांनी दि. १२/०१/२०२२ रोजी दिलेले डी.ओ. अंतिम पत्र, त्यावर ना.सु.प्र.ने दिलेले गोलमोल उत्तर. प्रशांत बोरीले या व्यक्तीकडून अनेक वर्षापासून अवैधरीत्या पार्कीग चार्ज घेणे, बिल्डरने ना.सु.प्र.ची एन.ओ.सी.न घेता ४ बँकेकडून घेतलेले ५ कर्ज थकीत (एन.पी.ए.) होणे, मात्र आजपर्यंत जप्तीची कारवाई न होणे, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची उपाययोजना"

---

## मा. उप मुख्यमंत्री(नगर विकास) महोदय यांचे निवेदन

मौजा नागपूर ख.नं. ५७६, ३२४/१ ही जागा पूर्व नागपूर नंदनवन येथील जगनाडे चौक नासुप्र च्या वाठोडा स्ट्रीट स्कीम अंतर्गत समाविष्ट आहे. शासनाने दि. १०.०९.२००१ रोजी मंजूर केलेल्या सुधारीत विकास योजनानुसार सदर जागेचे क्षेत्र १.३२४ हे. आर, "स्टेट ट्रान्सपोर्ट" (एम.ई.-९४) या आरक्षणाने प्रस्तावित असून सदर आरक्षणाकरीता समुचित प्राधिकरण महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ आहे. सदर क्षेत्राकरीता जागेच्या बाजार भावाप्रमाणे रु. ३०.६९ लक्ष मूल्य निर्धारीत करुन रक्कमेचा भरणा करण्या

संबंधी महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळ व नागपूर महानगरपालिका यांना कळविण्यात आले. परंतु महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळ यांनी प्रतिसाद दिला नाही. सदर जमीन अतिक्रमण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर जागेचा विकास करण्याकरीता समुचित प्राधिकरणाला विचारणा करुन सुध्दा प्रतिसाद प्राप्त होत नसल्यामुळे नागपूर सुधार प्रन्यासने लोकहितार्थ बस टर्मिनल तयार करण्याकरीता विश्वस्त मंडळाचा ठराव क्र. १५/१०७३ दि. २५.२. २००९ अन्वये (BFOT) या तत्वावर राबविण्यास मान्यता दिली. नागपूर सुधार प्रन्यासद्वारे दि. २५.३.२०११ अन्वये निविदा आमंत्रित करण्यात आल्या होत्या, सदर निविदा ही सन २०११ च्या सिध्द शिघ्र गणकानुसार परीगणना करुन सदर जागेची किंमत रु. १४.०० कोटी ठरविण्यात आली. परंतु निविदेमध्ये कोणत्याही कंत्राटदाराने भाग न घेतल्यामुळे, पुनश्च विश्वस्त मंडळाचा ठराव क्र. २४/११०३ दि. २७.१२.२०११ अन्वये सदर जागेची किंमत रु. १४.०० कोटी ऐवजी रु. ७.५० कोटी कमी करुन नविन निविदा आमंत्रित करण्याबाबत ठराव केला. यानुसार दोनदा निविदा आमंत्रित करण्यात आल्या. परंतु निविदाधारकाकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. विश्वस्त मंडळाचा ठराव क्र.२२/११९२ दि. २५.३.२०१३ अन्वये पूर्ननिविदा आमंत्रित करण्यात आल्या. सन २०१४ मध्ये सदर जागेचा दर रेडी रेकनर नुसार रु. १६.७१ कोटी इतका होता. रेडी रेकनर प्रमाणे रु. २५.६१ कोटी हा जमिनीचा दर नसून फक्त रु. १६.७१ कोटी आहे. या अनुषंगानेतीन निविदाधारकांचे दर प्राप्त झाले. यामध्ये मे. रॉय उद्योग, मे. रवि नायर हॉस्पीटल प्रा.लि., व मे. विश्वराज इन्फ्रास्ट्रक्चर लि. या तीन निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या. त्यामध्ये मे. रॉय उद्योग यांचे महत्तम दर रु. १३,००,७७,७७७/- प्राप्त झाले. या अनुषंगाने मे. रॉय उद्योग सदर बी.एफ.ओ. टी. प्रकल्पाचा करारनामा करण्यात आला.

सदर संदर्भात सहाय्यक आयुक्त, नेहरु नगर झोन, मनपा, नागपूर, सहाय्यक संचालक, नगर रचना, मनपा, नागपूर व सह संचालक, नामप्रविप्रा यांनी जागेवरील विद्यमान बांधकामाचे दि. २४.०१.२०२२ रोजी स्थळ निरीक्षण करून खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात आला आहे.

१) नागपूर शहरात सुधारीत मंजूर विकास योजनेत उक्त आरक्षणाची हद्द विचारात घेऊन इमारतीचा सुधारीत बांधकाम नकाशा मंजूर करण्यात आला. तसेच नाग नदीची हद्द ९ मीटर समास अंतरा ऐवजी १६.५० मीटर व १६.६३ मीटर हे कमाल अंतर सोडण्यात आले आहे.

२) आरक्षणाच्या हद्द नुसार उत्तर व पूर्व हद्द वर विकासकाने जागेच्या संरक्षणार्थ संरक्षण भिंतीचे बांधकाम केलेले आहे.

३) Pargolaही इमारतीच्या Elevation Treatment चा एक भाग असून त्याचा भाग हा नाग नदीच्या संरक्षण भिंतीवर नाल्याच्या आर.सी.सी. डिझाईन नकाशावरुन दिसून येतो.

नागपूर सुधार प्रन्यासने मे. रॉय उद्योग यांना ९० वर्षाची लिज करारनाम्यानुसार करुन दिली असून करारनाम्यातील अट क्र. २३.४ मध्ये सब लिज करण्याचे प्रावधान आहे. या अनुषंगाने नागपूर सुधार प्रन्यासचे ना हरकत प्रमाणपत्र घेऊन मे. रॉय उद्योन यांनी सब लिज करुन दिली आहे.करारनाम्यातील अट क्र. १.१ मधील मध्ये नमूद उप अट क्र. 'ई' मध्ये नमूद. तसेच करारनाम्यामधील अटीचे उल्लंघन केल्यामुळे नागपूर सुधार प्रन्यासने, दि. २६.९.२०२३ रोजी मे. लताकिसन कन्स्ट्रक्शन प्रा.लि. व संचालक, सेवन स्टार हॉस्पीटल यांनी करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्यामुळे करारनाम्यातील नमूद Ancillary Facilities व्यतिरिक्त अनाधिकृत वापर

तात्काळ थांबविण्याबाबत नोटीस बजावली होती. तत्पूर्वी नासुप्रच्या, दि.१८.०८.२०२३ चे पत्रान्वये सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, सिव्हील लाईन, नागपूर, उप आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, सिव्हील लाईन, नागपूर तसेच अबकारी शुल्क विभाग, सिव्हील लाईन, नागपूर यांना, सदर जागा ही नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीची असून ती लीजवर मे. लताकिसन कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना दिली आहे. सदर ठिकाणी बॅक्वेट हॉल तसेच मद्य विक्री व सेवन होत असल्यामुळे करारनाम्यातील अट क्र. १.१ तसेच करारनाम्यातील नमूद बाबीचा भंग झालेला असल्याने तात्काळ विकासकाला देण्यात आलेल्या परवानग्या रद्द करण्यात याव्या, अशी विनंती करण्यात आली. या संबंधी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे सुनावणी सुरु असून अद्याप अंतिम निर्णय व्हावयाचा आहे.

मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाने रिट याचिका क्र. ५६०/२०२३ मध्ये दि. २३.०१.२०२३ रोजी आदेश पारित करुन नागपूर सुधार प्रन्यासला सेवन स्टार हॉस्पीटलचे दि. ०६.०१.२०२३ च्या निवेदनावर निर्णय घेण्याचे निर्देश दिले. सदर निवेदनाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना सुनावणी देण्यात आली. तद्नंतर सेवन स्टार हॉस्पीटलचे दि. ०६.०१.२०२३ चे निवेदन अंशतः मान्य करुन Concession Agreement दि. २९.०४.२०१४ तसेच लीज पट्टा दि. ०७.०७.२०१४ मधील एकूण ४७.९१ टक्के (४८५४.६१२ चौ.मी.) भाग ज्यात हॉटेलचा समावेश आहे, तेवढ्या भागाचे Concession Agreement रद्द करण्यात आले व तेवढ्या भागाचा ताबा घेण्याचे निर्देश देण्यात आले. सभापती, नासुप्र यांनी पारित केलेल्या दि. ३१.०४.२०२३ चे आदेशाला श्री. अजय गुप्ता, Resolution Professional of Latakisan Infra Pvt. Ltd. यांच्याद्वारे National Company Law Tribunal Mumbai Bench येथे IA 2675/2023 Dt. 01.02.2024 दाखल करुन आव्हान दिले. दिनांक ०१.०२.२०२४ रोजी ओदश पारीत करुन सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांनी दि. ३१.४.२०२३ रोजी पारीत केलेला आदेश Insolvency

87 and Bankruptcy कोर्टाचा कलम १४(१) (d) चे उल्लंघन करणार असल्यामुळे खारीज केला. तसेच लता किसन इन्फ्रा प्रा.लि. यांनी Concession Agreement मधीलप्रतिबंधीत गतिविधी थांबविण्याकरीता निर्देश देण्यात आले. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडून मद्द परवाना रद्द करण्याची कारवाई सुरु आहे.दि. १२.१.२०२२ च्या पत्रा संदर्भात नागपूर सुधार प्रन्यासद्वारे पत्र क्र. नासुप्र/इ.अ. (८)/३५२७, दि. ४.४.२०२२ अन्वये सविस्तर अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे,त्यानुसार शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे. करारनाम्यातील अट क्र. २.१ मधील तरतुदीनुसार विकासकास पार्किंग मध्ये पार्किंग शुल्क स्वीकारण्याचे प्रावधान आहे.करारनाम्याची अट क्र. ५.६ प्रमाणे गहाणाकरीता तरतुद असून दि. २७.३.२०१७ च्या पत्रान्वये विकासकाला नागपूर नागरिक सहकारी बँक लि. (Lease of consortium member) तर्फे ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

......................

**लक्षवेधी सूचना क्र.२५४९**

**मा.वि.स.स.श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) यांनी, महाराष्ट्र विधानसभा नियम १०५अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"नाशिक मनपाहद्दीतील सर्वे नंबर ४१० मौजे मखमलाबाद शिवार क्षेत्र ३६१०.२५ चौ. मी. तालुका जिल्हा नाशिक एवढे क्षेत्र नाशिक महापालिकेच्या डीपी रोड साठी आरक्षित असणे, या मिळकतीचा लेआउट २७.८.१९९७ रोजी नाशिक महानगरपालिकेने प्रमाणित केलेला असणे, सदरचा डीपी रस्ता सुद्धा नाशिक मनपाला हस्तांतरित करणे, त्यानंतर सर्वे नंबर ४१० मौजे मखमलाबाद शिवार क्षेत्र ३६१०.२५ चौ.मी. मिळकत लॉरेन्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी नसताना इंट्रा कम्युनिकेशन कंपनीच्या नावे नकली खोटा ठराव सन १९९७ मध्ये तयार करून खरेदी दस्त क्रमांक १११७५/२०२० मध्ये नसून बेकायदेशीररित्या भूसंपादन मोबदला अंदाजे ८ कोटी ४५ लाख रुपयांचे अदा करून शासनाची तथा महापालिकेची आर्थिक फसवणूक करणे, या संदर्भात तत्कालीन दुय्यम निबंधक ४ कार्यालयातील अधिकारी तसेच नाशिक मनपाचे अधिकारी व कर्मचारी यांनी संगणनमत करून नाशिक महानगरपालिका व शासनाची फसवणूक केली असणे, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी असणाऱ्यांवर कडक कार्यवाही करण्याची मागणी सामान्य जनतेतून होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

---

## मा. उपमुख्यमंत्री(नगर विकास)महोदय यांचे निवेदन

नाशिक महानगरपालिकेच्या सन १९९३ साली मंजूर विकास योजनेत मौजे मखमलाबाद येथील सर्व्हे क्र.४१० हे क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट असून ३० मी. रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित होता. या क्षेत्राचा सिमांकित अभिन्यास महानगरपालिकेने पत्र क्र. २२३, दि.२७/०८/१९९७ अन्वये मंजूर केलेला आहे. ७/१२ उताऱ्या प्रमाणे सदर अभिन्यासाचे एकुण क्षेत्र ३३५०० चौ.मी. असून त्यामध्ये ३० मी. रुंद विकास योजना रस्त्याचे क्षेत्र ३६१०.२५ चौ.मी. दर्शविलेले आहे. सदर मंजूरीच्या पत्रातील अट क्र. ६ अन्वये, या अभिन्यासातील खुली जागा, कॉलनी रस्ते, यासह डी.पी. रोड (३६१०.२५ चौ.मी.) खालील क्षेत्र दि.१३/०८/१९९७ रोजी करारनाम्याव्दारे महानगरपालिकेच्या ताब्यात दिलेले आहे. सदर अभिन्यासात विकास योजना रस्त्याचे क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्राचा अभिन्यास व त्यासाठीचे आवश्यक खुली जागा दर्शविलेली आहे, त्यामुळे विकास योजना रस्त्याचे क्षेत्र वगळल्याचे दिसून येते.

उक्त रस्त्याचे क्षेत्राचे खाजगी वाटाघाटीने भूसंपादन झालेले असून हे क्षेत्र दि.२८/०८/२०२० रोजीचे लॉरेल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी यांचे मालकीचे असल्याचे ७/१२ उताऱ्यावरून दिसून येते.लॉरेल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीचे सभासदांच्या दि.०२/०९/१९९७ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. ०३ नुसार सदर लेआऊट मधील डी.पी. रोडचे क्षेत्र इंद्रा कम्युनिकेशन्स प्रा.लि. यांना मूळ अलॉट केलेल्या क्षेत्राचे हिस्सेराशीनुसार अलॉट केलेले आहे.सदर ३० मी. विकास योजना रस्त्याखालील क्षेत्रासाठी मोबदला अदा झाल्याचे दिसून येते.

अर्जदार लॉरेल को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. तर्फे इंद्रा कम्युनिकेशन प्रा.लि. यांचे मौजे मखमलाबाद स.न. ४१०/१/७१ मधील ३० मी. विकास योजना रस्त्यासाठी वाधित ३६१०.०० चौ.मी. क्षेत्राची खाजगी वाटाघाटीव्दारे अर्जदार यांना रक्कम रु. ८,४५,०२,८८०/- (अक्षरी रु. आठ कोटी पंचेचाळीस लाख दोन हजार आठशे ऐशी मात्र) इतकी देण्यात आल्याचे दिसून येत आहे.

------------

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.२५५१**

**मा. वि.स.स श्री. संजय रामभाऊ गायकवाड यांनी, महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"बुलढाणा शहराच्या सन १९९१ च्या मंजूर विकास योजना आराखड्यामध्ये सव्हे नं.४/१ मध्ये Play Ground चे आरक्षण असणे, शासनाच्या नगर विकास विभागाने दिनांक २१ डिसेंबर १९९५ रोजी राज्यातील शहराच्या विकास योजनेमध्ये क्रिडांगणासाठी आरक्षित असणाऱ्या जागां मध्ये कोणताही फेरबदल करण्यांत येऊ नये याबाबत शासन स्तरावरुन धोरणात्मक निर्णय झालेला असणे, असे असतांनाही सदर आरक्षित क्षेत्र असलेल्या काही भागावर एका जमिन मालकाने बेकायदेशिररित्या गुंठेवारी नियमानुकुल अधिनियमाखाली नगरपरिषदेकडून परवानगी प्राप्त करुन सदर जागेचा मंगल कार्यालय या प्रयोजनार्थ वाणिज्य वापर चालु करणे, सदर जागेवर गुंठेवारी अधिनियमाखाली भूखंड नियमानुकुल करण्याबाबत नगरपरिषदेने बेकायदेशिररित्या दिलेला आदेश, त्यावर दिलेली बांधकाम परवानगी रद्द करणे, सदर भूखंडावर झालेले अनाधिकृत बांधकाम पाडणे, खेळाचे मैदान या प्रयोजनार्थ सुविधा क्षेत्र म्हणून दर्शविलेली सदर जागा शासनाने ताब्यात घेणे, तसेच या नियमबाहय गुंठेवारी प्रकरणास जबाबदार असलेल्या तत्कालीन मुख्याधिकारी श्री. संजीव ओहोळ व संबंधित अधिकारी, कर्मचारी यांची सखोल चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

मौजा बुलढाणा, सर्वे क्रमांक ४, क्षेत्र १९ एकर ७ गुंठे ही जमीन मूळतः श्री. अर्जुन लक्ष्मण लांडे यांच्या मालकीची होती. उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांनी दि.०६.०१.१९६६ रोजी या क्षेत्रापैकी ४ एकर ३८ गुंठे क्षेत्रासाठी अकृषक आदेश पारित केलेला असून, सदर आदेशामध्ये अर्जदारास नगररचना व मूल्यनिर्धारण विभागाकडून अभिन्यास मंजूर करून घेण्याची अट नमूद करण्यात आलेली होती. त्यानुसार शाखा कार्यालय, नगररचना, अमरावती यांनी दि.२५.०५.१९६७ रोजी संपूर्ण १९ एकर ७ गुंठे क्षेत्राकरिता मार्गदर्शक अभिन्यास मंजुरीसाठी शिफारस केली होती. तथापि, उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांनी केवळ ४ एकर ३८ गुंठे क्षेत्रापुरता अकृषक आदेश दिला असून त्या क्षेत्रातील प्लॉट क्र. २० (अंदाजे २७ गुंठे) हा 'खेळाचे मैदान' म्हणून दर्शविण्यात आला होता.

यानंतर सन १९७५ मध्ये अंमलात आलेल्या मूळ विकास योजनेमध्ये तसेच सन १९९१ च्या सुधारित विकास योजनेमध्ये सर्व्हे क्र.४ मधील एकूण १९ एकर ७ गुंठे क्षेत्राकरिता शाखा कार्यालय, नगररचना, अमरावती

यांनी सुचविलेला मार्गदर्शक अभिन्यास विचारत घेऊन सर्व्हे क्र.४/१ या क्षेत्रावर अभिन्यासातील विद्यमान खेळाचे मैदान (अंदाजे ५७ गुंठे क्षेत्र) दर्शविलेले दिसून येते.

सर्वे क्रमांक ४ मधील एकूण १९ एकर ७ गुंठे पैकी उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांनी पारित केलेल्या अकृषक आदेशाव्यतीरिक्त उर्वरित १४ एकर ९ गुंठे क्षेत्राची तुकड्य-तुकड्या मध्ये विभागणी करून विक्री करण्यात आल्याचे दिसुन येते, त्यापैकीच १५ गुंठे क्षेत्र सन १९८५ मध्ये सौ. आशा सरदार यांनी विकत घेतले, जे सन १९९१ च्या सुधारित विकास योजनेतील खेळाचे मैदान या आरक्षणात येते. सौ. आशा सरदार यांच्या विनंतीनुसार नगर परिषद, बुलढाणा यांनी सदर क्षेत्र रहिवासी विभागात समाविष्ट करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. शासनाने दि.११.०१.१९९५ रोजी सदर प्रस्तावावर कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्यास हरकत नसल्याचा तत्वत: निर्णय घेतला होता. त्यानुसार कार्यवाही झाल्यानंतर संचालनालयाने दि.३०.०३.२००२ रोजी प्रस्तावास अनुकूल शिफारस केली. मात्र शासनाने दि.०१.०९.२००६ रोजी प्रस्तुत जागा मार्गदर्शक अभिन्यासातील आहे व सदर जागा खेळाचे मैदान या आरक्षणामधुन वगळणेसाठी सर्व भूखंडधारकांची संमतीपत्र सादर करण्याचे आवश्यक असल्याचे नमूद केले आणि नंतर दि.१०.०३.२०११ रोजीच्या पत्रान्वये, 'क्रीडांगणाच्या आरक्षणामध्ये फेरबदल करता येणार नाही अशा मंत्रीमंडळाच्या सुचना असल्याने आपली विनंती मंजूर करता येणार नाही', असे कळविले.

त्यानंतर मुख्याधिकारी, नगर परिषद बुलढाणा यांनी सन २०१६ मध्ये सर्व्हे क्र. ४/१ मधील काही जमिनींबाबत अकृषक आदेश पारित केले, तथापि हरकतीनंतर आदेश रद्द करून पुन्हा सदर अकृषक आदेश सन २०१७ मध्ये कायम करण्यात आल्याचे दिसुन येते. त्यापैकी एक आदेश मंजूर ४ एकर ३८ गुंठे अभिन्यासातील प्लॉट क्र. २० म्हणजेच खेळाचे मैदान करीता आरक्षीत जागेपैकी असल्याचे दिसुन येते.

तद्नंतर शासनाने दि.२६.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये, 'सदर जमिनीत विविध कालावधीत बालक मंदिर व खेळाचे मैदान क्षेत्रामध्ये अकृषक आदेश व बांधकाम परवानग्या देण्यात आलेल्या असून त्यानुसार तृतीय पक्षांचे हक्क (Third Party Interests) निर्माण झाले आहेत. अशा स्थितीत नियमानुसार दिलेल्या परवानग्यांप्रमाणे कार्यवाही करावी व भविष्यातील सुधारित विकास योजनेत आवश्यक बाबी विचारात घ्याव्यात, असे निर्देश दिले गेले.

सदरप्रमाणे, बुलढाणा शहराची दुसरी सुधारित विकास योजना, शासन अधिसुचना क्र.टिपीएस-२६२३/९०८/प्र.क्र.१२९/२०२३/नवि-३०, दि. ०४.०९.२०२५ रोजी भागशः मंजूर झाली असुन सदर अधिसूचनेसोबतच्या परिशिष्ट-ब मधील ई.पी.-१६ अन्वये सर्वे क्रमांक ४/१ मधील मंजूर अभिन्यासाच्या क्षेत्रास रहिवासी विभागात दर्शविण्याबाबत प्रस्तावीत करण्यात आले आहे.

***********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.२५५६**

**मा. वि.स.स श्री. संजय रामभाऊ गायकवाड यांनी, महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"बुलढाणा नगर परिषद हद्दीअंतर्गत सन १९९१ चे मंजुर विकास योजने मध्ये सर्व्हे क्र.४१/१ अंतर्गत येणाऱ्या जमिनीवर आरक्षण क्रमांक १ क्रिडांगण या प्रयोजनार्थ आरक्षण असणे, मंजूर विकास योजनेत सदर आरक्षण कायम असतांनाही तत्कालीन अपर जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी सदर क्रिडांगण या प्रयोजनार्थ आरक्षित असलेल्या जमिनीवरच नियमबाहय रित्या अकृषक आदेश पारीत करुन नियमांचा भंग करणे, सदर नियमबाहयरित्या पारीत केलेले अकृषक आदेश रद्द करुन या प्रकरणास जबाबदार असलेल्या संबंधितांची सखोल चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

मौजा बुलढाणा, सर्वे क्रमांक ४, क्षेत्र १९ एकर ७ गुंठे ही जमीन मूळतः श्री. अर्जुन लक्ष्मण लांडे यांच्या मालकीची होती. उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांनी दि.०६.०१.१९६६ रोजी या क्षेत्रापैकी ४ एकर ३८ गुंठे क्षेत्रासाठी अकृषक आदेश पारित केलेला असून, सदर आदेशामध्ये अर्जदारास नगररचना व मूल्यनिर्धारण विभागाकडून अभिन्यास मंजूर करून घेण्याची अट नमूद करण्यात आलेली होती. त्यानुसार शाखा कार्यालय, नगररचना, अमरावती यांनी दि.२५.०५.१९६७ रोजी संपूर्ण १९ एकर ७ गुंठे क्षेत्राकरिता मार्गदर्शक अभिन्यास मंजुरीसाठी शिफारस केली होती. तथापि, उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांनी केवळ ४ एकर ३८ गुंठे क्षेत्रापुरता अकृषक आदेश दिला असून त्या क्षेत्रातील प्लॉट क्र. २० (अंदाजे २७ गुंठे) हा 'खेळाचे मैदान' म्हणून दर्शविण्यात आला होता.

यानंतर सन १९७५ मध्ये अंमलात आलेल्या मूळ विकास योजनेमध्ये तसेच सन १९९१ च्या सुधारित विकास योजनेमध्ये सर्व्हे क्र.४ मधील एकूण १९ एकर ७ गुंठे क्षेत्राकरिता शाखा कार्यालय, नगररचना, अमरावती यांनी सुचविलेला मार्गदर्शक अभिन्यास विचारत घेऊन सर्व्हे क्र.४/१ या क्षेत्रावर अभिन्यासातील विद्यमान खेळाचे मैदान (अंदाजे ५७ गुंठे क्षेत्र) दर्शविलेले दिसून येते.

सर्वे क्रमांक ४ मधील एकूण १९ एकर ७ गुंठे पैकी उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांनी पारित केलेल्या अकृषक आदेशाव्यतीरिक्त उर्वरित १४ एकर ९ गुंठे क्षेत्राची तुकड्य-तुकड्या मध्ये विभागणी करून विक्री करण्यात आल्याचे दिसुन येते, त्यापैकीच १५ गुंठे क्षेत्र सन १९८५ मध्ये सौ. आशा सरदार यांनी विकत घेतले, जे सन १९९१ च्या सुधारित विकास योजनेतील खेळाचे मैदान या आरक्षणात येते. सौ. आशा सरदार यांच्या

विनंतीनुसार नगर परिषद, बुलढाणा यांनी सदर क्षेत्र रहिवासी विभागात समाविष्ट करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. शासनाने दि.११.०१.१९९५ रोजी सदर प्रस्तावावर कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्यास हरकत नसल्याचा तत्वत: निर्णय घेतला होता. त्यानुसार कार्यवाही झाल्यानंतर संचालनालयाने दि.३०.०३.२००२ रोजी प्रस्तावास अनुकूल शिफारस केली. मात्र शासनाने दि.०१.०९.२००६ रोजी प्रस्तुत जागा मार्गदर्शक अभिन्यासातील आहे व सदर जागा खेळाचे मैदान या आरक्षणामधुन वगळणेसाठी सर्व भूखंडधारकांची संमतीपत्र सादर करण्याचे आवश्यक असल्याचे नमूद केले आणि नंतर दि.१०.०३.२०११ रोजीच्या पत्रान्वये, 'क्रीडांगणाच्या आरक्षणामध्ये फेरबदल करता येणार नाही अशा मंत्रीमंडळाच्या सुचना असल्याने आपली विनंती मंजूर करता येणार नाही', असे कळविले.

त्यानंतर मुख्याधिकारी, नगर परिषद बुलढाणा यांनी सन २०१६ मध्ये सर्व्हे क्र. ४/१ मधील काही जमिनींबाबत अकृषक आदेश पारित केले, तथापि हरकतीनंतर आदेश रद्द करून पुन्हा सदर अकृषक आदेश सन २०१७ मध्ये कायम करण्यात आल्याचे दिसुन येते. त्यापैकी एक आदेश मंजूर ४ एकर ३८ गुंठे अभिन्यासातील प्लॉट क्र. २० म्हणजेच खेळाचे मैदान करीता आरक्षीत जागेपैकी असल्याचे दिसुन येते.

तद्नंतर शासनाने दि.२६.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये, 'सदर जमिनीत विविध कालावधीत बालक मंदिर व खेळाचे मैदान क्षेत्रामध्ये अकृषक आदेश व बांधकाम परवानग्या देण्यात आलेल्या असून त्यानुसार तृतीय पक्षांचे हक्क (Third Party Interests) निर्माण झाले आहेत. अशा स्थितीत नियमानुसार दिलेल्या परवानग्यांप्रमाणे कार्यवाही करावी व भविष्यातील सुधारित विकास योजनेत आवश्यक बाबी विचारात घ्याव्यात, असे निर्देश दिले गेले.

सदरप्रमाणे, बुलढाणा शहराची दुसरी सुधारित विकास योजना, शासन अधिसुचना क्र.टिपीएस-२६२३/९०८/प्र.क्र.१२९/२०२३/नवि-३०, दि. ०४.०९.२०२५ रोजी भागशः मंजूर झाली असुन सदर अधिसूचनेसोबतच्या परिशिष्ट-ब मधील ई.पी.-१६ अन्वये सर्वे क्रमांक ४/१ मधील मंजूर अभिन्यासाच्या क्षेत्रास रहिवासी विभागात दर्शविण्याबाबत प्रस्तावीत करण्यात आले आहे.

***********

<u>लक्षवेधी सूचना क्र. ७३३</u>

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. दिलीप लांडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.७३३ पुढीलप्रमाणे आहे :-**

"चांदिवली विधानसभा कार्यक्षेत्र हे झोपडपट्टीबहुल विभाग असून ठिकाणी उंच टेकडी व डोंगर उतारावर झोपड्या वसलेल्या असणे, दरवर्षी पावसाळ्यात डोंगर आणि टेकड्यांचे भूसखलन होत असल्याने दरडी कोसळत असणे, त्यामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्त हानी होणे, गेल्या काही वर्षात अनेक अपघात होऊन नागरिक मृत्यूमुखी व जखमी पडलेले असणे, अद्यापी तिच परिस्थिती असणे, सदरहू धोकादायक टेकड्या आणि डोंगर अतिक्रमण मुक्त करुन संरक्षण व संवर्धन करण्याची नितांत आवश्यकता, याकरीता या परिसरातील नागरिकांचे सर्वेक्षण करणे, बाधित झोपडीधारकांचे पुनर्वसन, येथील विहंगम दृश्य (हिल व्ह्यु) ला प्रोत्साहन देणे, आदि कडे शासनाने गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता, टेकड्या आणि डोंगर या कायमस्वरुपी अतिक्रमणमुक्त करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाकडे सातत्याने केलेला पत्रव्यवहार, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपयायोजना"

---

### मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

चांदिवली विधानसभा मतदार संघाच्या क्षेत्रातील काही क्षेत्र उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) कुर्ला यांच्या कार्यक्षेत्रात येत आहे. या चांदिवली विधानसभा मतदार संघाच्या कार्यक्षेत्रात पवई, तिरंदाज, चांदीवली, पासपोली, साकी ही गावे अंतर्भूत असून या गावांमधील शासकीय जागेवर टेकडी व डोंगर उतारावरील झोपड्यांचे अतिक्रमण नाही, तथापि, चांदिवली मतदार संघाच्या कार्यक्षेत्रातील काही भागात डोंगर व उंच टेकड्या असून, या ठिकाणी सुमारे १२०० झोपड्या आहेत. शासकीय / खाजगी जागेवरील झोपड्यांचे सर्वेक्षण व पात्रता निश्चित करण्याचे कार्यवाही झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडून करण्यात येते.

तसेच सन-२००९ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे चांदिवली विधानसभा मतदार संघातील खाडी नं.३, साकीनाका, परिसर येथे दरड कोसळून १० व्यक्ती मयत तर २५ व्यक्ती जखमी झाल्याची दुर्घटना घडली होती. त्यावेळी मुंबई महानगरपालिका, अग्निशमनदल व पोलीस विभाग यांच्यामार्फत तात्काळ मदतकार्य करुन शासन धोरणानुसार जखमी व मृत व्यक्तींच्या वारसांना तात्काळ मदत वाटप करण्यात आली होती.

भविष्यात अतिवृष्टीमुळे विविध ठिकाणी दरड कोसळून होणारी संभाव्य हानी टाळण्यासाठी डोंगर उतारावरील/ धोकादायक दरडीखाली राहणाऱ्या झोपडपट्टीवासीयांच्या संरक्षणार्थ विविध उपाययोजनांपैकी संरक्षक भिंत बांधणे हा एक उपाय असून गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्र.पुनर्व२०१०/प्र.क्र. १६२(अ)/झोपनि-२, दि.०४/०३/२०१५, या मधील तरतुदीनुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) यातंर्गत आपत्ती व्यवस्थापन विभाग, बृहन्मुंबई म.न.पा. यांना धोकादायक ठिकाणांच्या प्राप्त यादीतील डोंगर

उतारावरील धोकादायक ठिकाणी दरडी कोसळून होणाऱ्या जीवित व वित्त हानी टाळण्यासाठी त्यांच्याकडून संरक्षक भिंती बांधण्याची योजना राबविली जाते.

तसेच जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधरण) योजनांतर्गत चांदीवली विधानसभा मतदार संघामध्ये झोपडपट्टीवासीयांचे स्थलांतरण व पुंनर्वसन (डोंगर उतारावरील/ धोकादायक दरडीखाली राहणाऱ्या झोपडीवासीयांच्या संरक्षणार्थ संरक्षक भिंत बांधणे) याकरीता प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या २२ कामांसाठी सुमारे रु.१,१५,८८९/- इतका निधी वितरीत केलेला आहे.

सदर ठिकाणी अतिवृष्टीमुळे दरड कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यता विचारात घेऊन पावसाळा कालावधी पुर्वी खबरदारीची उपाययोजना म्हणून दरवर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीला तहसीलदार, कुर्ला कार्यालयामार्फत सदर परिसरात जाहीर नोटीस देऊन संरक्षित स्थळी स्थलांतरीत होणेबाबत आवाहन करण्यात येते. तसेच अतिवृष्टीमुळे जीवित व वित्त हानीच्या प्रकरणी शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. सीएलएस-२०२२/ प्र.क्र.३४९/ म-३, दि.२७/०३/२०२३ नुसार बाधित आपदग्रस्त व्यक्तींना मदत वाटप करण्यात येते.

*******

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री.हेमंत रासने, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ७५७पुढीलप्रमाणे आहे –

"शुक्रवार पेठ, पुणे येथील मामलेदार कचेरी (खडकमाळ आळी) सर्वे नं.६०७ व ६३१ या शासकीय भूखंडावर २००४ साली महत्वाकांक्षी शासकीय प्रकल्पास मान्यता देण्यात येणे, या प्रकल्पात तहसिलदार कार्यालय, दुयम निबंधक कार्यालय, उपविभागीय कार्यालय, नगर भूमापन कार्यालय, उमाजी नाईक स्मारक आणि खडक पोलिस स्टेशन यासारख्या महत्त्वाच्या सुविधा प्रस्तावित असणे, यांस दोन दशके उलटूनही हा प्रकल्प अपूर्ण असणे, सदर प्रकल्प रखडल्यामुळे नागरिकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागणे, संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबधित मंत्री महोदयांकडे पत्रव्यवहार करुनही अद्यापही या संदर्भात कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याकरिता शासनाने संबधित कंत्राटदारवर कठोर कारवाई करुन नविन सक्षम कंत्राटदारांची नियुक्ती करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या दि. २४/०१/२००२ रोजीच्या शासन निर्णयानुसार खडकमाळ पुणे येथील स.नं. ६०७ व ९३१ मधील शासकीय भूखंडाचा खाजगीकरणातून विकास करण्याबाबतचा प्रस्ताव अटी व शर्तीवर मंजूर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास जानेवारी, २००४ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. कार्यकारी अभियंता पुणे, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील दि. ०७/०३/२००५ अन्वये मे. कामदार-काकडे (जे.व्ही.) यांना सिटी सर्वे क्र. ९३१ खडकमाळ, शुक्रवार पेठ, पुणे येथील प्रशासकीय इमातीचे बांधकाम करण्याबाबत कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.

फेब्रुवारी २००५ मधील मंजूर निविदेनुसार १६१९५.०० चौ.मी. शासनास बांधकाम करून देण्याच्या मोबदल्यात सि.स.नं. ९३१ व ६०७ पैकी ८०००.०० चौ.मी. जागा ९९ वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने विकसकास देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन पत्र दि. १८/०१/२००६ अन्वये कामाच्या बाबात (काही कामाच्या ठिकाणात व क्षेत्रफळात बदल) करण्यास मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे कामाच्या बाबात तांत्रिक अडचणीमुळे ठिकाणात व क्षेत्रफळात बदल करण्यात आलेला आहे.

बदल करण्यात आलेल्या १६७९७.०६ चौ.मी. बांधकामामध्ये अ) सि.स.नं. ९३१ खडकमाळ शुक्रवार पेठ येथील प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे, ब) नवीन प्रशासकीय इमारत कौन्सील हॉल समोरील अस्तित्वातील इमारतीवरील मजल्याचे वाढीव बांधकाम करणे, क) २७ राणीचा बाग पुणे येथे अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी विश्रामधाम बांधणे (कक्ष ८), ड) क्लब ऑफ वेस्टर्न इंडिया पुणे नमुना नकाशा २ वर आधारित निवासी गाळे बांधणे, इ) सि.स.नं. ९३१ खडकमाळ शुक्रवारपेठ पुणे येथील अस्तित्वातील उमाजी नाईक स्मारकाचा विकास करणे / सुशोभीकरण करणे, फ) बंगला नं. १४ येरवडा पुणे येथील प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे प्रस्तावित होते. त्यापैकी विकासकाने २००७ ते २०१० या कालावधीत व्ही.व्ही.आय.पी. हे कॅबिनेट मंत्री व उच्च न्यायाधीश दर्जाच्या अति महत्वाच्या व्यक्तीसाठींचे विश्रामगृह, नवीन प्रशासकीय इमारतीवरील दोन अतिरिक्त मजले, नवीन प्रशासकीय इमारतीच्या आवारात नवीन विस्तारित इमारत, राणीचा बाग १८ व येरवडा येथे ५२ कर्मचारी निवासस्थाने तसेच आद्य क्रांतीकारक उमाजी नाईक स्मारकाचा विकास करणे ही कामे पूर्ण करून हस्तांतरीत केली आहे तसेच खडकमाळ येथील इमारतीचे स्थापत्य विषयक काम पूर्ण करण्यात आले आहे.

सदर इमारतीस कार्यकारी अभियंता पुणे, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडील दि. ०१/०७/२०२४ अन्वये सि.स.नं. ९३१ व ६०७ खडकमाळ, शुक्रवार पेठ, पुणे येथील बांधकामाधीन प्रशासकीय इमारतीमध्ये फर्निचर पुरवठा करणेबाबत मे. कंचन असोसिएट्स, प्रो.प्रा. संजय जेठमल लुणावत, नाशिक यांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. अर्थसंकल्पामध्ये मंजूर सदर इमारतीचे फर्निचर व इतर संलग्न बाबींची कामे अंतिम टप्प्यात आहे.

---

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.८४९**

**मा.वि.स.स. श्री. राजेश बकाने, यांनी, महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"वर्धा जिल्ह्यातील पुलगावच्या हिंगणघाट फैल मधील रहिवासी, ज्यांची निवासस्थाने १०० वर्षांहून अधिक काळापासून येथे आहेत, शासनाच्या शेत गट क्रमांक २७८ च्या प्रस्तावित लेआउट आक्षेप नोंदवण्याकरिता बाध्य झाले असणे, शासनाच्या शेत गट क्रमांक २७८ चा जुना सर्व्हे क्रमांक ३६९/१ असणे, सर्व सरकारी नोंदींमध्ये त्याचे क्षेत्र ११.२५ एकर (म्हणजे ४.५५ हेक्टर) दाखवले असून नंतरच्या कालावधीत हा सर्व्हे क्रमांक २७८ म्हणून बदलण्यात येणे, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश सरकारच्या सर्व सरकारी नोंदींमध्ये ही जमीन फार पूर्वीपासून परावर्तित जमीन म्हणून दाखवली जात असणे, विशेष बाब म्हणजे १९७०-८० पूर्वीच्या कोणत्याही शासकीय अभिलेखात पुलगाव नगरपालिकेला या जागेचे मालक म्हणून दाखवण्यात आलेले नसणे, ही जमीन सर्व शासकीय नोंदींमध्ये "परावर्तित जमीन" म्हणून दाखविण्यात आल्याने १०० वर्षांपूर्वी याला शासनाने मान्यताप्राप्त ले-आउटचा दर्जा दिल्याचे स्पष्ट होणे, ७०-८० वर्षापूर्वीच्या सर्व शासकीय नोंदी दुर्लक्षित करून त्याठिकाणी नवीन ले-आऊट तयार करून जुन्या जमीन मालकांच्या जमिनीच्या मालकी हक्कावर मर्यादा घालण्याचा प्रयत्न केल्यास भविष्यात असंख्य कायदेशीर समस्या निर्माण होतील आणि हे प्रकरण कधीच सुटणार नसणे, त्यामुळे उक्त प्रकरणी हिंगणघाट फैल पुलगाव (गट क्रमांक २७८) येथील प्रस्तावित शासकीय ले-आऊट योजनाबाबत शासनाने पुर्नविचार करून करावयाची योग्य ती कार्यवाही व उपाययोजना"

---

## मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदय यांचे निवेदन

नगर परिषद, पुलगांव क्षेत्रातील मौजा गुंजखेडा येथील सर्व्हे क्र.२७८ चे अद्ययावत ७/१२ उताऱ्यानुसार नगरपरिषद, पुलगाव कमिटी च्या नावाने नोंद असल्याने व शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१८/प्र.क्र.३०९/नवि-१४, दि.१४.०१.२०१९ "सर्वांसाठी घरे-२०२२" या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करुन देण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केले असल्यामुळे नगरपरिषद, पुलगाव यांनी सर्वसाधारण ठरावानुसार नगरपरिषद, पुलगांव येथील मौजा गुंजखेडा, ता. देवळी जि. वर्धा नगरपरिषद, मालकीच्या सर्व्हे क्र.२७८ या जागेवर 'सर्वांसाठी घरे २०२२" या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकुल करून देण्याचे ठरविले आहे.

नगर विकास विभाग शासन अधिसूचना एमसीओ-२०१८/प्र.क्र.३०९/नवि-१४, दि.०७.०२.२०१९ मधील अटी व शर्ती क्र.१ नुसार अ.क्र.१० नुसार अतिक्रमणे नियमानुकुल करताना, अतिक्रमित जागेचा एकत्रित अभिन्यास तयार करून विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदी शिथिल

करून घेणे आवश्यक असल्याने सदर जागेवरील अतिक्रमणधारकांची नगरपरिषद नोंदी नुसार भूमी अभिलेख कार्यालय, देवळी यांचे कडून मोजणी केलेली आहे व त्यानुसार एकत्रीत अभिन्यास तयार करून सहायक संचालक, नगर रचना, वर्धा यांना तांत्रिक तपासणी करून संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करण्यास कळविले.

नगरपरिषदेच्या मालकीच्या सर्व्हे क्र.२७८ या जागेवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी अभिन्यासात अंतर्गत रस्ते, भूखंडाची रुंदी, खुली जागा व सुविधा क्षेत्र करीता नियमान्वये शिथीलता संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.डिटीपी/९४६५/३०२४/न.प. पुलगाव/मौ. गुंजखेडा/स.क्र.२७८/टीपीव्ही-०२/४४०७, दि.१४.०८.२०२४ च्या पत्रान्वये सुधारणे सह एकत्रीत अभिन्यासास शिथिलता प्रदान करण्यात आलेली आहे. सहायक संचालक, नगर रचना, वर्धा यांना पत्र दि.२६.०९.२०२४ नुसार सदर प्रस्तावित अभिन्यासात पूर्वी पासून झालेले पक्के बांधकाम व ईतर अनुषंगिक विकास लक्षात येऊन संचालनालयाने कळविलेल्या सुधारणा पैकी शक्य होत असलेल्या सुधारणा एकत्रित अभिन्यास नकाशात अंतर्भूत करून प्रस्ताव सहायक संचालक, नगर रचना, वर्धा यांना सादर करण्यात आलेला असुन सदरहु अभिन्यासास काही सुधारणा व अटी शर्तीसह मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर सर्व्हे क्र.२७८ (जुना सर्व्हे क्र.३६९/१) च्या जुन्या अभिलेखाची पडताळणी केली असता यामध्ये "परि." असा शेरा फक्त सन १९८२-८३ च्या तलाठी स्तरावरील रिनंबरींग चर्चे मध्ये दिसुन येतो. तत्पूर्वीच्या जुन्या अभिलेखाच्या पडताळणीमध्ये परावर्तीत किंवा परीवर्तीत जमिन असा शेरा नाही.

सन १९०८-०९ च्या बंदोबस्त मिसल मध्ये शेरा या रकान्यात या नंबरात मुन्सिपालटी नमुद केलेले दिसुन आलेले आहे. परंतु मालकाचे नाव या रकान्यात छगमल वल्द अमोलिकचंद मारवाडी साकीन या खाजगी व्यक्तीचे नाव दिसुन येत आहे. सन १९५४-५५ च्या अधिकार अभिलेख पंजीमध्ये म्युनसीपाल कमेटी पुलगावच्या ६६ क्रमांकाच्या खात्यामध्ये समाविष्ट गटामध्ये ३६९/१ हा सर्व्हे क्रमांक दिसुन येत आहे. मात्र त्यामधील नमुद तपशिलामध्ये म्युनसीपाल कमेटी पुलगावच्या खात्यामधील फक्त सर्व्हे क्रमांक ३६८ हा परावर्तीत भुमी म्हणुन मा. उपविभागीय अधिकारी वर्धा यांचेकडील आदेशानुसार नमूद केलेले आहे.

------------

लक्षवेधी सूचना क्र. १३२८

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. सुनिल प्रभू, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१३२८ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबईतील मालाड पूर्व, नागरी निवारा वसाहतीतील ११३ सहकारी गृहनिर्माण संस्थाना शासनाने १५-२५ वर्षापूर्वी कब्जे हक्काने प्रदान केलेल्या मिळकतीचे भोगवटादार वर्ग-२ मधुन भोगवटदार वर्ग-१ मध्ये रुपातर करण्यासाठी प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रिकेनुसार सध्या देय असलेली मुल्यांकनाची १० टक्के रक्कम न आकारता एक टक्क्यापेक्षा अधिक रक्कम आकारणी न करण्याची नागरी निवारा वसाहत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संघानी दिनांक २७-२-२०२५ रोजी जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर यांना दिलेल्या निवेदनाद्वारे मागणी केल्याचे निदर्शनास येणे, सदरहू प्रकल्प हा अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी असणे, प्रकल्पाचे काम सुरु होण्याआधीच ६२ एकर जमीनीची किंमत संस्थानी शासनास अदा केलेली असणे, वसाहतीतील १०० हुन अधिक संस्थानी अभिहस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करुनही त्याचा संस्थाना कोणताही लाभ न होणे, शासनाने प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रिकेनुसार २०० ते ३५० चौ.फुट क्षेत्राच्या घरासाठी आकारण्यात येत असलेली मुल्यांकनाची १० टक्के रक्कम भरण्यास गृहनिर्माण संस्था या आर्थिकदृष्ट्या असमर्थ असुन सदर रक्कम भरणे अवाक्याबाहेर असणे, सदरहू संस्थांनी केलेल्या मागणी नुसार शासनाने सदरहू ११३ गृहनिर्माण संस्थांना प्रचलित वार्षिकदर विवरण प्रत्रानुसार मुल्यांकनाची १० टक्के प्रमाणे रक्कम आकारणी न करता, दिनांक ७-७-२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार एक टक्क्यापेक्षा कमी देय रक्कम आकारणी करणेबाबत शासनाने कार्यवाही करून मान्यता देण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

---

### मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

शासन ज्ञापन, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, क्र. एओएल-१०९२/३४४४/का-१३, दिनांक १६/०२/१९९१ अन्वये मौजे मालाड येथील सर्वे क्र. २३९/१ मधील निवासी विभागातील ६२ एकर जमीन नागरी निवारा परिषद या संस्थेच्या अंतर्गत गठीत होणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना कब्जेहक्काने प्रदान करण्यात आली आहे.

ज्या व्यक्ती / संस्था यांना कृषी / वाणिज्यिक / औद्योगिक / रहिवाशी व सहकारी गृहनिर्माण संस्था या वापर प्रयोजनासाठी कब्जेहक्काने / भाडेपट्टा या धारणाधिकाराने प्रदान केलेल्या आहेत त्या शासकीय जमिनीचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्यासाठी शासन अधिसूचना, दिनांक ०८/०३/२०१९ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे) नियम-२०१९ असे नियम प्रसिध्द करण्यात आले होते. या नियमान्वये वर नमूद वापर प्रयोजनासाठी प्रदान केलेल्या जमिनीचे धारणाधिकार भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्यासाठी अधिमूल्याची रक्कम निश्चित करण्यात आली होती. या नियमात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या होत्या.

शासनाने दिनांक २०/०२/२०२५ रोजीच्या अधिसूचनेव्दारे यापूर्वीचे यासंबंधिचे सर्व नियम अधिक्रमित करुन त्याव्दारे बाधा पोहचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी प्रारुप नियम प्रसिध्द करुन दिनांक ०२/०३/२०२५ पर्यंत हरकती / सूचना मागविल्या होत्या. प्राप्त झालेल्या हरकती / सूचना विचारात घेऊन महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे) नियम-२०२५ असे सुधारित नियम दिनांक ०४/०३/२०२५ च्या अधिसूचनेन्वये प्रसिध्द केले आहेत. सन-२०२५ च्या नियमाव्दारे यापूर्वीचे या संबंधिचे सर्व नियम अधिक्रमित केले आहेत. सन-२०२५ च्या सुधारित नियमानुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी प्रदान केलेल्या जमिनीचे भोगवटादार वर्ग-१ च्या रुपांतरणाकरीता प्रचलित वार्षिक दर विवरण पत्रातील दराप्रमाणे येणाऱ्या किंमतीच्या १०% व ज्या सहकारी गृहनिर्माण संस्था स्वयंपुर्नविकास करुन पुर्नविकासातील वाढीव चटईक्षेत्रातील २५% चटईक्षेत्र प्रधानमंत्री आवास योजनेसाठी उपलब्ध करुन देतील अशा सहकारी गृहनिर्माण संस्थांकरीता ५% असे अधिमूल्य आकारुन भोगवटादार वर्ग-२ ची / भाडेपट्ट्याची जमीन भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करुन देण्याची तरतूद करण्यात आली आहे. सदर सवलतीचे दर दिनांक ३१/१२/२०२५ पर्यंत लागू आहेत.

सन २०२५ चे सुधारित नियम नागरी निवारा परिषद अंतर्गतच्या ११३ सहकारी गृहनिर्माण संस्थांना देखील लागू आहेत. त्यामुळे केवळ नागरी निवारा परिषद अंतर्गत सहकारी गृहनिर्माण संस्थांकरीता स्वतंत्र निर्णय घेणे योग्य ठरणार नाही.

तसेच शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक ०७/०७/२०१७ हा सदनिका / गाळा हस्तांतरणासाठी आकारावयाच्या अधिमूल्याच्या दराबाबत आहे. त्यामुळे शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि.०७/०७/२०१७ मधील तरतुदी शासकीय जमीन भोगवटादार वर्ग-१ च्या रुपांतरणासाठी लागू करता येणार नाहीत.

*******

(१२२)

लक्षवेधी सूचना क्र.१७८५

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**श्री.मोहन मते व मा. श्री. विकास ठाकरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"महाराष्ट्र राज्यातील आदिवासी जमिन मिळकतीबाबत वारंवार होणारे अतिक्रमण, बेकायदेशीर विक्री करार, आदिवासी खातेदारांनी अर्ज केल्यास महसुल खात्यातील अर्धन्यायीक प्रकरणामध्ये आदिवासीच्या विरुध्द निर्णय देणे असे अनेक बाबी महसुल प्रशासनातील अधिकारी करत असल्यामुळे मा. उच्च न्यायालय, जनहित याचिका क्र. १२०/२०१० च्या आदेशावरून महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग यांनी दि. २६ मार्च २०१३ रोजीच्या शासन परिपत्रकाने कलम ३६ (अ) पोटकलम (४) व (५) ची विना परवानगी आदिवासी, बिगर आदिवासी विक्री झालेल्या प्रकरणांमध्ये सर्व प्रधिकरणांना आदिवासी व्यवहार बेकायदेशीर ठरवून झालेले अतिक्रमण हटवण्याचे दिलेले अध्यादेश, सदर आदेशांन्वये एका आदिवासी बांधवाने तहसीलदार भिवंडी, जिल्हाधिकारी ठाणे, जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख ठाणे यांच्याकडे मौजे नारपोली व कामतघर येथील आदिवासी मिळकती जमिनीबाबत तक्रार केली असणे, या आदिवासी जमिनी असतानाही कुठलेही आदिवासी विक्री दस्त व्यवहार ३६ ची परवानगी न घेता परस्पर बिगर आदिवासी फेरफार, सातबारा तयार करणे, उपअधिक्षक भुमि अभिलेख चौकशी नोंद अधिका-याने चौकशी नोंदवही वर सर्वे नंबर वरून आदिवासी मिळकत असल्याचे माहित असताना सुध्दा कागदपत्रे न तपासता बिगर आदिवासी बेकायदेशीर मिळकत पत्रिका घडवून आणणे, सदर प्रकरणी शासनाने आदिवासी ते बिगर आदिवासी झालेले बेकायदेशीर व्यवहार सातबारे मिळकत पत्रिका रद्द करणेसाठी गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ करावयाची ठोस उपाययोजना शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

शासनाची पुर्वपरवानगी न घेता आदिवासी व्यक्तीच्या जमिनी विकास करारनामा व कुलमुखत्यार पत्राव्दारे हस्तांतरीत करण्याच्या अनुषंगाने जनहित याचिका क्रमांक १२०/२०१० मध्ये दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेतील दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने शासन परिपत्रक क्रमांक आदिवासी २०१३/प्र.क्र. २५/ल-९ दिनांक २६ मार्च २०१३ अन्वये मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत.

शासनाची पुर्वपरवानगी न घेता आदिवासी व्यक्तीच्या जमिनी बिगर आदिवासी व्यक्तीस हस्तांतरित झाल्याबाबत मौजे नारपोली, ता.भिवंडी येथील स.नं. ९०, नविन स.नं. २१८/१ , ९३, ११६/१, ११६/३, १३० ७/५, ११६/२२ तसेच मौजे कामतघर येथील स.नं. १२८/४, ९३, १३२/३, १३७/१, १३७/४, १४१/३, १६४/६ येथील जमिनीबाबत जनहित याचिका क्रमांक १२०/२०१० मधील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याचे नमूद करून जिल्हाधिकारी, ठाणे तसेच तहसीलदार भिवंडी यांच्या कार्यालयाकडे अर्ज प्राप्त झाले आहेत.

प्रस्तुत प्रकरणी ठाणे जिल्ह्यात मौजे नारपोली येथे सन १९८६-८७ साली नगर भूमापन योजना लागू करण्यात आलेली आहे. सदरच्या नगर भूमापन कार्यवाही दरम्यान संबंधित विषयांकित मिळकत न.भू.क्र ७९२८ ते ८२३७, ८२३८ ते ८४५४ याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २० (२) अन्वये जाहीरपणे नोटीस देऊन धारक/मालकी हक्काची चौकशी करून तसेच सदर चौकशीवेळी उपस्थित असलेल्या संबंधित व्यक्तींकडून पुराव्याची कागदपत्रे म्हणजे ७/१२ उतारे, खरेदीखत, जागेवरील वहिवाटी

इ.ची खात्री करून मालकी हक्काबाबतचा निर्णय घोषित केला असल्याचे भूमीअभिलेख कार्यालयाने नमुद केले आहे. त्यामुळे जे सर्व्हे नंबर/गट नंबर नगरभूमापन मध्ये समाविष्ट होत नाहीत तेथील मालकी हक्काबाबत व जे जे सर्व्हे नंबर/गट नंबर नगरभूमापन मध्ये समाविष्ट होत आहेत त्या मिळकतींच्या मालकी हक्काबाबत घेण्यात आलेल्या नोंदीच्या अनुषंगाने आक्षेप असल्यास संबंधित व्यक्तींनी त्यांच्याकडे उपलब्ध अधिकार अभिलेखाच्या पुराव्यासह अनुक्रमे महसूल विभागाचे सक्षम प्राधिकारी व जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, ठाणे यांच्याकडे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये रितसर अपील करून चुकीच्या नोंदीबाबत दाद मागणे आवश्यक आहे.

तसेच मौजे नारपोली येथील स.नं. ७/५ व ११६/२२ येथील आदिवासी जमिनीच्या बिगर आदिवासी खातेदारांना झालेल्या हस्तांतरणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ अंतर्गत तहसिलदार, भिवंडी यांच्या स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

*******

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील, मा.वि.प.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १९०२ पुढीलप्रमाणे आहे —**

"मौजे कुर्डुवाडी (ता.माढा, जि.सोलापूर) शहरातील ९१७ मिळकतीचे वर्ग-२ नियमानुकूल झालेल्या मिळकती वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून कुर्डवाडी शहर व्यापारी संघटना, मिळकतधारक व स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार केलेली असणे, सन १९९२ पासून सदर प्रश्न प्रलंबित असणे, त्यामुळे नागरीकांना सदर मिळकतीवर बांधकाम परवाना, बँकेचे कर्ज तसेच खरेदी-विक्रीचे व्यवहार न होणे, कुर्डुवाडी शहरातील ९१७ मिळकती या नगरभूमापन कार्यालयाच्या गलथान कारभारामुळे वर्ग-२ मिळकतींना महाराष्ट्र शासन अशी नोंद झालेली असून ती बेकायदेशीर असणे, शासन अधिसूचना दि.०८ मार्च, २०१९ आणि २७ मार्च, २०२३ अन्वये निवासी, वाणिज्यिक औद्योगिक प्रयोजनासाठी भोगवटादार वर्ग-२ धारणाधिकारावर किंवा भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या किंवा प्रदानानंतर असा वापर अनुज्ञेय करण्यात आलेल्या जमिनीचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरण करणेबाबत निर्देश दिलेले असणे, सदर आदेशान्वये सदर नियमानकुल झालेल्या मिळकती ह्या भोगवटादार वर्ग-२ मधून भोगवटादार वर्ग-१ मध्ये करणेसाठी शासन नियमाप्रमाणे अधिमुल्याची रक्कम भरण्यास संबंधित व्यापारी व मिळकतदार तयार असणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा उपाययोजना"

---

## मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

शहर कुर्डूवाडी हे गांव मूळ कुर्डू या गावाखालील वाडी आहे. कुर्डूवाडी या वाडी गावास मूळ गावठाण नाही. तथापि कुर्डूवाडी रेल्वे स्टेशन परिसरास लागून दक्षिणेस गट नबर, सर्व्हे नंबर नमूद नसलेने १९ हेक्टर ८९ आर क्षेत्र गाव नकाशावर दिसून येते. त्याबाबत आकारबंदामध्ये नमूद आहे. कुर्डूवाडी या गावी सन १९२० मध्ये प्रथम गावठाण भुमापण योजना राबविण्यात आली यामध्ये ८२० मिळकतींचा समावेश आहे. त्यानंतर सन १९५६ साली कुर्डूवाडी गावी नगरपरिषद अस्तित्वात आली त्यानंतर मुख्याधिकारी, नगर परिषद कुर्डूवाडी यांचे मागणी नूसार मूळ गावठाण भूमापन अभिलेख जीर्ण झालेने ते रद्द करुन सन १९९३-९४ दरम्यान नव्याने गावंठाण भूमापन

योजना कार्यान्वीत करुन हक्क चौकशी करुन मिळकतीचे हक्क कायम केले आहेत. यामध्ये एकूण 3839 मिळकतींचा समावेश आहे. त्यापैकी ९१७ मिळकती या 'ब' सत्ताप्रकारातील आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| धारक | हक्कदार | मिळकतींची संख्या |
|---|---|---|
| १) महाराष्ट्र शासन | महाराष्ट्र शासन नावे नोंद | १५९ |
| २) महाराष्ट्र शासन | वहिवाटदारांचे नावे नोंद | १२२ |
| ३) महाराष्ट्र शासन | पट्टेदार नांवे नोंड | ३९० |
| ४) महाराष्ट्र शासन | इतर हक्कदारांचे नावे नोंद | २८६ |
| एकुण | | ९१७ |

शासन ज्ञापन दि. ३१/०८/२००९ व शुध्दीपत्रक दि.१८/०२/२०१२ अन्वये मौजे कुर्डूवाडी येथील ९१७ मिळकतीबाबत विचाराधिन अतिक्रमणे नियमित करणेसाठी सन १९९५ हे मानीव वर्ष गृहीत धरणेत यावे तसेच वरीलप्रमाणे अतिक्रमण नियमित केलेली संपूर्ण जमिन वर्ग- २ (ब सत्ता प्रकार) राहील तसेच शासनाचे पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरीत गहाण किंवा तारण ठेवणार नाही. अन्य प्रयोजनासाठी शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय वापर करता येणार नाही, तसेच जमिनी मंजूरीचे आदेश काढण्यापूर्वी शासनाच्या अटी व शर्ती व निर्धारित करण्यात येणारी किंमत भरण्यास संबंधित मिळकत धारक तयार असल्याबाबत त्यांचेकडून लेखी अभिप्रमाणित हमी पत्र घ्यावे असे निर्देश आहेत. तसेच विचाराधिन अतिक्रमणे नियमित करणेसाठी सन १९९५ हे मानीव वर्ष गृहीत धरुन त्या वर्षाचे बाजारमुल्य विचारात घेवून किमतीच्या १ पट इतकी दंडनिय रक्कम आकारुन नियमित करावे असे निर्देश होते. या ऐवजी शासन निर्णय शुध्दीपत्रक दिनांक १८/०२/२०१२ अन्वये प्रत्येक कमाल १००० चौ. फुट पर्यतची निवासी बांधकामाखालील अतिक्रमणे नियमित करणेत यावीत. तसेच १००० चौ फुटापेक्षा जास्त निवासी बांधकाम खालील क्षेत्र आणि वाणिज्यक अतिक्रमणे सन १९९५ हे मानीव वर्ष गृहीत धरूण त्यावर्षाचे बाजारमुल्य विचारात घेवून किमतीच्या १ पट इतकी दंडणीय रक्कम आकारुन नियमीत करण्यात यावे, असे निर्देश आहेत त्यानुसार कार्यवाही करणेत येत आहे.

तसेच महाराष्ट्र शासन, महसूल व विभागाकडील शासन निर्णय दि.१३/०४/२०१७ व दि.२३/०२/२०१८ अन्वये पुर्नविकास/पुनर्बाधकामासाठी, शासन निर्णय क्रमांक.दि.०५/०७/२०२३ अन्वये हस्तातरणाबाबत परवानगी व शासन निर्णय दिनांक. २६/०६/२०१८ अन्वये गहाणखत बाबत झालेले शर्तभंग नियमित केलेल्या मिळकत धारकांचे प्राप्त अर्जानुसार परवानगी देणेची कार्यवाही करणेत येत आहे.

विषयाकिंत प्रकरणी तत्कालीन जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सोलापूर यांच्या दिनांक. ३०/११/२०१५ नूसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २५८ अन्वये उप अधीक्षक भूमि अभिलेख, माढा यांना पुर्नविलोकन आदेश दिले व उप अधीक्षक भूमि अभिलेख, माढा यांनी खात्री अंती ३९० मिळकतीवरील धारक सदरी असलेले महाराष्ट्र शासन नाव कमी करुन पट्टेदार याची नावे धारक सदरी दाखल केली आहेत,

सद्यस्थितीत भाडेपट्ट्याच्या कालावधीबाबत भूमि अभिलेख कार्यालयाकडे तसेच मिळकतधारक यांचेकडेही अभिलेख उपलब्ध नाहीत, शासन अधिसूचना दिनांक ०४ मार्च २०२५ प्रंमाणे भोगवटदार वर्ग-२ मधून भोगवटदार वर्ग-१ मध्ये रुपांतर करणेपूर्वी भाडेपट्टा नुतणीकरण करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या मार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

लक्षवेधी सूचना क्र.२२९१

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**मा. श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

" महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ च्या तरतूदीनुसार कायदेशीर दस्तावरून फेरफार नोंद कायदयाबाबत तलाठी मंडळ अधिकारी व तहसिलदार यांना कायद्याचे सर्वतोपरी ज्ञान असते परंतु एखाद्या पिडीत शेतकऱ्यांने अथवा नागरीकांनी लेखी पत्राद्वारे कायद्याची माहिती मागिल्यास संबंधित शिक्षित महसूल अधिकारी हे नागरीकांना व शेतकऱ्यांना कायदयाची माहिती लेखी पत्राद्वारे कधीही देत नाही महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कायदेपुस्तक हे ६०० पानाचे असुन त्याची परिभाषा प्रशासनीक असल्यामुळे शेतकरी व सामान्य अशिक्षित नागरीकांना ते सहसा समजत नाही परंतु या संपुर्ण महसुल खात्याचे ज्ञान तलाठी मंडल अधिकारी व तहसिलदार यांना असतांना जनतेने एखादे पत्र लिहुन कायद्याबद्दल माहिती मागितल्यास संबंधित अधिकारी चालढकल करत असतात असेच एका प्रकरणात तहसिलदार ठाणे मंडळ अधिकारी व तलाठी बाळकुम माजिवाडा उपाधिक्षक भूमिअभिलेख ठाणे यांना दिनांक ५/१०/२०२४ दिनांक १६/१/२०२४ व ६/१/२०२५ रोजी नागरीकंनी यांनी गहाण खतावरुन भोगवटदार नोंद घेण्याची तरतूद असलेबाबत कायदे विषयक माहिती मागितली होती परंतु थातुर मातुर उत्तर दिल्यामुळे मौजे माजिवाडा व बाळकुम ठाणे येथील सर्व्हे क्रमांक ४२/१ व ईतर सर्व्हे क्रमांक याबाबत शेतकरी रोहिदास पाटील यांनी गहाणखताने भोगवटदार सदरी बिगर शेतकरी वर्मा कुटुंबियांना बेकायदेशीर मालक बनवलेबाबत दिनांक ७ जुलै 2023 रोजी रोहिदास पाटील यांनी जिल्हाधिकारी ठाणे व पोलिस आयुक्त ठाणे महापालिका आयुक्त ठाणे यांना तक्रार दिली होती परंतु सदर एकुण तक्रारीबाबत कुठलीही ठोस कार्रवाई न झाल्याने शासनाने गांभिर्याने दखल घेऊन ठोस उपाययोजना करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

---

## श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या तरतूदीनुसार कायदेशीर दस्ताबाबतची जी नोंद फेरफारान्वये घेण्यात येते त्याबाबत तसेच क्षेत्रीय कार्यालयात प्राप्त झालेल्या नागरिकांच्या अर्जान्वये कायदेशीर तरतूदीबाबतच्या माहितीची मागणी केल्यास क्षेत्रीय कार्यालयांकडून विहीत वेळेत सोप्या भाषेमध्ये माहिती दिली जाते. प्रस्तुत प्रकरणी अर्जदार श्री. नागेश किसनराव निमकर यांच्या दिनांक ०५.१०.२०२४ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी दिनांक १८.०३.२०२५ च्या पत्रान्वये तसेच दिनांक ०६.०१.२०२५ च्या अर्जाच्या अनुषंगाने उपअधिक्षक भूमि अभिलेख. ठाणे यांनी १६.०१.२०२५ च्या पत्रान्वये संबंधित अर्जदारांना माहिती दिली आहे. तसेच दिनांक १६.०१.२०२४ रोजीचा कोणताही अर्ज महसूल क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त झालेला नाही. तथापि, अर्जदार श्री. रोहीदास पाटील यांनी मंडळ अधिकारी बाळकुम यांचेकडे दि. १६/०१/२०२५ रोजी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी बाळकुम यांनी त्यांना उत्तर दिलेले आहे.

मौजे माजिवडे, ता.जि. ठाणे येथील सर्व्हे नं.१२ व इतर ३२ सर्व्हे नं. चे एकूण क्षेत्र ४६-४७-७१ हे.आर. हे फेरफार क्रं. ५७१, दि. ०१/०९/१९४६ अन्वये कब्जेगहाण खताने, फेरफार क्रं. ६२१, दि. ०९/१२/१९४७ अन्वये तारण गहाण खताने, फेरफार क्रं. ६३२, दि.१०/१२/१९४७ अन्वये फरदर चार्ज नुसार श्री.गणपतराय हरकलाल यांचेकडून श्री.आर.एस.वर्मा यांना मिळाले आहे. तद्नंतर जिल्हाधिकारी, ठाणे

यांच्या दिनांक दि.२१/०४/१९५० च्या आदेशान्वये सदरची जमीन खालसा होऊन कब्जेदार सदरी सरकार नाव दाखल झाले व श्री. आर.एस. वर्मा यांचे नाव आणि माजिवडे टेनन्ट फार्मिंग कंपनीचे नाव कुळ म्हणून इतर हक्कात दाखल केले होते. तद्नंतर फेरफार क्रं. ९८३, दि. २९/०१/१९५८ अन्वये सदरचे क्षेत्र मुंबई टेनन्सी आणि ॲग्रीक्लचर लॅण्ड ॲक्ट चे कलम ६५ नुसार माजिवडा टेनन्ट फार्मिंग सोसायटी यांना १० वर्षाच्या लागवडीस दिले होते.

मौजे माजिवडे, ता.जि. ठाणे येथील फेरफार क्रं. १२४०, दि.२५/१०/१९६१ अन्वये विहीत कार्यपद्धती अवलंबून सदरचे ४६-४७-७१ हे.आर. क्षेत्रावरील सरकार नाव कमी करुन श्री. आर.एस. वर्मा यांचे नाव दाखल केले गेले. फेरफार क्र.१३९९, दि.०५.१२.१९६६ अन्वये माजिवडा टेनन्ट फार्मिंग सोसायटीचे कुळ म्हणून असलेली नोंद कमी करुन श्री. आर.एस. वर्मा यांचे नावाची नोंद जमिनीच्या कब्जेदार सदरी दाखल केली. तद्नंतर आर.एस.वर्मा हे दि.१२/१२/१९७१ रोजी मयत झाल्याने त्यांचे वारस श्री.उदयसिंग वर्मा व इतर यांची नावे दाखल करण्यात आली होती.

तद्नंतर श्री.उदयसिंग वर्मा यांचे वारस श्री.अशोक उदयसिंग वर्मा व इतर यांचेकडून विकासकरारान्वये विकासक म्हणून मे. कॅपस्टोन कंस्ट्रक्शन प्रा.लि. चे संचालक बोमन रुस्तम इराणी यांच्या नावाची ७/१२ चे इतर हक्कात नोंद केलेली आहे. त्यामुळे सदर जमीन निरंतर आजतागायत वर्मा कुटुंबियाचे नावे असून विकास करण्यासाठी मे. कॅपस्टोन प्रा.लि. कंपनीचे संचालक श्री.बोमन रुस्तम इराणी यांना दिल्याचे दिसून येते. तसेच श्री.रोहीदास पाटील यांच्या दिनांक १७.०७.२०२३ च्या जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयास प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने तहसिलदार कार्यालय, ठाणे यांनी दिनांक ०३.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये त्यांना सदरचे फेरफार मान्य नसल्यास सक्षम न्यायधिकरणाकडे अपील करावे असे कळवून त्यांचा अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

नगरविकास विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक २४/०८/२००९ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ नुसार विशेष वसाहत म्हणून दि.२४/८/२००९ अन्वये मौजे माजिवडा ता.जि.ठाणे येथील एकूण २१२ सर्व्हे मधील क्षेत्र ५२-७०-१९ हे.आर पैकी ४८-२०-०२ हे.आर क्षेत्र हे विशेष नगर वसाहत अंतर्गत विकास करणेकामी शासनाने घोषित केलेले आहे.

******

लक्षवेधी सूचना क्र.२४५६

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. नरेंद्र मेहता, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

" मिरारोड रेल्वे स्टेशनच्या पश्चिम दिशेला असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या ५०० एकर खार जमिनीवर मे. मिरा रिअल इस्टेट डेव्हलपर्स यांनी कब्जा केल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, या कंपनीने मीठ उत्पादनाकरिता दि. १/१०/१९७८ ते ३१/१०/१९८३ पर्यंत परवाना क्र.४८ अन्वये परवानगी घेणे, याविरुद्ध मीठ विभागाने हरकत घेणे, याबाबत कंपनीने मीठ विभागा विरुद्ध मा. उच्च न्यायालय यांच्याकडे अपील दाखल केले असता त्यांच्या बाजूने निकाल लागणे, या निकालाविरुद्ध मीठ विभागातर्फे मा. सर्वोच्च न्यायालयात दाद मागितले असता सदरचे प्रकरण जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे दाखल करणे कामी निर्देश देणे सदर निर्देशानुसार जिल्हाधिकारी यांनी सदर कंपनी विरुद्ध निकाल देऊन सदर जमीन महाराष्ट्र शासनाच्या नावे करण्यात येणे, याविरुद्ध अपर आयुक्त कोकण यांच्याकडे दावा दाखल केला असता त्यांनी जमीन महाराष्ट्र शासनाच्या असताना देखील कोणतीही शहानिशा न करता सदर कंपनीचे नावे करणे. यामुळे कंपनीकडून अभिलेखात नाव लावणे कामी प्रयत्न करण्यात येणे यावर पुन्हा मीठ उपायुक्त यांच्यातर्फे हरकत घेण्यात येणे सर्वात महत्त्वाचे म्हणजे ही जमीन शासनाची असताना कोणत्याही दाव्यात शासनाची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न न करणे, यामध्ये शासनाच्या काही अधिकाऱ्यांनी न्यायव्यवस्थेच्या डोळ्यात धुळफेक करून आपल्या अधिकाराचा गैरवापर केलेला असणे अशा विविध प्रकारामुळे शहरातील जनतेमध्ये प्रशासनाच्या बाबतीत निर्माण झालेला संभ्रम आणि यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

## श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे भाईंदर येथील फेरफार क्रमांक १२६१, दिनांक १२.०६.१९५८ नुसार मीरा सॉल्ट वर्कचे प्रोप्रायटर दिनशा कोतवाल व एम.एस कोतवाल यांच्या अर्जावरुन व कलेक्टर ऑफ सेंन्ट्रल एक्साइज यांचे कडील दिनांक ०२.०३.१९४४ रोजीच्या पत्रान्वये सदर जमीन सन १९४४ पासून मिठागारांसाठी उपयोगात येत असल्याकारणाने सॉल्ट डिपार्टमेंट (गव्हर्मेंट ऑफ इंडिया) यांचे नावे दाखल करण्यात आले. तद्नंतर दि.०१.१०.१९७८ ते दि.३१.०१.१९८३ पर्यंत मीठ उत्पादनासाठी मिरा सॉल्ट वर्क्स यांना २०७.३१ एकर जमिनीकरिता परवाना दिल्याचे दिसून येते. सदर परवाना नुतनीकरणासाठी कंपनीने अर्ज केला असता सॉल्ट डिपार्टमेंटने सदर जमीनीवर मालकी हक्काचा दावा केल्यामुळे कंपनीने मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र. २८६१/१९८३ मध्ये मा.उच्च न्यायालयाने मिरा सॉल्ट वर्क्स या कंपनीचा दावा मान्य केला. सदर आदेशाविरुद्ध सॉल्ट डिपार्टमेंट, भारत सरकार यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या दावा क्र.सिए क्र.६७४३/१९९६ मध्ये मा. न्यायालयाने दि.२५.०३.१९९६ रोजीच्या आदेशान्वये सदर जमिनीच्या मालकीहक्कासंदर्भात जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे अपील दाखल करण्याचे निर्देश दिले. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांच्या दि.१८.११.२००२ रोजीच्या आदेशान्वये मिरा सॉल्ट वर्क्स कंपनीचे अपील फेटाळून सदर जमीन महाराष्ट्र शासनाकडे वर्ग करण्याबाबत आदेश पारीत केले. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या आदेशाविरुद्ध मिरा सॉल्ट वर्क्स कंपनीने अपर आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे दाखल केलेल्या अपीलात दि. ०८.१०.२०१० रोजी आदेश होऊन कंपनीचा मालकी हक्क मान्य करण्यात आला. सदर आदेशा विरोधात सॉल्ट डिपार्टमेंटने मा.दिवाणी न्यायालय वरिष्ठ

यांच्याकडे दाखल केलेल्या दावा क्र.७७१/२०११ मध्ये मा.न्यायालयाने सदरचा दावा फेटाळला आहे. त्यानुसार एकूण ११४ सर्व्हे नंबरच्या १०५ एकर १२ गुंठे क्षेत्राकरीता फेरफार ७६१०, ३ सर्व्हे नंबरच्या १ एकर ३३ गुंठे क्षेत्राकरीता फेरफार क्र.७६११ व उर्वरित १०९ सर्व्हे नंबरच्या १३४ एकर १६ गुंठे क्षेत्राकरिता फेरफार क्र.७६०४ अशा एकूण २४१.२१ एकर क्षेत्राकरिता सदरचे फेरफार अभीलिखीत करण्यात आले. त्यापैकी फेरफार क्र. ७६१० ही नोंद दि.२९.१०.२०२० रोजी तर फेरफार क्र. ७६११ ही नोंद दिनांक ०३.११.२०२० रोजी मंजूर करण्यात आली. मात्र फेरफार ७६०४ अनुषंगाने मीठ विभागाने मा.उच्च न्यायालयामध्ये दावा दाखल केल्याने फेरफार क्र. ७६०४ नामंजूर करण्यात आला. तर फेरफार क्र.७६१० व ७६११ हे उपविभागीय अधिकारी, ठाणे यांच्या पुनर्विलोकनाअंती नामंजूर करण्यात आले. सदर आदेशाविरुध्द कंपनीने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका (स्टॅंप) क्र. ११९६४/२१ च्या अनुषंगाने दि.०२.०९.२०२१ रोजी पारीत आदेशांनुसार मे.मिरा रियल इस्टेट डेव्हलपर्स यांचे नाव कब्जेदार सदरी घेण्याचे व संबंधित भुखंडाच्या बाबतीत भारत सरकारचे म्हणणे ऐकल्यानंतर अंतिम निर्णय होईपर्यंत आजची स्थिती कायम ठेवण्याचे मा. उच्च न्यायालयाने आदेशित केले. त्यानुसार सदर मिळकती मे.मिरा रियल इस्टेट डेव्हलपर्स यांच्या नावे दाखल आहेत.

सद्यस्थितीत मा. दिवाणी न्यायालय, (वरिष्ठ स्तर) ठाणे यांच्याकडील विशेष दिवाणी दावा क्र.७७१/२०११ मधील दि.१३.०४.२०१८ रोजीच्या आदेशाविरुद्ध युनियन ऑफ इंडिया तर्फे मीठ उपायुक्त, मुंबई यांनी जमिनीच्या मालकी हक्काच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय मुंबई येथे प्रथम अपिल क्र. १४३०/२०१९ दाखल केले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. सदर जमिनीबाबत महाराष्ट्र शासनाच्या मालकी हक्काच्या अनुषंगाने संपूर्ण अधिकार अभिलेखांची तपासणी करून महाराष्ट्र शासनाचे हितसंबंध आढळल्यास मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल प्रथम अपिल क्र. १४३०/२०१९ मध्ये शासनाच्या वतीने बाजू मांडण्याची कार्यवाही करण्यात येईल.

*******

लक्षवेधी सूचना क्र.२५००

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**मा. श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

" ठाणे जिल्हा भिवंडी महसूल विभागातील अनेक तलाठी कार्यालयात गेले कित्येक वर्ष एकाच मिळकतीचे दोन फेरफार टाकताना १५ दिवसाची नोटीस मुदत न ठेवता एकाच दिवशी दोन फेरफार घडवण्यात आलेले आहेत त्यामुळे तलाठी कार्यालयाने गैरव्यवहारातून अनेक फेरफारांची अनियमितता व अगुणवत्ता वाढवून गैरलाभ मिळवल्याने चुकीच्या फेरफारामुळे दिवाणी न्यायालयीन प्रक्रियेमध्ये मोठी वाढ झालेली आहे वर्षानुवर्ष न्यायालयामध्ये प्रकरण प्रलंबित असून असेच एक प्रकरण मौजे कामतघर तालुका भिवंडी येथील सर्व्हे क्र१३५/२ पैकी व १२८१ फेरफार क्र. १७०२ वारसाने आलेले असुन त्याच दिवशी नोंदणिकृत हक्कसोड नसतांना खोट्या तोंडी जबाबाने वहिणिचे हक्क वारसाने फेरफार के. १७०३ कमी झाले. दोन्ही फेरफारामध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ (सन२०१५चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३१) च्या कलम ३ (१) अन्वये १५ दिवसानी नोटीस न देता एकाच दिवशी झालेले दुसरे फेरफार रद्द करण्याची तरतूद असुन अशा प्रकरणांमध्ये तलाठी मंडळ अधिकारीच्या चुकीमुळे झालेल्या फेरफाराचे ५० वर्षाचे विलंब माफ करुन पुनर्विलोकन घेणेबाबत दिनांक १८/१/२०२१ रोजी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे पिडित विधवा महिलेने तक्रार करुनही प्रशासन मेरफार क्रं १७०३ बाबत कुठलीही ठोस उपाययोजना करत नसल्यामुळे शासनाने गैरकारभार करणाऱ्या तलाठी मंडळ अधिकारीच्या गलथान कारभारामुळे विधवा महिलांच्या हक्काचे संरक्षण होत नसल्या कारणाने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे तथा तक्रारीचे पुनर्विलोकनात रुपांतर करून शासनाने करावयाची कठोर कारवाई व प्रतिक्रिया."

---

## श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे कामतघर, ता.भिवंडी येथील स.नं. १३५/२ पै या मिळकतीवरील फेरफार क्र. १७०२, दि. ८/१/१९७६ अन्वये मयत रघुनाथ गोविंद तरे यांचे वारस अशोक रघुनाथ तरे व इतर ४ यांची नावे वारस म्हणुन दाखल झालेली आहेत. तद्नंतर फेरफार क्रमांक १७०३, दिनांक ८/१/१९७६ अन्वये वारस मुली शंकुतला लक्ष्मण चौधरी व इतर ३ मुली यांची नावे कबुली जबाबाने कमी करण्यांत आलेली आहेत. प्रस्तुत दोन्ही फेरफार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४९ व १५० नुसार सर्व संबंधितांना नोटीस बजावून दिनांक ०८/०१/१९७६ रोजी नोंदवून तद्नंतर दि.२६/०१/१९७६ रोजी मंजूर/प्रमाणित करण्यात आला होता. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा २८ एप्रिल २०१५ रोजी प्रख्यापित झाला आहे. त्यामुळे सदरचा अधिनियम फेरफार क्र.१७०२ व १७०३ या नोंदीस लागू होत नाही

तद्नंतर उक्त मिळकतीबाबत एकुण २४ फेरफार मंजुर झालेले आहेत. सदरचे फेरफार वारस नोंदी व खरेदी व्यवहाराबाबत आहेत. सदर फेरफार व खरेदीदस्त आजरोजी अस्तित्वात आहेत. सबब, सदरचे फेरफार नोंदविताना अनियमितता झाल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तुत प्रकरणामध्ये फेरफार क्र.१७०२ व १७०३ या नोंदी प्रमाणित होऊन ५० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५८ नुसार पुनर्विलोकन तसेच दिनांक ०५.०२.२०१६ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५५ व २५७ च्या अनुषंगाने झालेल्या सुधारणेनुसार सदर फेरफार पुनर्विलोकनात घेता येणार नाहीत.

तलाठी, सजा कामतघर यांनी अर्जदार यांना फेरफार क्र. १७०२ व १७०३ बाबत सक्षम न्यायालयात दाद मागणे आवश्यक असल्याबाबत दि.३०/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच सद्यस्थितीत वरील नमुद फेरफार क्र. १७०२ व १७०३ व त्यापुढील झालेल्या सर्व फेरफार नोंदीबाबत उपविभागीय अधिकारी, भिवंडी विभाग, भिवंडी यांचे कार्यालयाचे स्तरावर पुर्नविलोकन प्रस्ताव अथवा अपिल प्रलंबित दिसून येत नाहीत.

******

लक्षवेधी सूचना क्र. २५०१

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**मा. श्री. उमेश उर्फ चंदु यावलकर , विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २५०१ पुढीलप्रमाणे आहे :-**

"महाराष्ट्रातील जमिन महसूल अधिनियम अंतर्गत तलाठी मार्फत होणारे वारस फेरफार हक्काबाबत दिवाणी न्यायालय व अर्धन्यायिक न्यायालय यामध्ये मोठ्या प्रमाणावर कौटुंबिक वादाचे शेकडो दावे प्रलंबित असल्यामुळे कौटुंबिक वाद विकोपाला गेल्याने तंटामुक्तीसारखे प्रयोजन शासनाला करावे लागले याचा मुळ दस्तावेज वारस प्रमाणपत्र अथवा १०० रुपये स्टॅम्पवरील सत्यप्रतिज्ञापत्र असून भिवंडी येथील काही गावांच्या तक्रारीवरुन महसुल खात्याचे तलाठी हे योग्यरीत्या वारसचौकशी न करता भाऊबहिणींची नावे डावलून तलाठ्याने वारस फेरफार टाकल्याने योग्य वारसांची नोंद होण्यासाठी शासनाने विलंबाचा मुद्दा आडवा आणुन अशा मुळ वारसांचे नावे अपिलांती विलंबामुळे फेटाळण्यात आलेली आहे. यामुळे डावलण्यात आलेल्या भाऊबहिणींच्या वारसांबाबत प्रचंड मोठ्या प्रमाणात नागरीकांमध्ये असंतोष असून एका खोट्या सत्यप्रतिज्ञापत्रावरून भाऊबहिणीची नावे डावलुन खरेखुरे वारसांची नोंदी होत नसल्याकारणाने चौकशी न करता वारस फेरफार टाकण्यात आलेली आहे व त्या सत्यप्रतिज्ञापत्रामधील मजकुर खरेखुरे वारस अथवा भावाबहिणीची नावे लपवल्यास भा. द. वि. संहिता कलम १९८१९९२०० व १९३ मधील तरतुदीनुसार दंडास शिक्षेस पात्र राहील असे मुळ कुटुंबप्रमुखाने वारस नोंदी करतांना इतर सख्खे चुलत वारसांना डावलून एकटे हितसंबंधाचे प्रतिज्ञापत्र करुन दिलेले आहे. वारसांची नावे या सत्यप्रतिज्ञापत्रावरुन लपवल्यामुळे तात्काळ असे प्रतिज्ञापत्र रद्द करून त्यावरुन झालेले फेरफार रद्द करणेसाठी शासनाने तात्काळ ठोस उपाययोजना करुन करावयाची कार्रवाई व प्रतिक्रिया."

---

## श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

महाराष्ट्र जमीन महसूल नियम, खंड ४ मधील तरतुदींनुसार गाव तलाठी यांना मयताबाबत वर्दी मिळाल्यानुसार गावातील सरपंच, पोलीस पाटील, शेजारील रहिवासी अथवा लगतचे खातेदार व मान्यवर व्यक्ती यांचेसमवेत मयतांच्या वारसांची चौकशी करतांना जबाब-पंचनामा करुन तसेच अर्जदार यांनी दिलेली माहिती योग्य आहे याबाबत अर्जदार यांचेकडून अतिरिक्त पुरावा म्हणून सत्यप्रतिज्ञापत्र घेऊन वारस फेरफार नोंद अधिकार अभिलेखात केली जाते. तद्नंतर संबंधित मंडळ अधिकारी हे फेरफार नोंद प्रमाणीत करतात.

तथापि, ज्या प्रकरणांमध्ये वारस नोंदीबाबत कौटुंबिक वाद होतात अशा प्रकरणामध्ये महसूल न्यायालयात अर्धन्यायिक प्रकरणे चालवून गुणवत्तेनुसार फेरफार रद्द करून फेरवारस चौकशी करणे अथवा सक्षण न्यायालयाकडून वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) दाखल करणेबाबत निर्देश देण्यात येतात.

दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम क्र. ४१, दिनांक ०५.०२.२०१६ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम २५५ व २५७ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम २५७ (१) या परंतुकांमध्ये "दुय्यम अधिका-यांच्या निर्णयाच्या किवा आदेशाच्या दिनांकापासून ५ वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर कोणत्याही महसूल किंवा भूमापन अधिकाऱ्याकडून या पोटकलमान्वये किंवा पोटकलम (२) अन्वये कोणतीही कार्यवाही सुरु

करण्यात येणार नाही." अशी तरतूद आहे. सदर तरतूदीनुसार पाच वर्षांपेक्षा जास्त कालावधीपूर्वी घेण्यात आलेला निर्णय पुनरीक्षण अर्जाद्वारे आव्हानित करता येणार नसल्याने अर्धन्यायिक प्रकरणांमध्ये विलंबाने दाखल झालेले अपिल अर्ज विलंबमाफीच्या मुद्यावर सक्षम प्राधिकारी यांचे स्तरावरुन फेटाळण्यात येतात.

प्रकरणी भिवंडी तालुक्यात वारस फेरफार नोंदीबाबत चौकशी केली असता, मौजे-लाखिवली, मौजे-धामणे, मौजे-सरावली, मौजे-घोलगांव व मौजे-सोनाळे या गावांमध्ये तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारींचे अनुषंगाने तहसीलदार भिवंडी व तलाठी यांचे स्तरावरुन संबंधित वारस फेरफार नोंदीविरुध्द सक्षम प्राधिकाऱ्याकडे अपिल दाखल करणे आवश्यक असल्याचे नमुद करून अर्जदार यांना कळवून अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.

*******

लक्षवेधी सूचना क्र.२५१२

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**मा. श्री. उमेश उर्फ चंदु यावलकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"महाराष्ट्रातील मुंबई ठाणे जिल्हयातील अनेक आदिवासी जमिन मिळकतीमध्ये कलम ३६ च्या विनापरवानगी हस्तांतरण झाले असुन त्याबाबत मा. उच्च न्यायालय जनहित याचिका १२०/२०१० च्या आदेशावरुन महाराष्ट्र शासन महसुल शासन परिपत्रक क्रं, आदिवासी २०१३/प्रकरण क्रं. २५/ल-९ दि. २६ मार्च २०१३ असे असतांना सुध्दा जिल्हाधिकारी कुळवहिवाट शाखा व ईतर प्राधिकरणे हे कुठलीही ठोस उपाययोजना करत नसतांना दिसत असून अशिक्षित दुर्बल आदिवासी यांच्या जमिनी मोठ्या प्रमाणात गावगुंड व बिल्डरांमार्फत हडप करण्यात आलेले असल्याने आदिवास्यांचे कलम, ३६च्या परवानगीशिवाय विनामोबदला झालेले हस्तांतरण फेरफार मिळकतपत्रीका या तात्काळ रद्द करणेबाबत भिवंडी येथील मौजे-कामतबर नारपोली येथील काही ७ ते ८ आदिवासी नागरीकांनी फेब्रुवारी व मार्च २०२५ मध्ये मा. जिल्हाधिकारी, जिल्हा अधिश्वक भूमिअभिलेख ठाणे, उपाधिक्षक भूमिअभिलेख आणि तहसिलदार भिवंडी यांना रीतसर शासकीय अद्यादेशासह वेगवेगळी तक्रार केलेली असुन उच्च न्यायालयाचे अवमान होणार नाही याची दक्षता घेऊन सदर तक्रारीबाबत सुमोटो अथवा रेस्टोरेशनखाली कार्रवाई करणे आवश्यक असल्याने शासनाने मुंबई ठाणे जिल्हयातील समस्त आदिवासींच्या हडपलेले जमिनी त्यांना परत मिळणेकामी शासनाने करावयाची ठोस कारवाई व प्रतिक्रिया."

---

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

शासनाची पुर्वपरवानगी न घेता आदिवासी व्यक्तीच्या जमिनी विकास करारनामा व कुलमुखत्यार पत्राव्दारे हस्तांतरीत करण्याच्या अनुषंगाने जनहित याचिका क्रमांक १२०/२०१० मध्ये दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेतील दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने शासन परिपत्रक क्रमांक आदिवासी २०१३/प्र.क्र. २५/ल-९ दिनांक २६ मार्च २०१३ अन्वये मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत.

शासनाची पुर्वपरवानगी न घेता आदिवासी व्यक्तीच्या जमिनी बिगर आदिवासी व्यक्तीस हस्तांतरित झाल्याबाबत मौजे नारपोली, ता.भिवंडी येथील स.नं. ९०, नविन स.नं. २१८/१ , ९३, ११६/१, ११६/३, १३० ७/५, ११६/२२ तसेच मौजे कामतघर येथील स.नं. १२८/४, ९३, १३२/३, १३७/१, १३७/४, १४१/३, १६४/६ येथील जमिनीबाबत जनहित याचिका क्रमांक १२०/२०१० मधील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याचे नमूद करून जिल्हाधिकारी, ठाणे तसेच तहसीलदार भिवंडी यांच्या कार्यालयाकडे अर्ज प्राप्त झाले आहेत.

प्रस्तुत प्रकरणी ठाणे जिल्ह्यात मौजे नारपोली येथे सन १९८६-८७ साली नगर भूमापन योजना लागू करण्यात आलेली आहे. सदरच्या नगर भूमापन कार्यवाही दरम्यान संबंधित विषयांकित मिळकत न.भू.क्र ७९२८ ते ८२३७, ८२३८ ते ८४५४ याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २० (२) अन्वये जाहीरपणे नोटीस देऊन धारक/मालकी हक्काची चौकशी करून तसेच सदर चौकशीवेळी उपस्थित असलेल्या संबंधित व्यक्तींकडून पुराव्याची कागदपत्रे म्हणजे ७/१२ उतारे, खरेदीखत, जागेवरील वहिवाटी इ.ची खात्री करून मालकी हक्काबाबतचा निर्णय घोषित केला असल्याचे भूमीअभिलेख कार्यालयाने नमुद केले आहे. त्यामुळे जे सर्व्हे नंबर/गट नंबर नगरभूमापन मध्ये समाविष्ट होत नाहीत तेथील मालकी हक्काबाबत व जे जे सर्व्हे नंबर/गट नंबर नगरभूमापन मध्ये समाविष्ट होत आहेत त्या मिळकतींच्या मालकी हक्काबाबत घेण्यात आलेल्या नोंदीच्या अनुषंगाने आक्षेप असल्यास संबंधित व्यक्तींनी त्यांच्याकडे उपलब्ध अधिकार अभिलेखाच्या पुराव्यासह अनुक्रमे महसूल विभागाचे सक्षम प्राधिकारी व जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, ठाणे यांच्याकडे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये रितसर अपील करून चुकीच्या नोंदीबाबत दाद मागणे आवश्यक आहे.

तसेच मौजे नारपोली येथील स.नं. ७/५ व ११६/२२ येथील आदिवासी जमिनीच्या बिगर आदिवासी खातेदारांना झालेल्या हस्तांतरणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ अंतर्गत तहसिलदार, भिवंडी यांच्या स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच मुंबई शहर जिल्ह्यामध्ये आदिवासी जमिनी असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

*******

लक्षवेधी सूचना क्र. २२

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांच्या लक्षवेधी सूचना क्र.२२ वरील निवेदन वने मंत्री सभागृहासमोर ठेवतील:-

"अमरावती वन वृत्तात वडाळी व चांदूर रेल्वे परिक्षेतात सन २०२२-२३ आणि २०२३-२४ या आर्थीक वर्षात कॅम्पा अंतर्गत लिडार योजना कुरण विकास लागवड रोपवन योजना मोठया प्रमाणत राबविण्यात येणे, या चांगल्या योजनेचा वनअधिकाऱ्यांनी पदाचा दुरउपयोग करून नियमबाहय कामे करणे, यात मंजूर अंदाजपत्रकापेक्षा आणि प्रशासकीय मान्यतेपेक्षा करोडो रूपयांची अतिरिक्त कामे कागदोपत्री झाल्याचे दाखविणे,वडाळा परिक्षेत्रात झालेल्या चार परिक्षेत्रातील रोपवन कामामध्ये १ कोटी ४२ लाख ९२ हजार ६२९ आणि चांदूररेल्वे सहा परिक्षेत्रातील रोपवन कामामध्ये १ कोटी १५ लाख २५ हजार ७४७ रूपयांची अतिरिक्त कामे कागदोपत्री दाखवून शासकीय धनादेशाची उचल करून शासनाची करोडो रूपयांनी फसवणूक करणे, याबाबत तक्रार होताच नाममात्र कार्यवाही करून अतिरिक्त कामाचे उचल करण्यात आलेली रक्कम संबधित अधिकाऱ्यांकडून वसूल करण्याचे आदेश देण्यात येणे, हया गंभीर प्रकरणी संबधित सर्व अधिकाऱ्यावर कडक कार्यवाही करणे अपेक्षित असतांना नाममात्र कार्यवाही झालेली असल्यामुळे नागरिकात पसरलेले तिव्र असंतोष त्यामुळे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

मा. मंत्री (वने) श्री. गणेश नाईक

निवेदन

सन २०२०-२१ या कालावधीत पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन प्राधिकरण (CAMPA) योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या मान्यतेने Light Detection and Ranging (LiDAR) तंत्रज्ञानाद्वारे अमरावती वन विभागातील अमरावती, तिवसा व चांदूर रेल्वे या तालुक्यातील वनक्षेत्रामध्ये कुरण विकास, रोपवन व जल मृदसंधारणाची कामांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने WAPCOS या संस्थेला DPR तयार करण्याचे काम देण्यात आले होते.

केंद्र शासनाने सन २०२२-२३ मध्ये मंजूर केलेल्या कॅम्पा वार्षिक नियोजन आराखड्यानुसार कामाची अंमलबजावणी न करता तत्कालीन कार्यरत अधिकारी यांनी कॅम्पा

HB/2148

अंतर्गत केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये दिलेल्या अंदाजपत्रकाचा वापर न करता अंदाजपत्रकामध्ये फेरबदल करुन त्यास तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन कामे केल्याचे उपलब्ध दस्ताऐवजावरुन निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने सन २०२२-२३ व २०२३-२०२४ मधील पुर्ण झालेल्या कामांची तपासणी वनसंरक्षक (मुल्यांकन), नागपूर यांच्याकडून करण्यात आली. सदर चौकशीमध्ये वडाळी परिक्षेत्रातील ४ रोपवन कामे व चांदुर रेल्वे परिक्षेत्रातील ६ रोपवन कामे असे एकूण १० रोपवन कामांच्या अंदाजपत्रकांमध्ये मंजूर नमूना अंदाजपत्रकातील बाबी व्यतिरिक्त वाढीव मनुष्य दिवस, साहित्य पुरवठा यांचा समावेश करणे, मंजुर अंदाजपत्रका व्यतिरीक्त जल व मृद संधारणाची कामे करणे, अंदाजपत्रके तयार करताना खड्ड्यांचा आकार, रोपे वाहतुकीचा दर, खते व इतर निविष्ठांचा दर कोणतीही पुर्व मंजूरी न घेता अथवा आधारा विना वाढ केली आहे, अशा प्रकारे अंदाजपत्रकामध्ये फेरबदल केल्यामुळे चांदुर रेल्वे वनपरिक्षेत्रातील ६ रोपवन कामामध्ये १,१५,५२,९९२/- रुपये इतका अतिरीक्त खर्च आणि वडाळी वनपरिक्षेत्रातील ४ रोपवन कामामध्ये १,४२,९२,६२९/-रुपये असा एकूण २,५८,४५,६२१/- इतका अतिरीक्त खर्च झाल्याचे निदर्शनास आले आहे, असे आक्षेप नोंदवून सदर नियमबाह्य अतिरिक्त खर्चाची रक्कम संबंधितांकडून वसूल करण्याचे मुल्यांकन अहवालात नमूद केले आहे. सदर अहवालामध्ये नमूद केलेल्या आक्षेपांची शहानिशा करण्याकरीता उपवनसंरक्षक, अमरावती यांचे अध्यक्षतेखाली गठित केलेल्या समितीने वनसंरक्षक (मुल्यांकन), नागपूर यांच्या अहवालाशी सहमत असल्याबाबतचे अभिप्राय दिलेले आहेत. त्यानुसार प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांच्याविरुध्द उचित कार्यवाही करण्याच्या सूचना प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना शासनस्तरावरून देण्यात आलेल्या आहेत. याबाबत संबधितांचे खुलासे प्राप्त करून त्यांच्याविरुध्द उचित कार्यवाही करण्यात येईल.

***********************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. नारायण (आबा) गोविंदराव पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ४३६ पुढीलप्रमाणे आहे :-

"सोलापूर जिल्ह्यातील करमाळा, बार्शी, मोहोळ, माढा तालुक्यातील काही भागात गेल्या काही दिवसांपासून बिबट्यांचा वावर असल्याचे दिसून येणे, बिबट्या, वाघाकडून शेतकऱ्यांच्या गाय, म्हशी व अन्य पाळीव प्राण्यांवर वारंवार होत असलेले हल्ले, त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण होणे, जिल्ह्याच्या एका टोकावर असलेल्या करमाळा तालुक्यात बिबट्या किंवा तत्सम प्राण्यावर देखरेखीसाठी वनविभागाचे प्रादेशिक कार्यालय असणे अपेक्षित असताना १०० ते १५० किलोमीटर अंतरावर असलेल्या मोहोळ येथील वन कार्यालयातून जिल्ह्याच्या दुसऱ्या टोकावर असलेल्या करमाळा तालुकाचा कारभार पाहिला जात असणे, सद्यस्थितीत करमाळा तालुक्यावरील वनक्षेत्रात देखरेख करण्यासाठी केवळ एक वनरक्षकाची नियुक्ती करण्यात येणे, त्यामुळे करमाळा तालुक्यात बिबट्या किंवा वाघांकडून हल्ला झाल्यास मोहोळ येथील वन कार्यालयातून पथक पाठवले जात असून ते वेळेवर पोहोचू शकत नसल्यामुळे अनेक वेळा जीवित हानी होण्याच्या घटना घडणे, त्यामुळे करमाळा तालुक्यात कायमस्वरूपी प्रादेशिक कार्यालयाची स्थापना करून वनक्षेत्रपाल, वनपाल, वनरक्षक, वनसेवक अशी २५ ते ३० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी वारंवार स्थानिक नागरिक, शेतकरी व लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे करण्यात येणे, मागणीच्या अनुषंगाने करमाळा तालुक्यात वनविभागाचे प्रादेशिक कार्यालय स्थापना करण्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी तालुक्यातील नागरिकांमध्ये वाढता तीव्र असंतोष, शासनाने उक्तप्रकरणी तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

**श्री. गणेश नाईक**

**मा. मंत्री (वने)**

### निवेदन

वन व वन्यप्राण्यांना कायद्याचे संरक्षण व त्याद्वारे होत असलेल्या संवर्धनामुळे वन्यप्राण्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून आले आहे. वाढलेले शहरीकरण, वाढलेली लोकसंख्या, विकास कामांसाठी वन जमिनीच्या वापरामुळे वन क्षेत्राचे विखंडन झाल्याने वन्यप्राण्यांचे अधिवास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष खंडीत व संकुचित झाले असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे मानव-वन्यप्राणी, संघर्षाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे, त्याप्रमाणे पशुधन हानीच्या घटनांमध्ये देखील वाढ झाली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

मानव-वन्यजीव संघर्षाच्या परिस्थितीमुळे नागरिकांचे होणारे नुकसान विचारात घेता शासनाकडून नुकसान भरपाई अदा करण्याची योजना राबविण्यात येते. या अंतर्गत "महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरिता नुकसानभरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३" या कायद्याची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर अधिनियमांतर्गत शासन अधिसूचना दि. ३०.०१.२०२४ अन्वये विविध प्राणी तसेच विविध प्रकारच्या नुकसानीकरिता अनुज्ञेय अर्थसहाय्याचे दर शासनाने निश्चित केले असून त्यामध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ करण्यात येत आहे. सदर कायद्यानुसार नुकसान भरपाईची रक्कम विहीत वेळेत अदा न झाल्यास व्याजासह रक्कम अदा करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

राज्यातील मानव-वन्यजीव संघर्षाच्या अनुषंगाने तात्काळा कार्यवाही करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीद्वारे वारंवार पाठपुरावा करण्यात येतो. तदअनुषंगाने सदर प्रकरणांची गांभिर्याने दखल घेवून शासन स्तरावर वेळोवेळी बैठका व आढावा घेण्यात येत आहे.

(1) HB-2164/1-3/760 पुढे

सदरच्या मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटना अत्यंत वेदनादायक असून, त्यामध्ये मनुष्यहानी व इतर नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शासन स्तरावर अतिशय गंभीरतापूर्वक व तातडीने कार्यवाही करण्यात येत आहे. या घटनांच्या पार्श्वभूमीवर मा. मुख्यमंत्री महोदय, मा. उप मुख्यमंत्री महोदय व इतर स्तरावर आयोजित बैठकांमध्ये या अनुषंगाने तातडीने उपाययोजना करणेबाबत निर्देशित करण्यात आले आहे.

त्याअंतर्गत वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाकडून प्रस्ताव सादर करण्यात आला असून, पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच या कायद्यामध्ये State specific सुधारणा करणेबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. उपरोक्त मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटना "State-Specific Natural Disaster." म्हणून घोषित करणेबाबत शासनस्तरावरून कार्यवाही सुरू आहे.

मानव वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात, त्यामध्ये-

- मानवी वस्तीमध्ये येणारे व मनुष्यहानीस कारणीभूत ठरणारे बिबटे यांना कायदेशीर तरतुदीनुसार नरभक्षक बिबटे घोषित करण्याबाबत कार्यवाहीकरीता निर्देश देण्यात आलेले आहे.
- पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील मानव-वन्यजीव संघर्षग्रस्त भागातील बिबट्यांच्या बचावाकरीता तीनही जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी ६०० बिबटे ठेवण्याची क्षमता असलेले रेस्क्यु सेंटर किंवा ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर उभारण्याकरीता निर्देश देण्यात आलेले आहे.
- केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांची परवानगी घेवून बिबट्यांना इतर राज्यातील प्राणीसंग्रहालय व वन्यप्राणी बचाव केंद्रांमध्ये हस्तांतरीत करण्यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे.
- डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेंतर्गत बिबट प्रवण क्षेत्रातील स्थानिकांची राहती घरे, गोठे व तत्सम इमारती सभोवताली सौर ऊर्जा कुंपण उभारण्याकरीता रक्कम रु. १००.०० कोटी इतकी भरीव तरतुद करण्यात आलेली आहे.
- मागील काळात चंद्रपूर येथील मानव-वन्यजीव संघर्ष रोखण्याकरीता वापरात असलेली कृत्रिम बुध्दीमत्ता आधारित (AI) पूर्वसूचना देणारी यंत्रणा (Early Warning System) राज्यातील बिबट प्रवण क्षेत्रामध्ये वापरण्याबाबत निर्देश देण्यात आले आहे.
- बिबट प्रवण क्षेत्रामध्ये शाळांच्या वेळेमध्ये बदल करण्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांना निर्देश देण्यात आले आहे.
- जुन्नर वनविभागात बिबट्यांना जेरबंद करण्याकरीता १००० पिंजरे खरेदीकरीता निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे राज्यातील इतर विभागांकरीता पिंजरे खरेदी करण्याकरीता आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.
- क्षेत्रिय अधिकारी व कर्मचा-यांच्या गस्ती पथकांची निर्मिती करून नियमितपणे वनक्षेत्रात तसेच वन्यप्राणी प्रवण क्षेत्रात गस्त घालण्यात येवून वन्यप्राण्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात येते.
- मानवी जिवीतास धोकादायक ठरणाऱ्या वन्यप्राण्यांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.
- वनक्षेत्रात गवत, कुरण व इतर मृद व जलसंधारणाची कामे करुन त्या ठिकाणी गवत व इतर चराई योग्य प्रजाती याची लागवड करुन वन्यजीव/ तृणभक्षी प्राण्यांसाठी कुरण निर्मिती केली जात आहे.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात कृत्रीम पाणवठे निर्माण करुन पाण्याची व्यवस्था करण्यात येते.
- क्षेत्रीय अधिकारी/वनकर्मचाऱ्यांकडून संरक्षित क्षेत्रात नियमितपणे पायी तसेच वाहनाद्वारे गस्त घालण्यात येते.
- बिबट व इतर वन्यप्राणी यांना नागरी वस्तीत येण्यापासून रोखण्यासाठी कर्मचाऱ्यांचे वेगवेगळे गट तयार करण्यात येवून त्यांचे हालचालींचे सनियंत्रण करण्यात येते.
- मानव-वन्यजीव संघर्ष प्रकरणात तात्काळ कार्यवाहीसाठी जलद बचाव पथक, प्राथमिक बचाव दल तयार करण्यात आले आहेत.
- जंगलात आवश्यक त्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करण्यासाठी संरक्षण कुटी व निरीक्षण मनोरे उभारलेले असून गस्त करणारे वनकर्मचारी त्या ठिकाणी मुक्काम करतात.

- मानव-वन्यजीव संघर्ष, वनवणवा, वन्यप्राण्यांच्या अवैध शिकार ई. प्रकरणाबाबत माहिती वन विभागास उपलब्ध करुन देण्याकरीता हेल्पलाईन क्रमांक महाराष्ट्र वन विभागामार्फत कार्यान्वित करण्यात आला आहे.
- मानव-वन्यजीव संघर्षाची स्थिती हाताळण्याकरीता शासनस्तरावर प्रमाणबध्द कार्यक्रम (SOP) तयार करण्याची बाब शासनस्तरावर सुरू आहे.

अशाप्रकारे मानव-वन्यप्राणी संघर्षाची घटनांची तीव्रता कमी व्हावी, याकरिता शासन स्तरावर विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

*****

लक्षवेधी सूचना क्र. १४७०

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. विजय वडेट्टीवार, श्री.अस्लम शेख, श्री.नानाभाऊ पटोले, श्री.अमित झनक, श्री. विकास ठाकरे, श्री संजय मेश्राम, श्री. मोहन मते, श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांच्या लक्षवेधी सूचना क्र.१४७० वरील निवेदन वने मंत्री सभागृहासमोर ठेवतील:-

"कर्नाटक पॉवर कंपनीने बंराज मोकासा येथे नियमाला डावलून कोळसाचे मोठया प्रमाणात उत्खन्नन सुरू करणे, याबाबतची माहिती वनविभागाला मिळताच वनविभागाने २८ फेब्रुवारी २०२५ रोजी उत्खन्नन बंद करण्याचे आदेश देणे, चंद्रपूर जिल्हयातील भद्रावती तालुक्यातील बरांज मोकासा येथील कर्नाटक पॉवर कंपनीला वन विभागाने ८४.४१ हेक्टर जमीन देण्यात येणे, हि जमीन देतांना वनविभागाने वनसंवर्धन अधिनियम १९८० अतर्गत काही नियम व अटी लागू केल्या असणे, मात्र या अटी व शर्तीला डावलून कंपनीने मोठया प्रमाणात अवैध कोळसा उत्खन्नन सुरू केले असणे, हि जमीन देतांना बरांज मोकासा व चेकबंराज गावाचे पुनर्वसन हात नाही तोपर्यत जमिनीवरील निस्तार हक्काच्या जागेवर बाधा पोहचनार नाही असे नियमात नमुद असतांना सुध्दा कंपनीने अवैधपणे कोळसाचे उत्खन्नन सुरू करणे, या गंभीर प्रकरणाची वनविभागासह जिल्हाधिकारी चंद्रपूर यांसह संबधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे नागरिकांनी तक्रार करणे मात्र या तक्रारीची अघापही चौकशी करण्यात आलेली नसल्यामुळे नागरिकांत पसरत असलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबधितावर कार्यवाही होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा. मंत्री (वने) श्री. गणेश नाईक

निवेदन

मे. कर्नाटक पॉवर कॉर्पोरेशन लि. यांना मौजे-बरांज मोकाशा, चक बरांज व चिचोर्डी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर जिल्ह्यातील ओपन कास्ट माईन करीता ८४.४१ हे. वनजमिन वळती करण्यास, केंद्र शासनाने दिनांक ०९.१२.२०११ च्या पत्रान्वये तत्वत: मान्यता प्रदान करुन दिनांक २२.१२.२०२१ रोजी अंतीम मान्यता प्रदान केलेली आहे. सदरहू आदेश केंद्र शासनाने काही अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर केलेले आहेत. त्यानुसार राज्य शासनाने दिनांक ११.११.२०२२ रोजी केंद्र शासनाच्या उक्त आदेशातील अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन राहून वनजमिन वळतीकरणाचे आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यानुसार प्रकल्प यंत्रणेने वनमंजुरीच्या आदेशाचा मजकुर हितवाद (इंग्रजी) व लोकमत (मराठी) या वृत्तपत्रात दिनांक १५.११.२०२२ रोजी प्रसिध्द करुन हक्क बाधित होत असल्यास आक्षेप नोंदविण्याबाबत जाहीर केले होते. परंतु, त्यासुमारास कोणतेही आक्षेप प्राप्त झालेले नाहीत.

HB/2149

तद्नंतर केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या आदेशातील अटी व शर्तीनुसार विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांनी ८४.४१ हे. वनक्षेत्र प्रकल्प यंत्रणेस हस्तांतरण करण्याची कार्यवाही दिनांक २५.०१.२०२३ च्या आदेशान्वये केली आहे.

तथापि, ८४.४१ हे. वनक्षेत्र हस्तांतरीत केल्यानंतर एक ते दीड वर्षाच्या कालावधीमध्ये प्रकल्प यंत्रणेने पुनर्वसनाची व निस्तार हक्काबाबतची कार्यवाही पूर्ण न केल्यामुळे अवैध उत्खनन होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व गावकऱ्यांच्या तक्रारी वनविभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांनी दिनांक १५.०४.२०२४ रोजी प्रकल्पबाधीत खाणकामाच्या क्षेत्राचे प्रत्यक्ष स्थळनिरिक्षण पाहणी करून दिलेल्या अहवालानुसार अवैध उत्खनन सुरु नसल्याबाबत तसेच पुनर्वसन व निस्ताराबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेमार्फत सुरू असल्याबाबतचा सविस्तर अहवाल सादर केलेला आहे.

तथापि, प्रकल्प यंत्रणेनी केंद्र शासनाच्या अंतीम मान्यता आदेश दि. २२.१२.२०२१ मधील अट क्र. A (i) मध्ये प्रकल्पाचे काम सुरू होण्यापूर्वी मदत व पुनर्वसन धोरणाची अंमलबजावणी प्रकल्प यंत्रणा करेल व अट क्र. A (ii) मध्ये वनक्षेत्र हस्तांतरीत करण्यापूर्वी अनुसूचित जमाती आणि इतर पारंपारिक वनवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ ची अंमलबजावणी प्रकल्प यंत्रणा करेल, या अटींची पूर्तता करण्याबाबत आणि राज्य शासनाने दिनांक ११.११.२०२२ च्या वळतीकरणाच्या आदेशामध्ये नमूद केलेल्या अट क्र. ४ मध्ये केंद्र शासनाच्या आदेशातील अटींची पूर्तता न केल्यास वनभंग होईल व अट क्र. ५ मध्ये केंद्र शासनाच्या आदेशातील अटींची पूर्तता न केल्यास तसा अहवाल केंद्र शासनास सादर केला जाईल, या अटींची पूर्तता करण्याबाबत प्रकल्प यंत्रणेस वारंवार निदर्शनास आणून देखील याबाबतचा पूर्तता अहवाल वनविभागास सादर केलेला नाही. त्यामुळे मुख्य वनसंरक्षक (प्रा.), चंद्रपूर यांनी दिनांक २४.०२.२०२५ च्या आदेशान्वये सदर खाणकाम बंद करण्यात आले होते. तथापि, प्रकल्प यंत्रणेने उक्त केंद्र शासनाच्या अंतीम मान्यता आदेशातील अटीप्रमाणे प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन व मोबदला अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे तसेच, निस्तार हक्काबाबत बाधित कुटुंबांना प्रकल्प यंत्रणा नुकसान भरपाई देण्यास सहमत असल्याबाबतचे हमीपत्र दिनांक ०७.०३.२०२५ रोजी दिले आहे. त्यानुसार प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन व मोबदला अदा करण्याची व निस्तार हक्क निपटाऱ्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडून सुरू असल्याचे जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी दिनांक १७.०३.२०२५ च्या पत्रान्वये कळविले आहे. प्रकल्प यंत्रणेने सादर केलेला उक्त नमूद अटींचा अहवाल विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर यांच्याकडून दिनांक ०६.०३.२०२५ रोजी प्राप्त झाला असून, सदरचा अहवाल आणि प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन व मोबदला अदा करण्याची कार्यवाही सुरू असल्याची आणि जिल्हाधिकारी यांनी निस्तार हक्काबाबत सुरू केलेली कार्यवाही विचारात घेऊन, मुख्य वनसंरक्षक (प्रा.), चंद्रपूर यांनी दिनांक २४.०२.२०२५ च्या आदेशान्वये घातलेली बंदी उठविण्यात आलेली आहे.

***

# महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

<u>लक्षवेधी सूचना क्र.४२७</u>

श्री. भास्कर जाधव, श्री. सुनील मुनगंटीवार, श्री. मनोज जामसुतकर, श्री. संजय केळकर, श्री. सुनिल प्रभू, श्री. संजय गायकवाड, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र.४२७** पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील कमी पटसंख्येच्या मराठी माध्यमाच्या सुमारे १४ हजार शाळा बंद केल्या जात असल्याने मोठ्या संख्येने मुले शाळाबाह्य होऊन शिक्षणापासून वंचीत राहून शिक्षकही मोठ्या प्रमाणात अतिरिक्त राहणार असल्याचे शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांमध्ये चिंता व्यक्त करणे, २०२१-२२ च्या काळात राज्यातील शाळांची श्वेतपत्रिकेनुसार सरकारी अनुदानित आणि विशेषत: सर्व प्रकारच्या शाळांची अवस्था चांगली नसल्याने मराठी शाळांचा मुद्दा दुर्लक्षित रहाणे, राज्यात मराठी शाळा वाचविण्यासाठी राज्यातील बहुतांशी इंग्रजी शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नसल्याची धक्कादायक बाब असणे, शासनाने मायमराठीची प्रतिष्ठा उंचवणारी व्यापक धोरणे आखलेली असणे, सरकारी शाळांची गुणवत्ता वाढ, महाराष्ट्रासाठी नवे शैक्षणिक धोरण, मराठीचे आभ्यासक्रम तज्ज्ञांच्या राज्य सल्लागार मंडळाची स्थापना, अभ्यासक्रमात संविधान, प्रत्येक गावात शिक्षण व पुस्तक विक्रीचे गाळे, ग्रामपंचायत तेथे पुस्तकाचे दुकान, जिल्हा तेथे मराठी पुस्तकांची दुकाने, मराठीचे अर्थकारण बळकट करुन जिल्हा व राष्ट्रीय स्तरावरील मराठी साहित्य संमेलनांना भरीव अनुदान, तसेच ग्रंथालयाचे अनुदान तिप्पट करणे, मराठी अस्मिता व मायबोलींची अभ्यास केंद्र मराठी माहितीपटाला अनुदान अशी अभिवचने देण्यात आलेली असणे, शासनाचे मराठी शाळांकडे होत असलेले दुर्लक्षामुळे राज्यातील नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबतीत शासनाने वेळीच दखल घेऊन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

********************************************************************************

## <u>मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन</u>

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार राज्यातील प्रत्येक बालकाला मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार प्रदान करण्यात आला असून त्यानुसार सर्व बालकांना इ.१ ली ते ८ वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देण्यात येत आहे.

राज्यातील कमी पटसंख्येच्या शाळा बंद करणेबाबतचा कोणताही निर्णय शासनाने घेतलेला नाही, असे शासनाचे कोणतेही धोरण नाही. राज्यातील मराठी माध्यमाच्या शाळांमधून विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण दिले जात आहे. सरकारी शाळांमधून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रयोगशाळा, मराठी भाषा पेटी, गणित व विज्ञान पेटी याद्वारे विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य शासनाकडून पुरविले जात आहे. विविध सांस्कृतिक उपक्रम त्याचप्रमाणे मराठी माध्यमांच्या शाळांमधील विद्यार्थी पटसंख्या वाढावी यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.

शासकीय/ जिल्हापरिषद शाळांसोबतच राज्यात सुमारे २४,००० खाजगी शाळा व सुमारे १५,००० स्वयंअर्थसहाय्यित शाळा कार्यान्वित आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळांना आवश्यक असलेल्या मुलभूत सुविधांच्या बांधकामाकरिता दरवर्षी जिल्हा वार्षिक योजना (डीपीडीसी), पंधरावा वित्त आयोग, जिल्हा परिषद फंड, गौण खजिन योजना या योजनातंर्गत उपलब्ध निधीच्या मर्यादित निधी जिल्हास्तरावर मंजूर करण्यात येतो. उपलब्ध निधीच्या अनुषंगाने बांधकामे पूर्ण करण्याची कार्यवाही संबंधित जिल्हा परिषद स्तरावर करण्यात येते.

तसेच, समग्र शिक्षा अंतर्गत प्रधानमंत्री शक्ती पोषण निर्माण आहार योजना, विद्यार्थीसाठी मोफत पुस्तके व गणवेश, शाळांना संगणक, आयसीटी लॅब, क्रीडा साहित्य विज्ञान प्रयोगशाळा, डिजिटल लॅब, रोबोटिक कोडिंग लॅब व इतर सुविधा पुरविण्यात येतात. तसेच, आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होण्यासाठी शाळेला डिजिटल क्लासरूम उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच, शिक्षकांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबवून शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येतो. शिक्षकांना वेळोवेळी प्रोत्साहन देऊन शाळांची पटसंख्या वाढविण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे.

इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे विद्यार्थ्यांचा वाढता कल पाहता शासन निर्णय, दि.१९.०६.२०१३ अन्वये मराठी माध्यमांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची घसरण थांबविण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून इ.६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना गणित व विज्ञान हे विषय ऐच्छिक स्वरूपात इंग्रजी भाषेतून शिकविण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

शासन निर्णय, दि.०१.०६.२०२० अन्वये राज्यातील सर्व माध्यमाच्या शाळांमध्ये मातृभाषेतून शिक्षण देण्याच्या धोरणास बाधा न येऊ देता, इतर माध्यमाच्या विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर, भाषेची काठिण्य पातळी आणि याच बरोबर केंद्र शासनाच्या त्रिभाषा सुत्राचा अवलंब करून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून, इयत्ता १ ली ते १० वी साठी टप्प्याटप्प्याने मराठी भाषा अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच सर्व माध्यमांच्या शासकीय व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यात आले आहे. प्रत्येक शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीची करण्याबाबत पुनश्चः शासन परिपत्रक, दि.२८.०२.२०२४ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये मराठी भाषा आणि साहित्य विषयक आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमासाठी साहित्य संमेलनास अर्थसहाय्य देण्यात येते. सन २०२३-२४ पासून दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी, रु.२.०० कोटी इतके अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबतचा शासन निर्णय दि.२२.१२.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाकरीता रु.२.०० कोटी इतके अर्थसहाय्य महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्यामार्फत अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळास अदा करण्यात आले आहे. तसेच शासन निर्णय दि.२०.०२.२०२५ अन्वये "एक विशेष बाब" म्हणून अतिरिक्त रु.२.०० कोटी (एकूण रू.४ कोटी) इतके अर्थसहाय्य अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळास उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री अनुदाने यासाठी मान्यता) नियम, १९७० मधील तरतुदीनुसार शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना परिरक्षम अनुदान मंजूर करण्यात येते. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शासन निर्णय दि.२१.१२.२०२२ अन्वये शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुज्ञेय असलेल्या परिरक्षण अनुदानात सन २०२२-२३ पासून ६० टक्के वाढ केलेली आहे.

राज्य शासनाने १०० दिवसांच्या कालावधीमध्ये हाती घ्यावयाच्या महत्त्वाच्या योजनांचा कृति आराखडा यामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करण्यासाठी राज्यातील सर्व शाळांचे छायाचित्रासह जिओटॅगिंग, राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) ची अंमलबजावणी व एनसीईआरटी पुस्तके लागू करणे, शालेय गुणवत्ता मूल्यांकन आणि श्रेणी फ्रेमवर्कची अंमलबजावणी, केंद्र शासनाच्या "पीएमश्री शाळा" योजनेच्या धर्तीवर राज्यातील प्रत्येक CRC मधील एका शाळेचा "सीएमश्री शाळा" म्हणून विकास करणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत पूर्व प्राथमिक शिक्षण धोरणाची अंमलबजावणी, महाराष्ट्राचे राज्यगीत व मराठी भाषेला अभिजात दर्जा देणेबाबतच्या शासन निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी, विद्यार्थी केंद्रीत गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षण, शासकीय शाळांचा विविध योजनांद्वारे विकास, अभ्यासू पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था व शिक्षणतज्ञ यांच्या शिफारशी विचारात घेऊन शैक्षणिक धोरणाची आखणी करणे, विद्यार्थ्यांमध्ये उत्तम आरोग्य, व्यक्तिगत व सार्वजनिक स्वच्छताबाबत सजगता निर्माण करणे इत्यादी मुद्द्यांचा समावेश करण्यात आला असून त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत शासकीय प्राथमिक शाळांमध्ये अन्य विविध योजनांद्वारे पायाभूत सुविधांचा विकास करण्याचे व विद्यार्थी केंद्रीत गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षण देण्याचे उद्दिष्ट आहे.

*****

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन**

**महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना**

**डॉ. आशिषराव देशमुख,श्री. कृष्णा पंचम खोपडे यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. २४१५ पुढील प्रमाणे आहे:-**

नागपूर जिल्ह्यातील कलमना येथील पंडित जवाहरलाल नेहरु मार्केट मध्ये नविन गाळांसाठी जिल्हाधिकारी तथा भुसंपादन अधिकारी यांच्याकडून खसरा क्र.११२ संपादीत केलेल्या जागेवर कृषी उत्पन्न बाजार समितीने नफा ना तोटा या धर्तीवर भाजी बाजाराकरिता १४४ गाळयांकरिता इमारत क्र. १ ते ६ बांधण्यात येणे, १४४ गाळयांकरिता १७२ आडतदारांना परवाने वाटप करणे बंधनकारक असताना परवाना नुतनीकरणाच्या नावाखाली संचालक मंडळाच्या २०० पेक्षा जास्त आडतदारांना गैरमार्गाचा वापर करुन परवाने प्रदान करणे, पणन संचालकांनी गाळे प्रक्रिया रद्द करुन कृषी उत्पन्न बाजारा समितीच्या संचालकांना आपल्या पद्धतीने विक्री करण्याची मुभा देणे, मौजा रेंगापार बुटीबोरी येथील ०.१७ हेक्टर जागा बाजार समितीच्या संचालकांनी ठराव घेऊन खाजगी व्यक्तीला कर्मशियल कॉम्प्लेक्स बांधण्याकरिता देणे, तसेच गाळयाचा बांधकाम खर्च सरासरी २० ते २५ लाख असणे, गेल्या १२ वर्षापुर्वी पासून नियमित सेझ भरत असलेल्या आडतदारांना ३५ लाखापासून ७२ लाखापर्यंत किंमत सांगून तसेच दरमहिन्याला भाडे भरायला लागणार, आणि दर तीन वर्षानी भाडेवाढ होणार असे सांगून आडतदारांना संभ्रिमत करणे, आडतदारांची पणन संचालक आणि कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांबद्दल असलेली नाराजी, संचालक करत असलेले गैरव्यवहार, यावर शासनाची प्रतिक्रिया आणि कार्यवाही.

---

**मा. मंत्री (पणन) यांचे निवेदन**

नागपूर जिल्हयातील कळमना येथील पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड मधील खसरा क. ११२ मधील १०.७० हे.आर. जमीन भुसंपादन अधिकारी नागपूर यांचे दिनांक २५/०८/१९९४ चे निवाडा आदेशानुसार रूपये २६,११,३२८/- मोबदला रक्कम देवून बाजार समितीने संपादीत केलेली आहे. सदर जमिनीचा ताबा दि. २३/१२/१९९४ रोजी कृषि उत्पन्न बाजार समिती यांना मिळाला आहे. संपादीत जागेपैकी ३.३१ एकर जागेवर महात्मा फुले (कॉटन मार्केट) येथील भाजी बाजार हा कृषि उत्पन्न बाजार समितीचे कळमना मार्केट येथे स्थलांतरीत होणार होते. तेथील अडते व व्यापाऱ्यांची आवश्यकता व मागणी लक्षात घेवून ६ शॉप कम गोडावून इमारतीचे बांधकामास महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १२ (१) अन्वये महाराष्ट्र कृषि पणन मंडळ पुणे

यांचे दि. २५/०३/२०१३ आदेशाने मान्यता प्राप्त झाली असून बांधकाम दि.१९/०२/२०२४ रोजी पूर्ण करण्यात आले आहे.

महात्मा फुले भाजी बाजार कॉटन मार्केट येथुन दिनांक २५/०८/२०१३ रोजी स्थलांतरीत होणाऱ्या भाजी अडती यांची संख्या १७४ होती. बाजार समितीने अनुज्ञाप्ती साठी पात्र असलेल्या २३५ भाजी अडती यांना अनुज्ञाप्ती दिली आहे. नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती तर्फे बांधण्यात आलेले भाजी बाजारातील १४४ दुकाने/गोदामे यांचे भाजी अडती यांना वाटप करण्याकरीता पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक २५/०२/२०२५ चे पत्रान्वये अटी व शर्तीस अधिन राहुन कलम १२(१) व नियम १०९ (अ) अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

तत्कालीन मा. राज्य मंत्री, (महसुल) यांनी भूसंपादन अधिनियम १८९४ कलम ४८(१) अन्वये पारित केलेल्या दिनांक २५/०८/२०१५ रोजीच्या आदेशान्वये ग्राम पंचायत बुटीबोरी मौजे रेंगापार येथील सर्वे नं. १२४/२ क्षेत्र २.१७ हे. आर. पैकी ०.१३ हे. आर. क्षेत्रावर श्री. मुरलीधर महादेवराव हिवसे यांची नोंद घेणेबाबत निर्देश दिले आहेत.

श्री मुरलीधर महादेवराव हिवसे यांचे खसरा क. १२४/२ मौजे रेंगापार ता.जि. नागपूर येथील २.१७ हे. आर. जागेपैकी ०.१३ हे. आर. मध्ये रहिवासाचे घर व चरितार्थाचे साधन असलेले दुकाने गेल्यां ४० वर्षापासुन असल्याने शासनाचे आदेश मान्य करण्यास बाजार समितीने संचालक मंडळाच्या दि.०८.०९.२०१६ च्या सभेत ठराव पारित केला आहे.

प्रसंगत: तत्कालीन प्रशासक, कृषि उत्पन्न बाजार समिती, नागपूर यांनी तत्कालीन राज्य मंत्री, (महसुल) यांचे उक्त आदेशा विरूध्द मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथे दाखल केलेल्या याचिका क्र. १७०७/२०२१ मा. न्यायालयाने दिनांक ३१/०१/२०२४ खारिज केलेली आहे.

**********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

सर्वश्री. शंकर पांडुरंग जगताप,श्री. अमित विलासराव देशमुख,श्री. नानाभाऊ फाल्गुनराव पटोले, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ६८९ पुढीलप्रमाणे आहे -

"पिंपरी-चिंचवड शहराच्या मध्यवर्ती भागातून वाहणा-या पवना नदीची लांबी सुमारे २४.५कि.मी.असणे,पवना नदीला जलपर्णीचा विळखा पडल्यामुळे पवनामाईचा श्वास कोंडणे, नदीपात्र प्रदूषित होऊन परिसरात मोठी दुर्गंधी पसरणे, महापालिका प्रशासन या सर्व गोष्टींकडे केवळ बघ्याच्या भूमिकेतून पाहत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे, शहरातील पवना, इंद्रायणी, मूळा नद्या प्रदूषित होऊन जलसृष्टी धोक्यात येणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने डिसेंबर २०१०च्या अहवालानुसार शहरातील नद्यांचे पाणी सध्या प्रक्रिया करूनही पिण्यायोग्य करता न येणे, शहरातील ८० टक्के सांडपाणी वाहून नेण्याची क्षमता असणे, त्यापैकी फक्त ६० टक्के पाणी शुद्धकरण यंत्रणा कार्यरत असल्याचे धक्कादायकरित्या उघडकीस येणे.नद्यांसाठी नदी सुधार प्रकल्प गेल्या साडेसात वर्षांपासून केवळ कागदावरच असणे, गेल्या ३०-४० वर्षांपासून नदीत सोडण्यात आलेले सांडपाणी, कारखान्यांचे रसायनमिश्रीत पाणी, कपडे, वाहने, जनावरे धुणे यांमुळे नद्यांचे पाणी प्रदूषित होणे, प्रदूषण महामंडळाने कारवाई करण्याची गरज असणे, पवना व इंद्रायणी नदी प्रकल्पासाठी तयार करण्यात येणा-या विस्तृत प्रकल्प अहवालासाठी सरकारच्या पर्यावरण विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र घेऊन केंद्राच्या एनआरसीकडे पाठविण्याची आवश्यकता असणे, नदी पात्राचे डिमार्ककेशन करून मुख्य नदीपात्रात साठलेला गाळ काढणे, नद्यांचे खोलीकरण करणे, नदीपात्राकडील खालील पातळीस ग्रॅब्रीयन पद्धतीची भींत उभारणे व नदीत मिळणारे सांडपाणी रोखण्यासाठी नदी पात्राच्याकडेने मोठ्या व्यासाची जलवाहिनी टाकणे, नद्यांच्या काठावर रिव्हर फ्रंट विकसित करण्याची आवश्यकता, मनपा प्रशासनाला नदी प्रदूषण मुक्त करण्याबाबत नव्याने प्रकल्प अहवाल तयार करून राज्यशासनाची एनओसी घेऊन केंद्राच्या राष्ट्रीय नदी संरक्षण संचालनालयाकडे अनुदानासाठी पाठविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.."

---

## मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे निवेदन

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधे पवना नदी पिंपरी चिंचवड शहराच्या मध्यवर्ती भागातुन अंदाजे २४.४० कि.मी वाहते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत सुमारे ३८४ दशलक्ष लिटर घरगुती सांडपाण्याची निर्मिती होत असून त्यासाठी ३७६ दशलक्ष लीटर प्रतिदिन इतक्या क्षमतेचे एकूण १९ घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत उभारण्यात आलेल्या आहेत. सदरच्या सर्व सांडपाणी प्रकिया संयत्रणांमधून सद्यस्थितीत ३३० दशलक्ष लीटर प्रतिदिन सांडपाण्यावर प्रक्रिया केली जात असून प्रक्रियाकृत सांडपाणी पवना, मुळा व इंद्रायणी नदीमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी सोडण्यात येत आहे. उर्वरीत सांडपाणी विनाप्रक्रीया पवना व इंद्रायणी नदीमध्ये विविध नाल्यांमार्फत मिसळत असून याकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फ़त ४७ द.ल.लि. प्रति दिन क्षमतेच्या ४ सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार सद्स्थितीत अंदाजे ८५% सांडपाण्यावर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फ़त प्रक्रिया करण्यात येत असून सन २०४१ मध्ये होणारी लोकसंख्या वाढ गृहित धरुन एकूण ३९५ द.ल.लि. प्रति दिन क्षमतेचे १० सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्याचे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार पवना नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा आराखडा अंतिम करण्यात आला असुन प्रकल्पाकरीता CWPRS (Central Water and Power Research Station, Pune) विभागाचा अहवाल प्राप्त झाला आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पवना नदीचे

पुनरुज्जीवन प्रकल्पास पर्यावरण नाहरकत दाखला प्राप्त झाला असून सदर प्रकल्पाकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (NDMA) यांचे मार्गदर्शक सूचनांनुसार निधी मिळणेकरीता मा.जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्यावर कार्यवाही सुरु आहे. तसेच राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालय (NRCD) कडे निधी मिळणेकरिता प्रस्ताव पाठविणेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पवना नदीच्या पाण्याची गुणवत्ता सुधारण्याकरीता नदी सुधार प्रकल्पाचा आराखडा तयार करणेत आला असून पहिल्या टप्प्यातील नदीच्या कडेने इंटरसेप्टर लाईनचे काम पुर्ण झाले आहे. नाल्याद्वारे नदीत मिसळणारे सांडपाणी इंटरसेप्टर लाईनद्वारे संकलित करुन नजीकच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये त्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे. पवना नदी क्षेत्रात सद्दस्थितीत एकूण २८० द.ल.लि. प्रति दिन क्षमतेचे १२ सांडपाणी प्रक्रीया केंद्र कार्यरत आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत इंद्रायणी नदीच्या पाण्याची गुणवत्ता सुधारण्याकरीता नदी सुधार प्रकल्पाचा आराखडा तयार करणेत आला असून पहिल्या टप्प्यातील नदीच्या कडेने १३.६ कि.मी इंटरसेप्टर लाईनचे काम पुर्ण झाले आहे. नाल्याद्वारे नदीत मिसळणारे सांडपाणी इंटरसेप्टर लाईनद्वारे संकलित करुन नजीकच्या घरगुती सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये त्यावर प्रक्रिया करणेत येणार आहे. इंद्रायणी नदी क्षेत्रात सद्दस्थितीत एकूण ७६ द.ल.लि. प्रति दिन क्षमतेचे ५ सांडपाणी प्रक्रीया केंद्र कार्यरत आहेत. तसेच चिखली येथे ३२ द.ल.लि. प्रति दिन क्षमतेचे ०२ प्रकल्पाचे काम सुरु असून १६० द.ल.लि. प्रति दिन क्षमतेचे ०३ प्रकल्प प्रस्तावित आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा आराखडा अंतिम करण्यात आला असुन सदर प्रकल्पास पर्यावरण नाहरकत दाखला प्राप्त झाला आहे. इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पास अमृत २.० मधून मान्यता मिळालेली असून इंद्रायणी नदीच्या काठावर देहू व आळंदी ही दोन तीर्थक्षेत्र असल्याने इंद्रायणी नदीचे पावित्र्य जपण्यासाठी तसेच नदी प्रदूषण होऊ नये याकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या कामामध्ये अमृत योजना मार्गदर्शनानुसार आवश्यक त्या सुधारणा करुन सुधारित तांत्रिक मान्यतेसह प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या बैठकीत प्रशासकीय मान्यतेकामी सादर करणेत आला आहे. सदर प्रकल्पास केंद्र व राज्य शासनाकडून अमृत २.० योजनेअंतर्गत निधी प्राप्त होताच निविदा कार्यवाही पूर्ण करुन काम करणेत येणार आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पवना, मुळा व इंद्रायणी या नद्यांचे प्रदूषण कमी करणे करीता तसेच नदीत वाढणाऱ्या जलपर्णी वर उपाययोजना करणे करीता महानगरपालिकेमार्फत नदीचे पात्र स्वच्छ ठेवणेकरीता आवश्यक कामे पिंपरी चिंचवड महानगरपालिका मार्फत करणेत येत आहेत. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत महानगरपालिका हद्दीतील नद्या जलपर्णीमुक्त ठेवणेसाठी निविदा काढणेत आली असून सदर निविदेमध्ये नदीमध्ये जलपर्णी होऊ नये असे प्रयोजन असून जलपर्णी दिसल्यास ती तातडीने काढण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. त्यानुषंगाने महानगरपालिका हद्दीतील नद्यांमध्ये कोठेही जलपर्णी होऊ न देणेची दक्षता घेणेत आली आहे. वैद्यकीय विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार आरोग्य विषय कोणतीही तक्रार त्यांच्या कार्यालयात प्राप्त नसल्याचे नमूद केले आहे.

************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्रीमती सरोज बाबुलाल अहिरे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १८१० पुढीलप्रमाणे आहे -**

**"पालघर जिल्हयातील अनेक कंपन्या व आस्थापना MPCB नियमांचे उल्लंघन राजरोसपणे करीत असणे, या बाबत लोकप्रतिनिधींचे सदर विषयाबाबतचे दिनांक. ३/३/२०२५ प्रधानसचिव पर्यावरण विभाग यांना पत्र देणे. यामध्ये छेडा स्पेशालिटी फुडस प्रा.लि. या कंपनी, मे. ब्लुबेरी अॅग्रो प्रॉडक्स प्रा.लि., बिग ब्लॉक बिल्डिंग सोल्युशन प्रा.लि. या कंपन्यांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने चार वेळा प्रदुषणकारी कंपन्याना नोटीस देऊन पण कार्यवाही न होणे, या प्रदुषणामुळे तेथील नागरीकांचे आरोग्य धोक्यात येणे. सदर कंपनीद्वारे प्रदुषणाच्या संदर्भात उपचारित सांडपाणी योग्यप्रकारे नष्ट न करणे व नियमांचे उल्लंघन करणे व अपारदर्शक पध्दतीने कचऱ्याचे व्यवस्थापन व निष्कासन करणे, वायु व जल प्रदुषणाचे नियंत्रण योग्यप्रकारे न करणे. सदर प्रकरणी प्रदूषणकारी कंपन्या व दोषी संबंधित अधिकारी यांचेवर कारवाई करण्याची मागणी व यावर करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.."**

---

**<u>मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे निवेदन</u>**

पालघर जिल्हयातील वाडा तालुक्यात मे. छेडा स्पेशालिटी फुडस प्रा.लि., मे. ब्लुबेरी अॅग्रो प्रॉडक्स प्रा.लि. व बिग ब्लॉक बिल्डिंग सोल्युशन प्रा.लि. हे उद्योग कार्यान्वित आहेत. मे. छेडा स्पेशालिटी फुडस प्रा.लि. हा खाद्य पदार्थ बनविणारा उद्योग आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर उद्योगास संमतीपत्र प्रदान करण्यात आले असून त्याची वैधता ३१.१२.२०३२ पर्यत आहे. सदर उद्योगामार्फत जल प्रदूषण व वायु प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात आली आहे.

मे. छेडा स्पेशालिटी फुडस प्रा.लि. या उद्योगामधून होणाऱ्या प्रदूषणाच्या अनुषंगाने सदस्य, ग्राहक संरक्षण परिषद, पालघर यांनी दि. १३.०८.२०२३ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दि. २२.०८.२०२३ रोजी करण्यात आलेल्या पाहणी दरम्यान आढळलेल्या संमतीपत्रातील अटी व शर्तीतील त्रुटींच्या सदर उद्योगास दि. ३०.१०.२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस व दिनांक १०.११.२०२३ रोजी अंतरिम निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार सदर उद्योगाची रु.५०,०००/- इतक्या रकमेची बँक हमी जप्त करण्यात आली आहे. तद्नंतर सदर उद्योगाबाबत अंभई गावातील रहिवाशांची तक्रार दि. २४.०९.२०२४ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दि. २५.०९.२०२४ रोजी करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान सदर उद्योगामार्फत कोणत्याही प्रकारचे औद्योगिक सांडपाणी किंवा घरगुती सांडपाणी सोडत असल्याचे आढळून आले नाही.

मे. ब्लू बेरी अॅग्रो प्रोडक्ट प्राइवेट लिमिटेड या उद्योगास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संमतीपत्र प्रदान केले असून त्याची वैधता दि. ३१.०१.२०२७ पर्यत आहे. सदर उद्योगामार्फत जल व वायु प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात आली आहे.

सदर उद्योगाबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान संमतीपत्रातील अटी व शर्तीचे तसेच अंतरिम निर्देशांचे उल्लघंन केल्याचे आढळून निदर्शनास आल्याने सदर उद्योगास उत्पादन बंदचे आदेश देण्यात आले होते. तद्नंतर सदर उद्योगाने औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा अद्ययावत केल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उत्पादन पुन्हा सुरु करण्यास परवानगी देण्यात आली होती. सदर उद्योगाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पुन्हा दिनांक २९.०९.२०२४ रोजी

तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने करण्यात आलेल्या पाहणी दरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगास प्रस्तावित निर्देश व वैयक्तिक सुनावणी घेऊन अंतरिम निर्देश देण्यात आले होते. सदर उद्योगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अंतरिम निर्देशाचे पालन न केल्याने पुन्हा सदर उदयोगास उत्पादन बंद करणेबाबतचे आदेश देण्यात आले असून सद्यस्थितील सदर उद्योग बंद आहे.

मे. बिगब्लॉक एलिमेन्टस् प्रायवेट लिमिटेड या उद्योगास ऑटोक्लेव्ह एरिऐटेड कॉंक्रीट ब्लॉकच्या उत्पादनाकरिता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संमतीपत्र प्रदान करण्यात आले आहे.

जल प्रदूषण व हवा प्रदूषणाशी संबंधित प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांना वेळोवेळी भेट देऊन पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान दोषी आढळून आलेल्या व संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन करत असल्यास सदर उद्योगांवर नियमांनुसार वेळोवेळी आवश्यक ती कारवाई करण्यात येते.

जिल्हा आरोग्य अधिकारी, पालघर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार मे. ब्लू बेरी लि. या कंपनीबाबतची तक्रार आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, पालघर व प्राथमिक आरोग्य केंद्र, गोऱ्हे यांचेकडे जुलै, २०२४ मध्ये प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, पालघर यांचेकडून पाहणी करण्यात आली होती. सदर पाहणीदरम्यान उक्त उद्योगातील प्रक्रिया केलेले पाणी हे उघड्यावर किंवा जमिनीत सोडल्यात येत असल्यामुळे सदर परिसरातील पाण्याचे साठे दुषित होत असल्याचे आढळून आले होते. तसेच प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाणी उघडयावर सोडले असल्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढत असून परिणामी किटकजन्य आजार व हवेत दुर्गंधी पसरल्यामुळे परिसरामध्ये श्वसनाचे विकार वाढण्याची शक्यता असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

प्रश्नाधीन विषयाच्या अनुषंगाने मा.लोकप्रतिनिधींचे दिनांक ०४.०३.२०२५ रोजीचे पत्र शासनास प्राप्त झाले असून सदर पत्र जिल्हाधिकारी, पालघर तसेच सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव पाठविण्यात आले आहे.

*********

२०२

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन

श्री. शांताराम मोरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.२०१५ पुढीलप्रमाणे आहे:-

"फेब्रुवारी २०२५च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास मु.पो.-उलवे-कुंडे-वाहळ, ता.-पनवेल, जि.-रायगड येथील सुमारे २० ते २२ स्टोन-क्रशर कंपन्यांना दिनांक १८/११/२४ ते ८/१/२५ याकालावधीमध्ये पर्यावरण नियंत्रण कायदा-१९७४ चे कलम ३१नुसार वायू-प्रदूषण व ३३ ए नुसार पाणी प्रदूषण होत असल्याच्या कारणास्तव काम बंद करण्याच्या देण्यात आलेल्या नोटिसा उघडकीस येणे, नवीन विमानतळ-JNPT-हायवेपासून काही अंतरावर असलेले स्टोन-क्रशर तातडीने बंद करणे आवश्यक असताना या नोटिसा मिळाल्या नंतर ही ते सुरू असणे, २०२० च्या आधी परवानगी मिळालेले डोंगरी-लॉजिस्टिक हे ४०० मीटर, एस.आर.वास्कर, ४०० मीटर, पॉझिटिव्ह एंटरप्राईजेस ९०० मीटर, ऑस्कर-इन्फ्रा ५०० मीटर, म्हात्रे इंटरप्राईजेस ९०० मीटर, स्वस्तिक-इन्फ्रा २०० मीटर, ऑस्कर-इन्फ्रा ५०० मीटर, जे कुमार आय.पी.एल. कानोबा १८०० मीटर,आदेश तुलसीराम १२०० मीटर, कल्याण-एंटरप्राईजेस १२०० मीटर, अशा प्रकारे १किलोमीटर अंतराच्या आतील व बाहेरील स्टोन-क्रशरला देण्यात आलेल्या नोटिसा, तरीही त्यातील डोंगरी-लॉजिस्टिक, व एस.आर.मास्टर हे क्रशर सुरु असणे, त्याचबरोबर एक किलोमीटरच्या आत आहेत परंतु क्रशर बंद करण्याच्या नोटीसा न दिलेले क्रशर, के.एस.ठाकूर इम्युनिटी, गणेशपुरी १ व २, शुभ इन्फ्रा-नेटवर्क, नेटवर्क-एअरपोर्ट, प्रवीण-मनोहर-पाटील, नवकार-स्टोन, हे एअरपोर्ट पासून ५०० ते २०० मीटर अंतरावर असूनसुद्धा त्यांना नोटीस-न-देणे, उलवे-कुरडे-वाहळ,भागातील लाखो नागरिक, अन्य स्टोन क्रेशर मालक, यांच्या मनात पर्यावरण खात्याच्या बेकायदेशीर कामास सहकार्य करीत असल्याबद्दल निर्माण झालेला तीव्र-चीड-व-संताप, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही, उपायोजना व शासनाची प्रतिक्रिया.."

---

**मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) यांचे निवेदन.**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रादेशिक कार्यालय, रायगड यांच्या कार्यक्षेत्रात उप प्रादेशिक कार्यालय, रायगड -१ अंतर्गत मु. पो. उलवे- कुंडेवाहळ, ता. पनवेल हा परिसर येत असून या परिसरात वर्षानुवर्षे दगड खाणी व ७४ खडीक्रशर उद्योग स्थापित आहेत. या परिसरात मुबलक प्रमाणात दगड उपलब्ध असल्याने मुख्यत्वे नवी मुंबई विमानतळाच्या कामासाठी लागणाऱ्या खडी मालासाठी या भागात खडी क्रशर उभारण्यात आले असून सदयस्थितीत नवी मुंबई विमानतळ उभारण्याचे काम प्रगती पथावर आहे. या ठिकाणी खडीक्रशर उभारणी करिता काही जमीन मालकांनी आपल्या स्व: मालकीच्या जमिनी खडीक्रशरला उभारण्याकरीता भाडेतत्वावर दिलेल्या आहेत. तसेच, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे सिडकोमार्फत विकसित होत असल्यामुळे सिडकोच्या मालकीच्या काही जमिनी खडीक्रशर उद्योगांना खडीक्रशर उभारणी व चालु करण्याकरिता दिर्घमुदतीच्या करारावर दिलेल्या आहेत. तसेच, काही जमीनी ह्या प्रकल्पग्रस्त असणाऱ्या स्थानिक अल्पभुधारकांनी उपजिवीकेचे साधन म्हणून खडीक्रशर उभारणीकरीता भाडेतत्वावर दिलेल्या आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने या परिसरातील खडीक्रशरसाठी अटी व शर्ती घालून वेळोवेळी संमतीपत्र प्रदान केलेली आहेत. तसेच, मंडळाकडून सदरील खडी क्रशर उद्योगांची वेळोवेळी पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्याम आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने सदर उद्योगांवर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येते. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे मुंबई व महानगर परिसरातील हवा प्रदूषणासंबंधी दाखल असलेली सुमोटो याचिका क्र.पीआयएल ३/२०२३ च्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कुंडेवहाळ येथील खडीक्रशरची पाहणी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीमार्फत परिसरातील खडीक्रशरची पाहणी करण्यात आली असून पाहणी दरम्यान संमतीपत्रातील अटींचे उल्लंघन करण्यात आलेल्या खडीक्रशर उद्योगांवर कारवाई करण्यात आली. यामध्ये ०३ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस, ०५ उद्योगांना प्रस्तावित निर्देश व ४२ उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून १३ खडीक्रशर उद्योगांची रु.७.०० लक्ष इतकी बँक हमी जप्त करण्यात आलेली आहे.

दि.१८/११/२०२४ ते दि.०८/०१/२०२५ या कालावधीमध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगांची पाहणी करण्यात आली असून पाहणी दरम्यान संमतीपत्रातील अटींचे उल्लंघन करण्यात आलेल्या २२ खडीक्रशर उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आलेले होते. सदरील बंदचे आदेश दिलेल्या उद्योगांमध्ये मे. डोंगरी लॉजिस्टिक, एस.आर. वास्कर, पॉझिटिव्ह एंटरप्राईजेस, ऑस्कर इन्फ्रा, म्हात्रे इंटरप्राईजेस, जे कुमार आय.पी.एल.

कानोबा, आदेश तुलसीराम, कल्याण एंटरप्राइजेस, व मॅवलिन इन्फ्राटेक (नेटवीन) या उद्योगांचा समावेश असून नवकार स्टोन हे खडीक्रशर कायमचे बंद झाले आहे. मे. स्वस्तिक इन्फ्रा उद्योगास सन २०२४ मध्ये उद्योग बंद आदेश, गणेशपुरी २ (टेरेक्स) व शुभ इन्फ्रा या उद्योगांना प्रस्तावित निर्देश देण्यात आले आहेत. गणेशपुरी २ (टेरेक्स) व शुभ इन्फ्रा या खडीक्रशरची प्रस्तावित निर्देशाच्या अनुषंगाने दिलेली अपिलीय मुदत संपली असून सदरील खडी क्रशरांना उदयोग बंद करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. मे. स्वस्तिक इन्फ्रा व मे. ऑस्कर इन्फ्रा या खडीक्रशरची हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणाची पाहणी करुन उत्पादन सुरु करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. मे. एस. आर. वास्कर या खडीक्रशरला १५ दिवसांसाठी हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा दुरुस्त करण्यासाठी विदयुत पुरवठा जोडण्याचे आदेश स्थानिक मे. महाराष्ट्र राज्य विदयूत महामंडळ मर्यादित यांना देण्यात आले होते. सदयस्थितीत मे. एस. आर. वास्कर हे खडीक्रशर बंद असून त्याचा विदयूत पुरवठा दि.१३/०३/२०२५रोजी खंडित करण्यात आला आहे. मे. व्हिडिओकॉन स्टोन क्रशर (मेसर्स इम्युनिटी कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड), मे.इम्युनिटी गौरव बीके (जेव्ही)- (मेसर्स पुझलोना स्टोन क्रशर), (गणेशपुरी-१) या उदयोगांना उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून मे. इम्युनिटी गौरव बीके (जेव्ही)- (मे. टेरेक्स स्टोन क्रशर) या उदयोगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त प्रस्तावित निर्देश बजावण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या आदेशास अनुसरुन मे. महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाने या उद्योगांचा विद्युत पुरवठा खंडीत करणे व पूर्ववत करणेच्या आदेशाचे पालन केले आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने खडीक्रशरच्या स्थळ निश्चितीसाठी मंडळाच्या १२३ च्या बोर्ड मिटिंग दि. ३०/०३/१९९९ ला स्थळ निश्चिती केली. त्यानुसार नजीकच्या लोकवस्तीपासून (कमीत कमी १००० व्यक्ती असणाऱ्या) साधारणत: ५०० मीटर अंतर असणे बंधनकारक होते. तसेच, राष्ट्रीय महामार्गापासून ५०० मीटर व राज्य महामार्गापासून ५०० मीटर अंतर असणे बंधनकारक होते. तदंनतर मंडळाने दि.०९/०६/२००३ रोजी खडीक्रशरच्या स्थळ निश्चितीसाठी सुधारित परिपत्रक प्रसिध्द केले असून त्यानूसार कुठलाही स्टोन क्रशर हा राष्ट्रीय महामार्गापासून ५०० मीटर व राज्य महामार्गापासून २०० मीटर व इतर रस्त्यापासून १०० मीटर अंतरावरती व नजीकच्या लोकवस्तूपासून (कमीत कमी १००० व्यक्ती असणाऱ्या) साधारणत: ५०० मीटर अंतर असणे बंधनकारक होते. तदंनतर मंडळाने दि.०४/०३/२०२० रोजी महाराष्ट्र राज्यातील दगड क्रशर युनिट्ससाठी जागा निकषांमध्ये सुधारणाबाबतचे परिपत्रकानुसार स्टोन क्रशर हा राष्ट्रीय महामार्गापासून १ किलो मीटर, ५०० मीटर राज्य महामार्ग, २०० मीटर जिल्हा रस्ते अंतर असणे बंधनकारक केले. तसेच, दगड क्रशर नजीकच्या लोकवस्तूपासून (कमीत कमी १००० व्यक्ती असणाऱ्या) साधारणत: ५०० मीटर अंतर असणे बंधनकारक आहे. तसेच, यामध्ये ५०० मीटरच्या अंतरात शैक्षणिक संस्था / दवाखाने नसावेत असे नमूद केले असून भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाने घोषित केलेल्या ऐतिहासिक वास्तू पासून ५०० मीटर अंतरामध्ये खडीक्रशर असू नये. सदर निकषामध्ये प्रस्तावित एअरपोर्ट पासून स्टोन क्रशर उभारणीच्या अंतराबाबत उल्लेख नाही.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने जुलै, २०२३ रोजी प्रसिध्द केलेली दगड क्रशर युनिटसाठी पर्यावरणीय मार्गदर्शक तत्त्वे ही मंडळाच्या १८१ च्या बोर्ड मिटिंगमध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये अवलंबन करण्याबाबत मान्य करुन घेण्यात आले. त्यानुसार सदर मार्गदर्शक तत्वांबाबत दि.१०/०१/२०२४ रोजी परिपत्रक प्रसिध्द केले. सदर परिपत्रकानूसार दगडाची वाहतूक करणे, दळने (क्रशिंग), चाळणे, कन्वेयर बेल्ट व साठवणूक याबाबतची मार्गदर्शक सुत्रे दिलेली आहेत.

**************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली आबा कटके, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २३८५ पुढीलप्रमाणे आहे -**

**"रांजणगाव (जि.पुणे) एमआयडीसीतील महाराष्ट्र एनव्हायरो पॉवर कंपनीतून (M.E.P.L.)प्रक्रिया न केलेले घातक रसायनमिश्रित पाणी जलवाहिन्याद्वारे नदी-नाल्यात सोडले जात असणे, यामुळे शिरुर तालुक्यातील अन्नापूर व इतर सात गावातील शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले असणे, तसेच या नागरीकांना कॅन्सरसारख्या दुर्धर आजार होण्याचे प्रमाण वाढणे, तसेच हे दुषित पाणी पिऊन शेतकऱ्यांचे पशुधनास निर्माण झालेला धोका, त्यामुळे या आठही गावातील नागरीकांनी सदरील कंपनीविरोधात वारंवार आंदोलने करावी लागणे, या प्रकरणी मा.पर्यावरण मंत्री, जिल्हाधिकारी,पुणे व तहसिल ऑफिस यांच्याकडे वारंवार तक्रार करण्यात येणे, परंतु कंपनीवर कारवाई करण्यात आलेली नसणे, याउलट एमआयडीसीने संपादित केलेले वाढीव क्षेत्र या कंपनीला देण्यात आलेले असणे, त्यामुळे एमआयडीसीने महाराष्ट्र एनव्हायरो पॉवर कंपनीला दिलेले वाढीव क्षेत्र रद्द करावे असा आठही ग्रामपंचायतीने ठराव पारीत केलेला असणे, सदर कंपनीकडून शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान लक्षात घेता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ देखील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कळविण्यात येणे, परंतु कंपनीने तशी कारवाई अद्याप न करणे, परिणामी एमआयडीसीने दिलेले वाढीव क्षेत्र रद्द करण्याबाबत तसेच शासन तसेच कंपनीविरोधात जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व शासनाची भुमिका.."**

---

<u>मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे निवेदन</u>

रांजणगाव औद्योगिक वसाहतीमध्ये मे. महाराष्ट्र एन्व्हायरो पावर हा सामुहिक घातक घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट व्यवस्थापन केंद्र (CHWTSDF) कार्यरत असून सदर सामुहिक घातक घनकचरा प्रकल्प केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार उभारण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत सदर सामुहिक घातक घनकचरा प्रकल्पात कचऱ्याच्या वर्गीकरणानुसार प्रक्रिया करुन जमिन भरणी (Direct Secured Landfill) केली जाते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगास जमिन भरणी (Direct Secured Landfill), प्रक्रिया करुन जमिन भरणी (Landfill after treatment), भस्मिकरण (Incineration) व ६ मेवॅट विजनिर्मितीसाठी उद्योग उभारण्याबाबतचे संमती पत्र प्रदान करण्यात आले होते. तद्नंतर, सदर प्रकल्पास जमिन भरणी (Direct Secured Landfill) व प्रक्रिया करुन जमिन भरणी (Landfill after treatment) प्रक्रियेसाठी संमती पत्र प्रदान करण्यात आले होते. त्यानुसार, सन-२००७ पासून घातक घनकचऱ्याच्या वर्गीकरणानुसार जमिन भरणी (Direct Secured Landfill) व प्रक्रिया करुन जमिन भरणी (Landfill after treatment) कार्यरत झाले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगास सामुहिक घातक घनकचरा प्रकल्पाचा PGVR (Plasma Gasification and Vitrification Reactor) या तंत्राचा वापर करुन उच्च तापमानावर भस्मिकरण व सह विजनिर्मिती करण्याकरिता सन-२००८ मध्ये संमतीपत्र प्रदान करण्यात आले आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दि. ११/१२/२००८ रोजीच्या सामुहिक घातक घनकचरा प्रकल्पांच्या कार्यक्षेत्राबाबतच्या आदेशान्वये या सामुहिक घातक घनकचरा प्रकल्पामध्ये कोल्हापूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर व नाशिक या मंडळाच्या प्रादेशिक विभागातील उद्योगांमधुन निर्मिती होणारा घातक घनकचरा, पुढील प्रक्रिया व विल्हेवाटीसाठी संकलित केला जातो. सद्यस्थित सदरील सामुहिक घातक घनकचरा प्रकल्पाची सभासद संख्या सुमारे ४५०० आहे. सदर सामुहिक घातक घनकचरा प्रकल्पातून सुमारे २५ घनमीटर प्रति दिन निर्माण होणाऱ्या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सद्यस्थितीत १००

घनमीटर प्रति दिन क्षमतेची प्राथमिक, व्दितीय व तृतीय स्वरुपाची औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा कार्यरत आहे. तथापि, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फ़त करण्यात आलेल्या सर्वेक्षणादरम्यान सदर प्रकल्पाच्या परिसरातून संकलित केलेल्या सांडपाणी तसेच नैसर्गिक ओढा/ नाल्यामधील पाण्याच्या नमुन्यांच्या पृथ:करण अहवालावरुन पाण्याची गुणवत्ता ही संमती पत्रातील विहित मानकापेक्षा जास्त असल्याचे निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडे सदर प्रकल्पामधून प्रक्रिया न केलेले घातक रसायनमिश्रीत पाणी जलवाहिन्याव्दारे नदी नाल्यामध्ये सोडले जात असलेबाबतच्या विविध तक्रारी शिरुर तालुक्यातील अन्नापूर व इतर सात गावातील स्थानिक नागरिकांच्या वतीने प्राप्त झाल्या असून सदर प्रकल्पामुळे शेतजमिनीचे होणारे नुकसान, नागरिकांना कॅन्सरसारख्या दुर्धर आजार होण्याचे प्रमाण वाढणे व दुषित पाणी पिऊन शेतकऱ्यांच्या पशुधनास निर्माण होणारा धोका इ. बाबत सदर कंपनी विरोधात आंदोलने करण्यात आली होती.

सदर प्राप्त तक्रारी व आंदोलने यांची महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून त्वरीत दखल घेऊन प्रकल्प व परिसराची पाहणी करण्यात आली असून पाहणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फ़त मे. महाराष्ट्र एनव्हायरो पॉवर लि. यांना दि. ०८/०८/२०२२ रोजी अंतरीम निर्देश बजावण्यात आले असून दि. २६/०८/२०२४ सदर प्रकल्पाची रु. ५ लाखाची बँक हमी जप्त करण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत दि.२४/०९/२०२४ रोजी मुख्यालय स्तरावर वैयक्तिक सुनावणी घेऊन दि०१/१०/२०२४ रोजी अंतरिम आदेश पारित करण्यात आले आहेत.

मे. महाराष्ट्र एनव्हायरो पॉवर लि. या उद्योगास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सुमारे ६० एकर वाढीव क्षेत्रास देण्यात आलेल्या मंजुरीस होत असलेल्या विरोधाच्या तक्रारींची दखल घेऊन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व स्थानिक नागरीक व संबंधित ग्रामपंचायतींचे प्रतिनिधी यांचे समवेत दि. २६/०८/२०२४ रोजी व दि. ३१/०१/२०२५ रोजी संयुक्त बैठकी घेण्यात आलेल्या आहेत. सदर बैठकांच्या दरम्यान झालेल्या चर्चेबाबतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पुणे यांनी दि.०४/०२/२०२५ रोजी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडे सादर केला आहे.

मे. महाराष्ट्र एन्व्हायरो पॉवर लि. या प्रकल्पाविरुध्द मा. राष्ट्रीय हरित लवाद, पश्चिम विभाग, पुणे यांचेकडे मुळ अर्ज क्र. १४/२०२५ दाखल करण्यात आला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत मे. महाराष्ट्र एन्व्हायरो पॉवर लि. या प्रकल्पाची वेळोवेळी पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४, हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ तसेच घातक आणि इतर कचरा (व्यवस्थापन आणि सीमापलिकडील संचलन) दुरुस्तीचे नियम, २०१६ मधील तरतुदींनुसार वेळोवेळी कारवाई करण्यात आली आहे.

***********

# लक्षवेधी सूचना
## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे प्रथम अधिवेशन

**श्री. रवी राणा, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६०९ पुढीलप्रमाणे आहे:-**

"अमरावती जिल्ह्यातील श्री, सूर्यवंशी वाल्मिकी मठ संस्थान ( ब वर्ग तिर्थक्षेत्र) सामदा काशीपुर व श्री भोगेश्वर महाराज संस्थान (क वर्ग तीर्थक्षेत्र) सासन रामापूर दोन्ही तालुका दर्यापूर या संस्थांच्या आवारात अद्ययावत प्रगत तंत्रज्ञान आधारे विकसित सौर ऊर्जेचे लाईट बसविण्यात यावा या संबंधाने लोकप्रतिनिधी यांचे लेखी पत्र मागणीप्रमाणे जिल्हा नियोजन अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती, यांनी त्यांचे पत्र क्रमांक ३४९/२०२५ दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ रोजी कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग, जी. प. अमरावती यांना पत्र पाठवले असणे, परंतु विषय मेडा या यंत्रणेकडे येत असून त्यांच्याकडून वरील काम होणे अपेक्षित आहे या संबंधाने शासनाने वेळीच लक्ष घालून त्यासंबंधाने शासनस्तरावरून आदेश देण्याची आवश्यकता व काम होईल या संबंधाने कार्यवाही करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

## मा. मंत्री (अपारंपरिक ऊर्जा यांचे निवेदन)

अमरावती जिल्ह्यातील श्री सूर्यवंशी वाल्मिकी मठ संस्थान (ब वर्ग तिर्थक्षेत्र) सामदा काशीपुर व श्री भोगेश्वर महाराज संस्थान (क वर्ग तीर्थक्षेत्र) सासन रामापूर दोन्ही तालुका दर्यापूर या संस्थांच्या आवारात अद्ययावत प्रगत तंत्रज्ञान आधारे विकसित सौर ऊर्जेचे लाईट बसविणेबाबतचे निवेदन मा. लोकप्रतिनिधी यांच्याकडून दि.१३.०३.२०२५ रोजी महाऊर्जा विभागीय कार्यालय, अमरावती कार्यालयास प्राप्त झाले आहे. त्यानुषंगाने महाऊर्जा विभागीय कार्यालय, अमरावती कार्यालयाव्दारे प्रस्तावित प्रकल्प स्थळांचे सर्वेक्षण करून अमरावती जिल्ह्यातील सदर दोन्ही प्रकल्पाचे रु. १७,०५,९९९ इतक्या रकमेचे अंदाजपत्रके तांत्रिक मान्यतेसह जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, अमरावती यांना दि. १८.०३.२०२५ रोजी सादर करण्यात आले.

जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांनी रू.१७,०५,९९९ इतक्या रक्कमेच्या प्रकल्पास दि.२०.०३.२०२५ रोजी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करुन महाऊर्जा, विभागीय कार्यालय, अमरावती यांना निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

यानुषंगाने महाऊर्जा विभागीय कार्यालय, अमरावती यांचेकडून प्रकल्प अंमलबजावणीबाबत पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

***********************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सुचना क्र.४८२

**श्री.अनंत (बाळा) नर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.४८२ पुढीलप्रमाणे आहे :-**

"जोगेश्वरी पूर्व विधानसभा कार्यक्षेत्रातील आरे मध्ये २७ आदिवासी पाडे असून हे आदिवासी पाडे वीज, पाणी, आदि मुलभूत सोयी-सुविधांपासून वंचित असणे, या भागात शासनाचे कोणतेही अदयावत रुग्णालय नसल्याने ब-याचदा सर्पदंश, अपघात अशा घटना झाल्यास उपचार तात्काळ न मिळाल्यामुळे मृत्यूला सामोरे जावे लागणे, सध्या असलेले वैद्यकीय रुग्णालयात अपु-या सुविधा असणे, तसेच सदरहू भाग हा वन विभागात मोडत असल्याने बिगर आदिवासी बांधवांना घर दुरुस्तीची परवानगी मिळत नसणे, या आदिवासी पाड्यांमध्ये हॉस्पिटल नाही, अंतर्गत रस्त्यांची दूरवस्था झालेली असणे, वाहतूक कोंडी आदि समस्यामुळे हे पाडे विकासापासून वंचित राहिलेले असणे, आदि वासी पाड्यांच्या विकासाबाबत अनेक वेळा या सभागृहात चर्चा होऊनही शासन गंभीर नसणे, देशाला स्वातंत्र मिळून ७८ वर्ष झाली पण आजही आदिवासी पाडे मुलभूत सोयी-सुविधापासून वचित असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, आदिवासी चे जीवनमान उंचविण्याकरिता आदिवासी पाड्यांचा विकासाकडे लक्ष देण्याची आवश्यकता, याकरिता भरीव निधी तरतूदीची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

---

## मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

आरे वसाहतीमधील २७ आदिवासी पाड्यांना मुलभूत पायाभूत सोयी सुविधांच्या दुरुस्तीचे कामे जसे पायावाटा, गटारे, शौचालय, पाणी, शाळा इ. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान इको सेन्सीटीव्ह झोन सनियंत्रण समितीच्या 'ना हरकत" प्रमाणपत्रासह मुख्य कार्यकारी अधिकारी (आरे दुग्ध वसाहत) यांचे ना हरकत प्रमाणपत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येतात. तसेच महानगरपालिकेकडून युनिट क्र.१६, आरे दुग्ध वसाहत येथे मनपा शाळा कार्यान्वीत आहे. जलकामे खात्यामार्फत पाणीपुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेतर्फे शोषण टाकी बांधणे, उदंचन केंद्रांची

उभारणी करणे व जल वाहिन्या टाकणे इ. कामे करण्यात आली आहेत. सदर २७ आदिवासी पाड्यांना जलजोडण्या देऊन सद्यस्थितीत सुरळीत पाणी पुरवठा होत आहे. सदर क्षेत्रामध्ये घर दुरुस्ती परवानगी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून देण्यात येत नाही.

सदर क्षेत्रामध्ये आरोग्य खात्यामार्फत लसीकरण मोहीम, प्रसुतीमाता नोंदणी, बाह्यरुग्ण तपासणी, पॉप्युलेशन बेस सर्व्हे (हायपर टेंशन रुग्णांसाठी), कुटूंब नियोजन इ. सुविधा देण्यात येत आहेत. आरे वसाहती जवळच हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर महापालिका रुग्णालय असुन आपत्कालीन स्थितीतील रुग्णांना येथे सेवा देण्यात येते. तसेच आपला दवाखाना अंतर्गत एच.बी.टी दवाखाना युनिट क्र.३० व ३२ येथे सुरु आहे. महानगरपालिकेकडून उपलब्ध निधीतून सदर आदिवासी पाड्यांमध्ये पायवाटा व गटारांची दुरुस्ती करण्यात येते. आदिवासी पाड्यांमधील रस्ते महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेले नसल्यामुळे, सदर परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती महानगरपालिकेच्या रस्ते विभागाकडून केली जात नाही. भविष्यात निधीच्या उपलब्धतेनुसार महानगरपालिकेच्या अखत्यारितील मुलभूत सुविधा पुरविण्यात येत आहे.

****

<u>लक्षवेधी सूचना क्र. २३१६</u>

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**ॲड. राहूल कुल, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २३१६ खालीलप्रमाणे आहे:-**

"दौंड, जि.पुणे येथे बालविकास प्रकल्प-१ अंतर्गत २१७ व प्रकल्प-२ अंतर्गत २१८ अंगणवाडी कार्यरत असणे, त्यामध्ये प्रकल्प १ मध्ये २०४ सेविका, १७३ मदतनीस कार्यरत असणे,मदतनीस पदाच्या १८ रिक्त जागा भरण्यासाठी महिला व बाल विकास विभाग शा.नि. २ फेब्रुवारी २०२३, अन्वये भरती प्रक्रिया राबवली असून, निवड झालेल्या मदतनीस याद्या ०२ सप्टेंबर २०२४, रोजी अंतिम करून उक्त १४ ग्रापंला कळविण्यात आले असणे, याद्या प्रसिद्ध केल्यानंतर उक्त मदतनीस यांना महिला व बाल विकास विभाग दि. ३० जानेवारी २०२५ च्या शा.नि.नुसार नव्याने भरतीप्रक्रिया न राबवता नियुक्ती आदेश देऊन सेवेत रुजू करून घेणे आवश्यक असताना CDPO प्रकल्प १ दौंड, यांनी त्याचपदासाठी नव्याने पदभरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली असणे, याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण जिप पुणे यांची संमती असणे, CDPO बदलीमध्ये गैरव्यवहार प्रकरणी सदर अधिकारी यांची २ वेळा विभागीय आयुक्त यांचेमार्फत चौकशी होऊन त्यात दोषी आढळले असणे, निविदा प्रक्रियेत त्यांनी गैरव्यवहार केल्याचा आरोप त्यांचेवर असणे, वैयक्तिक स्वार्थासाठी वारंवार त्याच चुका करून देखील त्यांना मुदतवाढ दिली असणे, यापूर्वी परीक्षा दिलेल्या व पात्र झालेल्या मदतनीसवर उक्त अधिकाराच्या नवीन भरतीच्या निर्णयामुळे अन्याय झाला असणे, त्यांना मिळणारे मानधन पगार म्हणून मिळण्याची व शासकीय सेवांचा लाभ मिळण्याची अनेक दिवसांची मागणी प्रलंबित असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.."

## मंत्री, महिला व बाल विकास यांचे निवेदन

पुणे जिल्ह्यात दौंड तालुक्यातील बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय दौंड-१ अंतर्गत २१७ अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत. सदर प्रकल्पातील १४ ग्रामपंचायतमधील १८ अंगणवाडी मदतनीस पदाच्या रिक्त जागा भरण्याची कार्यवाही दिनांक १२/०६/२०२४ रोजी सुरू करण्यात आलेली होती. सदर भरती प्रक्रिया दिनांक ३१/०७/२०२४ पर्यंत पूर्ण करण्याबाबत जिल्हा परिषद पुणे मार्फत निर्देश देण्यात आलेले होते. या कालावधीत दौंड-१ प्रकल्पाचा अतिरिक्त कार्यभार बाल विकास प्रकल्प अधिकारी बारामती-१ यांच्याकडे सोपविण्यात आलेला होता. दौंड-१ प्रकल्पामधील १८ रिक्त पदापैकी ४ ठिकाणी आवश्यक तो प्रतिसाद मिळालेला नव्हता. त्यानुषंगाने उर्वरीत १४ रिक्त पदांसाठी गुणवत्ता यादी तयार करण्यात आली. दरम्यान, राज्यातील अंगणवाडी कर्मचा-यांच्या भरती प्रक्रियेस दिनांक १०/०९/२०२४ रोजीच्या आदेशान्वये स्थगिती देण्यात आली होती. सदरहू स्थगिती आदेश दिनांक ३०/०१/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रद्द करून रिक्त पद भरती प्रक्रिया करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

दरम्यानच्या कालावधीत दौंड-१ येथे प्रकल्प कार्यालयाचे मूळ बाल विकास प्रकल्प अधिकारी हजर झाले होते. त्यांनी जुन्या गुणवत्ता यादीवरील ४ हरकती विचारात घेऊन पुन्हा दिनांक ६/०३/२०२५ रोजी सदर १४ जागांसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. शासन निर्णय दिनांक ३०/०१/२०२५ मध्ये गुणवत्ता पडताळणी समितीने अंतिम केलेली यादी प्रकल्प कार्यालयाने प्रसिद्ध केलेली असल्यास अशी प्रकरणे वगळून उर्वरित

टप्प्यावरील भरती प्रक्रिया रद्द करण्यात यावी व नवीन जाहिरात देण्यात यावी असे नमूद आहे. यानुसार यापूर्वीच गुणवत्ता पडताळणी समितीने अंतिम केलेल्या गुणवत्ता यादीनुसारच नियुक्तीची पुढील प्रक्रिया करावी अशा हरकती बाल विकास प्रकल्प अधिकारी दौंड-१ यांचेकडे नोंदविलेल्या होत्या. त्यानुसार बाल विकास प्रकल्प अधिकारी दौंड-१ यांनी प्रसिद्ध केलेली नवीन जाहिरात दिनांक-१३/०३/२०२५ रोजी रद्द केली व यापूर्वी गुणवत्ता पडताळणी समितीने अंतिम केलेल्या गुणवत्ता यादीप्रमाणे १४ अंगणवाडी मदतनीस या पदाचे नियुक्ती आदेश दिनांक १३/०३/२०२५ रोजी निर्गमित केलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून सदर योजनेतंर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची पदे मानधनी तत्वावरील आहेत. त्यानुसार अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना नियमितपणे मानधन अदा करण्यात येते.

**************

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२५ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन**
**लक्षवेधी सूचना क्रमांक २४७२**

**मा. डॉ. किरण लहामटे वि.स.स., यांच्या लक्षवेधी सूचना क्र. २४७२** वरील निवेदन सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री सभागृहासमोर ठेवतील :-

"अकोले तालुक्यातील म्हैसवळण ते देवठाण (जि. अहिल्यानगर) सदरचे काम २ वर्षापूर्वी सुरु होऊन ही आतापर्यंत केवळ २५ टक्के इतकेच काम झालेले असणे, तसेच सदर रस्त्याच्या कामाचा दर्जा अतिशय निकृष्ट व खालावलेला असल्याचे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आलेले असणे, सदर रस्त्याच्या कामाची मुदत संपलेली असतानाही कामाची संथगतीने काम सुरु असून सदर कामाची चौकशी करुन ठेकेंदाराविरुध्द कार्यवाही करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने चौकशी करुन ठेकेदाराविरुध्द शासनाने कारवाई करण्याची गरज व त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

---

**मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन.**

अकोले तालुक्यातील ईगतपुरी नाशिक जिल्हा हद्दी पासून म्हैसवळण घाट- पाडोशी- समशेरपूर ते देवठाण सदर रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग १६ असा असुन त्याची एकुण लांबी ४४.५०० कि.मी. आहे. या रस्त्यावर सद्यस्थितीत एकूण ०७ वेगवेगळी कामे वेगवेगळया साखळी क्रमांकात मंजूर असून त्यात प्रामुख्याने सध्याची ३.७५ मीटर डांबरी पृष्ठभागाची रुंदी वाढवून ५.५० मी इतकी वाढवण्याची बाब मंजुर आहे.

सदर कामांचे कार्यारंभ आदेश मार्च २०२४ पुर्वी देण्यात आले असुन कामांची मुदत सप्टेंबर २०२५ पर्यंत होती. मंजूर कामांपैकी एकुण २६.६०० कि.मी. लांबीत रुंदीकरणासह डांबरीकरण व ९.४०० कि.मी. लांबीत मजबुतीकरणासह डांबरीकरण असे एकुण ३६.०० किमी लांबीचे डांबरीकरण होणार आहे. सद्यस्थितीत एकूण २३.६०० कि.मी. लांबीत रुंदीकरणापर्यंतचे काम पुर्ण झालेले असून ६.८०० कि.मी. लांबीत एम.पी.एम. व २.०० कि.मी. लांबीत बि.एम. ने मजबुतीकरणाचे काम पुर्ण झालेले आहे.

वरील कामांपैकी काही कामांची दक्षता व गुणवत्ता नियंत्रण मंडळ, नाशिक यांनी पाहणी केलेली असुन व उर्वरीत कामांची सुध्दा दक्षता व गुण नियंत्रण मंडळाकडून पाहणी करण्यात येणार आहे. तसेच निविदाशर्तीप्रमाणे कामाची प्रगती न राखल्याने कंत्राटदारांवर दंडात्मक कार्यवाही करण्याचे सुध्दा प्रस्तावित आहे.

---

महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

" राज्यातील शेतकऱ्यांवर जंगली प्राण्यांनी शेती पिके खावुन पिके उधवस्त होण्याचे नविन संकट ओढायलेले असणे, जंगलाच्या शेजारी व दूर असलेल्या शेतकऱ्यांनासुध्दा ही समस्या भेडसावत असणे, कष्ट करून पिकवलेले शेत जंगली प्राण्यांनी खावून टाकल्यामुळे त्यांची खुप मोठी हाणी होत असणे, एखाद्या शेतकऱ्याने कुंपन करावयाचे ठरविल्यास त्याला त्याच्या शेताचे चारही बाजुनी कुंपन करावे लागते व त्याचा प्रचंड खर्च शेतकऱ्याला सोसवत नसणे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेताचा समुह/किंवा गट तयार करून त्या गटाला बाहेरील सिमेवरून कुंपन घातल्यास कमी खर्चात शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांना सुरक्षा मिळू शकते, ६०-४० या सुत्राने म्हणजेच ६०% अनुदान जिल्हा नियोजन योजने मधून किंवा शासनाकडून व ४०% खर्च स्वत: शेतकऱ्याचा या पध्दतीने आर्थिक नियोजन करून शेतकऱ्यांच्या शेतास शासनामार्फत कुंपन करून देता येईल. या पध्दतीने पालकमंत्री बळीराजा शेतजमीन फेन्सींग योजना चांगल्या प्रकारे राबविल्या जावू शकते, या योजनेत शेतकऱ्यांचा गट केल्यामुळे प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेताच्या चारही बाजुला कुंपन करण्याची गरज भासणार नसून संपूर्ण गटांच्या बाहेरील सिमेवरून कुंपन घालण्यात येणार असणे, उन्हाळी हंगामात जंगला पासून खुप दूर पर्यंत जंगली प्राणी येत असल्यामुळे ही योजना सर्व शेतकऱ्यांसाठी राबविणे आवश्यक असणे, त्यामुळे सदरहू योजना तात्कळ राबविण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

-------------------

**श्री. गणेश नाईक** | **मा. मंत्री (वने)**

## निवेदन

वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीपोटी नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही अधिक प्रभावीपणे पार पाडण्याकरीता महाराष्ट्र वन्यप्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान याकरीता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ दिनांक ३०.०१.२०२४ पासून अस्तित्वात आला असून त्यातील तरतुदींनुसार आवश्यक कार्यवाही करुन संबंधितास नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

वनालगतच्या गावांमध्ये वन्यप्राण्यांकडून शेतपिकाचे नुकसान टाळण्यासाठी व्याघ्र प्रकल्पांच्या बफर क्षेत्रात तसेच अभयारण्ये/राष्ट्रीय उद्याने यांच्या सीमेपासून ५ कि.मी. संवेदनशील असलेल्या गावांमध्ये उपाययोजना करण्याच्या दृष्टीने महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक ०४.०८.२०१५ अन्वये डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना राबविण्याचा निर्णय शासनामार्फत घेण्यात आला होता. सदर योजना ग्राम परिस्थितीकीय विकास समिती/संयुक्त वन व्यवस्थापन समिती किंवा समिती अस्तित्वात नसल्यास नव्याने ग्राम परिस्थितीकीय विकास समिती गठीत करुन त्यांचेमार्फत राबविण्यात येते. व्याघ्र प्रकल्पांच्या बफर क्षेत्राच्या सीमेवरील तसेच राष्ट्रीय उद्यान/अभयारण्याच्या सीमेवरील अल्प भूधारक शेतकऱ्यांची प्राधान्याने सदर योजने अंतर्गत निवड करण्यात येत असते.

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेंतर्गत वाघ आणि बिबट ह्यांच्या प्रादुर्भावामुळे वनालगत असलेल्या गावांमध्ये अलिकडे वारंवार होत असलेल्या मनुष्यहानी आणि वाढणाऱ्या पिक नुकसानीच्या घटना लक्षात घेता, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेची व्याप्ती वाढवून वनालगतच्या काही गावातील वन सीमेवर साखळी जाळीचे कुंपन घालण्याबाबत शासन निर्णय क्र.डब्ल्युएलपी-०५.१७/प्र.क्र.९७/फ-१, दिनांक २१.०३.२०१८ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यात सौर ऊर्जा कुंपणाकरीता अर्ज केलेल्यांपैकी ३०५४७ लाभार्थींना शासनाची पुर्व मंजूरी प्रदान करण्यात आली असून, त्यापैकी प्रत्यक्षात कुंपण लावलेल्या १२७४१ लाभार्थींना अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे.

व्याघ्र प्रकल्पांच्या बफर क्षेत्रात तसेच अभयारण्ये/राष्ट्रीय उद्याने यांच्या सीमेपासून ५ कि.मी. संवेदनशील असलेल्या गावांव्यतिरिक्त इतर गावांमध्ये सदर योजना राबवावयाची असल्यास त्यास शासनस्तरावर विशेष मंजुरी प्रदान करण्यात येते.

---

लक्षवेधी सूचना क्रमांक १२४१

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. अभिमन्यु पवार, वि.स.स. यांनी दिलेली महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १२४१ सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्य शासनाच्या वतीने रेशीम उद्योग योजना हि वस्त्रउद्योग विभागामार्फत राबविली जात असणे, सदरील विभागाकडे अत्यल्प मनुष्यबळ असल्याने सदरील योजना सक्षमपणे राबविली जात नसणे, रेशीम विभागाचे कार्यालय जिल्हा स्तरावर असल्याने आणि अत्यंत कमी अधिकारी कर्मचारी असल्याने ग्राम पातळीपर्यंत तांत्रिक मार्गदर्शन मिळत नसल्याने लागवड करण्याची भावना असतानाही शेतकरी योजनेचा लाभ घेत नसणे, रेशीम विभाग हा कृषी विभागाकडे वर्ग करण्याबाबत रेशीम संचालनालय नागपूर यांनी कृषी विभागास प्रस्ताव सादर केला असणे, त्याबाबत कोणतीही कार्यवाही कृषी विभागामार्फत झालेली नसणे, सदरील योजना कृषी विभागामार्फत पोकरा च्या धर्तीवर मनरेगा अंतर्गतच सुरु करावी याबाबत लोकप्रतिनिधी यांची सातत्याने मागणी असतानाही संबधित विभागाचे सचिव यांच्याकडे सातत्याने मागणी करूनही कार्यवाही झालेली नसणे, शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती निर्माण करणारी रेशीम उद्योग योजना कृषी विभागामार्फत सुरु झाली तर ग्रामपातळीवर अधिकारी कर्मचारी यांचे तांत्रिक मार्गदर्शन शेतकऱ्यांना मिळणार असल्याने व योजना सक्षमपणे राबविली जाणार असल्याने सदरील रेशीम लागवड व कोष उत्पादन हि योजना कृषी विभागामार्फत सुरु करण्याबाबत किंवा कृषी विभागात विलीन करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

## मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे निवेदन

रेशीम उद्योगाच्या सर्वांगिण विकासासाठी उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २७ ऑगस्ट, १९९७ रोजीच्या शासन निर्णयान्वये वस्त्रोद्योग विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली स्वतंत्र रेशीम संचालनालयाची दिनांक ०१ सप्टेंबर, १९९७ पासून स्थापन करण्यात आले आहे. रेशीम संचालनालयाची स्थापना झाल्यानंतर संचालनालयांतर्गत नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, व पुणे असे एकूण ४ प्रादेशिक विभाग करण्यात आले आहेत. राज्यातील हवामान व भौगोलिक परिस्थितीही रेशीम उद्योगास पोषक आहे. रेशीम संचालनालय, नागपूर यांच्यामार्फत राज्यातील २७ जिल्ह्यामध्ये तुती व टसर रेशीम उद्योग राबविण्यात येतो. रेशीम शेतीतून शेतकऱ्यांना हमखास व नियमित उत्पन्नाची शाश्वती असल्याने तसेच ग्रामिण भागातील अर्थकारण बदलण्याची

क्षमतेबरोबर रोजगाराची मोठया प्रमाणात संधी उपलब्ध होत असल्यामुळे शेतकरी रेशीम शेती करण्याकडे आकर्षित होत आहे. सन २०१७ पासून रेशीम शेतीचा प्रचार व प्रसार व्हावा म्हणून दरवर्षी महारेशीम अभियान राबविण्यात येत आहे. त्यास अनुसरुन सन २०२४-२५ मध्ये तुती लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी "महारेशीम अभियान २०२४" कृषि विभाग, पंचायत विभाग व रेशीम विभागास नोंदणीचा लक्षांक देण्यात आला होता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे दिला आहे :-

**महारेशीम अभियान अंतर्गत शेतकरी नोंदणीची आकडेवारी वर्ष २०२४-२५**

| कृषी विभाग | | | | पंचायत विभाग (कृषी) | | | | रेशीम संचालनालय | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नोंदणी लक्षांक | | लक्षांक पुर्तता | | नोंदणी लक्षांक | | लक्षांक पुर्तता | | नोंदणी लक्षांक | | लक्षांक पुर्तता | |
| शेतकरी | एकर | शेतकरी | एकर | शेतकरी | एकर | शेतकरी | एकर | शेतकरी | एकर | शेतकरी | एकर |
| ८९०० | ८९०० | ३८ | ३८ | ८०६५ | ८०६५ | ५६ | ५७ | ८०३५ | ८०३५ | १४९३५ | १६२३६ |

उपरोक्त आकडेवारी लक्षात घेता वस्त्रोद्योग विभागांतर्गत रेशीम संचालनालयामार्फत महारेशीम अभियान कालावधीत विविध विस्तार माध्यमांचा अवलंब करुन मोठया प्रमाणात शेतकऱ्यांची तुती लागवडीकरिता नोंदणी करण्यात आली आहे. रेशीम संचालनालयातील रिक्त पदांची पदभरतीची प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सुरू आहे. तसेच एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत वस्त्रोद्योग आयुक्तालय व रेशीम संचालनालय यांचे एकत्रिकरणाचा निर्णय घेण्यात आला असून याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

राज्यातील रेशीम शेतीचा सर्वसमावेशक विकास व्हावा व रेशीम उद्योगाला राज्याच्या अर्थव्यवस्थेत केंद्रस्थानी आणण्यासाठी एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत अंडीपुंज निर्मिती केंद्र, मुलभूत बियाणे फार्म, विकेंद्रीत प्रशिक्षण संस्था व महाराष्ट्र प्रशिक्षण संस्था, कोष खरेदी विक्री बाजारपेठ, रेशीम सुत विनिमय केंद्र इत्यादी स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याची अंमलबजावणी सुरु आहे. तसेच रेशीम उद्योगाच्या विकासासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनेचा लाभ शेतकऱ्याना व उद्योजकांना देण्यात येत असून त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

१. केंद्र पुरस्कृत (केंद्रीय क्षेत्र) सिल्क समग्र-२ (ISDSI) योजना.
२. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजना.
३. राज्य योजनेंतर्गत रेशीम उद्योगाचा प्रचार व प्रसार कार्यक्रमांतर्गत दरवर्षी महारेशीम अभियान राबविणे.
४. रेशीम शेतीतील लक्षाधिश शेतकऱ्यांना रेशीम रत्न पुरस्कार देवून सन्मामानीत करणे.
५. रेशीम उद्योगाच्या विकासाकरिता पायाभूत सुविधा निर्माण करणे व अस्तित्वातील सुविधांचे बळकटीकरण करणे.

६. राज्य योजनेंतर्गत स्वयंचलीत रिलींग मशिन/ मल्टीएन्ड रिलींग मशिन/व्टीस्टींग युनीटकरिता शेड उभारण्यास अनुदान देणे.

७. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सवलतीच्या दरात अंडीपुंज पुरवठा, तांत्रिक प्रशिक्षण, अभ्यास दौरा, रेशीम कोष व सुत उत्पादनास प्रोत्साहनात्मक अनुदान देणे.

८. राज्यातील तुती व टसर बीज कोष उत्पादक शेतकऱ्यांना केंद्रीय रेशीम मंडळाच्या धर्तीवर बीज कोष खरेदीच्या दरात सुधारणा / वाढ करणे.

राज्यात रेशीम उद्योग हा अपारंपारीक उद्योग असुन पारंपारिक राज्यामध्ये (उदा.कर्नाटक,तामिळनाडु,आंध्रप्रदेश) स्वतंत्र विभाग असून आपल्या राज्यातदेखील रेशीम संचालनालय ही स्वतंत्र यंत्रणा वस्त्रोद्योग विभागांतर्गत कार्यरत आहे. केंद्र शासनाच्या धोरणानुसार वस्त्रोद्योग विभागांतर्गत विविध घटकांचा सर्वसमावेशक व शाश्वत विकासासाठी Farm to Fashion च्या माध्यमातून मुल्य साखळी (Value Chain) निर्माण करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. रेशीम शेतीमध्ये तुती लागवड ते कोष उत्पादन या प्रक्रियेत शेतकऱ्यांचा सहभाग असतो तर कोषोत्तर प्रक्रियेत धागा निर्मिती ते कापड निर्मितीमध्ये विविध घटकांचा मुख्यत: समावेश असतो. रेशीम शेतीमध्ये तुती लागवडीबरोबर त्यावर आधारीत प्रक्रिया उद्योगाच्या विकासासाठी (forward and Backward linkages) साखळी निर्माण करण्यावर केंद्र शासनाच्या मदतीने राज्य शासनाच्या माध्यमातून आवश्यक त्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येत आहे. त्यामुळे रेशीम शेतीतील विविध घटकांना त्याचा मोठया प्रमाणात फायदा होत आहे. तसेच रेशीम शेतीतील संशोधन विकास व प्रशिक्षण याकरिता केंद्रीय रेशीम मंडळ, भारत सरकार यांच्या संस्थेचा मोलाचा वाटा असून या संस्थेतील तंत्रज्ञान व मार्गदर्शनाद्वारे रेशीम शेतीचा विकास करण्यात येत आहे.

रेशीम शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या अर्थसहाय्याने विविध बाबीकरीता भरीव असे अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे. राज्यातील शेतकऱ्यांना उत्पदित केलेल्या कोषांना चांगला दर मिळावा म्हणून शासकीय कोष खरेदी विक्री बाजारपेठा तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून कोष खरेदी विक्री बाजारपेठा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या रेशीम कोषांना खुल्या बाजारपेठेत गेल्या दहा बारा वर्षापासून चांगला दरही मिळत आहे. तसेच तुती बीज कोष व टसर बीज कोष व इतर कोषाच्या खरेदी दरात केंद्रीय रेशीम मंडळाच्या धर्तीवर सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना इतर पिकाच्या तुलनेत आर्थिक फायदा जास्त होत असल्यामुळे रेशीम शेतीकडे शेतकरी मोठया प्रमाणात आकर्षित होत असल्याचे दिसून येत आहे. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र व पश्चिम महाराष्ट्रामध्ये तुती रेशीम व कोष उत्पादनामध्ये सन २०२३-२४ च्या तुलनेत माहे जानेवारी २०२५ अखेर झालेली प्रगती पुढीलप्रमाणे दिली आहे :-

| विभाग | जिल्हयांची संख्या | तुती लागवड | | | | अंडीपुंज पुरवठा | | कोष उत्पादन (मे.टन) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०२३-२४ | | २०२४-२५ (जानेवारी २५ अखेर) | | | | | |
| | | शेतकरी | क्षेत्र (एकर) | शेतकरी | क्षेत्र (एकर) | २०२३-२४ | २०२४-२५ (जाने २५ अखेर) | २०२३-२४ | २०२४-२५ (जानेवारी २५ अखेर) |
| नागपूर | ०६ | ३१३ | ३४३.०० | ६५५ | ७६८.५० | १,०७,८२५ | ८७,९७० | ६६.२०० | ५६.३०० |
| अमरावती | ०५ | १३४७ | १४२३.०० | १९४६ | २,१७८.५० | ५,७४,४०० | ४,७९,२०० | ३९७.१०० | ३०९.७०० |
| छत्रपती संभाजीनगर | ०८ | ७२९५ | ७५४२.५० | ११९०८ | ११,५६५.५० | ३९,९१,६७५ | ३४,१०,६७५ | २७३१.३०० | २३५५.६०० |
| पुणे | ०५ | २६४३ | २७६९.२५ | ४०११ | ४,४७५.५० | १७,५१,९९० | १५,६६,२२५ | १२६८.५०० | १०४२.९०० |
| नाशिक | ०५ | ८६० | ९०७.५० | १४२९ | १,६४४.५० | ६,१७,८५० | ४,४९,४५० | ४०७.२०० | २८५.२०० |
| कोकण | ०७ | ६७ | ७८.०० | १३९ | १५२.०० | ५३,७५० | ४१,७०० | ३२.४०० | ३५.७०० |
| **एकूण** | **३६** | **१२५२५** | **१३०६३.२५** | **१९२८८** | **२०,७८४.५०** | **७०,९७,४९०** | **६०,३५,२२०** | **४९०२.७००** | **४०८५.४००** |

वर तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे सन २०२३-२४ मध्ये १२५२५ शेतकरी १३०६३ एकर तुती लागवड क्षेत्रावर रेशीम शेती करीत होते त्यामध्ये वाढ होवून माहे जानेवारी २०२५ अखेर १९२८८ शेतकऱ्याकडे २०७८४ एकर तुती लागवड क्षेत्रावर रेशीम शेती करण्यात येत आहे. रेशीम संचालनालयामार्फत केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभाविपणे अंमलबजावणी करण्यात येत असून त्याचा लाभ सर्व घटकातील शेतकऱ्यांना होत आहे. तसेच, रेशीम शेतीसाठी पीक कर्ज व कोषोत्तर प्रक्रीया उद्योग वाढीसाठी वित्तीय सहाय्यता करिता मार्गदर्शन करण्यात येत आहे. त्यामुळे राज्यातील तुती लागवडीच्या क्षेत्राबरोबर कोष उत्पादनामध्ये तसेच कोषोत्तर प्रक्रिया उद्योगात वाढ होत आहे. रेशीम शेतीमध्ये तुती लागवड, अंडीपुंज संगोपन व कोष उत्पादन हे कौशल्यावर आधारीत व शास्त्रोक्त पध्दतीने करावे लागत असल्याने तसेच कोषोत्तर प्रक्रीयेच्या माध्यमातून मुल्य साखळी वर्धन (Value Chain) करिता वेगवेगळया यंत्रणाऐवजी एकाच छताखाली सर्वसमावेशक व शाश्वत विकास करणेकरिता वस्त्रोद्योग विभाग सक्षम आहे. त्यामुळे रेशीम संचालनालय कृषी विभागास वर्ग करणे उचित होणार नाही.

*******************

## लक्षवेधी सुचना क्र. १७५३

महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय अधिवेशन)

श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांनी नागपूर-भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द हा शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्प ३७वर्षाचा कालावधी, ३० हजार कोटींचा निधी खर्चुनही अपूर्ण असणे बाबत महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सुचना खालीलप्रमाणे आहे.

"नागपूर-भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द हा शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्प ३७ वर्षाचा कालावधी, ३० हजार कोटींचा निधी खर्चुनही अपूर्ण असणे या प्रकल्पामुळे बाधितांच्या तीन पिढया संपून ते त्यांचे घर, शेती आणि कायम रोजगार गमावून अत्यवस्थ आर्थिक परिस्थितीमध्ये जीवन जगत असणे, या बाधितांच्या पूनर्वसनासाठी झालेले शासननिर्णय समाधानकारक नसणे, योग्य आर्थिक तरतूद व धोरणात्मक बदल करण्यात निकडीची गरज असणे, या बाधितांना ग्रामपंचायत अंतर्गत २६/२/२००९ रोजी १८ वर्षे पूर्ण झालेल्या २११८४ वाढीव कुटूंबांना सुधारीत कृषी मजूरी २९७ प्रती दिवसानुसार थेट आर्थिक लाभ, सुधारित घरबांधणी अनुदान कायम रोजगार निर्मितीसाठी ५ ते २५ लाख रुपयांचा बिनव्याजी कर्जपुरवठा, चार एकर पर्यायी शेतीसाठी लाभ न देता संपूर्ण शेतीस प्रती एकर ८० हजार रुपयांचा लाभ नव्याने बाधित होणा-या ४१ गावांसाठी विशेष पॅकेज देवून आर्थिक मोबदला वाटपाची कारवाई शेती संपादीत बाधितांची संख्या निश्चीत करुन त्यांना योग्य लाभ, ज्या शेतक-यांच्या जमिनीवर बाधित गावांचे पूनर्वसन झाले त्यांना विशेष अनुदानासह आर्थिक लाभ, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र नामांतराची सुलभ प्रक्रिया व प्रकल्पग्रस्तांना शासन सेवेत १५ टक्के आरक्षण येथील प्रकल्पग्रस्त मागणी करीत असुन शासनासोबत संवाद-संघर्ष करीत असतानाही शासन दाखवित असलेली अनास्था परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया."

## मा. मंत्री ( मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

गोसीखुर्द धरणाचे बुडीत क्षेत्रात नागपूर जिल्हयातील ५१ गावे पुर्णतः बाधित (गांवठाण शेती व २८ अंशतः बाधित (फक्त् शेती) होत असून, बाधित क्षेत्रासाठी संपादीत गावांचे निवाडे पारित करुन मोबदला भूधरकांना अदा करण्यात आलेला आहे. गोसीखुर्द प्रकल्पामुळे नागपूर जिल्हयातील ५१ बाधित गावठाणाचे ३६ पर्यायी गावठाणात पुनर्वसन करण्यात येत आहे. ३६ पर्यायी गावठाणापैकी ३५ पर्यायी गावठाणात १८ नागरी सुविधांची कामे पूर्ण झालेली असून, दि. ३०.४.२०१६ ला नागरी सुविधांसह ३४ गावे जिल्हा परिषद, नागपूर यांना हस्तांतरीत करण्यात आली आहेत. उर्वरीत १ गाव मौजा रुयाड येथे १८ नागरी सुविधांचे कामे संपादन संस्थेकडून पूर्ण करण्यात येत आहे. मौजा-रुयाड, ता. कुही, जिल्हा नागपूर या गावातील ७९% घरे प्रकल्पाचे पार्श्वजलामुळे बाधित होत असल्याने, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार पुनर्वसन करणे प्रस्तावित आहे. सदर गावातील ९३ कुटुंबे बाधित होत आहेत. मोजा-रुयाड या गावाचे पुनर्वसन

मौजा-रुयाड येथील उर्वरीत उंचावरील जमिनीवर करण्यात येत आहे. पर्यायी गावठाणाकरीता आवश्यक १३.९८ हे. आर. जमिनीच्या भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली असून, नागरी सुविधांच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर गावठाणात नागरी सुविधांची कामे माहे-जुन-२०२५ पर्यंत पूर्णकरण्याचे नियोजन आहे. बाधित गावठाण मौजा सोनारवाही या गावाचे पुनर्वसन मौजा-चिरव्हा येथेच करण्याचे नियोजित असून, मौजा-सोनारवाही येथील प्रकलग्रस्तांना तहसिलदार कुही यांचे कडुन ईश्वर चिठ्ठीव्दारे भुखंड वाटपाची प्रक्रीयार पुर्ण करण्यात आलेली आहे. मौजा-सोनारवाही येथील १४ प्रकल्पग्रस्त कुटूंबांना पाटबंधारे विभागाचे मौजा-वेलतुर येथील शासकीय वसाहतीत तात्पुरते स्थंलातरीत करण्यात आलेले आहे.

नागपूर जिल्हयातील एकुण बाधित होणा-या ८३४८ कुटुंबापैकी दिनांक १०/०३/२०२५ पावेतो ७५८५ कुटुंबे स्थलांतरीत झालेले असुन, उर्वरीत ७६.३ कुटुंबांची स्थलांतरणाची कार्यवाही सुरु आहे. स्थलांतरीत करावयास शिल्लक ९६३ कुटुंबे हे गोसीखुर्द प्रकल्पाचे पूर्ण संचय पातळी २४५.५० मी. तलांकाचे वरील आहेत.

गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांना शासन निर्णय दिनांक दिनांक १८ जुन २०१३ अन्वये प्रकल्पग्रस्त कुटुंबाना नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कम १८४४४ कुटूंबाना (नागपुर व भंडारा) २.९० लक्ष देण्यात आले आहे. तसेच वाढीव कुटूंबाना सुध्दा शासन निर्णय दिनांक १९/०८/२०१५ नुसार २९३७ कुटूंबाना भुसंपादन अधिकारी यांचे मार्फत रु. २.९० लक्ष देण्यात आलेले आहे. गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांना शासन निर्णय दिनांक १८ जुन २०१३ नुसार वाढीव कुटूंबासाठी घर बांधणी अनुदान रु. ८३५००/- प्रती कुटूंब देण्यात आले आहे. कायम रोजगारासाठी ५ ते २५ लाख बिनव्याजी कर्ज पुरवठा करणे ही पुनर्वसनाशी संबंधीत बाब नसुन केवळ पर्यायी जमिन, भुखंडाचे वाटप करणे , पुनर्वसित गावठाणामध्ये नागरी सुविद्या पुरविणे, पात्र प्रकल्पबाधित व्यक्तीच्या नावे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र निर्गमित करणे इत्यादि पुनर्वसन विषयक बाबीसंबंधी पुनर्वसन अधिनियम,१९९९ मध्ये तरतुद आहे. गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांना शासन निर्णय दिनांक १८ जुन २०१३ नुसार पर्यायी शेत जमीनी ऐवजी रोख रक्कम प्रती हेक्टरी रु. ४ लक्ष दराच्या ५० टक्के या दरानुसार लाभ देण्यात आलेला आहे.

प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांना शासकीय नोकरी मध्ये शासन निर्णयानुसार ५ टक्के आरक्षण असून प्रकल्पग्रस्तांच्या नेमणूका जाहीरात देवून संबंधित पदाच्या नियमानुसार उमेदवाराची पात्रता तपासून व स्पर्धा परीक्षेव्दारे गुणवत्ते नुसार करण्यात येते. शासन निर्णय दिनांक २९/०१/२०२५ नुसार प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र हस्तांतरणाची प्रक्रिया सुलभ करण्यात आलेली आहे. गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांना शासन निर्णय दिनांक १८ जुन २०१३ अन्वये घोषित विशेष आर्थिक पॅकेज नुसार नोकरी ऐवजी एकमुस्त रु. २.९० लक्ष देण्यात आलेले आहेत.

..................................

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**सर्वश्री. विजय वडेट्टीवार, श्री.अस्लम शेख, श्री.मोहन मते, श्री.संजय मेश्राम, श्री.बबनराव यादव (लोणीकर), श्री.अर्जुन खोतकर मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ (३) अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.५८२ पुढीलप्रमाणे आहे:-**

"जालना जिल्हयातील जाफराबाद तालुक्यातील पासोडी शिवारात पुलाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने कंत्राटदाच्यामार्फतीने सुरू असणे, बांधकामासाठी कंत्राटदाराने बाहेरगावातून मजूर आणून त्यांना राहण्यासाठी पुलालगतच टिनपत्र्यांचे शेड उभारले असणे, दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ च्या मध्यरात्री पहाटे ३.३० वाजताच्या सुमारास ओव्हरलोड रेती भरून एक हायड्रोलिक टिप्पर बांधकाम स्थळी येणे, त्याने टीनशेडमध्ये कोण झोपले आहे काय त्याठिकाणी कोणी आहे काय याची शहानिशा न करता टिप्पर चालकाने हायड्रोलिक सुरू करून संपुर्ण रेती टिनशेड लगतच उतरविल्याणे रेतीच्या वजनामुळे शेड कोसळून पाच मजूर जागीच ठार झाल्याची दुर्देवी व संतापजनक घटना २३ फेब्रुवारी २०२५ रोजी निर्देशनास येणे, रेतीच्या वजनामुळे शेड कोसळत असल्याचे दिसताच एक महिला आरडाओरड करणे, मात्र ढिगाऱ्याखाली दबलेल्या मजूरांना वाचविण्याचे प्रयत्न करण्याऐवजी टिप्परचालक घटनास्थळावरून पळून जाणे, रेतीची वाहतुक रात्री करू नये तसेच परवाणगीपेक्षा जास्त रेतीची ओव्हरलोड वाहतुक करू नये असे शासनाचे स्पष्ट धोरण असतांना सुध्दा महसूल, पोलिस व परिवहन विभागातील अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने नियमबाहय रेतीची वाहतूक सुरू असल्याने व पुलाच्या कंत्राटदाराने कामगाराच्या सुरक्षेबाबत कोणतीही काळजी घेतली नसल्यानेच हा अपघात झाला असून या गंभीर प्रकरणीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, नागरिकांत पसरत असलेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण याबाबत तातडीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण विकास संस्था, जालना यांनी जालना जिल्हयातील जाफ्राबाद तालुक्यामधील भारज ते पासोडी रोडवरील पासोडी गावाजवळील पुलाचे काम मे. अनिरुध्द कन्सट्रक्शन सिंगल जिन, स्टेशन रोड, जालना या कंत्राटदारास दिनांक २३.०१.२०२५ रोजीच्या आदेशान्वये दिलेले आहे.

दिनांक २२.०२.२०२५ रोजी सकाळी अंदाजे ०४.०० वाजण्याच्या सुमारास टिप्पर क्रमांक एम एच २१ बी.एच. ८२३२ च्या मालकाने कंत्राटदाराच्या सूचनेनुसार वाळुचा टिप्पर खाली करण्यासाठी पुलाचे बांधकाम चालु असलेल्या साईटवर आणला होता. ज्या ठिकाणी वाळू खाली करण्यात येणार होती, त्यास लागूनच पत्र्याचे शेड होते. पत्र्याच्या शेड मध्ये

एकूण ७ व्यक्ती झोपले होते. त्यापैकी मयत कामगार गणेश काशीनाथ धनवई, रा. गोळेगाव ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर हे सदरील कंत्राटदाराकडे काम करत होते. घटनेच्या ३ दिवस अगोदर मयत कामगाराची पत्नी, मुलगी आणि मुलगा त्यांना भेटण्यासाठी आले होते.

पुलाचे बांधकाम चालु असलेल्या साईटवरील पत्र्याच्या शेडमध्ये झोपलेल्या व्यक्तींपैकी मयत कामगाराच्या पत्नी पहाटे अंघोळीसाठी उठल्या होत्या. त्याचवेळेस त्याचवेळेस वाळूचा टिप्पर चालकाने पत्र्याच्या शेडजवळच वाळू खाली केल्याने शेडमध्ये झोपलेल्या एकूण ५ व्यक्तींचा वाळूच्या ढिगाखाली दबून मृत्यु झाला. तथापि, मयत कामगाराच्या मुलीस कामगाराच्या पत्नी यांनी सुखरुप बाहेर काढले. मयत पावलेल्या वरील ५ व्यक्तीपैकी मयत कामगारास भेटायला आलेल्या मुलाचा देखील मृत्यू झालेला आहे.

सदरील घटनेबाबत पोलीस स्टेशन, जाफ्राबाद येथे दोन टिप्पर मालक आणि मुख्य कंत्राटदार यांचेविरुध्द भारतीय न्यायसंहिता, २०२३ च्या कलम १०५, ३०३ (०२), १२५ (ए) अन्वये दिनांक २२.०२.२०२५ रोजी गुन्हा (एफ.आय.आर. क्रमांक २०६५) दाखल करण्यात आलेला आहे. सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने १) किमान वेतन अधिनियम १९४८, २) वेतन प्रदान अधिनियम १९३६, ३) कंत्राटी कामगार अधिनियम (नियमन व निर्मुलन) १९७०, ४) इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगारांचे नियमन व सेवाशर्ती) १९९६ व इतर लागू असलेल्या कामगार कायद्याअंतर्गत मुख्य मालक व कंत्राटदार यांचे विरुध्द निरिक्षण शेरे पारित केलेले आहेत. याशिवाय दुर्घटनेत मृत्यु झालेल्या कामगारांना नुकसान भरपाई मिळावी म्हणुन मा. नुकसान भरपाई आयुक्त तथा मा. कामगार न्यायालय, जालना येथे त्याबाबत दावा दाखल असून त्यासंदर्भातील पुढील कार्यवाही सुरु आहे.

सदरील दुर्घटनेतील मयत कामगार सुनील समाधान सपकाळ यांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, जालना येथे बांधकाम कामगार म्हणून नोंदणी झालेली असुन त्यांच्या नोंदणीची वैधता २५.०५.२०२५ पर्यंत आहे. त्या अनुषंगाने सदरील कामगाराच्या वारसदारास प्रत्यक्ष भेटून मंडळाकडील योजना क्रमांक एफ-०१ (कामाच्या ठिकाणी नोंदित कामगाराचा मृत्यु झाल्यास वारासदारास रु.५ लक्ष एवढा आर्थिक लाभ) मयत कामगाराच्या वारसदारास मंडळामार्फत देण्यात आलेला आहे.

तसेच सदरील घटनेतील गणेश काशीनाथ धनवई (वय ५० वर्ष), रा.जि.छत्रपती संभाजीनगर, सुपडू मधुकर आहेर (वय ३८ वर्ष), रा.जि.जळगाव व राजेंद्र दगडूबा वाघ (वय ४२ वर्ष), रा.जि.बुलढाणा हे ३ कामगार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, जालना या कार्यालयाअंतर्गत नोंदित नसल्यामुळे त्यांना मंडळाच्या योजनेचा लाभ दिला गेलेला नाही.

*****************************************************************

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. भास्कर भाऊराव जाधव, वि.स.स. श्री. रोहित पवार, वि.स.स. श्री. विजय नामदेवराव वडेट्टीवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र.६४३** पुढीलप्रमाणे आहे :-

"दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ दुपारी २.१५ च्या सुमारास मुंबईतील चिंचपोकळी रेल्वे स्थानकाजवळील संत ज्ञानेश्वर पुलावर ट्रकच्या चाकाखाली येऊन डिलिव्हरी बॉयचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना घडणे, स्वीगी, झोमॅटो, ब्लिंकइट, अमेझोन यासारख्या ॲप्लिकेशनसाठी डिलिव्हरी बॉय म्हणून काम करणाऱ्या डिलिव्हरी बॉयचे अपघात झाल्याच्या घटना वाढत असणे, मोबाइल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक करणारे, फूड डिलिव्हरी करणारे तसेच अशाप्रकारची अनेक कामे करणाऱ्या कामगारांना गिग कामगार म्हणून संबोधले जाणे, महाराष्ट्रात जवळपास ८-१० लाख गिग कामगार असणे, यातील बहुतांश कामगार १८ ते ३५ या वयोगटातील असणे, सदर कामगारांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागणे,सदर व्यवसायात कामगारांना कर्मचारी न समजता "भागीदार" समजले जात असल्याने गिग कामगारांना किमान वेतन कायदा, भविष्य निर्वाह निधी, आरोग्य विमा यांसारख्या सामाजिक सुरक्षेच्या सवलती लागू होत नसणे, तसेच त्यांचे प्रश्न कामगार कायद्याच्या चौकटीबाहेरील ठरणे, सदर कामगारांचा कामाच्या वेळी अपघात झाल्यास त्यांना कंपनीकडून कोणत्याच प्रकारची आर्थिक मदत मिळत नसणे, कामाच्यावेळी गिग कामगारांना अपमानास्पद वागणूक मिळाल्याच्या तसेच त्यांच्यावर हल्ले झाल्याच्या काही घटना राज्यात घडणे, तरी गिग क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांसाठी राजस्थानप्रमाणे महाराष्ट्रातदेखील गिग कामगार नोंदणी व कल्याणकारी कायदा करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

## मा. मंत्री (कामगार) यांचे निवेदन

केंद्र शासनाने सामाजिक सुरक्षा संहिता-२०२० दि.२१.११.२०२५ रोजी लागू केली असून, त्यानूसार सामाजिक सुरक्षा संहिता-२०२० अन्वये झोमॅटो, झेप्टो, स्विगी या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची **"गिग आणि प्लॅटफॉर्म वर्कस"** अशी वर्गवारी केली असून, त्यांच्यासाठी कल्याणकारी मंडळ गठीत करुन, विविध कल्याणकारी योजनांचे लाभ देण्याबाबत राज्यातील गिग क्षेत्रातील कंपन्या तसेच गिग क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींशी चर्चा करून, गिग कामगारांसाठी स्वतंत्र कायदा करण्याच्या प्रारूपावर शासन स्तरावर पुढील कार्यवाही चालू आहे.

सामाजिक सुरक्षा संहिता-२०२० मध्ये "गिग कामगार- म्हणजे पारंपारिक कामगार मालक या नातेसंबंधात न मोडणाऱ्या व्यवसायामध्ये काम करणारे किंवा सहभाग घेणारी व्यक्ती" अशी व्याख्या करण्यात आली आहे. गिग कामगारांचा समावेश हा असंघटीत कामगारांमध्ये होत असल्याने तसेच त्यांचे मालक व कामगार असे संबंध प्रस्थापित होत नसल्याने अशा कामगारांबद्दल कंपनीच्या मागणीनुसार ते स्वेच्छेने त्यांचे दर निश्चित करून काम करीत असतात.

गिग कामगारांच्या कामाच्या स्वरूपानुसार किमान वेतन निश्चित केलेल्या अनुसूचित उद्योगामध्ये त्यांचे काम मोडत असल्यास त्यांना ते वेतन देणे अपेक्षित आहे. असंघटीत गिग कामगारांचे मजूरीचे दर हे पीस रेट प्रमाणे व त्यांच्या कराराप्रमाणे केले जात असल्याने सदर रक्कम ही वेतन या व्याख्येमध्ये आजमितीस मोडत नाही.

केंद्र शासनाने सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० (Social Security Code, २०२०) दि.२९.०९.२०२० रोजी अधिसूचित केली असून, दि.२१.११.२०२५ पासून या संहितेची अंमलबजावणी करण्याबाबत अधिसूचना जारी करण्यात आली आहे. सामाजिक सुरक्षा संहितेच्या कलम ६ (९) मधील तरतुदीनुसार राज्यस्तरावर असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा मंडळ गठीत करण्याची तरतुद करण्यात आली आहे.

सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० चे कलम १०९ (१) आणि कलम १०९ (२) अन्वये केंद्र शासनामार्फत विविध सामाजिक सुरक्षेबाबतच्या योजना अधिसूचित करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे.

सामाजिक सुरक्षा संहितेतील तरतुदींनुसार गीग कामगार देखील असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा मंडळतंर्गत सामाजिक सुरक्षेचा लाभ घेण्यासाठी पात्र असणार आहेत. सद्यस्थितीत सामाजिक सुरक्षा संहितेचे नियम तयार करणे व केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे राज्यातील गीग कामगारांना सामाजिक सुरक्षा योजना उपलब्ध करुन देणेबाबतची पुढील कार्यवाही शासनस्तरावरून करण्यात येत आहे.

--------------

लक्षवेधी सुचना क्र.२२९३

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**श्री.प्रविण दटके, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम- १०५अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २२९३ पुढील प्रमाणे आहे:-**

" माथाडी कामगार कायदा कलम ६(१) नुसार गठित केलेल्या मंडळावर सहाय्यक कामगार आयुक्त कार्यरत असणे, त्यांनी माथाडी कायद्याची प्रामाणिक अंमलबजावणी करणे अपेक्षित असताना सद्यस्थितीत मागील पाच ते सात वर्षापासून सदर सहा. आयुक्त प्रचंड भ्रष्टाचार करीत असल्याचे निदर्शनास येणे, यंत्रणा हाताशी धरून माथाडी कायदा डावलून, नियमबाह्य पध्दतीने कामगार नेमणूक आदेश देत असणे, नोंदणीकृत कंपनीच्या मागणीनुसार पोलीस संरक्षण पत्र देण्याची तरतूद असताना श्री. दिनेश दाभाडे, सहाय्यक कामगार आयुक्त अधिकाराचा गैरवापर करून नोंदणीकृत नसलेल्या कंपन्यांना पोलीस संरक्षण पत्र देत असणे, ९ (इ) नुसार सचिवांना मंडळाचे अधिकार असताना सदर सहा. आयुक्त स्वतःच्या मर्जीने, स्वतःच्या स्वाक्षरीने पोलीस संरक्षण पत्र देत असणे, सन २०१६ ला बनलेल्या कृती आराखड्याचे पालन न करता पोलीस स्टेशन तसेच प्रशासनाला वेठीस धरून मनमानी पध्दतीने काम करीत असणे, कार्यालयात उपस्थित न राहता घरी किंवा हॉटेलमध्ये बसून निर्णय घेत असल्याचे प्रकार निदर्शनास आले असणे, काही घटनांमध्ये खाजगी कंपनीचा मालक म्हणून या अधिकाऱ्याने स्वाक्षरी केली असल्याचे निदर्शनास येणे, माथाडी मंडळामध्ये होत असलेला भ्रष्टाचार थांबविणेकामी सहाय्यक कामगार आयुक्त यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करून त्यांचे व्यवहार आणि त्यांनी नेमणूक आदेश दिलेल्या कंपन्यांची उच्च समितीकडून चौकशी होणेकामी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

## मा. मंत्री (कामगार) यांचे निवेदन

महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, 1969 अन्वये माथाडी कायदयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळाची स्थापना सन १९७० मध्ये करण्यात आलेली आहे.

श्री. दिनेश दाभाडे हे कामगार उप आयुक्त कार्यालय, पालघर येथे सहायक कामगार आयुक्त, पालघर या पदावर कार्यरत होते. तसेच त्यांच्याकडे मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ, कळंबोली या माथाडी मंडळाच्या अध्यक्ष पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. प्रस्तुत प्रकरणी सन २०२५ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात माथाडी कायद्यांतर्गत होणाऱ्या अनियमिततांबाबत चर्चा झालेली असून चर्चेच्या अनुषंगाने श्री. दिनेश दाभाडे, सहा. कामगार आयुक्त यांना सक्तीच्या रजेवर पाठवून या प्रकरणाची विशेष चौकशी पथकाद्वारे चौकशी करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते. त्यास अनुसरून दि.२७.०३.२०२५ च्या आदेशीत पत्रान्वये श्री. दाभाडे, यांना सक्तीच्या रजेवर

पाठविण्यात आले होते. तसेच दि.२७.०३.२०२५ च्या आदेशीत पत्रान्वये विशेष चौकशी पथक स्थापन करून चौकशी प्रस्तावित केली होती.

तद्नंतर चौकशी पथकाने शासनास सादर केलेल्या अहवालामध्ये समितीस आढळून आलेल्या अनियमितता लक्षात घेता श्री. दिनेश दाभाडे यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम क्रमांक ४ च्या पोटनियम १(अ) मधील तरतूदीनुसार शासनाच्या दि.०७.०८.२०२५ रोजीच्या ज्ञापनाद्वारे निलंबित करण्यात आले होते. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम क्रमांक-४ च्या पोटनियम (५) च्या खंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून श्री. दिनेश दाभाडे यांचे शासनाच्या दि.२८.१०.२०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबन रद्द करण्यात येवून त्यांना सेवेत पुन:स्थापित करण्यात आले आहे व त्यांची पदस्थापना सहायक कामगार आयुक्त, पालघर या पदावर करण्यात आली आहे.

तसेच श्री. दिनेश दाभाडे यांच्याविरूध्द आढळून आलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम क्र.८ नुसार चौकशी करण्याच्या अनुषंगाने त्यांच्या विरूध्द शासनाच्या दि.१७.१०.२०२५ रोजीच्या आदेशान्वये दोषारोप पत्र बजविण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरू आहे. तसेच याप्रकरणी विशेष चौकशी पथकाने सुचविलेल्या उपाययोजना, प्राप्त झालेली निवेदने यांच्या अनुषंगाने योग्य अशी मार्गदर्शक तत्वे तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

********************************

लक्षवेधी सूचना क्र.८८९

२७८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

**सर्वश्री. योगेश सागर, अतुल भातखळकर, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, अमीन पटेल, नानाभाऊ पटोले, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. साजिद पठाण, सुरेश धस,. भास्कर जाधव, मोहन मते, संजय मेश्राम, वरुण सरदेसाई, अजय चौधरी, हारुन खान, सुनिल प्रभू वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ८८९ पुढील प्रमाणे आहे:-**

"न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मुंबईतील प्रभादेवी व गोरेगाव शाखांमध्ये सुमारे १२२ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेच्या २२ शाखा असून बँकेत ठेवीदारांच्या २४३६ कोटींच्या ठेवी असणे, या बँकेने बनावट कर्जदारांना कोटयावधी रुपयांचे दिलेले कर्ज वसूल न झाल्याने सन २०२२-२३ च्या आर्थिक वर्षात ३० कोटी ७४ हजार व सन २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात २२ कोटी ७८ लाख तोट्याचा ताळेबंद रिझर्व्ह बँकेला सादर केला असणे, सलग २ वर्षे मोठ्या प्रमाणावर तोटा झाल्याची गंभीर दखल घेऊन भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ च्या कलम ३४ अे नुसार कारवाई करुन बँकेवर ६ महिन्यांसाठी निर्बंध लादलेले असणे, विश्वासार्ह सहकारी बँक म्हणून अनेक मध्यमवर्गीयांनी सदर बँकेत लाखो रुपयांच्या ठेवी ठेवलेल्या असणे, पैसे काढण्यासाठी ग्राहकांनी बँकेबाहेर गर्दी करणे, परंतु ग्राहकांना बँकेतून पैसे काढू देण्यात न येणे, परिणामी त्यांच्यात पसरलेले भितीचे व तीव्र असंतोषाचे वातावरण, गेल्या ५ वर्षामध्ये राज्यात ६० नागरी सहकारी बँका नामशेष झाल्याचे निदर्शनास आल्याने शासनाने सदर गैरव्यवहाराची तातडीने पारदर्शक चौकशी करुन दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यासह सदर बँकेत ठेवी असलेल्या ग्राहकांना त्यांचे पैसे त्वरीत मिळवून देण्याची आवश्यकता, यासंदर्भात शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.."

---

## मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन-

न्यु इंडिया को-ऑप बँक लि., मुंबई ही बँक बहुराज्यीय सहकारी अधिनियम २००२ अन्वये नोंदणीकृत नागरी सहकारी बँक असुन सदर बँकेचे नियंत्रण केंद्रिय निबंधक सहकार विभाग, नवी दिल्ली यांच्याकडे आहे. बहुराज्यीय संस्थांबाबत बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम २००२ अन्वये कामकाज चालत असून, बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम २००२ चे कलम ८४ (४) अन्वये लवाद नियुक्ती करण्याव्यतिरिक्त इतर कोणतेही वैधानिक अधिकार राज्य शासनास नाहीत. बँकेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र व गुजरात या राज्यात असुन बँकेच्या एकुण शाखा २८ आहेत.

भारतीय रिझर्व्ह बँकेने केलेल्या तपासणीमध्ये या बँकेचा कमी झालेला सीआरएआर, बँकेला होत असलेला सततचा तोटा तसेच बँकीग अधिनियम १९४९ अन्वये सादर करावयाच्या माहितीमध्ये तफावत आढळल्याने रिझर्व्ह बँकेने सदर बँकेस अचानक भेट देऊन तपासणी केली असता बँकेच्या रोख शिल्लकेमध्ये रुपये १२२.२८ कोटी रुपये कमी आढळुन आले. बँकीग रेग्युलेशन नियमन अधिनियम, १९४९ अन्वये सादर करावयाच्या माहितीमध्ये तफावत आढळल्याने भारतीय रिझर्व्ह बँकेने सदर बँकेची तपासणी केली असता बँकेच्या रोख शिल्लकेमध्ये रुपये १२२.२८ कोटी रुपये कमी आढळून आले. बँकीग नियमन अधिनियम, १९४९ च्या तरतूदी अंतर्गत दाखल करावयाची विवरणपत्रे प्रस्तुत बँकेने चुकीची व दिशाभूल करणारी दाखल केल्यामुळे तसेच सीआरएआर नियमानुसार न राखल्यामुळे व ठेवीमध्ये घसरण व शिल्लक रकमेचा अपहार निदर्शनास आल्यामुळे भारतीय रिझर्व्ह बँकेने दि. १३.०२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये बँकीग नियमन अधिनियम, १९४९ च्या कलम ३६अअअ अन्वये बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून दि. १४.०२.२०२५ पासुन १ वर्षाच्या कालावधीसाठी प्रशासकीय मंडळ नेमण्यात आले आहे. बँकेतील रोख रकमेच्या रु. १२२.० कोटी रकमेच्या अपहाराबाबत दादर पोलीस स्टेशन येथे क्र. ००६८/२०२५ दिनांक १५.०२.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| अ.क्र. | न्यु इंडिया को-ऑप बँक लि., मुंबई<br>दि.११.०२.२०२५ रोजीची आर्थीक स्थिती | |
|---|---|---|
| १ | ठेवी | २४६१.१० कोटी |
| २ | कर्जवाटप | ११७७.९९ कोटी |
| ३ | ढोबळ एनपीए | ७.४३ टक्के |
| ४ | निव्वळ एनपीए | ५.४९ टक्के |
| ५ | संचित तोटा | २८.९७ कोटी |
| ६ | सीआरएआर | (-)१.६० टक्के |

बँकेची आर्थिक परिस्थिती पाहता दि. २४.०२.२०२५ पासुन बँकेच्या ठेवीदारांना फक्त रु. २५,०००/- फक्त काढण्याची परवानगी देण्यात आली असून त्यानुसार आतापर्यंत एकुण ३०,१३८ ठेवीदारांना रु. ५६.५१ कोटी वाटप करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र राज्यातील एकुण २३ सहकारी बँकाचा व्यवसाय परवाना मागील ५ वर्षामध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेने रद्द केला असून सदर बँका अवसायनात घेण्यात आल्या आहेत. सदर अवसायनात घेतलेल्या बँकांनी १३,४८,९६७ ठेवीदारांना DICGC या संस्थेकडून प्राप्त झालेल्या रु.३९४६.४४ कोटी इतक्या रक्कमेच्या ठेवी अदा केल्या आहेत. सहकारी बँकेमध्ये काही गैरव्यवहार झाला असल्यास, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ मधील तरतूदींनुसार कलम ८३ व कलम ८८ अन्वये चौकशी तसेच कलम ८१ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही संबंधित बँकांवर करण्यात येते. अवसायनातील ज्या बँकांची कलम ८८ अन्वये कार्यवाही पुर्ण झाली आहे, अशा प्रकरणात कलम ९८ (ब) अन्वये वसूली प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले असून, सर्व संबंधित संचालक/जबाबदार व्यक्तिंकडून वसुलीची कारवाई सुरु आहे.

तसेच आर्थिक अडचणीमध्ये (SAF) असणा-या नागरी सहकारी बँका बंद पडू नयेत या करीता सहकार आयुक्त कार्यालयाकडून विशेष लक्ष देण्यात येत असून, भारतीय रिझर्व्ह बँकेसोबत चर्चा करुन, आर्थिक अडचणीमध्ये (SAF) असलेल्या बँकांकरीता करावयाच्या उपाययोजनांबाबत कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर कृती आराखडयाची अंमलबजावणी करण्याकरीता अशा बँकांवर पालक अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पालक अधिका-यांच्या कामकाजाबाबत सहकार विभागाच्या स्तरावर मासिक बैठक घेवून अशा बँकांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात येतो. त्याचप्रमाणे अशा बँकांकरीता जिल्हा स्तरावर व विभाग स्तरावर प्रशिक्षणसुध्दा आयोजित करण्यात येते.

सहकार आयुक्त कार्यालयाकडून वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचे फलस्वरुप, अडचणीतील बँकांची आर्थिक स्थिती सुधारली असून, आजअखेर एकुण २२५ आर्थिक अडचणीतील (SAF) बँकांपैकी ५५ बँकांवरील SAF निर्बंध भारतीय रिझर्व्ह बँकेने मागे घेतले आहेत. उर्वरित आर्थिक अडचणीतील (SAF) बँका बाहेर येण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत असून सदर बँका लवकरच आर्थिक अडचणीतुन बाहेर येतील असा विभागास विश्वास आहे.

***************

लक्षवेधी सूचना क्र. २१३१

२७९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

**श्री. मोहन मते वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. २१३१ पुढील प्रमाणे आहे:-**

"राज्य शासन एकीकडे खासगी सावकारीचा बीमोड करीत असल्याच्या वल्गना करीत असतानाच मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या ठाण्यातील विश्वकर्मा अपार्टमेंट, लोकमान्यनगर (पाडा क्र. ४) येथे वास्तव्य करणारा आर्यन गुप्ता हा इसम गरजू गरीब लोकांना बेकायदेशीररित्या कर्ज पुरवून त्यावर अव्वाच्या सव्वा व्याज आकारणी करून सर्वसामान्यांची लुबाडणूक करीत असल्याची गंभीर बाब दि.९ मार्च, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, कर्ज पुरवठा करताना त्याच्याकडून गरजवंतांचे दागिने आणि मालमत्ता तारण म्हणून ठेवण्यात येणे, तसेच कर्जदारांच्या घरांचे आणि मालमत्तांचे खरेदीखत करून घेण्यात येणे, कर्जदाराने घेतलेल्या रकमेवर त्याच्याकडून आकरण्यात येत असलेले अवाजवी व्याज, जेणेकरून सर्वसामान्य कर्जदारास कर्ज परतफेड करण्यात येत असलेले अपयश, त्यामुळे कर्जाची परतफेड न करणाऱ्या अनेक लोकांच्या मालमत्ता बेकायदेशीरपणे गिळंकृत करण्यात येणे, त्याने कर्ज वसूलीसाठी नेमलेल्या स्थानिक श्री. शंकर पवार व श्री. आप्पा ढवण या इसमांकडून स्थानिक पोलिसांशी घनिष्ठ संबंध असल्याची बतावणी करून पैसे वसूलीसाठी कर्जदारांचा करण्यात येत असलेला मानसिक छळ, यास्तव सदर प्रकरणी सखोल चौकशी करून अवैध सावकारी करून सर्वसामान्य गरीब कर्जदारांच्या गिळंकृत केलेल्या मालमत्ता पुनश्च त्यांच्या स्वाधीन करण्याबाबत, तसेच खुलेआमपणे बेकायदा सावकारी व्यवसाय करणाऱ्या संबंधितांविरुद्ध तातडीने कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"-

**मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन-**

सावकाराकडून होणा-या कर्जदार शेतक-यांच्या पिळवणूकीस प्रभावीपणे प्रतिबंध करण्यासाठी समूचित व कठोर उपाययोजना करण्यासाठी तसेच राज्यात सावकारीच्या व्यवहाराचे नियमन व नियंत्रण करण्यासाठी दि.०४/०४/२०१४ पासून महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ लागू करण्यात आलेला आहे.

राज्यात सावकारी कायदा अंमलात आल्यापासून अवैध सावकारी बाबत सहकार विभागाकडे एकूण १०,२०० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. एकूण १०५४ प्रकरणांमध्ये महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधिल कलम १८(२) अन्वये आदेश पारित करुन संबंधित शेतक-यांना ७९२.१५ हेक्टर जमीन परत करण्यात आली आहे. तसेच एकूण ५०७ प्रकरणात गुन्हे दाखल केले आहेत.

तथापि आर्यन गुप्ता हे बेकायदेशीर सावकारी करीत असल्याबाबत सहकार आयुक्त कार्यालय तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे अथवा उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे शहर कार्यालयास अद्याप कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतुदीनुसार सदर प्रकरणी तात्काळ चौकशी करुन योग्य ती कायदेशीर कारवाई जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तसेच उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे शहर यांना निर्देश देण्यात आले आहेत.

***************

लक्षवेधी सूचना क्रमांक ३९९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. राजेश उत्तमराव विटेकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ३९९ पुढीलप्रमाणे आहे:-

"परभणी जिल्ह्यातील पाथरी-पोखरणी, पात्री-मानवत, परभणी-गंगाखेड या रस्त्यावर दर दिवशी मोठे अपघात होत असल्याने ट्रामा केअर सेंटर ची अत्यंत गरज असल्याचे निदर्शनास येणे, सदरील रस्त्यावर आजपर्यंत जवळपास ३०० पेक्षा जास्तीचे अपघात व ५० होऊन अधिक मृत्यू झाल्याचे दिसून येणे, मानवत व दैठना तेथे ट्रामा केअर सेंटर उभारणी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जानेवारी, फेब्रुवारी २०२५ दरम्यान माननीय आरोग्य मंत्री महोदय यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी करणे, पात्री व सोनपेठ येथे ग्रामीण रुग्णालयाची दर्जेवाढ करून अपघातग्रस्तांना पुरेशी मदत मिळण्यासाठीची गरज आरोग्य मंत्री महोदय यांच्या लक्षात आणून देणे, वरील सर्व ठिकाणचा जनतेच्या जीवनमरणाशी संबंध असल्याने नवीन ट्रामा केअर सेंटर व दर्जावाबाबत शासनाकडून मान्यता मिळण्याची गरज व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".

---

श्री. प्रकाश आबिटकर, मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांनी करावयाचे निवेदन

सद्य:स्थितीत पाथरी, जि. परभणी तसेच सोनपेठ, जि. परभणी येथे प्रत्येकी ३० खाटांची ग्रामीण रुग्णालये आहेत. त्याशिवाय वाढत्या अपघातांमुळे रुग्णांना तातडीने उपचार मिळण्याच्या पार्श्वभूमीवर मानवत, जि. परभणी येथे ट्रामा केअर सेंटर मंजूर करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०४.०२.२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, दिनांक १८ सप्टेंबर, २०२० मधील अटी व शर्तीनुसार प्रस्ताव विहित निकषानुसार तपासण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयांना निर्देशित करण्यात आले होते.

दरम्यान सार्वजनिक आरोग्य सेवेच्या पायाभुत सुविधांबाबत नियोजित पध्दतीने कामे करण्याची आवश्यकता विचारात घेऊन शासनाने दि. २९ मे, २०२५ रोजीच्या आदेशान्वये असा धोरणात्मक निर्णय घेतला आहे की, राज्यातील विविध पातळीवर आधीच हाती घेण्यात आलेली रुग्णालयांची बांधकामे पूर्ण करुन त्या-त्या ठिकाणी आरोग्य सेवा तातडीने उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तद्नंतर नविन रुग्णालयांची मागणी विचारात घेऊन नविन बांधकामांना मंजुरी द्यावी.

******

लक्षवेधी सूचना क्र. ५७८

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अस्लम शेख, श्री. संजय मेश्राम, मा. विधान सभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५७८ पुढीलप्रमाणे आहे:-

"चंद्रपूर जिल्हयात चंद्रपूर येथे फक्त एकच महिला व बाल रूग्णालय असून या रूग्णालयात ब्रम्हपूरी, सिंदेवाही, नागभीड, सावली या तालुक्यासह जिल्हयातील इतरही तालुक्यातील मोठय प्रमाणात महिला व बाल रूग्ण जात असणे, ब्रम्हपूरी, सिंदेवाही, नागभीड, सावली या तालुक्यापासून चंद्रपूरचे अंतर लांब असल्याने अति गंभीर आजारी रूग्ण वेळेवर रुग्णालयात पोहचण्याआधी वाटेतच मृत्यू होत असणे, या कारणास्तव चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी येथे १०० खाटांचे महिला व बाल रुग्णालय सूरू करण्याची मागणी या तालुक्यातील हजारो नागरिकांनी करणे, हे रुग्णालय सुरू झाल्यास या रुग्णालयात ब्रम्हपूरी, सिंदेवाही, नागभीड, सावली या तालुक्यासह गडचिरोली जिल्हयातील आरमोरी, वडसा, कुरखेडा या तालुक्यातील नागरिकांना सुध्दा फायदा होणार असणे, बोडेगावे परिसरात सर्वे नंबर ४११ ही सरकारी जागा असून याठिकाणी ब्रम्हपूरी येथे १०० खाटाचे महिला व बाल रुग्णालयाची निर्मिती होऊ शकत असल्याने लोकप्रतिनिधीसह नागरिकांनी मागणी करणे, मात्र या मागणीकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे नागरिकांत पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी ब्रम्हपूरी येथे १०० खाटाचे महिला व बाल रुग्णालय मंजुर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

---

श्री. प्रकाश आबिटकर, मंत्री, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण, यांचे निवेदन.

चंद्रपूर जिल्हयात ब्रम्हपूरी या तालुक्याचे ठिकाणी सद्यस्थितीत ३० खाटांचे ग्रामिण रुग्णालय कार्यान्वीत आहे. सदर रुग्णालयाचे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन झालेले असुन १०० खाटांची मुख्य इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. तसेच पदनिर्मिती झालेली आहे. नविन श्रेणीवर्धीत इमारतीमध्ये फायर ऑडीटची कामे सुरु असल्यामुळे मुख्य इमारतीचे हस्तांतरणाची प्रक्रिया अद्याप झालेली नाही. ब्रम्हपूरी पासुन चंद्रपूर मुख्यालयाचे अंतर १२५ किमी आहे. तसेच ब्रम्हपूरी पासुन गडचिरोली जिल्हयाचे अंतर ५५ किमी असून गडचिरोली येथे जिल्हा रुग्णालय तसेच महिला व बाल रुग्णालय कार्यान्वीत आहे.

ब्रम्हपूरी येथे १०० खाटांचे अद्ययावत महिला व बाल रुग्णालय मंजुर करण्याचे अनुषंगाने सदर क्षेत्राचे मा. लोकप्रतिनिधी महोदयांनी जिल्हा शल्य चिकित्सक, चंद्रपूर यांचे कार्यालयास

दिनांक ३०/०१/२०२५ नुसार निवेदन / पत्राव्दारे ब्रम्हपूरी लगत मौजा बोडेगाव येथील भुमापन क्र. ४११ क्षेत्रफळ ५.५७ हे. आर. या शासकीय जागेवर महिला व बाल रुग्णालयाचे मंजुरी बाबत प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

दरम्यान सार्वजनिक आरोग्य सेवेच्या पायाभुत सुविधांबाबत नियोजित पद्धतीने कामे करण्याची आवश्यकता विचारात घेऊन शासनाने दि. २९ मे, २०२५ रोजीच्या आदेशान्वये असा धोरणात्मक निर्णय घेतला आहे की, राज्यातील विविध पातळीवर आधीच हाती घेण्यात आलेली रुग्णालयांची बांधकामे पूर्ण करुन त्या-त्या ठिकाणी आरोग्य सेवा तातडीने उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तद्नंतर नविन रुग्णालयांची मागणी विचारात घेऊन बांधकामांना मंजुरी द्यावी.

उपजिल्हा रुग्णालय ब्रम्हपुरी येथील रिक्त पदांची स्थिती वर्ग-१ चे १ पद भरलेले आहे. वर्ग-२ चे १२ पदे रिक्त आहे. वर्ग-३ ची ३१ पदे रिक्त आहेत व वर्ग -४ चे १८ पदे रिक्त आहे.

आयपीएचएस अंतर्गत घेण्यात आलेल्या विशेषज्ञ सेवा खालील प्रमाणे आहेत.

१) उपजिल्हा रुग्णालय, ब्रम्हपूरी, येथे आयपीएचएस अंतर्गत रक्त साठवणुक केंद्र कार्यान्वित असून तेथे रक्तपेढीतंत्रज्ञ कार्यरत आहे. तसेच या रुग्णालयांमध्ये सिझेरियन प्रसुतीची सुविधा उपलब्ध आहे. तसेच गरोदर मातांना सोनोग्राफी सुविधा उपलब्ध आहे. नवजात बालकांसाठी एनबीएसयु विभाग सर्व सुविधासह उपलब्ध आहे.

२) उपजिल्हा रुग्णालय, ब्रम्हपूरी येथे आयपीएचएस अंतर्गत पूर्ण वेळ भिषक व ऑनकॉल सेवा स्त्रीरोगतज्ञ, बालरोगतज्ञ, भुलतज्ञ, क्ष-किरणशास्त्रज्ञ या विशेषज्ञ सेवा तसेच कंत्राटी तत्वावर अधिपरिचारीका, औषध निर्माण अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, क्ष-किरणतज्ञ व व्रणोपचारक या सेवा घेण्यात आलेल्या आहेत.

सन २०२५-२६ (डिसेंबर २५ पर्यंत) कालावधीत ग्रामीण रुग्णालय, ब्रम्हपूरी येथील कार्याचा अहवाल ओपीडी- ८०६९५, आयपीडी ५७२८, मोठया शस्त्रक्रिया -४८५, लहान शस्त्रक्रिया २४०, प्रयोगशाळा चाचण्या- ५१०६३, क्ष-किरण चाचण्या-२६८७, सोनोग्राफी १५६६, प्रस्तुती -८४९ इ. सेवा देण्यात येतात.

****************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. शिवाजी पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.२२४३ पुढीलप्रमाणे आहे :-

---

"कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यामध्ये एकूण ७ प्राथमिक आरोग्य केंद्र व ३४ उपआरोग्य केंद्र आहेत. यातील तुडिये आणि हेरे येथील आरोग्य केंद्राच्या इमारती जीर्ण होणे,मोठ्याप्रमाणात नागरिक या केंद्रातून उपचार घेत असतात. त्यामुळे येथे सुविधा पुरवून नूतनीकरण करणे आवश्यक आहे. तसेच नागणवाडी,जंगमहट्टी,कोलिक,हुसूर,ढोलगरवाडी,कुरणी,ढेकोळी,उमगाव येथे नवीन आरोग्य केंद्र होणे. १)गडहिंग्लज तालुक्यामध्ये ५ प्राथमिक आरोग्यकेंद्र आणि २८ उपआरोग्य केंद्र असून नूल,हलकर्नी,मुंगुरवाडी,महागाव,नेसरी या ५ आरोग्य केंद्राच्या इमारती जीर्ण झाल्या असून येथे सर्व सोयीसुविधा पुरवून नूतनीकरण करणे आवश्यक असणे. २) माझ्या मतदारसंघातील आजरा तालुक्यामध्ये २ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ७ उपआरोग्यकेंद्र असणे, त्यातील मालिग्रे आणि वाटंगी येथे सुविधा पुरवून नूतनीकरण करणे आवश्यक असणे, शिरसंगी आणि चितळे या उपकेंद्रांच्या इमारती बांधून पूर्ण होणे, त्याठिकाणी सुविधा पुरवून तात्काळ ही आरोग्य उपकेंद्र चालू करणे. ३) ही सर्व आरोग्य केंद्र सर्व सोयीसुविधांयुक्त नूतनीकरण करणे गरजेचे आहे. हा भागपूर्ण ग्रामीण असल्याने उपचारासाठी सर्व नागरिक या आरोग्यकेंद्रावर अवलंबून असतात, या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाऊस असतो वारंवार पूर परिस्थिती निर्माण होत असते. काही भागांचा संपर्क तुटतो कधी काळी मोठ्या प्रमाणात नागरिक जखमीदेखील होतात,साचलेल्या पुराच्या पाण्यामुळे अनेक साथीचे आजार पसरतात अशावेळी जर हे आरोग्य केंद्र सोयीसुविधाने परिपूर्ण असतील, तर येथे तात्काळ प्राथमिक उपचार केले जावू शकणे. ४)चंदगड,गडहिंग्लज,आजरा तालुके हे ग्रामीण असून येथील नागरिक सरकारी आरोग्य केंद्रातून उपचार घेत असतात. त्यामुळे इथे सर्व सुविधा पुरविणे व नूतनीकरण करण्याची आवशक्यता, आरोग्य केंद्रांचे सर्व सोयी सुविधांसह नूतनीकरण करण्याकरिता शासनाने यावर करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांनी करावयाचे निवेदन

कोल्हापूर जिल्हयातील चंदगड तालुक्यामध्ये एकूण ९ प्राथमिक आरोग्य केंद्र व ३४ आरोग्य उपकेंद्र आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र, तुडिये इमारत निर्लेखन प्रस्ताव तालुका आरोग्य अधिकारी, पं. स. चंदगड यांचेकडे मागणी केलेली आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, हेरे इमारत निर्लेखनाबाबतचा प्रस्तावर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.गडहिंग्लज तालुक्यामध्ये एकूण १० प्राथमिक आरोग्य केंद्र असून त्यापैकी सांबरे, औरनाळ, अत्याळ, व भडगांव या प्रा. आ. केंद्राचे बांधकाम प्रगतीपथावर असून ५०% बांधकाम पूर्ण झालेल्या प्रा.आ. केंद्राचे पदनिर्मितीच्या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे. गडहिंग्लज तालुक्यातील नूल, हलकर्णी, मुंगूरवाडी, महागांव, नेसरी या आरोग्य केंद्राच्या इमारतीचे नूतनीकरण करणेसाठी संबंधीत वैद्यकीय अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांचेकडून विहित नमुन्यामध्ये प्रस्ताव मागणी करणेची कार्यवाही सुरू आहे.

आजरा तालुक्यातील प्रा.आ. केंद्र मलिग्रे आणि वाटंगी या इमारती नुतणीकरण करणेसाठी जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ मधून निधी मागणी केलेली आहे, प्रा. आ. केंद्र, मलिग्रे व वाटंगी इमारत

बांधकाम प्रगतीपथावर आहे.आजरा तालुक्यातील प्रा.आ. उपकेंद्र शिरसंगी आणि चितळे या इमारती बांधून पूर्ण झालेल्या आहेत, त्या ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध असून सदरची प्रा.आ. उपकेंद्रे सद्या कार्यरत आहेत. चंदगड तालुक्यातील सर्व आरोग्य केंद्रे नुतणीकरण करणे व सोयीसुविधा उपलब्ध करणेबाबत जिल्हा वार्षिक योजनेमधून निधी तरतूद करून घेण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

सर्व आरोग्य केंद्रामधून विस्तारीत १३ सेवा ज्यामध्ये गरोदर माता सेवा, प्रसूती सेवा, बालकांचे लसीकरण व संदर्भ सेवा, असंसर्गजन्य आजार तपासणी व उपचार, जेष्ठ नागरीकांच्या आरोग्य सेवा इ. राष्ट्रीय आरोग्य अभियान  कार्यक्रम याद्वारे नागरीकांना सुविधा पुरविल्या जातात सर्व प्रकारच्या अत्यावश्यक सेवा या सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रामधून पुरविल्या जातात, नागरीकांच्या आरोग्य विषयक जनजागृती, लसीकरण मोहिम यासारखे उपक्रम  आरोग्य केंद्रामधून राबविले जातात.

*************